श्री ज्ञानेश्वरी

अध्याय अठरावा

हा ज्ञानेश्वरीचा शेवटचा अध्याय. हा अध्याय म्हणजें एकाध्यायी गीता आहें. यांत 78 श्लोक असून त्यावर 1811 ओव्या आहेंत. शेवटी एकनाथ महाराजांच्या ज्ञानेश्वरीच्या शुद्धप्रती संबंधी 5 ओव्या आहेंत.

पहिल्या 28 ओव्यात निवृत्तिनाथांची स्तुती असून पुढील 81व्या ओवी पर्यंत गीतेचे महत्व, अध्यायांची एकात्मता वर्णन केली आहें . यातच अर्जुन प्रश्न करितो कीं त्याग आणि संन्यास यात फरक काय. या प्रश्नाचे निमित्त करून पुनः सारांशरूपाने पूर्ण गीता पुढे सांगितली आहें . 373 वी ओवी फार महत्वाची आहें कारण मूळ ज्ञानेश्वरी कोणती हें ठरविण्याचा एक चांगला मार्ग या ओवीत सांगीतला आहें . अध्यायातून अध्याय कसा

निघतो हे 75व्या ओवीत दाखवले आहें .

यातील 112 ते 114,1 54,344 तें 347,587,620,866,या ओव्या सुंदर आहेंत. व शेवटी पसायदान आहे .

श्री ज्ञानेश्वरी
अध्याय अठरावा

जयजय देव निर्मळ । निजजनाखिलमंगळ [1] ।
जन्मजराजलदजाळ-। प्रभंजन [2] ।।+1।।
जयजय देव प्रबळ । विदळितामंगळकुळ [3] ।
निगमागमद्रुमफळ [4] । फलप्रद ।।+2।।
जयजय देव सकळ । विगतविषयवत्सल [5] ।
कलितकाळकौतूहल [6]। कलातीत [7]।।+3।।
जयजय देव निश्चळ । चलितचित्तपानतुंदिल [8]।
जगदुन्मीलनाविरल [9] । केलिप्रिय ।।+4।।
जयजय देव निष्कळ । स्फुरदमंदानंदबहळ [10]।
नित्यनिरस्ताखिलमळ [11] । मूळभूत ।।+5।।
जयजय देव स्वप्रभ । जगदंबुदगर्भनभ [12] ।
भुवनोद्भवारंभस्तंभ [13] । भवध्वंस ।।+6।।
जयजय देव विशुद्ध । विदुदयोद्यानद्विरद [14] ।
शमदममदनमदभेद [15] । दयार्णव ।।+7।।
जयजय देवैकरूप । अतिकृतकंदर्पसर्पदर्प [16] ।
भक्तभावभुवनदीप [17] । तापापह [18]।।+8।।
जयजय देव अद्वितीय।परिणतोपरमैकप्रिय [19]।
निजजनजित [20] भजनीय । मायागम्य ।।+9।।
जयजय देव श्रीगुरो!।अकल्पनाख्यकल्पतरो[21]!।
स्वसंविद्द्रुम बीजप्ररो-[22] । हणावनी।।+10।।
हे काय एकैक ऐसैसे । नानापरि भाषावशे ।
स्तोत्र करूं तुजोद्देशे, । निर्विशेषा ! ।।11।।
जिहीं विशेषणीं विशेषिजी,।ते,दृश्य नव्हे रूप तुझे।
हे जाणे मी,म्हणौनि लाजे।वानणा [23] इहीं ।।12।।
परी,मर्यादेचा सागरु । हा तंवचि तया डगरु [24],।
जंव न देखे सुधाकरु । उदया आला ।।13।।
सोमकांतु निजनिर्झरी [25]। चंद्रा अर्ध्यादिक न करी।
ते, तोचि , अवधारी, । करवी कीं जी ! ।।14।।
नेणो कैसी वसंतसंगें । अवचितिया वृक्षाचीं अंगे।
फुटती ! तै हे तयांही जोगें । धरणें नोहे ?।।15।।
पद्मीनी रविकिरण । लाहे [26],मग लाजे कवण?।
कां, जळें शिवतले लवण ,। आंग भुले ! ।।16।।

1 स्वभक्ताला सर्वथैव मंगलकारक 2 जन्मवा-
वार्धाक्यरुपी मेघांचा नाश करणारा वायु
3 अशुभांचे समुदायाचा ज्याने नाश केला आहे
असा 4 वेद शास्त्ररुपी वृक्षाचे फळ देणारा
5 विषयवासना नष्ट केलेल्यांचा कैवार घेणारा
6 मृत्युंजय 7 परीपूर्ण
8 चंचळ विषय पिऊन पोट मोठे झालेला
9 जग उत्पन्न करण्याची नेहमी क्रीडा करणारा
10 उत्कट आनंदाला उत्पन्न करणारे
11 सर्व पापांचा निरंतर नाश करणारा
12 जगतरुपे मेघास आकाशासारखा आधारभूत
13 जगाच्या उत्पत्तीचा मुळ आधार
14 अविद्यारुपी वनाचा नाश करणारा हत्ती
15 संयमाने व इंद्रियनिग्रहाने कामाचा नाश
करणारा 16 मदन सर्पाचा गर्व उतरवीणारा
17 भक्तचित्तरुप गृहाला प्रकाशित
करणारा 18 तापहर्ता19 पूर्ण शांती प्राप्त
झालेले प्रिय असणारा 20 भक्तवश
21 निरिच्छ पुरुषांचा कल्पतरु
22 आत्मज्ञान वृक्षाची
बीज रुजवण्याची जागा
23 स्तुती करणारा
24 प्रसिद्ध
25 स्वतःमधून पाझरणाऱ्या पाण्याने
26 मिळते

तैसा, तूते जेथ मी स्मरें , । तेथ, मीपण मी विसरे।
मग जाकळिला [1]ढेकरें , । तृप्तु जैसा ।।17।।
मज तुवां जी केलें तैसें । माझे मीपण दवडूनि देशें[2] ।
स्तुतिमिषें च पां पिसें[3] । बांधले वाचे ।।18।।
ना, एऱ्हवीं तरी ,आठवी । राहोनि [4], स्तुति जैं करावी , ।
तै, गुणागुणिया [5] धरावी । सरोभरी[6] की ? ।।19।।
तरी, तूं जी एकरसाचे लिंग । केवीं करूं गुणागुणी विभाग ? ।
मोतीं फोडोनि सांधितां चांग ? । कीं तैसेंचि भले ? ।।20।।
आणि, ''बाप ! तूं माय '' । इही बोली ना स्तुती होय ।
डिंभोपाधिक [7] आहे । विटाळू [8] तेथें।।21।।
जी ! जालेनि[9] पाइकें आलें [10]। ते गोसावीपण [11]केवीं बोलें ?।
ऐसे उपाधी उशिटलें[12] । काय वर्णू ? ।।22।।
जरी आत्मा तूं एकसरा [13] , । हेंही म्हणतां , दातारा ! ।
तरी, आंतुल [14] तूं बाहेरा । घापतासी [15] ।।23।।
म्हणौनि, सत्यचि, तुजलागीं । स्तुती न देखों जी जगीं , ।
मौनावांचूनि लेणे आंगी । सुसीना मा ! [16] ।।24।।
स्तुती कांहीं न बोलणें , । पूजा कांहीं न करणें, ।
सन्निधी [17] कांहीं न होणें । तुझ्या ठायी ।।25।।
तरी, जिंतलें जैसे भुली[18] , । पिसे आलापु घाली, ।
तैसे, वानूं ते माऊली ! । उपसाहावें तुवां ।।26।।
आतां, गीतार्थाची मुक्तमुदी [19] । लावीं माझिये वाग्वृद्धी ।
जे माने [20] हे सभासदीं । सज्जनांच्या ।।27 ।।
तेथ म्हणितलें श्रीनिवृत्ती । '' नको हे पुढतपुढती ।
परिसीं लोहा घृष्टी किती । वेळवेळां कींजे गा ? ।।28।।
तंव विनवी ज्ञानदेवो । म्हणे, ''हो कां जी पसावो [21] ।
तरी अवधान देतु देवो । ग्रंथा आतां ।।29।।
जी !गीतारत्नप्रासादाचा । कळसु अर्थचिंतामणीचा ।
सर्व गीतादर्शनाचा । पाढाऊं [22] जो ।।30।।
लोकीं तरी आथी [23] ऐसे, । जे दुरूनि कळसु दिसे ।
आणी भेटीचि हातवसे [24] । देवतेची तिये ।।31।।
तैसेचि एथही आहे । जे एकेचि येणें अध्यायें ।
आघवाचि दृष्ट होये । गीतागमु हा ।।32।।
मी कळसु याचि कारणें । अठरावा अध्यायो म्हणें ।
उवाइला [25] बादरायणें[26] । गीताप्रासादा ।।33।।

1 पोट भरलेला
2 देशोधडीला लाऊन
3 वेड लाऊन
4 देहभान ठेऊन
5 गुण आणि गुणी 6 निवड करणे
7 मातृत्व,पितृत्व 8 दोष
9 जन्मताच 10 सेवकपणा
11 मालका सारखे12 अशा दोषांनी डागाळलेला 13एकमेव
14 अंतरात्म्यातून
15 बाहेर घालवून दिल्यासारखे होते 16 घालीत नाहीं ना
17 जवळीक
18 भ्रम झाल्यावर
19 मोत्याच्या अंगठीचा शिक्का
20 जीला मान आहे
21 प्रसाद द्या
22 वाटाड्या
23 आहे
24 आवाक्यात आणते
25 घातला
26 व्यासांनी प्रसन्न होऊन

नोहे कळसापरतें कांहीं । प्रासादी काम नाही ।
ते सांगतसे गीता ही । संपलेपणें ।।34।।
व्यासु सहजी सूत्री बळी [1] । तेणें निगमरत्नाचळी [2]।
उपनिषदार्थाची माळी [3]-। माजीं खांडिली [4] ।।+35।।
तेथ, त्रिवर्गाचा [5] अणुआरु [6] । आडऊ [7] निघाला जो अपारु, ।
तो महाभारतप्राकारु [8] । भोंवता केला ।।+36।।
माजीं आत्मज्ञानाचे एकवट । दळवाडे [9] झाडूनि चोखट ,।
घडिले पार्थ वैकुंठ-।संवाद कुसरी [10] ।।37।।
निवृत्तिसूत्र सोडवणिया[11] । सर्व शास्त्रार्थ पुरवणिया ।
आवो साधिला[12] मांडणिया । मोक्षरेखेचा ।।+38।।
ऐसेनि करितां उभारा, । पंधरा अध्यायांत पंधरा ।
भूमी निर्वाळलिया पुरा । प्रासादु जाहला ।।39।।
उपरी सोळावा अध्यायो, । तो ग्रीवघंटेचा[13] आवो ,।
सप्तदशु तोचि ठावो । पडघाणिये [14] ।।40।।
तयाहीवरी अष्टादशु, । तो अपैसा मांडला कळसु।
उपरी गीतादिकीं व्यासु । ध्वजे लागला ।।41।।
म्हणौनि, मागील जे अध्याये, । ते चढते भूमीचे आये [15] ।
तयांचे पुरे दाविताहे । आपुल्या आंगी ।।42।।
जालया कामा नाहीं चोरी [16] । ते कळसें होय उजरी [17] ।
तेवीं अष्टादशु विवरी [18] । साद्यंत गीता ।।43।।
ऐसा व्यासें विंदाणिये [19], । गीताप्रासादु सोडवणिये [20], ।
आणूनि राखिले प्राणिये । नानापरी ।।44।।
एक प्रदक्षिणा जपाचिया[21] ,। बाहेरोनि करिती यया, ।
एक ते श्रवणमिषें छाया । सेविती ययाची ।।45।।
एक ते अवधानाचा पुरा । विडापाऊड [22], भीतरां, ।
घेऊनि, रिघती गाभारां । अर्थज्ञानाच्या ।।46।।
ते निजबोधें उराउरी । भेटती आत्मया श्रीहरी ।
परी मोक्षप्रासादी सरी [23] । सर्वांही आथी ।।47।।
समर्थाचिये पंक्तिभोजनें,।तळिल्या वरिल्या [24],एकचि पक्वान्नें।
तेवीं, श्रवणें, अर्थे, पठणें । मोक्षुचि लाभे ।।48।।
ऐसा गीता वैष्णवप्रासादु, । अठरावा अध्याय कळसु ,विशदु।
म्यां म्हणितला, हा भेदु । जाणोनियां ।।49।।
आतां सप्तदशापाठीं । अध्याय कैसेनि उठी?, ।
तो संबंधु सांगों , दिठी । दिसे तैसा ।।50।।

1 समर्थ सूत्रकार असल्याने
2 वेदरत्नरुपी डोंगराच्या 3 पठार
4 खणले 5 धर्म,अर्थ,काम
6 चाराचुरा 7 डबर 8 तट
9 चीरे
10 कौशल्याने
11 निवृत्तिसूत्राचा ओळंब्याने
12 आकार केला
13 गळमण्याचा आकार
14 कळसाच्या बैठकीची जागा
15 मजल्यांचे आकार
16 हयगय 17 स्पष्ट
18 विवरण करतो
19 कारीगर 20 मुक्त करण्याकरिता
21 गीतापाठ करून
22 पैजेने
23 योग्यता
24 खालच्या वरच्या

कां, गंगायमुना उदक, । वोघबगे [1] वेगळिक ।
दावी, होऊनि एक । पाणीपणें ।।51।।
न मोडता दोन्ही आकार, । घडिलें एक शरीर।
हे अर्धनारी नटेश्वर-। रूपीं दिसे ।।52।।
नाना, वाढिली दिवसे, । कळा बिंबी पैसे [2] ।
परी सिनाने लेवे [3] जैसे । चंद्रीं नाहीं ।।53।।
तैसीं सिनानी चारी पदें [4] । श्लोक तो शलोकावच्छेदें ।
अध्यावो अध्यायभेदें । गमे कीर ।।54।।
परी प्रमेयाची उजरी [5] । आनान रूप न धरी ।
नाना, रत्नमणीं ,दोरी । एकचि जैसी ।।55।।
मोतियें मिळोनि बहुवे ,। एकावळीचा पाडु [6] आहे ।
परी शोभे रूप होये । एकचि तेथ ।।56।।
फुलाफुलसरा [7] लेख चढे [8] ,।द्रुतीं , दुजी अंगुळी न पडे [9]।
श्लोक अध्याय तेणें पाडे । जाणावे हे ।।57।।
सात शते श्लोक । अध्यायां अठरांचे लेख [10] ।
परी देवो बोलिले एक । जे दुजे नाहीं ।।58।।
आणि म्यांही न सांडूनि ते सोये [11] ।ग्रंथ व्यक्ती केली आहे,।
प्रस्तुत, तेणें निर्वाहे [12] । निरूपण आइका ।।59।।
तरी सतरावा अध्यावो । पावतां पुरता ठावो ।
जे संपतां [13] श्लोकीं, देवो । बोलिले ऐसें , ।।60।।
''अर्जुना ! ब्रह्मनामाच्याविखीं।बुद्धि सांडूनि आस्तिकीं [14] ,।
कर्मे कींजती, तितुकीं । असंते होती'' ।।61।।
हा ऐकोनि देवाचा बोलु,। अर्जुना आला डोलु [15] ।
म्हणे,'' कर्मनिष्ठां मळु । ठेविला देखों ''।।62।।
तो अज्ञानांधु तंव, बापुडा ,। ईश्वरुचि न देखे ,एवढा,।
तेथ नामचि [16] एक पुढां । कां सुझे [17] तया ? ।।+63।।
आणि, रजतमें दोन्हीं । गेलियावीण ,श्रद्धा सानी [18] ,।
ते का लागे अभिधानी [19] ?। ब्रह्माचिये ।।64।।
मग कोता [20] खेंव [21] देणे ,। वार्तेवरील [22] धांवणे, ।
सांडी पडे [23] खेळणे । नागिणीचें ते ।।65।।
तैसीं, कर्मे दुवाडें [24], । तयां जन्मांतराची कडे, ।
दुर्मेळावे येवढे । कर्मामाजी ! ।।66।।
ना विपाये हे उजु होये, । तरी ज्ञानाची योग्यता लाहे।
एऱ्हवीं , येणेंचि [25] जाये । निरयालया [26] ।।67।।

1 ओघाच्या संबंधाने
2 चंद्रकोर वाढते
3 वेगळे लेप नाहीं दिले
4 चार चरणामुळे
5 प्रतिपाद्य विषयाची मांडणी
6 एकसरीचाच आकार आहे
7 फुले आणि हार 8 वासाची गणती
मोजण्यास 9 दुसरे बोट मोडावे
लागत नाही 10 संख्या
11 रीत
12 त्याच पद्धतीने
13 शेवटी
14 ॐ तत्सत्
15 आनंद झाला
16 ॐ तत्सत् हे नाम 17 समजेल
18 कमी प्रतीची
19 कल्पना
20 शस्त्र 21 आलिंगन
22 दोरीवर 23 व्यर्थ होते
24 कठीण
25 कर्मामुळेच 26 अधोगतीला

कर्मी हा ठायवरी । आहाती बहुवा अवसरी [1] ।
आतां कर्मठा कैंवारी [2]। मोक्षाची हे ? ।।68।।
तरी फिटो कर्माचा पांगु, । कींजो अवघाचि त्यागु, ।
आदरिजो अव्यंगु । संन्यासु हा ।।69।।
कर्मबाधेची कहीं । जेथ भयाची गोठी नाहीं ।
ते आत्मज्ञान जिहीं । स्वाधीन होय ।।70।।
ज्ञानाचें आवाहनमंत्र । जे ज्ञान पिकते सुक्षेत्र ।
ज्ञान आकर्षिते सूत्र-। तंतु जे का, ।।71।।
ते दोनी संन्यास त्याग । अनुष्ठुनि, सुटे जग ।
तरी हेचि आतां चांग । व्यक्त पुसों ''।।72।।
ऐसें म्हणौनि पार्थे । त्यागसंन्यासव्यवस्थे ।
रूप होआवया जेथें । प्रश्नु केला, ।।73।।
तेथ प्रत्युत्तरें बोली, । श्रीकृष्णें जे चावळिली ।
तया व्यक्ती जाली । अष्टादशा ।।74।।
एवं, जन्यजनकभावें [3] । अध्यावो अध्यायाते प्रसवे ।
आतां ऐका बरवें । पुसिले जे ।।75।।
तरी पंडुकुमरे तेणें । देवाचे सरते बोलणें ।
जाणोनि अंतःकरणे । काणी घेतली [4] ।।76।।
एऱ्हवीं, तत्त्वाविषयी भला । तो निश्चितु असे कीर जाहला, ।
परी देवो राहे उगला, । ते साहावेना ।।77।।
वत्स धालयाही वरी [5] । धेनु न वचावी [6] दुरी ।
अनन्य प्रीतीची परी । ऐसी आहे ।।78।।
तेणें काजेवीणही बोलावे । ते देखिले [7] तरी पाहावे ।
भोगितां चाड दुणावे । पढियंतयाठायी [8]।।79।।
ऐसी प्रेमाची हे जाती, । आणि पार्थ तंव तेचि मूर्ती, ।
म्हणौनि, करूं लाहे खंती । उगेपणाची ।।80।।
आणि संवादाचेनि मिषे, । जे अव्यवहारी [9] वस्तु असे ,।
तेचि भोगिजी कीं, जैसें । आरिसां रूप ।।+81।।
मग संवादु तोही पारुखे, । तरी भोगितां भोगणें थोके [10] ।
हे कां साहावेल ,सुखे । लांचावलेया ?।।82।।
यालागी त्याग संन्यास । पुसावयाचे घेऊनि मिस [11] ,।
मग उपलविले दुस [12] । गीतेचें ते ।।83।।
अठरावा अध्यावो नोहे ! । हें एकाध्यायी गीताचि आहे ।
जैं वांसरुचि गाय दुहे । तै वेळु कायसा ! ।।84।।

1 हरकती
2 वेळ
3 कार्यकारण भावाने
4 उदास झाला
5 दुधाने पोट भरले तरी
6 दूर जात नाही
7 एकदा पाहिले तरी
8 प्रेमिकाची
9 दाखवता न येणारी
10 थांबते
11 निमित्त
12 वस्त्र उलगडले

तैसी संपतां अवसरीं ,। गीता आदरविली माघारीं।
स्वामी भृत्याचा[1] न करी । संवादु [2]काई ? ।।85।। — 1 सेवकाचा 2बोलण्याचा मान ठेवत नाही
परी हे असो; ऐसें । अर्जुने पुसिजत असे ।
म्हणे,''विनंती विश्वेशें । अवधारिजो ।।86।।

अर्जुन उवाच

संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ।।1।।

अर्जुन म्हणाला- हे महाबाहो हृषीकेशा! संन्यासांतील तत्त्व, आणि हे केशिदैत्यनिषूदना ! त्यागातील तत्त्व मी पृथक् जाणू इच्छितो

हां जी ! संन्यासु आणि त्यागु । इयां दोही एक अर्थीं लागु ।
जैसा सांघातु[3] आणि संघु [4]। संघातेचि बोलिजे ।।87।। — 3 एकत्र आलेले 4 जमाव
तैसेंचि त्यागें आणि संन्यासें । त्यागुचि बोलिजतु असे ।
आमचेनि तंव मानसें । जाणिजे हेचि ।।88।।
ना, कांहीं आथी अर्थभेदु, । तो देवो करोतु विशदु ''।
तेथ म्हणती श्रीमुकुंदु । '' भिन्नचि पैं ।।89।।
तरी अर्जुना तुझ्या मनी, । त्याग संन्यास दोनी ।
एकार्थ गमले, हें मानीं । मीही साच ।।90।।
इहीं दोही कीर शब्दीं । त्यागुचि बोलिजे त्रिशुद्धी ।
परी कारण एथ भेदी । येतुलेंचि, ।।91।।
जे निपटूनि कर्म सांडिजी । ते सांडणे संन्यासु म्हणिजे, ।
आणि फलमात्र का त्यजिजे । तो त्यागु गा ।।92।।
तरी कोणा कर्माचें फळ । सांडिजे, कोण कर्म केवळ, ।
हेही सांगो विवळ [5] । चित्त दे पां ।।93।। — 5 स्पष्ट
तरी अपैसीं दांगे [6],डोंगर,। झाडें डाळती [7] अपार, । — 6 अरण्यात 7 उगवतात
तैसें लांबे [8], राजागर [9] । नुठिती ते ।।94।। — 8 भाताचे शेत 9 राजाचा बगीचा
न पेरितां सैंध[10] तृणे । उठती, तैसें साळीचे होणे । — 10 जिकडेतिकडे
नाहीं गा, राबाउणे [11]। जियापरी ।।95।। — 11 मशागत केल्याशिवाय
का, अंग जाहले सहजे, । परी लेणे उद्यमे कीजे ।
नदी आपैसी, आपादिजे [12] । विहिरी जेवी ।।96।। — 12 प्रयत्न पूर्वक मिळवावी लागते
तैसें नित्य, नैमित्तिक । कर्म, होय स्वाभाविक ।
परी, न कामितां, कामिक [13] । न निफजे [14]जे ।।97।। — 13 काम्य 14 उत्पन्न होत नाही

श्रीभगवानुवाच

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणा ः ।।2।।

काम्य म्हणून जेवढी कर्मे त्यांचा न्यास म्हणजे सोडणे याला शाहाणे लोक संन्यास असे समजतात; व सर्व कार्मांच्या फलाचा त्याग करणे याला पंडित त्याग असे म्हणतात.

का कामनेचेनि दळवाडे [1] । जे उभारावया घडे, ।
अश्वमेधादिक फुडे । याग जेथ ,।।98।।
वापी,कूप आराम[2],। अग्रहारे [3] ,हन ,महाग्राम ,।
आणीकही नानासंभ्रम । व्रतांचे ते।।99।।
ऐसें , इष्टापूर्त [4]सकळ । जया कामना एक मूळ ।
जे केले, भोगवी फळ । बांधोनियां।।100।।
देहाचिया गांवा आलिया, । जन्ममृत्यूचिया सोहळिया ।
ना म्हणो नये धनंजया ! । जियापरी ।।101।।
का, ललाटीचे लिहिले । न मोडे गा! कांहीं केले, ।
काळेगोरेपण धुतले, । फिटों नेणें ।।102।।
केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसे [5] ।
न फेडितां ऋण जैसें । वोसंडीना [6] ।।103।।
का, कामनाहीं न करितां,। अवसांत [7] घडे ,पंडुसुता ! ।
तरी, वायकांडें [8] न झुंझता । लागे जैसे ।।104।।
गूळ नेणतां तोंडीं । घातला, देचि गोडी, ।
आगी , मानूनि राखोंडी । चेपिला[9] , पोळी ।।105।।
काम्यकर्मी हे एक । सामर्थ्य आथी [10] स्वाभाविक ।
म्हणौनि, नको कौतुक । मुमुक्षु एथ ।।106।।
किंबहुना पार्था ! ऐसें । जे काम्य कर्म गा असे, ।
ते त्यजिजे विष जैसे । वोकूनिया ।।107।।
मग तया त्यागाते जगी । संन्यासु ऐसया भंगी [11] ,।
बोलिजे अंतरंगी । सर्वद्रष्टा ।।108।।
हे काम्यकर्म सांडणे, । ते कामनेतेचि उपडणे ।
द्रव्यत्यागे दवडणे । भय जैसे ।।109।।
आणि सोमसूर्यग्रहणें । येऊनि, करविती पार्वणें, ।
का, मातापितरमरणे । अंकित [12] जे दिवस ।।110।।
अथवा, अतिथी हन पावे , । हे ऐसैसें पडे जैं करावे, ।
तै, ते कर्म जाणावे । नैमित्तिक गा ! ।।111।।

1 मोठा ढीग
2 बगीचा 3 निर्वाहाकरिता ब्राह्मणाला दिलेले ईनामी जमीन
4 इच्छा पूर्ती करणारे
5 तगादा करते
6 कमी होत नाहीं
7 अकस्मात
8 वायफळ बाण
9 पाय दिला
10 आहे
11 रीतीने
12 निमित्त

वार्षिया क्षोभे गगन, । वसंते दुणावे वन ।
देहा शृंगारी यौवन-। दशा जैसी ।।112।।
का, सोमकांतु सोमें पघळे, । सूर्ये फांकती कमळें , ।
एथ असे ,तेंचि पाल्हाळे [1] ,। आन नये ।।113।। 1 विस्तार पावते
तैसें , नित्य जे का कर्म । ते चि निमित्ताचे लाहे नियम ।
एथ उंचावे, तेणें नाम । नैमित्तिक होय ।।114।।
आणि, सायंप्रातर्मध्यान्हीं , । जे का करणीय [2] प्रतिदीनीं, । 2 करण्यास योग्य
परी, दृष्टि जैसी लोचनीं । अधिक नोहे ।।115।।
कां, नापादितां [3] गती । चरणीं , जैसी आथी । 3 संपादन न करिता
नातरी, ते दीप्ती । दीपबिंबी ।।116।।
वासु नेदितां जैसे । चंदनीं सौरभ्य [4] असे। 4 सुवास
अधिकाराचें तैसे । रूपचि जे ।।117।।
नित्य कर्म ऐसें जनीं । पार्था! बोलिजी, ते मानी ।
एवं नित्य नैमित्तिक दोन्हीं । दाविलीं तुज ।।118।।
हे चि नित्यनैमित्तिक । अनुष्ठेय आवश्यक ।
म्हणौनि, म्हणों पाहती एक । "वांझ [5] ययाते " ।।119।। 5 फळ न देणारे
परी भोजनीं जैसे होये, । तृप्ति लाहे भूक जाये ।
तैसे नित्यनैमित्तिकीं आहे । सर्वांगी फळ ।।120।।
कींड [6] आगिठां पडे, । तरी ,मळु तुटे ,वानी [7] चढे । 6 हिणकस सोने 7 कस वाढतो
यया कर्मा तया सांगडे [8] । फळ जाणावें।।121।। 8 सारखे
जे प्रत्यवाय [9] तंव गळे, । स्वधिकार बहुवे [10] उजळे, । 9 दोष 10 खूप
तेथ हातोफळिया [11] मिळे । सद्गतीसी ।।122।। 11 त्वरित
येवढेवरी ढिसाळ [12] । नित्यनैमित्तिकी आहे फळ, । 12 सामर्थ्य
परी ते त्यजिजे ,। मूळ नक्षत्री जैसें ।।123।।
लता [13] पिके आघवी [14] । तंव च्युत बांधे पालवीं [15] ,। 13 वेल 14 संपूर्ण 15 पानगळती
मग हात न लावित , माधवीं [16] । सोडूनि घाली ।।124।। सुरु होते 16 वसंतशोभा
तैसी, नोलांडितां कर्मरेखा, । चित्त दीजे नित्यनैमित्तिका।
पाठीं, फळा कीजे अशेखा [17] । वांताचे वानी [18] ।।125।। 17 संपूर्ण 18 ओकारी सारखे
यया कर्म फळत्यागाते । त्यागु म्हणती पै, जाणते ।
एवं, त्याग संन्यास तूतें। परिसविले ।।126।।
हा संन्यासु जैं संभवे, । तैं , काम्य बाधूं न पावे ।
निषिद्ध तंव स्वभावें । निषेधें गेले ।।127।।
आणि नित्यादिक जे असे, । ते येणे पळत्यागे नासे ।
शिर लोटलिया [19] जैसें । येर आंग ।।128।। 19 तोडल्यावर

मग, सस्य[1], फळपाकांत[2] । तैसें निमालिया [3] कर्मजात, ।	1 धान्य 2 फळ पिकल्यावर 3 नष्ट
आत्मज्ञान गिवसित [4] । अपैसें ये ।।129।।	झाल्यावर 4 शोधत 5 व्यवस्थित पणे
ऐसिया निगुती [5] ,दोनी । त्याग, संन्यास अनुष्ठानीं [6] ,।	6 आचरण करून
पडले गा आत्मज्ञानी । बांधती पाटु [7] ।।130।।	7 अधिकार योग्य होतात
नातरी हे निगुती चुके, । मग त्यागु कीजे हाततुके [8],।	8 अंदाजाने
तैं , कांहीं न त्यजे,अधिके । गोवींचि [9] पडे ।।131।।	9 गुंता होतो
जे औषध ,व्याधी अनोळख [10],।ते घेतलिया,परते विख ।	10 व्याधी न जाणता
कां, अन्न न मानितां [11] ,भूक । मारी ना काय ?।।	11 अन्न सेवन न केले
म्हणौनि, त्याज्य जे नोहे, । तेथ त्यागाते न सुवावें[12]।	12 आचरावे
त्याज्यालागी नोहावें । लोभापर ।।133।।	
चुकलिया त्यागाचें वेझें[13],। केला सर्वत्यागुही होय वोझें ,।	13 मर्म
न देखती सर्वत्र दुजे [14] ,। वीतराग ते ।।+134।।	14 दुसरे म्हणजे त्याज्य

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ।।3।।

कर्म दोषयुक्त म्हणून त्याचा सर्वस्वी त्याग करावा असे कित्येक पंडित म्हणतात; आणि यज्ञ,दान,तप व कर्म यांचा कधीहि त्याग करूं नये असे दुसऱ्यांचे म्हणणे आहे .

एकां फळाभिलाष न ठके [15],। ते कर्माते म्हणती बंधके ,।	15 साधत नाहीं
जैसें, आपण नग्न, भांडके [16] । जगाते म्हणे ।।135।।	16 भांडखोर
कां, जिव्हालंपट रोगिया । अन्नें दूषी धनंजया ! ।	
आंगा न रूसे कोढिया [17], । मासियां कोपे ।।136।।	17 कोड असलेला
तैसें फळकाम [18] दुर्बळ, । म्हणती कर्मचि किडाळ [19] ।	18 फळाभिलाषी 19 निंद्य
मग निर्णयो देती केवळ । त्यजावें ऐसा ।।137।।	
एक म्हणती यागादिक । करावेंचि आवश्यक, ।	
जे यावांचूनि शोधक । आन नसे ।।138।।	
मनशुद्धीच्या मार्गी ।जैं विजयी व्हावें वेगीं, ।	
तैं कर्म सबळालागीं (संबंधालागी)। आळसु न कीजे ।।139।।	
भांगार[20] आथी शोधावें,। तरी आगी जेवी नुबगावें[21] ।	20 सोने 21 कंटाळु नये
कां, दर्पणालागी सांचावे । अधिक रज [22] ।।140।।	22 धूळ
नाना, वस्त्रें चोख होआवी, । ऐसें आथी जरी जीवीं , ।	
तरी संवदणी [23] न मनावी । मलिन जैसी ।।141।।	23 कपडे धूण्याचे भांडे
तैसीं, कर्मे क्लेशकारें । म्हणौनि न न्यावी अव्हेरें ,।	
कां, अन्नलाभे अरुवारें[24], । रांधितिये उणे [25] ।।142।।	24 अन्नदेणारा चांगला 25 रांधणारा वाईट

इहीं इहीं गा शब्दीं , । एक, कर्मी बांधिती बुद्धी।
ऐसा त्यागु विसंवादी[1] । पडोनि ठेला ।।143।। 1 मतभिन्नतेत
तरी विसंवादु तो फिटे, । त्यागाचा निश्चयो भेटे, ।
तैसें बोलों गोमटे । अवधान देई ।।144।।

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम् ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ।।4।।
तरी हे भरतश्रेष्ठा! त्यागाबद्दल माझा निर्णय काय तो एक . हे पुरुषश्रेष्ठा त्याग तीन प्रकारचा सांगितला आहे .

तरी त्यागु एथे पांडवा ! । त्रिविधु पै जाणावा।
तया त्रिविधाही बरवा । विभाग करूं ।।145।।
त्यागाचे तीन्ही प्रकार । कीजती जरी गोचर[2] ,। 2 स्पष्ट
तरी तूं इत्यर्थाचे[3] सार । इतुले जाण ।।146।। 3 तात्पर्य
मज सर्वज्ञाचिये बुद्धी, । जे अलोट[4] माने त्रिशुद्धी, । 4 सत्य
निश्चयतत्त्व ते आधीं । अवधारी पां! ।।147।।
तरी आपुलिये सोडवणें । जो मुमुक्षु जागों म्हणे, ।
तया सर्वस्वें करणे । हेंचि एक ।।148।।

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ।।5।।
यज्ञ,दान,तप आणि कर्म यांचा त्याग करू नये; ती कर्मे केलीच पाहिजेत. यज्ञ,दान व तप ही शाहाण्या पुरुषासहि पावन म्हणजे चित्तशुद्धिकारक आहे त.

जिये यज्ञदानतपादिकें । इयें कर्में आवश्यकें , ।
तिये न सांडावी, पांथिकें । पाउले जैसीं ।।149।।
हारपलें न देखिजे, । तंव तयाचा मागु न सांडिजे, ।
का, तृप्त न होतां न लोटिजे । भाणें[5] जेवीं ।।150।। 5 ताट
नाव थडी[6] न पवतां, । न खांडिजे केळी, न फळतां ,। 6.तीर
कां, ठेविलें न दिसतां, । दीपु जैसा ।।151।।
तैसी, आत्मज्ञानविखीं[7] ,। जंव निश्चिती नाहीं निकी[8] ,। 7 आत्मज्ञानाविषयी 8 चांगली
तंव नोहावे यागादिकीं , । उदासीन ।।152।।
तरी स्वाधिकारानुरुपें । तिये यज्ञदानें , तपें ।
अनुष्ठावींचि साक्षेपे[9] । अधिकेंवर[10] ।।153।। 9 यथाविधी 10 आधिकच

जे चालणे वेगावत जाये, । तो वेगु बैसावयाचि [1] होये ।		1 विश्रांती मिळण्यास
तैसा, कर्मातिशयो आहे । नैष्कर्म्यालागीं ।।154।।
अधिकें जंव जंव औषधी । सेवनेचि मांडी बांधी [2], ।		2 निश्चय केला जातो
तंव तंव मुकिजे व्याधी । तयाचिये ।।155।।
तैसीं, कर्मे हातोपातीं [3] । जै कीजती यथानिगुती, ।		3 लवकर
तैं रजतमे झडती । झाडा देऊनी ।।156।।
का, पाठोवाटी [4] पुटें,। भांगारा खारु देणें घटे, ।		4 एकामागून एक
तैं कींड झडकरी तुटे । निर्व्याजु [5] होय ।।157।।		5 शुद्ध
तैसे, निष्ठा केलें कर्म, । ते झाडी करूनि [6] रजतम, ।		6 नाहींसे करून
सत्त्वशुद्धीचें धाम ।डोळां दावी ।।158।।
म्हणौनियां धनंजया! । सत्त्वशुद्धी गिंवसितया [7] ।		7 शोधत
तीर्थांचिया सावाया [8] । आली कर्मे ।।159।।		8 बरोबरीने
तीर्थे बाह्यमळु क्षाळे, । कर्मे अभ्यंतर उजळे,।
एवं, तीर्थे जाण , निर्मळें । सत्कर्मेचि ।।160।।
तृषार्ता मरुदेशीं ,। झळे [9] अमृते वोळली [10] जैसीं ।		9 वाऱ्याची झळ 10 ओलावा असलेली
कीं, अंधालागी डोळ्यांसी । सूर्यु आला ।।161।।
बुडतया नदीच धाविन्नली, । पडतया पृथ्वीच कळवळिली,।
निमतया[11] मृत्यूनें दिधली । आयुष्यवृद्धी ।।162।।		11 मरणपंथाला लागलेल्याला
तैसें कर्मे कर्मबद्धता। मुमुक्षु सोडविले पंडुसुता!
जैसा रसरीती[12] मरतां, । राखिला ,विषें ।।163।।		12 औषधोपचाराने
तेसीं एके हतवटिया [13] । कर्मे कींजती धनंजया ! ।		13 हातोटीने
बंधकेचि सोडवावया । मुख्ये होती ।।164।।
आतां, तेचि हातवटी । तुज सांगों गोमटी, ।
जया कर्माते किरीटी ! । कर्मचि रुसे ।।165।।

एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ।।6।।

म्हणून ही यज्ञदानदि कर्मे सुद्धा आसक्ति न ठेवितां फलांचा त्याग करून इतर निष्काम कर्माप्रमाणेच लोकसंग्राहार्थ केली पाहिजेत असे, हे पार्था! माझे निश्चित मत असून तेच उत्तम आहे .

तरी महायागप्रमुखें । कर्मे निफजतांही अचुकें ।
कर्तेपणाचे न ठाके । फुंजणे आंगी [14] ।।166।।		14 कर्तेपणाचा अहंकार आंगी चिकटत नाही
जो मोले [14] तीर्था जाये । तया ,मी यात्रा करितु आहे ।		14 मोबदल्याच्या हेतुने
ऐसिये श्लाघ्यतेचा [15] नोहे । तोषु जेवी ।।167।।		15 समाधान

का, मुद्रा समर्थाचिया [1], । जो एकवटु [2] झोंबे ,राया !।	1 राजाज्ञेने 2 एकत्र येऊन
तो, '' मी जिणता '' [3] ऐसिया । न येचि गर्वा ।।168।।	3 मी जिकलो
जो कांसे लागोनि [4] तरे, । तया पोहती उर्मी [5] नुरे ।	4 आधार घेऊन 5 आनंद
पुरोहितु नाविष्करे [6] । दातेपणें ।।169।।	6 डौल नसतो
तैसे, कर्तुत्व अहंकारे । नेघोनि, यथा अवसरें [7] ,।	7 योग्य वेळी
कृत्यजातांचें [8] ,मोहरे । सारीजती [9] ।।170 ।।	8 कर्म केल्यावर 9 बाजुला सारतात
केल्या कर्मा पांडवा ! । जो आथी फळाचा यावा, ।	
तया मोहरा होंनेदावा [10] । मनोरथु ।।171।।	10 होऊ देऊ नये
आधींचि फळी आस तुटिया, । कर्मं आरंभावी धनंजया ।	
परावें बाळ , धाया [11] । पाहिजे जैसें ।।172।।	11 दाई
पिंपरुवांचिया [12] आशा , । न शिंपिजे पिपळु जैसा , ।	12 पिंपळाचे फळ
तैसिया फळनिराशा । कीजती कर्मे ।।173।।	
सांडूनि दुधाची टकळी [13] , । गोंवारी गांवधेनु वेंटाळी [14] ।	13 आशा 14 संभाळतो
किंबहुना कर्मफळी । तैसें कींजे ।।174।।	
ऐसी हे हातवटी । घेऊनि, जे क्रिया उठी, ।	
आपणा आपुलिया गांठी । लाहेचि तो ।।175।।	
म्हणौनि, फळी लागु । सांडोनि, देहसंगु ।	
कर्मे करावीं , हा चांगु । निरोपु माझा ।।176।।	
जो जीवबंधें शिणला, । सुटके जाचे आपला, ।	
तेणें पुढतपुढतीं या बोला । आन न कींजे ।।177।।	

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ।।7।।

स्वधर्मानुरुप कर्माचा त्याग करणे कोणासहि योग्य नाही.मोहाने केलेला हा त्याग तामस होय.

नातरी,आंधाराचेनि रोखे [15] । जैसीं डोळां रोविजती [16] नखें ,।	15 रागाने 16 खुपसणे
तैसा ,कर्मद्वेषें अशेखे । कर्मेचि सांडी, ।।178।।	
तयाचें जे कर्म सांडणे, । ते तामस पै मी म्हणे ।	
शिसाराचे रागे [17] लोटणे [18] । शिरचि जैसें ।।179।।	17 अर्धशिशिच्या रागाने
हां गा ! मार्गु दुवाडु [19] होये , । तरी निस्तरितील पाये ।	18 तोडणे 19 कठीण
कीं तेचि खांडणे [20] आहे । मार्गापराधें ? ।।180।।	20 तोडणे
भुकेलियापुढें अन्न । हो कां भलतैसें उन्ह ,।	
तरी,बुद्धी न घेतां, लंघन । भाणें पापरां हल्या [21] ।।+181।।	21 ताट लाथेने उडवून
तैसा, कर्माचा बाधु, कर्मं । निस्तरिजे करितेनि वर्मे [22] ।	लावले तर 22 मर्म जाणून
हे तामसु नेणें , भ्रमे । माजविला [23] ।।182।।	23 उन्मत्त झालेला

कीं, स्वभावें आलें विभागा [1], । ते कर्मचि वोसंडी [2] पै गा! ।	1 वाट्याला 2 सोडून देतो
तरी झणें आतळा [3] त्यागा । तामसा तया ।।183।।	3 नका स्पर्श करु

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ।
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ।।8।।

शरीराला कष्ट होतील या भीतीने , म्हणजे दुःखकारक एवढ्याचसाठी , जर कर्म सोडले, तर त्याचा त्याग राजस होऊन त्यागाचे म्हणुन जे फळ ते त्याला मिळणार नाहीं .

अथवा स्वाधिकारु बुझे [4],। आपुलें विहितही सुजे ।	4 जाणतो 5 समजतो
परी करितया, उमजे [6] । निबरपणा [7] ।।184।।	5 कंटाळतो 7 कठीणपणाला
जे कर्माची ऐलीकड ।नावेक[8], दिसे दुवाड [9] ।	8 क्षणभर अलिकडेच
जे वाहतिये वेळे जड । शिदोरी जैसी ।।185।।	9 कठीणपणा
जैसा, निंब जिभे कडवटु, । हिरडा पहिले तुरटु ।	
तैसा, कर्मा ऐल, शेवटु । खणुवाळा [10] होय ।।186।।	10 कठीण
कां, धेनु ,दुवाड शिंग [11], । शेवंतीये, अडव [12] आंग, ।	11 मारकुटी 12 काटेरी
भोजनसुख महाग । पाकु करितां ।।187।।	शेवंतीला काट्याचा दोष
तैसें , पुढतपुढती कर्म । आरंभींच अति विषम, ।	
म्हणौनि , तो ते श्रम । करितां मानी ।।188।।	
एऱ्हवी,विहितत्वें मांडी[13] । परी घालितां [14],असुरवाडी [15] ,।	13 विधीपूर्वक संकल्प करितो
तेथ पोळला, ऐसा सांडी । आदरिलेही [16] ।।189।।	14 सुरु केल्यावर 15 दुःख
म्हणे, वस्तु देहासारिखी, । आली बहुतीं भाग्यविशेखीं [17] ।	16 सुरु केलेलेही 17 मोठ्या
मा ,जाचूं कां कर्मादिकीं । पापिया जैसा ? ।।190।।	भाग्याने
केलें कर्मीं जे द्यावे । ते झणें[18] मज होआवें ।	18 नकोसे
आजि भोगूं ना कां बरवे । हातींचे भोग ? ।।191।।	
ऐसा शरीराचिया क्लेशा-।भेणें , कर्मे ,वीरेशा ! ।	
सांडी, तो परियेसा । राजसु त्यागु ।।192।।	
एऱ्हवीं , तेथही कर्म सांडे, । परी तया त्यागफळ न जोडे, ।	19 होमात आहुती
जैसें , उतले आगीं पडे । ते नलगेचि होमा [19] ।।193।।	दिल्यासारखे नाही
कां, बुडोनि प्राण गेले, । ते अर्धोदकीं निमाले[20] ।	20 उपोषण करून पाण्यात
हे म्हणों नये, जाहलें । दुर्मरणचि ।।194।।	उभे राहून देहत्याग करणे
तैसें , देहाचेनि लोभे, । जेणें कर्मा पाणी सुभे[21] ,।	21 पाणी सोडतो
तेणें साच न लभे । त्यागाचें फळ ।।195।।	
किंबहुना, आपुलें । जैं ज्ञान होय उदया आलें, ।	
तैं नक्षत्राते , पाहलें[22] । गिळी जैसें ।।196।।	22 पहाट

तैशा, सकारण क्रिया । हारपती, धनंजया ! ।
तो कर्मत्यागु यें जया । मोक्षफळासी, ।।197।।
ते मोक्षफळ ,अज्ञाना ।त्यागिया नाहीं, अर्जुना! ।
म्हणौनि तो त्यागु न माना । राजसु जो ।।198।।
तरी कोणे पां एथ त्यागें ? । ते मोक्षफळ घर रिघे ?।
हेंही आइक प्रसंगे । बोलिजेल ।।199।।

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ।।9।।

हे अर्जुना ! स्वधर्माप्रमाणे नियत म्हणजे नेमलेले कार्य म्हणजे कर्तव्य म्हणूनच जे कर्म संग व फल सोडून केले जाते, तेव्हां त्याला सात्त्विक त्याग समजतात

तरी स्वाधिकाराचेनि नांवे । जे वांटिया आलें स्वभावे, ।
ते आचरे विधिगौरवें । शृंगारोनि ।।200।।
परी हे मी करितु असे, । ऐसा आठवु[1] त्यजी मानसें । — 1 हा भाव
तैसेचि पाणी दे आशे । फळाचिये ।।201।।
पैं , अवज्ञा आणि कामना । मातेच्या ठायीं , अर्जुना !
केलिया , दोनी पतना । कारण होती ।।202।।
तरी दोनीं ये त्यजावीं ।मग माताचि ते भजावी ।
वांचूनि मुखालागीं वाळावी । गायचि सगळी ?।।+203।।
आवडतियेही फळीं , । असारें[2]साली, आंठोळी, । — 2 शुष्क
त्यासाठी अवगळी [3] । फळाते कोण्ही ? ।।204।। — 3 टाकतो
तैसा, कर्तुत्वाचा मदु , । आणि कर्मफळाचा आस्वादु ।
या दोहींचे नांव बंधु । कर्माचा की ।।205।।
तरी या दोहींच्या विखीं [4] ,। जैसा बापु नातळे [5] लेकी, । — 4 विषयी 5 स्पर्श करीत नाहीं
तैसा हों, न शके दुःखी । विहिता क्रिया [6]।।206।। — 6 शास्त्राने सांगितलेली कर्मे
हा तो त्याग तरुवरु [7] । जो गा! मोक्षफळें ये थोरु । — 7 श्रेष्ठ वृक्ष
सात्त्विक ऐसा डगरु [8] । यासींच जगीं ।।207।। — 8 प्रसिद्धी
आतां, जाळूनि बीज जैसें , । झाडा कीजे निर्वशे , ।
फळ त्यागूनि कर्म तैसें । त्यजिलें जेणें ।।208।।
लोह लागतखेंवो [9] परिसीं, । धातूची गंधिकाळिमा [10] जैसी । — 9 लागताक्षणिच 10 गंज व
जाती, रजतमें तैसीं । तुटलीं दोन्ही ।।209।। — काळेपणा
मग सत्त्वें चोखाळें । उघडती आत्मबोधाचे डोळे ।
तेथ मृगांबु [11] सांजवेळे । होय जैसें ।।210।। — 11 मृगजळ

तैसा, बुद्ध्यादिकांपुढां । असतु विश्वाभासु हा येवढा, ।
तो न देखे कवणीकडां । आकाश जैसें ।।+211।।

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।
त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ।।10।।
एखादे कर्म अकुशल म्हणजे अकल्याणकारक असले तर त्याचा द्वेष करीत नाहीं, व दुसरे कल्याणकारक किंवा फायद्याचे आहे म्हणून त्यांत अनुषक्त होत नाहीं, तो सत्वशील बुद्धीमान व संशयविरहित त्यागी म्हणजे संन्यासी म्हणावयाचा

म्हणोनि, प्राचीनाचेनि बळें[1] । अलंकृते कुशलाकुशलें[2]। 1 प्रारब्धाच्या बळाने 2 शुभाशुभ
तियें व्योमाआंगी[3] आभाळें , । जिराली जैसीं ।।212।। 3 आकाशात
तैसीं, तयाचिये दिठी । कर्मे चोखाळलीं[4] किरीटी! । 4 शुद्ध होतात
म्हणौनि सुखदुःखीं ,उठी । पडेना तो ।।213।।
तेणें शुभकर्म जाणावें, । मग तें हर्षे करावें , ।
का अशुभालागीं होआवें । द्वेषिया ना ।।214।।
तरी इयाविषयींचा कांहीं । तया एकुही संदेहो नाहीं ।
जैसा स्वप्नाच्या ठायीं । जागिन्नलिय ।।215।।
म्हणौनि, कर्म आणि कर्ता, । या द्वैतभावाची वार्ता ।
नेणें, तो पंडुसुता ! । सात्त्विक त्यागु (त्यागी)।।216।।
ऐसेनि कर्मे पार्था ! । त्यजिलीं , त्यजिती सर्वथा ।
अधिकें बांधिती, अन्यथा । सांडिलीं तरी ।।217।।

न हि देहभूता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ।।11।।
कारण ज्याला म्हणून देह आहे त्याला कर्माचा निःशेष त्याग करणे शक्य नाही. म्हणून ज्याने कर्म न सोडिता फक्त कर्मफलाचा त्याग केला त्यालाच खरा त्यागी म्हणजे संन्यासी म्हटले आहे .

आणि हां गा सव्यसाची ! । मूर्ति लाहोनि देहाची ।
खंती करिती कर्माची । ते गांवढे[5] गा ! ।।218।। 5 अडाणी
मृत्तिकेचा वीटु । घेऊनि , काय करील घटु ?।
केउता ताथु[6] पटु[7] । सांडील तो ? ।।219।। 6 दोरा 7 वस्त्र
तेविंची वन्हित्व आंगी, । आणि उबे उबगणे[8] आगी ! । 8 ऊष्णतेला त्रासणे
की, तो दीपु प्रभेलागीं । द्वेषु करील काई ? ।।220।।
हिंगु त्रासिला घाणी, ।तरी कैचें सुगंधत्व आणी ?।
द्रवपण सांडूनि पाणी । कें राहे ते ?।।221।।

तैसा, शरीराचेनि आभासें । नांदतु जंव असे, ।
तंव कर्मत्यागाचे पिसें । काइसे तरी ?।।222।।
आपण लाविजे टिळा । म्हणौनि पुसों ये वेळोवेळा, ।
मा घाली [1] ,फेडी[2], निडळा [3]। कां करूं ये गा? ।।223।। 1 कोरलेले 2 पुसून टाकणे
तैसे विहित स्वयें आदरिलें ,। म्हणौनि त्यजूं ये त्यजिलें ,। 3 कपाळावर
परी, कर्मचि, देह आतलें । ते कां सांडील गा ? ।।224।।
जे श्वासोच्छ्वासवरी । होत, निजेलियाहीवरी ।
कांहीं न करणेंयाचि परी । होती जयाची ! ।।225।।
या शरीराचेनि मिसकें [4] । कर्मचि लागलें असिकें । 4 निमित्ताने
जितां मेलया न ठाके [5] । इया रीती ।।226।। 5 थांबत नाहीं
यया कर्मातें सांडिती , परी । एकीचि[6], ते अवधारी । 6 एकच मार्ग आहे
जे करितां न जाइजे हारीं[7] । फळाशेचिये ।।227।। 7 गुंतत नाहींत
कर्मफळ ईश्वरीं अर्पे, । तत्प्रसादे बोधु उद्दीपें[8], । 8 उजळतो
तेथ रज्जुज्ञानें [9] लोपे । व्याळशंका [10] ।।228।। 9 दोरी आहे हे समजले
तेणें आत्मबोधें तैसें । अविद्येसी कर्म नाशे । 10 साप असल्याची शंका
पार्था ! त्यजिजे जैं ऐसें , । ते त्यजिले होय ।।229।।
म्हणौनि, इयापरी जगीं । कर्मे करितां, मानूं त्यागी ।
येर, मुर्छने नांव , रोगी । विसांवा जैसा ।।230।।
तैसा कर्मी शिणे एकी, । तो विसावों पाहे ,आणिकी,।
दांडेयाचे घाय बुकी [11] । धाडणें जैसें ।।231।। 11 काठीचा मार चुकविण्याकरता
परी हे असो; पुढती । तोचि त्यागी त्रिजगती । बुक्क्या खाणे
जेणें फळत्यागे निष्कृती [12]। नेलें कर्म ।।232।। 12 नैष्कर्माचे योग्यतेस

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ।।12।।

अनिष्ट, इष्ट व कांहीं इष्ट व कांहीं अनिष्ट असे मिश्र याप्रमाणे कर्माचे तीन प्रकारचे फळ , मेल्यावर अत्यागी म्हणजे फलाशेचा त्याग न करणाऱ्या पुरुषास मिळते. पण जो संन्यासी म्हणजे फलाशा सोडून कर्मे करणारा त्याला हें फळ कधीही मिळत नाही म्हणजे बांधु शकत नाही.

एऱ्हवीं तरी धनंजया! । त्रिविधा कर्मफळा गा ! यया, ।
समर्थ ते की भोगावया । जे न सांडितीचि आशा ।।233।।
आपणचि विऊनि [13] दुहिता[14] । की 'न मम ''म्हणे पिता ,। 13 जन्म देऊन 14 मुलगी
तो सुटे, की प्रतिग्रहिता [15]। जांवई शिरके ।।234।। 15 दान घेणारा

विषाचे आगरही वाहती [1] । ते विकितां ,सुखे लाभे जिती, ।
येर निमाले [2] , जे घेती । वेंचोनि मोलें ।।235।।
तैसें कर्ता कर्म करू, । अकर्ता फळाशा न धरू, ।
एथ न शके आवरूं । दोहींते कर्म ।।236।।
वाटे पिकलिया रुखाचें । फळ अपेक्षी तयाचें ।
तेवी , साधारण कर्माचें । फळ ,घे तया ।।237।।
परी करूनि , फळ नेघे, । तो जगाच्या कामीं न रिघे [3]।
जे त्रिविध जग अवघें । कर्मफळ हे ।।238।।
देव ,मनुष्य ,स्थावर, । यया नांव जगडंबर।
आणि हें तंव प्रकार । कर्मफळांचे ।।239।।
तेचि ,एक गा ! अनिष्ट । एक ते ,केवळ इष्ट।
आणि एक ,इष्टानिष्ट । त्रिविध ऐसें ।।240।।
परी विषयमंतीं [4] बुद्धी, । आंगीं सूनि अविधी [5] ।
प्रवर्तती[6] जे निषिद्धी । कुव्यापारी ,।।241।।
तेथ कृमि ,कींट ,लोष्ट [7] । हे देह लाहती निकृष्ट।
तया नाम ते अनिष्ट । कर्मफळ ।।242।।
कां, स्वधर्मा मानु देतां [8], । स्वाधिकारु पुढां सूतां[9], ।
सुकृत कीजे, पुसतां । आम्नायाते [10] ।।243।।
तैं , इंद्रादिक देवांची । देहें लाहिजती, सव्यसाची ! ।
तया कर्मफळा, इष्टाची । प्रसिद्धि गा ! ।।244।।
आणि, गोड, आंबट मिळे, । तेथ रसांतर फरसाळें [11] ।
उठी, दोहीं वेगळें ,। दोहीं जिणते [12]।।245।।
रेचकुचि [13]योगवशें । होय स्तंभावयादोषें [14]।
तेवीं सत्यासत्य समरसें । सत्यासत्यचि जिणिजे ।।+246।।
म्हणौनि, समभागें शुभाशुभें । मिळोनि अनुष्ठानाचें उभें [15] ।
तेणें मनुष्यत्व लाभे । ते मिश्र फळ ।।247।।
ऐसें त्रिविध यया भागीं । कर्मफळ मांडलें से जगीं ।
हे न सांडी, तयां भोगीं । जे सूदले आशा [16] ।।248।।
जेथें जिव्हेचा हातु फांटे [17] । तंव जेवितां वाटे गोमटे, ।
मग परिणामी शेवटें । अवश्य मरण ।।249।।
संवचोरमैत्री [18] चांग । जंव न पविजे ते दांग [19], ।
सामान्या[20] भली, आंग । न शिवे तंव ।।250।।
तैसी कर्में करितां , शरीरीं । लाहती ,महत्त्वाची फरारी [21] ।
पाठी निधनी एकसरी । पावती फळें ।।251।।

1 विषारी वनस्पतीच्या शेतीची माशागत करितात 2 मरतात
3 संसारचक्रात सापडत नाही
4 विषयासक्त 5 दुराचार अंगवळणी पडून 6 उद्युक्त होतात
7 ढेकुळ
8 मान देऊन 9 स्वाधिकाराप्रमाणे
10 वेदाज्ञेप्रमाणे
11 भिन्न रुची
12 दोन्ही पेक्षा वरचढ
13 प्राणवायु सोडणे 14 कोंडला जातो
15 कर्माची उभारणी
16 अभिलाशा धरिली
17 रुची वाढते
18 सभ्य दिसणारा चोर
19 अरण्य 20 वैश्या
21 भरभराट

जैसा, समर्थु आणि ऋणिया [1] । मागों आला बाइणिया [2], ।	1 सावकार 2 वायदा
न लोटे, तैसा प्राणिया । पडे तो भोगु ।।252।।	
मग कणिसौनि कणु झडे, । तो विरूढला[3] कणिसा चढे ।	3 रुजला
पुढती भूमी पडे, । पुढती उठी ।।253।।	
तैसें भोगीं, जे फळ होय, । ते फळांतरे वीत [4] जाय,।	4 प्रसवत जाते
चालतां, पावो पाय । जिणिजे जैसा ।।254।।	
उताराचिये [5] सांगडी[6] । ठाके ,ते ऐलीच थडी[7]।	5 नदी पार करतांना 6 तराफा
तेवीं न मुकिजती वोढी । भोग्याचिये ।।255।।	7 सुरवातीचीच जागा होते
पै, साध्यसाधनप्रकारें । फळभोगु तो पसरे ।	
एवं गोविलें संसारें । अत्यागी ते ।।256।।	
एऱ्हवीं जाईचियां फुला फांकणें ,।त्याचि नाम जैसें सुकणे,।	
तैसें कर्ममिषें न करणें । केलें जिही, ।।257।।	
बीजचि वरोसि वेंचे [8], । तेथ , वाढती कुळवाडी खांचे[9] ।	8 खाऊन टाकले 9 शेती कमी होते
तेवी, फळत्यागें कर्माचें । सारिलें काम ।।258।।	
ते सत्त्वशुद्धी साहाकारें । गुरुकृपामृततुषारें ।	
सासिन्नलेनि बोधें [9], वोसरे । द्वैतदैन्य ।।259।।	9 ज्ञानसंपन्न झाल्यावर
तेव्हां, जगदाभासमिषें । स्फुरे ते त्रिविध फळ नाशे ।	
येथ भोक्ता भोग्य आपैसें [10] । निमाले हें ।।260।।	10 सहज
घडे ज्ञानप्रधानु हा ऐसा । संन्यासु, जयां वीरेशा! ।	
तेचि फळभोग सोसा [11] । मुकले गा ! ।।261।।	11 हव्यासाला
आणि येणे कीर संन्यासें । जै आत्मरुपी दिठी पैसे[12] ,।	12 दृष्ट ी प्रवेश करते
तै कर्म एक ऐसे[13] । देखणे आहे ? ।।262।।	13 कर्म कांहीं एक वेगळेच आहे
पडोनि गेलिया भिंती, । चित्रांची केवळ होय माती ।	
कां, पाहालेया [14], राती । आंधारे उरे ? ।।263।।	14 पहाट झाल्यावर
जै रूपचि नाहीं उभें , । तैं साउली काह्याची शोभे ?।	
दर्पणेवीण बिंबे । वदन कें पां ? ।।264।।	
फिटलिया निद्रेचा ठावो, । कैंचा स्वप्नासि प्रस्तावो ? ।	
मग साच का वावो[15] । कोण म्हणे ? ।।265।।	15 खरे खोटे
तैसे गा ! संन्यासें येणें । मूळ अविद्येसीचि नाहीं जिणें ।	
मा तियेचें कार्य[16] कोणें । घेपे , दीजे ? ।।266।।	16 कर्मफळ देणे घेणे
म्हणौनि,संन्यासी ,ये,पाहीं ।कर्माची गोठी कींजेल काई? ।	
परी अविद्या आपुलां देहीं । आहे जै कां, ।।267।।	
जै, कतेपणाचेनि थांवें [17] । आत्मा शुभाशुभी धांवे, ।	17 बळाने 18 भेदाच्या
दृष्टि ,भेदाचिये राणिवे[17] । रचलीसे [19] जैं ,।।268।।	राज्यावर 19 आरुढ झाली

तैं , तरी गा सुवर्मा! । बीजावळी [1] आत्मया, कर्मा । 1 वेगळेपणा
अपाडे [2] जैसी पश्चिमा । पूर्वेसि कां ! ।।269।। 2 वेगळी
नातरी,आकाशा का आभाळा,। सूर्या आणि मृगजळा ।
बिजावळी [3] भूतळा । वायूसि जैसी ।।270।। 3 वेगळेपणा
पांघरौनि नईचे [4] उदक, । असे नईचिमाजीं खडक, । 4 नदी
परी जाणिजे का वेगळिक । कोडीची ते [5] ।।271।। 5 पराकाष्टेची
हो कां उदकाजवळी, । परी सीनानीचि [6] ते बाबुळी [7] । 6 वेगळी 7 शेवाळ
काय संगास्तव काजळी । दीपु म्हणों ये ? ।।272।।
जरी चंद्रीं जाला कलंकु , । तरी चंद्रेसीं नव्हे एकु।
आहे , दृष्टी, डोळ्या विवेकु [8] । अपाडु जेतुला ।।273।। 8 फरक
नाना, वाटा ,वाटे जातया ,।वोघा, वोघीं वाहातया, ।
आरसा, आरसां पाहातया । अपाडु जेतुला ।।274।।
पार्था गा! तेतुलेनि मानें । आत्मेनिसीं कर्म सिनें ।
परी घेवविजे अज्ञानें । ते कीर ऐसें ।।275।।
विकाशे [9] ,रवीते उपजवी [10]। द्रुती [11] ,अलीकरवी [12] भोगवी । 9 प्रफुल्लिपणा 10 उत्पन्न होतो
ते सरोवरीं कां बरवी [13] । अब्जिनी [14] जैसी ।।276।। 11 सुवास 12 भ्रमर 13 चांगली
पुढतपुढती, आत्मक्रिया । अन्यकारणकाचि, तैशिया । 14 कमलीनी
करूं पांचाही तयां । कारणां रूप ।।277।।

पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।
सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम ।।13।।

हे महाबाहो! सर्व कर्मे घडून येण्यास सांख्यांच्या सिद्धांतात जी पाच कारणे सांगितलेली आहे त ती मी तुला सांगतो, ऐक

आणि पांचही कारणे तियें । तूंही जाणसील विपायें [15]। 15 कदाचित
जे शास्त्रे उभऊनी बाहे । बोलती, तयांते ।।278।।
वेदरायाचिया राजधानीं । सांख्यवेदांताच्या भुवनीं ।
निरूपणाच्या निशाणध्वनी [16] । गर्जती जियें ।।279।। 16 डंका
जे सर्वकर्मसिद्धीलागी । इयेंचि मुद्दले [17] हो जगीं । 17 भांडवल
तेथ न सुवावा [18] अभंगी [19] । आत्मराजु ।।280।। 18 घालावा 19 अयोग्य
ह्या बोलाची डांगुरटी [20] । तियें प्रसिद्धीचि आली किरीटी ! । रीतीने 20 प्रसिद्धी
म्हणौनि, तुझ्या हन कर्णपुटी । वसो हे काज ।।281।।
आणि, मुखांतरी [21] आइकिजे,। तैसे कायसे हें ओझें ?। 21 इतरांच्या तोंडून
मी चिद्रत्न तुझे । असतां हातीं ।।282।।

दर्पणु पुढां मांडलेया, । कां लोकांचिया डोळ्यां ।
मानु द्यावा , पहावया । आपुलें निकें [1] ? ।।283।।
भक्त जैसेनि जेथ पाहे, । तेथ ते तेचि होत जाये ,।
तो, मी तुझें जाहालो आहे । खेळणे आजी ।।284।।
ऐसें हें प्रीतीचेनि वेगे । देवो बोलतां ,से नेघे [2]।
तंव आनंदामाजी आंगें । विरतसे येरु ।।285।।
चांदिणियाचा पडिभरु [3] । होतां, सोमकांताचा डोंगरु ।
विघरोनि [4], सरोवरु । हो पाहे जैसा ! ।।286।।
तैसें,सुख आणि अनुभूती [5] । या भावांची मोडूनि भिंती ।
आतले [6] अर्जुनाकृती । सुखचि जेथ ।।287।।
तेथ समर्थु म्हणौनि, देवा । अवकाशु जाहला आठवा,[7]।
मग बुडतयाचा धांवा [8] । जीवें केला ।।288।।
अर्जुना येसणें थेंडें [9] । प्रज्ञा पसरेसी बुडे [10], ।
आलें भरते एवढें ,। ते काढूनि पुढती, ।।289।।
देवो म्हणे, '' हां गा पार्था ! । तूं आपणपें देख सर्वथा ''।
तंव श्वासूनि येरें माथा । तुकियेला ।।290।।
म्हणे,'' जाणसी दातारा !। मी तुजशीं व्यक्तिशेजारा [10] ।
उबगला, आजी एकाहारा [11] । येवों पाहें ।।291।।
तयाही, हा ऐसा । लोभें देतसां जरी लालसा[12], ।
तरी कां जी घालीतसां । आड आड जीवा ? ''।।292।।
तेथ श्रीकृष्ण म्हणती, ''निके [13] । अद्यापि नाहीं मा ठाउकें ?।
वेड्या !चंद्रा आणि चंद्रिके । न मिळणें आहे ।।293।।
आणि, हाही बोलोनि भावो । तुज दाऊं, आम्ही भिवों ।
जे रुसता, बांधे थावो [14] । ते प्रेम गा हे ! ।।294।।
एथ एकमेकांचिये खुणें [15] ,। विसंवादु [16] तंवचि जिणें , ।
म्हणौनि असो हे बोलणे; । इयेविषयीचें ।।295।।
मग, कैशी कैशी ते आतां । बोलत होतो ? पंडुसुता ! ।
सर्व कर्मा भिन्नता । आत्मनेसीं ''।।296।।
तंव अर्जुन म्हणे देवें ,। ''माझिये मनीचेचि स्वभावें ।
प्रस्ताविलें बरवें । प्रमेय ते जी ।।297।।
जे सकळ कर्माचे बीज । कारणपंचक तुज ।
सांगेन ऐसी पैज । घेतली कां ।।298।।
आणि आत्मया एथ कांही । सर्वथा लागु [17]नाहीं ।
हे पुढारलासि [18] ते देई । लाहाणे[18] माझे ''।।299।।

1 आपले खरे स्वरूप
2 भान रहात नाहीं
3 वर्षाव
4 विरघळून
5 आत्मप्रत्यय 6 झाला
7 स्वतःला सावरण्यास वेळ मिळाला 8 बुडणाऱ्याला वाचवण्याचा निकराचा प्रयत्न
9 एवढे मोठी प्रस्थ 10 विशाल बुद्धीसह बुडावयाला लागला
10 तुझ्याजवळ पण वेगळा
11 ऐक्यास
12 प्रेमाने
13 खरोखर
14 बळावते
15 परस्पर प्रेमाचे लक्षण
16 भेद
17 संबंध
18 सांगण्यास सुरवात केली होती 19 आवडीचे

यया बोला , विश्वेशे । म्हणितले तोषे बहुवसे ,।	
'' इयेविषयी धरणे बैसे । ऐसे के जोडे [1] ? ।।300।।	1 मिळेल
तरी अर्जुना! निरुपिजेल । कीर भाषेआंतुल [2] ,।	2 बोलण्याच्या पलिकडचे
परी मेचु ये [3], होईजेल । ऋणिया[4] तुज ''।।301।।	3 या प्रेमाने 4 तुझा ऋणी होईन
तंव अर्जुन म्हणे,'' देवो! । काई विसरले मागील भावो ।	
इये गोठीस ? कीं राखत आहो । मीतूपण जी ? ''।।302।।	
एथ श्रीकृष्ण म्हणती,''हो कां?।आतां अवधानाचा पसरु निका [5]।	5 मन लाऊन
करूनिया, आईका । पुढारलो तें [6] ।।303।।	6 सांगतो म्हणालो ते
तरी सत्यचि गा धनुर्धरा ! । सर्व कर्माचा उभारा [7] ।	7 उभारणी
होतसे बाहिरबहिरा [8] ,। करणीं पांचे ।।304।।	8 बाहेरच्या बाहेर
आणि, पांच कारण दळवाडे [9], । जिही कर्माकारु मांडे ,।	9 पाचांचा समुदाय
ते हेतुस्तव घडे । पांच आथी ।।305।।	
येर, आत्मतत्त्व उदासीन । ते ना हेंतु, ना उपादान [10] ।	10 साक्षात कारण
ना ते अंगे करी संवाहन [11], । कर्मसिद्धीचे ।।306।।	11 मदत
तेथ शुभाशुभी अंशी , । निफजती कर्मे ऐसी ।	
राती , दिवो आकाशी । जियापरी ।।307।।	
तोय,तेज,धूमु । ययां वायूसी संगमु ।	
जालिया, होय अभ्रागमु [12], । व्योम ते नेणे[13] ।।308।।	12 ढगाळते 13 आभाळाला
नाना, काष्टी नाव मिळे, । ते नावाडेनि चळे, ।	जाणीव नसते
चालविजे अनिळे [14] । उदक ते साक्षी ।।	14 वाऱ्याने
कां, कवणे एके पिंडे[15] । वेचितां, अवतरे भांडे ।	15 मातीचा गोळा वापरून
मग भवडीजे [16], दंडे । भ्रमे चक्र ।।310।।	16 दांड्याने चाक फिरवून
आणि कर्तुत्व कुलालाचे [17] । तेथ काय ,ते पृथ्वीयेचे ।	फिरवले जाते17 कुंभाराचे
आधारावांचूनि वेचे [18]? । विचारी पां ! ।।311।।	18 पृथ्वीच्या आधाराशिवाय काय
हेही असो; लोकांचिया । राहाटी [19] होता आघविया, ।	खर्च होते 19 व्यापाराला
कोण काम सवितया । आंगा आलें ? ।।312।।	
तैसे, पांचहेतुमिळणी । पांचेचि इही कारणी ।	
कीजे कर्मलतांची लावणी । आत्मा सिना [20] ।।313।।	20 अलिप्त
आतां, तेचि वेगळालि । पांचही विवंचू गा ! भली ।	
तुकोनि [21] घेतली । मोतिये जैसी ।।314।।	21 मोजून

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवाऽत्र पञ्चमम् ।।14।।

अधिष्टान म्हणजे जागा, तसाच कर्ता, निरनिराळ्या प्रकारचे कारण म्हणजे साधन किंवा हत्यार, अनेक प्रकारच्या कर्त्याच्या पृथ्क पृथ्क चेष्टा म्हणजे व्यापार, आणि त्याबरोबरच पांचवे दैव होय.

तैसी यथा लक्षणे । आईके कर्म-कारणे ।
तरी देह हे मी म्हणे । पहिले एथ ।।315।।
ययाते अधिष्ठान ऐसे । म्हणिजे, ते याचि उद्देशे ।
जे स्वभोग्येसी वसे । भोक्ता येथ ।।316।।
इंद्रियांच्या दाहे हाती । जाचोनिया दिवोराती।
सुखदुःखे प्रकृती । जोडीजती जिये ।।317।।
तिये भोगावया पुरुखा, । आन ठावोचि[1] नाहीं देखा, ।   1 दुसरे ठिकाणच नाहीं
म्हणौनि अधिष्ठानभाखा [2] । बोलिजे देह ।।318।।   2 अधिष्ठान हा शब्दप्रयोग
हे चोविसांही तत्त्वांचे । कुटुंबघरवस्तीचे ।
तुटे बंधमोक्षाचे । गुंथाडे [3] एथ ।।319।।   3 गुंता
किंबहुना, अवस्थात्रया । हे अधिष्ठान धनंजया ! ।
म्हणौनि देहा यया । हेचि नाम ।।320।।
आणि कर्ता हे दुजे । कर्माचे कारण जाणिजे, ।
प्रतिबिंब म्हणिजे । चैतन्याचे जे ।।321।।
आकाशचि वर्षे नीर । ते तळवटी [4] बांधे नाडर [5] ।   4 खाली 5 डबके
मग बिंबोनि तदाकार । होय जेवी ।।322।।
कां, निद्राभरे बहुवे [6], । राया आपणपें ठाउवे [7] नव्हे, ।   6 गाढ 7 विसरतो
मग स्वप्नीचिये सामावे [8] । रंकपणी ।।323।।   8 तद्रूप होऊन
तैसे ,आपुलेनि विसरे । चैतन्यचि देहाकारे ।
आभासोनि, आविष्करे [9] । देहपणे जे ।।324।।   9 प्रगट होते
जया ,विसराच्या देशी,।प्रसिद्धि गा 'जीवु' ऐसी ।
जेणे भाष [10] केली देहेसी । आघवाविषयी ।।325।।   10 प्रतिज्ञा
प्रकृति करी कर्मे, । ती ,म्यां केली म्हणे, भ्रमे ।
येथ 'कर्ता' येणे नामे । बोलिजे जीवु ।।326।।
मग पातेयांच्या केशी, । एकीच उठी दिठी ,जैसी ।
मोकळी चवरी ऐसी, । चिरीव [11] गमे ।।327।।   11 चिरलेली
कां, घराआंतुल एकु । दीपाचा , तो अवलोकु [12] ।   12 तो प्रकाश
गवाक्षभेदे , अनेकु । आवडे [13] जेवी ।।328।।   13 भासतो
कां, एकुचि पुरुषु जैसा, । अनुसरत नवां रसां ,।
नवविधु ऐसा । आवडो लागे ।।329।।
तेवी बुद्धीचे एक जाणणे,। श्रोत्रादिभेदे येणे ।
बाहेरी इंद्रियपणे । फाके जे कां ,।।330।।
ते पृथग्विध करण [14] । कर्माचे इया कारण ।   14 निरनिराळी इंद्रिये
तिसरे गा जाण । नृपनंदना! ।।331।।

आणि पूर्वपश्चिमवाहणी । निघालिया वोघाचिया मिळणी ।	
होय, नदी,नद,पाणी । एकचि जेवी ।।332।।	
तैसी, क्रियाशक्ति पवनी । असे जे अनपायिनी [1] ।	1 निरंतर
ते पडिली नानास्थानी, । नाना होय ।।333।।	
जै वाचे करी येणे [2] । तै, तेचि होय बोलणे ।	2 वाचेच्या मार्गाने
हाता अली, तरी घेणे ,। देणे ,होय ।।334।।	
अगा! चरणाच्या ठायी । तरी, गती तेचि पाही ।	
अधोद्वारी [3] दोही । क्षरणे तेचि ।।335।।	3 मलमुत्रद्वारी
कंदौनि हृदयवरी [4] । प्रणवाची उजरी [5] ।	4 नाभी पासून हृदयापर्यंत
करितां, तेचि शरीरी ।प्राणु म्हणिजे ।।336।।	5 विस्तार
मग ऊर्ध्वीचिया रिगानिगा [6] । पुढती तेचि शक्ति , पै गा! ।	6 ये जा
'उदानु ' ऐसिया लिंगा [7] । पात्र जाहली ।।337।।	7 संज्ञेला
अधोरंध्राचेनि वाहे [8] ,। 'अपानु' हें नाम लाहे ,।	8 गतीला
व्यापकपणे होये । 'व्यानु' [9] तेचि ।।338।।	9 शरीरस्थ वायु
आरोगिलेनि रसे [10], । शरीर भरी सरिसे [11] ,।	10 सेवन केलेल्या अन्नरसाने
आणि, न सांडितां असे । सर्वसंधी ।।339।।	11 सारखे
ऐसिया इया राहटी [12] । मग तेचि क्रिया पाठी ,।	12 व्यापार
'समान' ऐसी किरीटी । बोलिजे गा ! ।।340।।	
आणि, जांभई, शिंक, ढेकर । ऐसैसा होतसे व्यापार [13] ।	13 कर्म
नाग,कूर्म कृकर[14] । इत्यादि होय ।।341।।	14 ढेकर
एवं, वायूचि हे चेष्टा । एकीचि, परी सुभटा !।	
वर्तनास्तव पालटा [15] । येतसे जे ।।342।।	15 नानास्वरुपाला
ते, भेदली वृत्तिपंथे[16] । वायुशक्ति गा! एथे ?	16 कार्यभेदाने
कर्मकारण चौथे । ऐसे जाण ।।343।।	
आणि ऋतु बरवा शारदु, । शारदी पुढती चांदु , ।	
चंद्री जैसा संबंधु । पूर्णिमेचा ।।344।।	
कां, वसंती बरवा आरामु[17] ,।आरामीही प्रियसंगमु ,।	17 बाग
संगमी आगमु । उपचारांचा [18]।।345।।	18 प्रेमळ सुखसाधनांचा
नाना, कमळी, पांडवा !। विकासु [19] ,जैसा बरवा, ।	19 फुलणे
विकासीही यावा । परागाचा ।। 346।।	
वाचे बरवे कवित्व, । कवित्वीं बरवे रसिकत्व, ।	
रसिकत्वी परतत्त्व-।स्पर्शु [20] जैसा ।।347।।	20 आत्मरूपाचा संबंध
तैसी, सर्ववृत्तिवैभवी । बुद्धिचि एकली बरवी ।	
बुद्धीही बरव नवी ।इंद्रियप्रौढी[21] ।।348।।	21 इंद्रियांची सामर्थ्य शोभा

इंद्रियप्रौढीमंडळा । शृंगारु एकुचि निर्मळा ।
जै, आधिष्ठात्रियां [1] कां मेळा । देवतांचा जो ।।349।।   1 आश्रयभूत
म्हणौनि, चक्षुरादिकीं दाहे । इंद्रियां पाठी स्वानुग्रहे [2] ।   2 कृपा
सूर्यादिकां कां आहे । सुरांचे वृंद [3] ।।350।।   3 देवांचा समुदाय
ते देववृंद बरवे । कर्मकारण पांचवे ।
अर्जुना एथ जाणावे ,। देवो म्हणे ।।351।।
एवं माने, तुझिये आयणी [4] । तैसी कर्मजातांची हे खाणी ।   4 तुला आकलन होईल असे
पंचविध ,आकर्णी [5]। निरूपिली ।।352।।   5 ऐकवीली
आतां, हेचि खाणी वाढे , । मग कर्माची सृष्टि घडे ।
जिही, ते हेंतुही उघडे । दाऊ पांचै ।।353।।

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।
न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ।।15।।

शरीराने, वाचेने किंवा मनाने मनुष्य जी जी कर्मे आरंभितो, मग ते न्याय्य असो वा विपरीत म्हणजे अन्याय्य असो- त्याची ही पांच कारणे आहेत.

तरी अवसांत [6] आली माधवी [2], । ते हेंतु होय , नवपल्लवी ।   6 अचानक 7 वसंतऋतु
पल्लव , पुष्पपुंज दावी ,। पुष्प ,फळाते ।।354।।
कां, वार्षिये [8] आणिजे मेघु , । मेघे , वृष्टिप्रसंगु , ।   8 पावसाळा
वृष्टिस्तव भोगु । सस्यसुखाचा [9] ।।355।।   9 धान्य
नातरी, प्राची [10] अरुणाते विये, ।अरुणे सूर्योदयो होये ,।   10 पूर्व दिशा
सूर्ये सगळा पाहे । दिवो जैसा ।।356।।
तैसे , मन , हेंतु पांडवा ! । होय , कर्मसंकल्पभावा [11] , ।   11 कर्म करण्याची इच्छा
तो संकल्पु [12] लावी दिवा [13]। वाचेचा गा ! ।।357।।   12 इच्छा 13 वाचेने प्रगट
मग वाचेचा तो दिवटा[14] । दावी , कृत्यजातांचिया वाटा , ।   होते 14 मशाल
तेव्हां , कर्ता रिगे कामठा [15] । कर्तृत्वाच्या ।।358।।   15 कार्याला
तेथ , शरीरादिक दळवाडे [16] । शरीरादिकां , हेतुचि घडे , ।   16 समुदाय
लोहकाम , लोखंडे । निर्वाळिजे [17] जैसे ।।359।।   17 केले जाते
कां , तांथुवाचा ताणा [18] । ताथु घालिता वैरणा [19] ,।   18 ताणलेल्या दोऱ्यांमधे
तो तंतुचि , विचक्षणा ! ।होय पटु ।।360।।   19 आडव्या दोऱ्याची भर
तैसे , मनवाचादेहाचे । कर्म , मनादि हेंतुचि रचे ।
रत्नी घडे ,रत्नाचे । दळवाडे [20] , जेवी ।। 361।।   20 रत्नखचित दागीना
एथ शरीरादिके कारणे । तेचि हेतु केवी [21] ? हे कोणे ।   21 कसे
अपेक्षिजे , तरी तेणें । अवधारिजो ।।362।।

आइका , सूर्याचिया प्रकाशा । हेंतु कारण सूर्युचि जैसा ।
कां , ऊंसाचे कांडे , ऊंसा । वाढी हेतु ।।363।।
नाना , वाग्देवता वानावी [1] , । तै , वाचाचि लागे कामवावी । 1 स्तुती करावी
कां , वेदां , वेदेचि बोलावी । प्रतिष्ठा जेवी ।।364।।
तैसे , कर्मा, शरीरादिके । कारण , हे कीर ठाउके [2]। 2 निश्चित माहीत आहे
परी हेचि हेतु , न चुके [3]। हेही एथ ।।365।। 3 तेही हेतु होतात हे खोटे नाही
आणि देहादिकी कारणी । देहादि हेतु मिळणी ।
होय , जया उभारणी । कर्मजातां ।।366।।
ते शास्त्रार्थे मानिलेया । मार्गा अनुसरे , धनंजया ! ।
तरी न्याय , तो न्याया । हेतु होय ।।367।।
जैसा , पर्जन्योदकाचा लोटु । विपाये [4] धरी साळीचा पाटु । 4 चुकुन
तो जिरे , परी अचाटु ।उपयोगु आथी ।।368।।
कां , रोषे निघाले , अवचटे । पडिले द्वारकेचिया वाटे , ।
ते शिणे , परी सुनाटे [5] । न वचिती पदे ।।369।। 5 व्यर्थ
तैसे , हेतुकारण मेळे ,। उठी कर्म जे आंधळे , ।
ते शास्त्राचे लाहे डोळे । तै , न्याय म्हणिपे ।।370।।
ना , दुध वाढिता , ठावो पावे[6] । तंव उतोनि जाय स्वभावे । 6 भांडे भरले
तोही वेचु [7], परी नव्हे । वेचिले ते ! ।।371।। 7 खर्च केले
तैसे , शास्त्रसाह्येवीण । केले नोहे , जरी अकारण ।
तरी लागो कां नागवण [8] । दानलेखी [9] ?।।372।। 8 लूट 9 दान म्हणून समजणे
अगा ! बावन्ना वर्णापरता । कोण मंत्रु आहे पंडुसुता ! ।
कां बावन्नही नुच्चारितां । जीवु आथी ?।।373 ।।
परी , मंत्राची कडसणी [10] । जंव नेणिजे , कोदंडपाणी ! । 10 निवड
तंव उच्चारफळ , वाणी । न पवे ,जेवी ।।374।।
तेवी , कारणहेतुयोगे । जे बिसाट [11] कर्म निगे ,। 11 सहज होणारे
ते शास्त्राचिये न लगे । कांसे [12] , जंव , ।।375।। 12 शास्त्राला धरून
कर्म होतचि असे तेव्हांही , । परी ते होणे नव्हे , पाही ।
तो अन्यायो गा ! अन्यायी । हेतु होय ।।376।।

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ।।16।।

या प्रकारची खरी स्थिति असतां, बुद्धि संस्कृत नसल्यामुळे मी एकटाच कर्ता आहे असे ज्याला वाटते त्या दुर्मतीला कांहींच कळत नाहीं असे म्हटले पाहिजे.

एवं , पंचकारणा कर्मा , । पांचही हेतु हे सुमहिमा ! ।
आतां एथे पाहे पां , आत्मा । सापडला असे ।।377।।
भानु न होनि रुपे [1],जैसी । चक्षुरुपाते प्रकाशी । — 1 कोणतेही रुप न घेता
आत्मा न होनि, कर्मे तैसी । प्रकटित असे गा! ।।378।।
पै, प्रतिबिंब , आरिसा । दोन्ही न होनि, विरेशा ! ।
दोहीते प्रकाशी जैसा । न्याहाळिता तो ।।379।।
कां, अहोरात्र, सविता । न होनी, करी पंडसुता! ।
तैसा, आत्मा कर्मकर्ता । न होनि, दावी ।।380।।
परी देहाहंमान भुली, । जयाची बुद्धि देहीचि आतली [2], । — 2 देहरुप झाली
तया आत्मविषयी जाली । मध्यरात्री गा ! ।।381।।
जेणे चैतन्या, ईश्वरा, ब्रह्मा । देहचि केले परमसीमा, ।
तया, आत्मा कर्ता , हे प्रमा [3] । अलोट उपजे [4]।।382।। — 3 सिद्धांत 4 पक्का मनात बसला असतो
अत्माचि कर्मकर्ता, । हाही निश्चयो नाहीं तत्त्वतां, ।
देहोचि मी कर्मकर्ता ,। मानितो साचें ।।383।।
जे आत्मा मी कर्मातीतु, । सर्वकर्मसाक्षिभूतु ।
हे आपली कही मातु [5] । नायकेचि कानी ! ।।384।। — 5 गोष्ट
म्हणौनि, उमपा [6] अत्मयाते, । देहचिवरी मविजे [7] एथे । — 6 अमर्याद 7 देह असे माानतो
विचित्र, काई रात्रि दिवसाते । डुडुळ [8] न करी ? ।।385।। — 8 घुबड
पै, जेणे आकाशीचा कही । सत्य सूर्यु देखिला नाहीं, ।
तो थिल्लरीचे बिंब [9] , काई । मानूं न लोहे [10] ? ।।386।। — 9 डबक्यातले प्रतिबिब 10 खरे नाहीं समजत?
थिल्लराचेनि जालेपणे, । सूर्यासि आणी होणे ।
त्याच्या नाशी नाशणे , । कंपे, कंपु ।।387।।
आणि निद्रिस्ता चेवो[11] नये , । तंव स्वप्न साच हो लाहे, । — 11 जाग
रज्जु [12] नेणतां, सापा बिहे[13] । विस्मो कवण ! ।।388।। — 12 दोर 13 भितो
जंव कवळ [14] आथि डोळां, । तंव चंद्रु देखावा कीं पिवळा । — 14 कावीळ झाली असता
काय, मृगीही मृगजळा । भाळावे नाहीं ? ।।389।।
तैसा, शास्त्रगुरुचेनि नांवे, । जो वाराही टेको नेदी सिवे, ।
केवळ मौढ्याचेनिचि [15] जीवे । जियाला जो, ।।390।। — 15 मूर्खपणा
तेणें देहात्मदृष्टीमुळे [16], । आत्मया घापे [17] देहाचे जाळे । — 16 देह हाच आत्मा या समजुतीने 17 घालतो
जैसा, अभ्राचा वेगु, कोल्हे । चंद्री मानी ।।391।।
मग तया मानणयासाठी, । देहबंदिशाळे, किरीटी ! ।
कर्माच्या वज्रगाठी । कळासे [18] तो ।।392।। — 18 बांधला जातो
पाहे पां, बद्ध भावना दृढा, । नळियेवरी तो बापुडा, ।
काय मोकळेयाहि पायाचा चवडा । न ठकेचि ?पुंसा [19]।393।। — 19 पोपट

म्हणौनि, निर्मळे आत्मस्वरूपी ,। जो प्रकृतीचे केले आरोपी, । 1 ब्रह्मदेवाच्या कोट्यावधी
तो कल्पकोडीच्या मापी [1] । मवीचि [2] कर्मे ।।394।। दिवसापर्यंत 2 मोजतो
आतां कर्मामाजी असे, । परी तयाते कर्म न स्पर्शे, ।
वडवानळाते जैसे । समुद्रोदक ।।395।।
तैसेनि, वेगळेपणे । जयाचे कर्मी असणे, ।
तो कीर वोळखावा कवणे, । तरी सांगो ।।396।।
जे मुक्ताते निर्धारितां[3] , । लाभे आपलीच मुक्तता । 3 विचार करता
जैसी, दीपे दिसे पाहतां । आपली वस्तु ।।397।।
नातरी,दर्पणु जंव उटि जे[4],। तंव आपणपयां आपण भेटिजे । 4 स्वच्छ केला कीं
कां, तोय पावतां , तोय होईजे । लवणे जेवी ।।398।।
हे असो; परतोनि मागुते । प्रतिबिंब पाहे बिंबाते ।
तंव पाहणे जाउनि आयिते । बिंबचि होय ।।399।।
तैसे हारपले आपणपें पावे । तै, संतांते पाहतां गिवसावे [5] । 5 शोधावे
म्हणौनि, वानावे, ऐकावे । तेचि सदा ।।400।।
परी कर्मी असोनि , कर्मी । जो नावरे [6], समेविषमे [7] । 7 गुंतत नाहीं 8 बरेवाईट
चर्मचक्षूचेनि चामे । दृष्टि जैसी ।।401।।
तैसा सोडवला जो आहे । तयाचें रूप आतां पाहे ।
उपपत्तीची बाहे । उभऊनि सांगो ।।402।।

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ।।17।।
ज्याला ' मी करितो ' ही भावना नाहीं, व ज्याची बुद्धि अलिप्त असते, त्याने या लोकांना मारिले तरीहि मारिले असे होत नाहीं, आणि ते कर्म बंधकहि होत नाहीं .

तरी अविद्येचिया निदा [9] । विश्वस्वप्नाचा हा धांदा [10] । 9 झोप 10 व्यापार
भोगीत होता प्रबुद्धा ! । अनादि जो ।।403।।
तो महावाक्याचेनि [11] नांवे । गुरुकृपेचेनि थांवे [12] । 11 वेदातील जीव ब्रह्म
माथां हातु ठेविला नव्हे, । थापटिला जैसा ।।404।। ऐक्य दाखविणारे वाक्य
तैसा, विश्वस्वप्नेसी माया ,। नीद सांडुनि धनंजया ! । 12 बळाने
सहसा चेइला [13] । अद्वया-। नंदपणे जो ।।405।। 13 एकदम जागा झाला
तेव्हां, मृगजळाचे पूर । दिसते एक निरंतर [14] ,। 14 अखंड
हारपती, कां चंद्रकर । फांकतां जैसे ।।406।।
कां, बाळत्व निघोनि जाय, । तै, बागुला नाहीं त्राय [15], । 15 बळ
पै, जळालिया इंधन, न होय । इंधन जेवी ।।407।।

नाना, चेवो आलिया पाठी, । तै स्वप्न न दिसे दिठी ।
तैसी, अहं ममता किरीटी ! । नुरेचि तया ।। 408।।

मग सूर्यु ,आंधारालागी । रिघो कां भलते सुरंगी [1] । 1 भुयारात
परी तो तयाच्या भागी । नाहीचि जैसा ।।409।।
तैसा, अत्मत्वे वेष्टिला [2] होये, । तो जया तया दृश्याते पाहे, । 2 वेढला
ते दृश्य द्रष्टेपणेसी होत जाये । तयाचेंचि रूप ।।410।।
जैसा, वन्हि जया लागे, । ते वन्हिचि जालिया आंगे, ।
दाह्यदाहकविभागे । सांडिजे ते ।।411।।
तैसा, कर्माकारा , दुजेया । तो कर्तेपणाचा, आत्मया ।
आळु [3] आला, तो गेलिया । कांहीं बाही जे उरे, ।। 412।। 3 आरोप
तिये,आत्मस्थितीचा जो रावो,। मग,तो देही इये जाणेल ठावो?।
काय प्रलयांबूचा उन्नाहो [4] । वोघु मानी ? ।।413।। 4 प्रलयाची भरती
तैसी ते पूर्ण अहंता [5]। काई देहपणे, पंडुसुता ! । 5 मी ब्रह्मच आहे हा भाव
आवरे? काई , सविता । बिंबे धरिला ? ।।414।।
पै, मथूनि लोणी घेपे, । ते मागुती ताकीं घापे, ?।
तरी ते अलिप्तपणे ,सिंपे [6]। तेणेंसी काई ? ।।415।। 6 मिसळते
नाना, काष्ठौनि वीरेशा! । वेगळा केलिया हुताशा, ।
राही काष्ठाचिया मांदुसा [7] । कोंडलेपणे ?।।416।। 7 पेटीत
कां, रात्रीचिया उदराआंतु । निघाला जो भास्वतु, ।
तो रात्री ऐसी मातु [8] । ऐके कायी ? ।।417।। 8 गोष्ट
तैसे वेद्य [9] वेदकपणेसी [10]। पडिले कां जयाचे ग्रासी, । 9 जाणण्यास योग्य
तया ''देह मी'' ऐसी । अहंता कैची ? ।।418।। 10 जाणणारा
आणि, आकाशे जेथे जेथूनी । जाईजे, तेथ असे भरोनी ।
म्हणौनि ठेले कोंदोनी [11]। आपेआप ।।419।। 11 भरून राहीले
तैसे, जे तेणे करावे, । तो, तेचि आहे स्वभावे ।
मा, कोणे कर्मी वेष्टावे । कर्तेपणे ?।।420।।
नुरेचि गगनावीण ठावो, । नोहेचि समुद्रा प्रवाहो, ।
नुठीचि ध्रुवा जावो , । तैसे जाहाले ।।421।।
ऐसेनि अहंकृतिभावो[12] , । जयाचा बोधी , जाहला वावो [13] ,। 12 अहंभाव 13 व्यर्थ
तऱ्ही देहा जंव निर्वाहो ,। तंव आथी कर्मे ।।422।।
वारा जरी वाजोनि वोसरे [14], । तरी तो डोल, रुखी उरे, । 14 तांडव करून थांबला
कां, सेंदे दृति राहे [15], कापुरे । वेचलेनी ।।423।। 15 करंड्यात वास राहतो
कां,सरलेया गीताचा समारंभु,। न वचे,राहवलेपणाचा क्षोभु [16]। 16 तल्लिनता
भूमी लोळोनि गेलिया अंबु [17], । वोल थारे [18] ।।424।। 17 पाणी वाहून गेले
18 ओल राहते

अगा! मावळलेनि अर्के, । संध्येचिये भूमिके [1] ,।
ज्योतिदीप्ती[2] , कौतुके । दिसे जैसी ।।425।।
पै, लक्ष भेदिलियाहीवरी, । बाण धांवेचि तंववरी, ।
जंव भरली आथी उरी । बळाची[3] ,ते ।।426।।
नाना, चक्री भांडे जाले, । ते कुलाले [4] परते नेले, ।
परी भ्रमेचि ते, मागिले । भोवंडिलेपणे [5] ।।427।।
तैसा,देहाभिमानु गेलिया,। देह जीणे स्वभावे,धनंजया !।
जाले, ते अपैसया । चेष्टवीच [6] ते ।। 428।।
संकल्पेवीण स्वप्न, । न लावितां दांगीचे बन [7], ।
न रचितां गंधर्वभुवन [8]। उठी जैसे ।।429।।
आत्मयाचेनि उद्यमेवीण, । तैसे देहादिपंचकारण।
होय, आपणयां आपण । क्रियाजात ।।430।।
पै, प्राचीनसंस्कारवशे, । पांचही कारणे सहेतुके ,।
कामवीजती गा ! अनेके । कर्माकारे ।।431।।
तया कर्मामाजी मग । संहरो आघवे जग, ।
अथवा नवे चांग । अनुकरो [9] ।।432।।
परी, कुमुद कैसेनि सुके ?। कैसे ते कमळ फांके?।
ही दोन्ही रवी न देखे । जयापरी, ।।433।।
कां, वीजु वर्षोनि [10] आभाळ,। ठिकरिया आतो भूतळ [11] ।
अथवा करूं शाड्वळ [12] । प्रसन्नावृष्टी ,।।434।।
तरी तया दोहीते जैसे । नेणिजेचि कां आकाशे, ।
तैसा, देहीच जो असे । विदेहदृष्टी, ।।435।।
तो देहादिकीं चेष्टी, । घडतां मोडतां हे सृष्टी, ।
ने देखे स्वप्न , दृष्टी । चेइला जैसा ।।436।।
एऱ्हवी, चामाचे डोळेवरी[13],। जे देखती देहचिवरी, ।
ते जीर, तो व्यापारी [14]। ऐसेचि मानिती ।।437।।
कां, तणाचा [15] बाहुला । जो आगरामेरे [16] ठेविला, ।
तो साचचि राखता [17],कोल्हा । मानिजे ना ? ।।438।।
पिसे , नेसले कां नागवे, । हे लोकीं येऊनि जाणावे, ।
ठाणोरियांचे [18] मवावे[19] । आणिकीं [20] घाय [21] ।।439।।
कां, महासतीचे भोग । देखे कीर सकळ जग, ।
परी, ते आगी ना आंग ,। ना लोकु, देखे ।।440।।
तैसा,स्वस्वरुपे उठिला,। जो दृश्येसी द्रष्टा आटला [22],।
तो नेणे, काय राहटला । इंद्रियग्रामु ?।।441।।

1 वेळ
2 संध्यारंग
3 आंगातला जोर ओसरत नाहीं
4 कुंभाराने
5 आधीच्या फिरण्याच्या गतीमुळे
6 हालचाल
7 अरण्य
8 ढगांचे आकार
9 निर्माण करो
10 वीज पडून11 जमीनीचे तुकडे होओत 12 हिरवेगार
13 सामान्य दृष्टिने
14 कर्म करितो
15 गवताचा 16 शेताच्या सीमेवर
17 खराखुरा राखणदार
18 योद्धा 19 मोजावे
20 इतरांनी 21 जखमा
22 लय पावला

अगा! थोरी कल्लोळी[1] ,कल्लोळ साने। लोपता [2] ,तिरीचेनि जने ।
एकीं एक गिळिले, हे मने । मानिजे जऱ्ही, ।।442।।
तऱ्ही, उदकाप्रति पाही ,। कोण ग्रसितसे ? काई?।
तैसे पूर्णा, दुजे नाहीं । जे तो मारी ।।443।।
सुवर्णाचिया चंडिका,। सुवर्णशूळेचि ,देखा, ।
सुवर्णाचिया महिखा [2] । नाशु केला ।।444।।
तो देवलवसिया कडा [4] । व्यवहारु गमला फुडा [5] , ।
वाचूनि, शूळ,महिष,चामुंडा । सुवर्णचि ते ।।445।।
पै, चित्रींचे जळ , हुतांशु [6]। तो दृष्टीचाचि आभासु, ।
पटी, आगी ,वोलांशु[7] , । दोन्ही नाहीं ।।446।।
मुक्ताचे देह तैसे । हालत ,संस्कारवशे, ।
ते देखोनि लोक, पिसे [8] ,। कर्ता म्हणती ।।447।।
आणि,तयां करणेया आंतु [9] ,। घडो तिही लोकां घातु,।
परी तेणें केला, हे मातु [10] । बोलो नये ।।448।।
अगा, अंधारुचि देखावा तेजे, । मग तो फेडी, हे बोलिजे, ।
तैसे, ज्ञानिया नाहीं दुजे । जे ,तो मारी ।।449।।
म्हणौनि तयाची बुद्धी । नेणे पापपुण्याची गंधी [11] ।
गंगा ,मीनलिया नदी ,। विटाळु जैसा ।।450।।
आगीसी आगी झगटलिया, ।काय पोळे धनंजया ?।
कीं शस्त्र रुपे आपणया । आपणचि ?।।451।।
तैसे, आपणपयापरते । जो नेणे क्रियाजाताते, ।
तेथ काय लिंपवी बुद्धीते । तयाचिये ?।।452।।
म्हणौनि, कार्य,कर्ता,क्रिया । हे स्वरुपचि जाहले जया, ।
नाहीं शरीरादिकीं तया । कर्मी बंधु ।।453।।
जे कर्ता जीव, विंदाणी [12] । काढूनि पांचहा खाणी [13] ।
घडित आहे, करणी । आउती दाहे [14]।।454।।
तेथ, न्यावो आणि अन्यावो । हा द्विविधु साधूनि, आवो [15] ।
उभवितां, न लवी खेवो [16] । कर्मभुवने ।।455।।
या थोराडा[17] कीर कामा, । विरजा नोहे [18] आत्मा, ।
परी म्हणसी, हन, उपक्रमा [19]। हातु लावी [20]! ।।।456।।
तो साक्षी चिद्रुपु [21] , । कर्मप्रवृत्तीचा संकल्पु ।
उठी, तो का निरोपु [22] । आपणचि दे ? ।।457।।
तरी, कर्मप्रवृत्तीहीलागी । तया आयासु नाहीं [23] आंगी।
जे प्रवृत्तीचेही उळिगी [24] । लोकुचि आथी ।।458।।

1 मोठ्या लाटेने 2 लहान लाटेला
3 महिशासूराचा
4 पुजाऱ्याचे दृष्टिने 5 खरा
6 आग
7 ओलेपणा
8 भ्रमाने
9 कृतीमुळे
10 गोष्ट
11 गंधवार्ता
12 कारागीर 13 पाचही हेतूंची
14 दहा इंद्रियांच्या नांगरणीने
15 आकार 16 क्षणाचाही
विलंब लावत नाहीं
17 मोठ्या 18 मदत करीत नाहीं
19 आरंभ करण्यास 20 मदत
करतो 21 साक्षीभूत
ज्ञानस्वरूप 22 आज्ञा
23 श्रम नाहींत
24 कर्म करावयाची वृत्ती

म्हणोनि, आत्मयाचे केवळ , । जो रूपचि जाहला निखिळ [1] ,। 1 शुद्ध
तया नाहीं बंदिशाळ । कर्माची हे ।।459।।
परी अज्ञानाच्या पटी[2] , । अन्यथा ज्ञानाचे चित्र उठी । 2 वस्त्रावर
तेथ चितारणी [3] , हे त्रिपुटी । प्रसिद्ध जे कां ।।460।। 3 चित्रकार

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ।।18।।

ज्ञान , ज्ञेय व ज्ञाता अशी ही तीन प्रकाराची कर्मचोदना, आणि करण , कर्म व कर्ता असा तीन प्रकारचा कर्म संग्रह आहे .

जे ज्ञान , ज्ञाता , ज्ञेय । हें जगाचे बीज त्रय , ।
ते कर्माची निःसंदेह [4] । प्रवृत्ती जाण ।।461।। 4 निर्विवाद
आता ,ययाचि गा ! त्रया , । व्यक्ती [5] वेगळालिया । 5 स्पष्ट करु
आइके धनंजया ! । करु रुप ।।462।।
तरी , जीवसूर्यबिंबाचे । रश्मी [6] , श्रोत्रादिके पांचे , । 6 जीवरुपी सूर्याचे कीरण
धांवोनि , विषयपद्माचे । फोडिती मढ [7] ।।463।। 7 कळी
की,जीवनृपाचे वारु [8] उपलाणे [9] ,। घेऊनि इंद्रियांची केकाणे [10] । 8 घोडा 9 खोगीर पाठीवर
विषयदेशीचे नागवणे [11] । आणीत जे , ।।464।। नसलेला10 समुदाय 11 लूट
हे असो; इही इंद्रयी राहाटे,। जे सुखदुःखेसी जीवा भेटे , ।
ते सुषुप्तिकाली वोहटे [12] । जेथ ज्ञान , ।।465।। 12 गाढ झोपेत ओसरते
तया जीवा,नांव, ' ज्ञाता ' । आणि,जे हे सांगितले आतां, ।
तेचि एथ पंडुसुता ! । ' ज्ञान ' जाण ।।466।।
जे अविद्येचिये पोटी , । उपजतखेवो [13] किरीटी ! । 13 जन्मल्याबरोबर
आपणयाते वांटी । तिही ठायी ।।467।।
आपुलिये धांवे पुढां , । घालूनि ज्ञेयाचा गुंडा [14] , । 14 दगड 15मागील
उभारी मागिलीकडां [15] । ज्ञातृत्वाते [16] ।।468।। बाजूस 16 ज्ञात्याला
मग,ज्ञातया,ज्ञेया दोघां ,। तो नांदणुकेचा बगा [17] । 17 आचरण्याचा मार्ग
माजी जालेनी , पै गा ! । वाहे जेणे [18] ।।469।। 18 वागतो
ठाकूनि ज्ञेयाची शिव , । पुरे जयाची धांव , ।
सकळ पदार्था नांव । सूतसे [19] जे , ।।470।। 19 देते
ते गा ! सामान्य ज्ञान । या बोला नाही आन ।
ज्ञेयाचेहि चिन्ह । आइक आतां ।।471।।
तरी , शब्द , स्पर्शु , । रूप , गंध , रसु ।
हा पंचविध आभासु । ज्ञेयाचा तो ।।472।।

जैसे, एकेचि चूतफळे[1] , । इंद्रिया वेगवेगळे ।
रसे ,वर्णे परिमळे । भेटिजे स्पर्शे ।।473।।
तैसे , ज्ञेय तरी एकसरे[2] , । परी ज्ञान इंद्रियद्वारे ।
घे , म्हणौनि प्रकारे । पांचे जाले ।।474।।
आणि,समुद्री वोघाचे जाणे,। सरे,लाणीपासी[3] धांवणे,।
कां , फळी सरे वाढणे । सस्याचे[4] जेवी ।।475।।
तैसे, इंद्रियांच्या वाहवटी[5] । धांवतया ज्ञाना जेथ ठी[6] ,।
होय , ते गा किरीटी ! । विषय , ज्ञेय ।।476।।
एवं, ज्ञातया, ज्ञाना, ज्ञेया । तिही रूप केले धनंजया ! ।
हे त्रिविध सर्व क्रिया-। प्रवृत्ति जाण ।।477।।
जे शब्दादि विषय । हे पंचविध जे ज्ञेय , ।
तेचि प्रिय कां अप्रिय । एकेपरीचे ।।478।।
ज्ञान ,मोटके ज्ञातया । दावी ना जंव, धनंजया ! ।
तंव , स्वीकारा की त्यजावया । प्रवर्तेचि तो ।।479।।
परी, मीनाते देखोनि बकु ,। जैसा , निधानाते[7] रंकु,।
कां स्त्री देखोनि कामुकु । प्रवृत्ति धरी[8] ।।480।।
जैसे खालारां[9] धांवे पाणी, । भ्रमर पुष्पाचिये घाणी[10],।
नाना, सुटला ,सांजवणी[11] ,। वत्सुचि पां ! ।।481।।
अगा ! स्वर्गीची उर्वशी । ऐकोनि, जेवी माणुसी ।
वराता[12] लावीजती आकाशी । यागांचिया , ।।482।।
पै , पारिवा जैसा किरीटी ! । चढला नभाचिये पोटी , ।
पारवी देखोनि लोटी । आंगचि सगळे , ।।483।।
हे ना ; घनगर्जनासरिसा, । मयूर वोवांडे[13] आकाशा, ।
ज्ञाता, ज्ञेय देखोनि ,तैसा । धांवचि घे ।।484।।
म्हणौनि, ज्ञान, ज्ञेय, ज्ञाता । हें त्रिविध गा पंडुसुता !।
होयचि कर्मा समस्तां, । प्रवृत्ति येथ ।।485।।
परी, तेचि ज्ञेय विपाये[14] , । जरी ज्ञातयाते प्रिय होये, ।
तरी, भोगावया न साहे । क्षणही विलंबु ।।486।।
नातरी, अवचटे, । तेचि विरुद्ध होऊनि भेटे, ।
तरी युगांत वाटे । सांडावया ।।487।।
व्याळा कां हारा, । वरपडा[15] जालेया नरा, ।
हरिखु[16] आणि दरारा[17] । सरसाचि उठी ।।488।।
तैसे, ज्ञेय प्रियाप्रिये ,। देखिलेनि ज्ञातया होये ।
मग, त्याग, स्वीकारी ,वाहे[18] । व्यापाराते।।489।।

1 आंब्याचे नांव काढताच
2 एकच
3 शेवटच्या मुक्कामावर थांबते
4 धान्याचे
5 व्यवहाराने 6 शेवट
7 धनाचा ठेवा
8 कर्म करण्यास प्रवृत्त होतो
9 उताराला 10 फुलाच्या वासावर 11 सायंकाळी दूध काढावयाचे वेळी
12 शिड्या
13 उडण्याचा प्रयत्न करितो
14 कदाचित
15 दिसल्यावर
16 आनंद 17 भय
18 प्रवृत्त होतो

तेथ रागी प्रतिमल्लाचा [1] ,। गोसांवी सर्वदळाचा[2],।
रथु सांडूनि पायांचा । होय [3] जैसा ।।490।।
तैसे, ज्ञातेपणे जे असे । ते ये कर्ता ऐसिये दशे, ।
जेविते [4], बैसिले जैसे । रंधन करूं [5]।।491।।
कां, भंवरेचि [6] केला मळा,। वरकलुचि [7] झाला अंकसळा[8],।
नाना, देवो रिगाला देउळा-।चिया कामा, ।।492।।
तैसा, ज्ञेयाचिया हांवा [9] ,। ज्ञाता ,इंद्रियांचा मेळावा ।
राहाटवी, तेथ पांडवा ! । कर्ता होय ।।493।।
आणि आपण होउनि कर्ता, । ज्ञाना आणी करणता [10] ,।
तेथे, ज्ञेयचि स्वभावतां, । कार्य होय ।।494।।
ऐसा, ज्ञानचिये निजगती [11], । पालटु [12] पडे गा सुमती ! ।
डोळ्याची शोभा राती । पालटे जैसी ।।495।।
कां, अदृष्ट [13]जालिया उदासु [14],। पालटे श्रीमंताचा विलासु,।
पुनिवेपाठी शीतांशु [15] । पालटे जैसा ।।496।।
तैसा, चाळिता करणे [16], । ज्ञाता वेष्टिजे कर्तेपणे, ।
तेथिंची तिये लक्षणे । ऐक आतां ।।497।।
तरी बुद्धि आणि मन ,। चित्त ,अहंकार हन, ।
हे चतुर्विध चिन्ह । अंतःकरणाचे ।।498।।
बाह्य त्वचा,श्रवण,।चक्षु,रसना,घ्राण ।
हे पंचविध जाण । इंद्रिये गा !।।499।।
तेथ आंतुले तंव करणे, । कर्ता ,कर्तव्या घे उमाणे [17] ।
मग तै जरी जाणे । सुखा येते, ।।500।।
तरी बाहेरीले तियेही । चक्षुरादिके दाहाही ।
उठौनि लवलाही [18] । व्यापारा सूये ।।501।।
मग तो इंद्रियकदंबु [19] । करविजे तंव राबु [20], ।
जंव कर्तव्याचा लाभु । हातासि ये ।।502।।
ना, ते कर्तव्य ,जरी दुःखे । फळेल ,ऐसे देखे, ।
तो लावी त्यागमुखे । तिये दाहाही ।।503।।
मग फिटे दुःखाचा ठावो । तंव राहाटवी रात्रिदिवो, ।
विकणवाते [21] कां रावो[22] । जयापरी ।।504।।
तैसेनि त्याग स्वीकारी । वाहातां इंद्रियांची धुरी [23]।
ज्ञातयाते , अवधारी । कर्ता म्हणिपे ।।505।।
आणि कर्तयाच्या सर्व कर्मी, । आउतांचिया क्षमी[24] ,।
म्हणौनि, इंद्रियाते आम्ही । करणे [25] म्हणो ।।506।।

1 युद्धाची खुमखुमी असलेला
2 सेनानायक
3 रथातून खाली उतरतो
4 जेवणारा 5 स्वयंपाकाला लागला
6 भ्रमर 7 कसवटीचा दगड 8 कस
9 अभिलाषेने
10 साधनस्वरूप
11 करामतीने 12 बदलते
13 नशीब 14 रुसले
15 चंद्र
16 इंद्रियांच्या वर्तणुकीने
17 अंदाज घेतो
18 क्षणाचा विलंब न लाविता
19 इंद्रियांचा समुदायाला
20 राबवितो
21 धान्य नसल्यामुळे कर्ज न फेडणाऱ्याला 22 राजा
23 इंद्रियांचे चलनवलन संभाळणाऱ्या
24 नांगरासारखा राबवतो
25 साधने

आणि हेचि करणेवरी । कर्ता क्रिया ज्या उभारी, ।
तिया व्यापे[1] , ते अवधारी । कर्म एथ ।।507।।   1 आकाराला येते
सोनाराचिया बुद्धी लेणे ।व्यापे, चंद्रकरी चांदणे, ।
कां व्यापे वेल्हालपणे[2] । वेली जैसी ,।।508।।   2 वाढीमुळे वेल व्यापली जाते
नाना, प्रभा व्यापे प्रकाशु, । गोडिया[3] इक्षुरसु ।   4 गोडपणा
हे असो; अवकाशु । आकाशी जैसा, ।।509।।
तैसे, कर्तयाचिया क्रिया । व्यापले ,जे धनंजया ! ।
ते कर्म गा ! बोलावया । आन नाहीं[5] ।।510।।   5 दुसरे कांहीं म्हणत नाहीं
एवं, कर्ता,कर्म,करण । या तिहींचेही लक्षण ।
सांगितले ,तुज विचक्षण-। शिरोमणी ।।511।।
एथ , ज्ञाता,ज्ञान, ज्ञेय । हे कर्माचे प्रवृत्तित्रय ।
तैसेचि कर्ता, करण, कार्य । हा कर्मसंचयो[6] ।।512।।   6 कर्माच्या निर्मीतीस कारण
वन्ही ठेविला असे धुमु, । आथी[7] बीजी जेवी द्रुमु, ।   7 असते
कां, मनी जोडे कामु । सदा जैसा, ।।513।।
तैसा, कर्ता, क्रिया, करणी । कर्माचे आहे जिंतवणी[8]।   8 उगमस्थान
सोने जैसे खाणी । सुर्वणाचिये ।।514।।
म्हणौनि, हे कार्य, मी कर्ता, । ऐसे आथि जेथ पंडुसुता !।
तेथ , आत्मा दूरी समस्ता-। क्रियांपासी ।।515।।
यालागी पुढतपुढती, । आत्मा वेगळाचि सुमती ! ।
आतां असो, हें किती ! । जाणतासि तूं ।।516।।

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ।।19।।
ज्ञान,कर्म आणि कर्ता प्रत्येकीं सत्त्व,रज व तम या गुणभेदाने तीन-तीन प्रकारची आहे त असे गुणसंख्याशास्त्रात म्हणजे कपिल-शांख्यशास्त्रात म्हटले आहे . ते प्रकार जसेच्या तसे ऐक.

परी, सांगितले जे ज्ञान,।कर्म,कर्ता हन ।
ते तिन्ही तिही ठायी ,भिन्न ।गुणी आहाती ।।517।।
म्हणौनि,ज्ञाना,कर्मा, कर्तया । पातेजो नये[9] धनंजया ! ।   9 विश्वास ठेवु नये
जे[10]दोनी बांधती,सोडावया[11]। एकचि प्रौढ[12],।518।।   10 रज,तम 11 मुक्तीकरिता
ते सात्त्विक, ठाउवे होये[13] । जे गुणभेदु सांगो , पाहे ।   12 समर्थ 13 लक्षात ठेव
जो सांख्यशास्त्री आहे । उवाइला[14] ।।519।।   14स्पष्ट केला आहे 15 आत्मबोधरुपी
जे विचारक्षीरसमुद्र । स्वबोधकुमुदिनीचंद्र[15]।   कमलाचा विकास करणारा चंद्र
ज्ञानडोळसां नरेंद्र[16] । शास्त्रांचा जे ।।520।।   16 ज्ञान देणाऱ्या शास्त्रांचा राजा

की, प्रकृतिपुरुष दोनी । मिसळली, दिवोरजनी ।
तिये निवडितां त्रिभुवनी । मार्तंडु [1] जे ।।521।।
जेथ अपारा मोहराशी । तत्त्वाच्या मापी चोविसी [2] ।
उगाणा घेऊनि [3] परेशी [4] । सुरवाडिजे [5] ।।522।।
अर्जुना! ते सांख्यशास्त्र । पढे ,जयाचे स्तोत्र [6] ,।
ते गुणभेदचरित्र । ऐसे आहे ।।523।।
जे आपुलेनि आंगिके [7] ,। त्रिविधपणाचेनि अंके [8] ।
दृश्यजात तितुके । अंकित [9] केले ।।524।।
एवं, सत्त्वरजतमा । तिहीची एवढी असे महिमा, ।
जे त्रैविध्य, आदी ब्रह्मा ,। अंती कृमी [10] ।।
परी,विश्वीची आघवी मांदी [11] ,।जेणे भेदलेनि,गुणभेदी ।
पडिली, ते तंव आदी । ज्ञान सांगो ।।526।।
जे दिठी जरी चोख कीजे,। तरी भलतेही चोख सुजे [12] ।
तैसे, ज्ञाने शुद्धे , लाहिजे । सर्वही शुद्ध ।।527।।
म्हणौनि, ते सात्त्विक ज्ञान । आतां सांगो, दे अवधान ।
कैवल्यगुणनिधान । श्रीकृष्ण म्हणे ।।528।।

1 सूर्य
2 चौवीस तत्त्वांचा अभ्यास करून
3 विचार करून 4 परमात्मरुपाचे
5 सुख भोगता येते 6 वर्णन केले आहे
7 स्वाभाविकपणे 8 चिन्हाने
9 खुणा केल्या
10 ब्रह्मापासून किटकापर्यंत
11 समुदाय
12 समजते

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ।।20।।

विभक्त म्हणजे निरनिराळ्या सर्व भूतांत, एकच अविभक्त व अव्यय भाव किंवा तत्त्व आहे, असे ज्या ज्ञानाने कळते ते सात्त्विक ज्ञान असे समज .

तरी अर्जुना गा! ते फुडे [13] । सात्त्विक ज्ञान चोखडे [14] ।
जयाच्या उदयी ज्ञेय बुडे [15] ,। ज्ञातेनिसी [16] ।।529।।
जैसा, सूर्य न देखे अंधारे, । सरिता नेणिजती सागरे ,।
कां, कवळिलिया [17], न धरे । आत्मछाया [18] ।।530।।
तयापरी, जया ज्ञाना, । शिवादि तृणावसाना[19], ।
इया भूतव्यक्ति, भिन्ना । नाडळती [20] ।।531।।
जैसे, हाते चित्र पाहातां, । होय पाणिये मीठ धुतां, ।
कां, चेवोनि स्वप्ना येतां ,। जैसे होय ।।532।।
तैसे, ज्ञाने ,जेणे । करिता ,ज्ञातव्याते [21] पाहाणे, ।
जाणता ,ना ,जाणणे ,। जाणावे ,उरे, ।।533।।
पै,सोने आटूनि,लेणी ।न काढिती आपुलिया आयणी [22],।
कां, तरंग न घेपती , पाणी । गाळूनि जैसे ।।534।।

13 स्पष्ट14 शुद्ध 15 जाणण्याची वस्तु मावळते 16 जाणणाऱ्या सह
17 पकडण्याचा प्रयत्न केला असता
18आपली सावली
19 शंकरापासून गवतापर्यंत
20 भिन्न दिसत नाहीत
21 जाणण्यास योग्य
22 बुद्धीने

तैसी, जया ज्ञानाचिया हाता । न लगेचि दृश्यपथा [1]। 1 दृश्य स्थिती
ते ज्ञान जाण सर्वथा । सात्त्विक गा !।।535।।
आरिसा पाहो जातां कोडे,। जैसे, पाहातेचि [2] कां रिगे पुढे,। 2 पाहाणाराच
तैसे, ज्ञेय लोटोनि पडे । ज्ञाताचि जे ।।536।।
पुढती तेचि ,सात्त्विक ज्ञान, । जे मोक्षलक्ष्मीचे भुवन ।
हे असो ; ऐक चिन्ह । राजसाचे ।।537।।

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ।।21।।
सर्व भूतांमध्ये भिन्न भिन्न प्रकारचे नाना भाव आहेत असा पृथक्त्वबोध ज्या ज्ञानाने होतो ते ज्ञान राजस समज .

तरी पार्था ! परियेस । ते ज्ञान गा ! राजस ,।
जे भेदाची कांस । धरूनि चाले ।।538।।
विचित्रता,भूतांचिया,। आपण,आंतोनि ठिकरिया [3],। 3 स्वतःच भिन्नत्व अर्पण करून
बहु चकै [4] ,ज्ञातया । आणिली जेणे ।।+539।। 4 खूप भ्रम पाडला
जैसे ,साचा रूपाआड । घालूनि विसराचे कवाड [5], । 5 पडदा
मग स्वप्नाचे काबाड । ओपी [6] निद्रा ।। 6 वैरण ठेवते
तैसे,स्वज्ञानाचिये पौळी। बाहेरि [7] ,मिथ्या मही खळी[8] । 7 आवाराबाहेर 8 भ्रामक
तिही अवस्थांचिया वह्याळी [9] । दावी जे जीवा ।।+541।। मंचावर 9 खेळ
अलंकारपणे झाकले, । बाळा, सोने कां वायां गेले, ।
तैसे नामी, रुपी, दुरावले । अद्वैत जया ,।।542।।
अवतरली गाडग्यां,घडां। पृथ्वी,अनोळख जाली मूढां,।
वन्ही जाला कानडा [10] । दीपत्वासाठी ।।543।। 10 समजण्यास कठीण
कां, वस्त्रपणाचेनि आरोपे,। मूर्खाप्रति तंतु हारपे,।
नाना, मुग्धा [11] पटु लोपे, । दाऊनि चित्र ।।544।। 11 मूर्ख
तैशी, जया ज्ञाना ,। जाणोनि भूतव्यक्ती भिन्ना, ।
ऐक्यबोधाची भावना । निमोनि [12] गेली ।।545।। 12 नाहींशी झाली
मग इंधनी भेदला अनळु [13], । फुलावरी परिमळु, 13 अग्नि
कां जळभेदे ,शकलु [14] । चंद्रु जैसा ।।546।। 14 संपूर्ण
तैसे, पदार्थभेद बहुवस । जाणोनि लाहान, थोर, वेष ।
आंतले [15] ,ते राजस ।ज्ञान येथ ।।547।। 15 मिळते
आतां,तामसाचेहि लिंग [16] । सांगेन ते वोळख चांग । 16 चिन्ह
डावलावया मातंग-। सदन जैसे ।।548।।

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ।।22।।

परंतु हेच काय ते सर्वस्व म्हणून एकाच गोष्टीत निष्कारण व तत्त्वार्थ न जाणिता गुंतून राहिलेले जे अल्पज्ञान ते तामस म्हटले आहे

तरी किरीटी ! जे ज्ञान । हिंडे विधीचेनि वस्त्रेहीन ।
श्रुति पाठमोरी [1] नग्न । म्हणौनि ,तया ।।549।।
1 तोंड फिरवते
येरीही ,शास्त्र बटिकरी[2] ।जे निंदेचे विटाळवरी[3] ।
2 दासी 3 निंदेचा दोष लागेल
बोळविलेसे [4] डोंगरी । म्लेंच्छधर्माच्या ।।550।।
म्हणून 4 घालवून दिले
जे गा ज्ञान ऐसे, । गुणग्रहे तामसे [5] ।
5 तामसरुपी पिशाच्चाने ग्रासल्यामुळे
घेतले, भवे [6] ,पिसे । होऊनियां [7]।।551।।
6 भटकते 7 वेडे होऊन
जे ,सोयरिके बाधु नेणे [8], । पदार्थी निषेधु न म्हणे, ।
8 शरीरसंबंधात दोष मानीत नाहीं
निरोविले [9] जैसे सुणे [10] । शून्यग्रामी ।।552।।
9 सोडले 10 कुत्रे
तया तोंडी जे नाडळे [11], । कां, खातां जेणे पोळे, ।
11 मिळत नाहीं
तेचि , एक वाळे [12], । येर घेणेचि ।।553।।
12 टाकतो
पै, सोने चोरितां उंदिरु । न म्हणे थरुविथरु [13] ।
13 शुद्ध ,अशुद्ध
नेणे मांसखाइरु [14] । काळे गोरे ।।554।।
14 मांस खाणारा
नाना, वनामाजी, बोहरी [15] । कडसणी [16] जेवी न करी, ।
15 वणवा 16 निवड
कां, जीत, मेले ,न विचारी । बैसतां माशी ।।555।।
अगा! वांता [17] कां वाढिलेया, । साजुक कां सडलिया, ।
17 ओकून टाकलेले
विवेकु कावळिया । नाही जैसा, ।।556।।
तैसे, निषिद्ध सांडूनि द्यावे, । कां, विहित आदरे घ्यावे, ।
हे विषयांचेनि नांवे । नेणेचि जे ,।।557।।
जेतुले आड पडे दिठी, । तेतुले घेचि विषयासाठी, ।
मग ते स्त्री-द्रव्य वाटी, । शिश्नोदरां [18]।।558।।
18 खातो किंवा भोगतो
तीर्थातीर्थ हे भाख [19] ,। उदकी नाही सनोळख [20] ,।
19 भाषा 20 ओळख
तृषा वोळे [21], तेचि सुख । वांचूनियां ।।559।।
21 तहान भागते
तयाचिपरी खाद्याखाद्य । न म्हणे, निंद्यानिंद्य, ।
तोंडा आवडे ते मेध्य [22] । ऐसाचि बोधु ।।560।।
22 पवित्र
आणि स्त्रीजात तितुके , । त्वचेंद्रियेचि वोळखे, ।
तियेविषयी सोयरिके । एकचि बोधु ।।561।।
पै ,स्वार्थी जे उपकरे [23],।तयाचि नाम सोयिरे,।
23 स्वार्थाचे वेळी उपयोगी पडतात
देहसंबंधु न सरे [24] । जिये ज्ञानी ।।562।।
24 नात्यागोत्याला किंमत नसते
मृत्युचे आघवेचि अन्न, । आघवेचि आगी इंधन, ।
तैसे, जगचि आपले धन । तामसज्ञाना ।।563।।

ऐसेनि विश्‍व सकळ । जेणे विषयोचि मानिले केवळ,।
तया एक जाण फळ, ।’देहभरण’ ।।564।।
आकाशपतिता नीरा, । जैसा सिंधूचि येक थारा, ।
तैसे, कृत्यजात उदरा-। लागीचि बुझे [1] ।।565।   1 मानितो
वांचूनि स्वर्ग, नरकु ,आथी, । तया हेंतु ,प्रवृत्ति निवृत्ती, ।
इये आघवियेचि ,राती । जाणिवेची [2] जे ।।566।।   2 ज्ञानाचा अंधारच असतो
जे ,देहखंडा नाम आत्मा, । ईश्‍वर पाषाणप्रतिमा,।
ययापरौति प्रमा [3] । ढळो नेणे ।।567।।   3 बुद्धी
म्हणे,”पडिलेनि शरीरे । केलेनिसी आत्मा सरे [4], ।   4 कर्मासह आत्मा नाशा पावतो
मा, भोगावया उरे । कोण वेषे ? ।।568।।
ना, ईश्‍वरु पाहातां आहे , । तो भोगवी ,हें जरी होये, ।
तरी देवचि खाये । विकूनिया ।।569।।
गांवीचे देवळेश्‍वर । नियामकचि होती साचार [5] ,।   5 खरोखर
तरी, देशीचे डोंगर । उगे कां असती? ।।570।।
ऐसा विपाये[6] देवो मानिजे,। तरी पाषाणमात्रचि जाणिजे, ।   6 चुकुन
आणि, आत्मा तंव म्हणिजे । देहातेचि ।।571।।
येरे पापपुण्यादिके, । ते आघवेचि करोनि लटिके [7], ।   7 खोटे
हित मानी अग्निमुखे । चरणे जे कां ।।572।।
जे चामाचे डोळे दाविती, । जे इंद्रिये गोडी लाविती, ।
तेचि साच, हें प्रतीती । फुडी [8] जया ।।573।।   8 खरी
किंबहुना, ऐसी प्रथा [9]। वाढती देखसी, पार्था ! ।   9 गवगवा
धूमाची वेली वृथा । आकाशी जैसी ।।574।।
कोरडा ना वोला, । उपेगा आथी गेला ।
तो वाढोनि मोडला । भेंडु [10] जैसा ।।575।।   10 निरुपयोगी झाड
नाना, उंसांची कणसे ,। कां, नपुंसके माणुसे, ।
वन लागले जैसे । साबरीचे [11] ।।576।।   11 पोकळ निरुपयोगी झाड
नातरी, बाळकाचे मन, । कां, चोराघरीचे धन, ।
अथवा गळास्तन । शेळियेचे ।।577।।
तैसे जे वायाणे [12] , । वोसाळ [13] दिसे जाणणे, ।   12 व्यर्थ 13 निस्तेज
तयाते मी म्हणे । ’तामस ज्ञान’ ।।578।।
तेही ज्ञान ,इया भाषा । बोलिजे, तो भावो ऐसा, ।
जात्यंधाचा कां जैसा । डोळा वाडु [14]।।579।।   14 दिसण्यात चांगला मोठा
कां, बधिराचे नीट कान, । अपेया नाम पान, ।
तैसे, आडनांव ज्ञान । तामसा तया ।।580।।

हे असो; किती बोलावे ? । तरी ऐसे जे देखावे, ।
ते ज्ञान नोहे , जाणावे । डोळस [1] तम ।।581।। 1 प्रत्यक्ष
एवं, तिही गुणी । भेदले, यथालक्षणी ,।
ज्ञान, श्रोतेशिरोमणी! । दाविले तुज ।।582।।
आतां, याचि त्रिप्रकारा । ज्ञानाचेनि ,धनुर्धरा! ।
प्रकाशे ,होती गोचरा । कर्तयांच्या क्रिया ।।583।।
म्हणौनि, कर्म पै, गा ! । अनुसरे तिही भागां ।
मोहरे जालिया वोघा [2] ,। तोय जैसे ।।584।। 2 ओघा बरोबर
तेचि ज्ञानत्रयवशे, । त्रिविध कर्म जे असे, ।
तेथ सात्त्विक तंव ऐसे । परिसे आधी ।।585।।

नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ।।23।।

फलप्राप्तीची इच्छा न धरणारा पुरुष, प्रीती किंवा द्वेष मनात न ठेविता, आसक्तिविरहित स्वधर्माप्रमाणे नियत म्हणजे नेमलेले जे कर्म करितो ते कर्म सात्त्विक म्हटले आहे .

तरी स्वाधिकाराचे मार्गे । आलें, जे मानिले आंगे, ।
पतिव्रतेचेनि परिष्वंगे [3] । प्रियाते, जैसे ।।586।। 3 आलिंगनाने
सांवळ्या आंगा चंदन , । प्रमदालोचनी अंजन, ।
तैसे अधिकारासी मंडण । नित्यपणे जे ।।587।।
ते नित्य कर्म भले ,। होय नैमित्तिकी सावाइले [4] ,। 4 साह्य झाले
सोनयासि जोडले । सौरभ्य जैसे ।।588।।
आणि,आंगा जीवाची संपत्ती । वेचूनि, बाळाची करी पाळती,।
परी, जीवे उबगणे हें स्थिती । न पाहे माय ।।589।।
तैसे, सर्वस्वे कर्म अनुष्ठी, । परी फळ न सूये दिठी, ।
उखिती [5] क्रिया पैठी [6], । ब्रह्मीचि करी ।।590।। 5 जशीच्या तशी 6 अर्पण करितो
आणि,प्रिय आलिया स्वभावे,। शंबळ [7] उरे ,वेचे ठाउवे । 7 अन्नसामुग्री
नव्हे, तैसे सत्प्रसंगे करावे । पारुषे[8] जरी ।।591।। 8 विफळ झाले तरी
तरी, अकरणाचेनि [9] खेदे, । द्वेषाते जिवी न बांधे, । 9 कर्म झाले नाहीं म्हणून
जालियाचेनि आनंदे , । फुंजो [10] नेणे ।।592।। 10 फुगुन जात नाहीं
ऐसऐसिया हातवटिया [11] । कर्म निफजे जे धनंजया !। 11 कुशलतेने
जाण , 'सात्त्विक ' हें तया । गुणनाम गा ! ।।593।.
ययावरी राजसाचे । लक्षण, सांगिजेल साचें, ।
न करी अवधानाचे । वाणेपण [12] ।।594।। 12 कुचराई

यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ।।24।।

पण काम म्हणजे फलाशेची इच्छा धरणारा किंवा अहंकार-बुद्धीचा पुरुष पुष्कळ आयासाने जे कर्म करितो त्याला राजस म्हणतात.

तरी घरी मातापितरां। धड बोली नाही ,संसारा, ।
येर विश्व भरी आदरा । मूर्खु जैसा ।।595।।
कां, तुळशीचिया झाडा, । दुरूनि न घापे [1] सिंतोडा, । — 1 घालतो
द्राक्षीचिया तरी बुडा, । दूधचि लाविजे ।।596।।
तैसी, नित्यनैमित्तिके । कर्मे , जिये आवश्यके, ।
तयांचेविषयी न शके । बैसला उठूं ।।597।।
येरां, काम्याचेनि तरी नांवे, । देह ,सर्वस्व आघवे ।
वेचितांही ,न मनवे । बहु ऐसे ।।598।।
अगा! देवढी [2] वाढी लाहिजे,।तेथ मोल देतां न धाइजे [3],। — 2 दीडपट 3 समाधान होत नाहीं
पेरितां , पुरे न म्हणिजे । बीज जेवी ।।599।।
कां, परिसु आलिया हाती ,। लोहालागी सर्वसंपत्ती ।
वेचितां ,ये उन्नती [4] । साधकु जैसा ।।600।। — 4 उन्माद
तैसी, फळे देखोनि पुढे, । काम्यकर्मे दुवाडे [5] । — 5 कठीण
करी, परी ते थोकडे [6] । केलेही मानी ।।601।। — 6 कमीच
तेणें फळकामुके । यथाविधी नेटके ।
काम्य कीजे तितुके । क्रियाजात, ।।602।।
आणि, तयाही केलियाचे । तोंडी लावी दौडीचे ।
'कर्मी' [7] या नांवपाटाचे [8] । वाणे सारी [9] ।।603।। — 7 कर्ता 8 पदवीने मिरवितो
तैसा भरे कर्माहंकारु, । मग, पिता अथवा गुरु । — 9 वाणे वाटतो
ते न मनी, काळज्वरु । औषध जैसे ।।604।।
तैसेनि साहंकारे, । फळाभिलाषिये नरे,।
कींजे गा ! आदरे, । जे जे कांहीं, ।।604।।
परी तेही करणे बहुवसा [10] । वळघोनि [11] करी सायासा ,। — 10 फार 11 आवेशाने
जीवनोपावो [12] कां जैसा । कोल्हाटियांचा [13] ।।606।। — 12 पोटपण्याचा उद्योग
एका कणालागी, उंदिरु । आसका [14] उपसे डोंगरु, । — 13 डोंबाऱ्याचा14 संपूर्ण
कां, शेवाळोद्देशे, दर्दुरु [15] । समुद्रु डहुळी [16] ।।607।। — 15 बेडुक 16 घुसळतो
पै, भिकेपरते न लाहे, । तऱ्ही, गारुडी सापु वाहे । — 17 कष्टच गोड
काय कींजे ! शीणुचि होये । गोडू[17] , येकां [18] ! ।। 608।। — वाटतात 18 काहींना
हे असो; परमाणूचेनि लाभे, । पाताळ लंघिती [19] वोळंबे [20] । — 19 आक्रमण करितात
तैसे, स्वर्गसुखलोभे । विचंबणे[21] जी ।।609।। — 20 वाळवी 21 कुचंबणे

ते काम्य कर्म सक्लेश । जाणावे येथ राजस ।
आतां चिन्ह परिस । तामसाचे ।।610।।

अनुबन्धं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ।।25।।
अनुबंध म्हणजे पुढे होईल काय, पौरुष म्हणजे आपले सामर्थ्य किती, आणि त्यांत नाश अगर हिंसा घडेल किंवा नाही, यांचा विचार न करिता मोहाने जे कर्म आरंभिले जाते, त्याला तामस म्हणतात.

तरी ते गा ! तामस कर्म, । जे निंदेचे काळे धाम।
निषेधाचे जन्म । साच जेणे ।।611।।
जे निपजविल्यापाठी, । कांहीच न दिसे दिठी ।
रेघ काढिलिया पोटी । तोयाचें जेवी ।।612।।
कां, कांजी घुसळलिया, । कां, राखोंडी फुंकलिया, ।
कांही न दिसे गाळिलिया । वाळुघाणा ।।613।।
नाना, उपणिलिया [1] भूंस, । कां विंधिलिया [2] आकाश, । — 1 वाऱ्यावर उडविले असता 2 प्रहार केला असता
नाना, मांडिलिया पाश । वारयासी ।।614।।
हे आवघेचि जैसे । वांझे होऊनि नासे, ।
जे केलिया पाठी ,तैसे । वायांचि जाय ।।615।।
एऱ्हवी, नरदेहाही येवढे । धन आटणीये [3] पडे , । — 3 खर्च होते
जे कर्म निफजवितां , मोडे । जगाचे सुख ।।616।।
जैसा, कमळवनी फांसु ,। काढिलिया ,कांटसु [4],। — 4 काटेरी
आपण झिजे, नाशु । कमळा करी ।।617।।
कां, आपण आंगे जळे, । आणि नागवी जगाचे डोळे [5],। — 5 अंधार करितो
पतंगु जैसा सळे [6] । दीपाचेनि ।।618।। — 6 द्वेष करितो
तैसे ,सर्वस्व वायां जावो, । वरी देहाही होय घावो , ।
परी पुढिला अपावो । निफजविजे जेणे ,।।619।।
मासी आपणयाते गिळवी, । परी पुढीला वांती शिणवी, ।
ते कश्मळ [7], आठवी ,। आचरण जे ।।620।। — 7 सदोष
तेही करावया दोषे, । मज सामर्थ्य असे की नसे, ।
हेही पुढील तैसे । न पाहतां, करी ।।621।।
केवढा माझा उपावो [8] ?। करिता कोण प्रस्तावो ? [9] । — 8 सामर्थ्य 9 प्रसंग
केलियाही,आवो [10]। काय येथ ? ।।622।। — 10 लाभ
इये जाणिवेची सोये [11] । अविवेकाचेनि पाये । — 11 मार्ग
पुसोनियां, होये । साटोप [12] कर्मी ।।623।। — 12 उद्युक्त

आपुला वसौटा [1] जाळूनि, । बिसाटे [1]जैसा वन्ही, ।। — 1 आश्रयस्थान 2 फैलावतो
कां, स्वमर्यादा गिळोनि ,। सिंधु उठी ।।624।।
मग नेणे , बहु थोडे, । न पाहे मागे पुढे,।
मार्गामार्ग येकवढे [3] । करीत चाले ।।625।। — 3 एकत्र
तैसे कृत्याकृत्य सरकटित [4], । आपपर नुरवित, । — 4 रगडत
कर्म होय, ते निश्चित । तामस जाण ।।626।।
ऐसी, गुणत्रयभिन्ना, । कर्माची गा अर्जुना! ।
हे केली विवंचना । उपपत्तीसी [5] ।।627।। — 5 उद्देशासह
आतां, ययाचि कर्मा भजतां, । कर्माभिमानिया कर्ता ।
तो जीवुही त्रिविधता । पातला असे ।।628।।
चतुराश्रमवशे, । एकु पुरुषु चतुर्धा दिसे ।
कर्तया त्रैविध्य तैसे । कर्मभेदे ।।629।।
तरी तयां तिही आंतु, । सात्त्विक तंव प्रस्तुतु ।
सांगेन, दत्तचित्तु । आकर्णी तूं ।।630।।

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ।।26।।
ज्याला आसक्ति नाहीं, जो ‘मी’ व ‘माझे’ म्हणत नाही, कार्य सिद्ध होवो न होवो दोन्ही वेळी जो मनाने अविकृत , तथापि जो धृति व उत्साह यांनी युक्त होत्साता कर्म करितो, त्यास सात्त्विक कर्ता म्हणतात.

तरी फळोद्देशे सांडिलिया, । वाढती जेवी सरळिया,।
शाखा कां चंदनाचिया ,। बावन्नया [6]।।631।। — 6 उत्तम
कां, न फळतांही, सार्थका । जैसिया नागलतिका [7] ,। — 7 विड्याच्या पानाचा वेल
तैसिया करी नित्यादिकां । क्रिया जो कां, ।।632।।
परी, फळशून्यता[8] ,। नाही तया विफळता [9], । — 8 कर्माला फळ नाही 9 कर्म व्यर्थ होत नाहीं
पै, फळासीचि पंडुसुता ! । फळे कायिसी ? ।।633।।
आणि,आदरे [10] करी बहुवसे [11] ,।परी कर्ता मी,हे नुमसे [12],। — 10 आदरपूर्वक 11 खूप
वर्षाकाळीचे जैसे । मेघवृंद ।।634।। — 12 समजत नाहीं
तेवींचि, परमात्मलिंगा । समर्पावयाजोगा, ।
कर्मकलापु [13] पै गा! । निपजावया ,।।635।। — 13 कर्मसमुदाय
तया, काळाते नुलंघणे [14] ,। देशशुद्धिही साधणे, । — 14 योग्या काळ साधून
कां, शास्त्रांच्या वाती पाहणे [15] । क्रियानिर्णयो ।।636।। — 15 शास्त्राला अनुसरुन
वृत्ती करणे येकवळा [16], । चित्त जावो न देणे फळा, । — 16 एकाग्र
नियमांचिया सांखळा [17] । वाहणे सदा ।।637।। — 17 नियमांचे पालन करीत

हा निरोधु साहावयालागी, । धैर्याचिया चांगचांगी [1] ।
चिंतवणी [2] जिती [3] ,आंगी । वाहे जो कां, ।।638।।
आणि आत्मयाचिये आवडी, । कर्मे करिता वरपडी[4] ।
देहसुखाचिये परवडी [5] । येवो न लाहे ।।639।।
आळस, निद्रा दुऱ्हावे, । क्षुधा न बाणवे,।
सुरवाडु [6] न पावे । आंगाचा ठावो ।।640।।
तंव अधिकाधिक । उत्साहो धरी आगळीक [7] ,।
सोने जैसे पुटी [8],तुक [9] । तुटलिया ,कसी।।+641।।
जरी आवडे आथी साच, । तरी जीवितही सलंच [10]।
आगी घालिता रोमांच । देखिजती सतिये ।।642।।
मा,आत्मया येवढया प्रिया ।वालभेला[11], जो धनंजया ! ,।
देहही सिदतां[12], तया । काय खेदु होईल ? ।।643।।
म्हणौनि, विषयसुरवाडु [13] तुटे, । जंव जंव देहबुद्धि आटे ।
तंव तंव आनंदु दुणवटे । कर्मी जया ।।644।।
ऐसेनि जो कर्म करी, । आणि कोणे एके अवसरी, ।
ते ठाके[14] ऐसी परी । वाहे [15] जरी ,।।645।।
तरी,कडाडी [16] लोटला गाडा,। तो आपणपें न मनी अवघडा [16],।
तैसा, ठाकलेनिही , थोडा [17]। नोहे जो कां,।।646 ।।
नातरी, आदरिले । अव्यंग सिद्धी गेले, ।
तरी तेही , जिंतिले [18] । मिरवूं नेणे ।।647।।
इया खुणा कर्म करितां । देखिजे जो पंडुसुता ! ।
तयाते म्हणिपे तत्त्वतां । सात्त्विकु कर्ता ।।648।।
आतां, राजसा कर्तेया । वोळखणे हें धनंजया! ।
जे अभिलाषा जगाचिया । वसौटा [19] तो ।।649।।

1 आंगात चांगले धैर्य बानवण्याची
2 काळजी 3 जाग्रुकतेने
4 प्राप्त झाली असता
5 अवस्था
6 शरीरस्वास्थ्याचा विचार करीत नाहीं 7 बळावतो
8 शुद्ध करतांना 9 वजन
10 लाजिरवाणे
11 प्रेमाने वश झालेला
12 कष्टवीता
13 विषयसुख
14 बंद पडते 15 असा प्रसंग ओढवतो 15 कड्यावरून
16 संकट समजत नाही
17 हिरमुसला
18 विजयीभावनेने
19 आश्रयस्थान

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ।।27।।

विषयासक्त,लोभी, सिद्धि व असिद्धि यांचे ठायी यथानुक्रम हर्ष व शोक यांनी युक्त, कर्मफलाच्या प्राप्तीची इच्छा धरणारा, हिंसात्मक आणि अशुचि अशा कर्त्यास राजस म्हणतात.

जैसा गांवीचिया कश्मळा [20] ,। उकरडा होय येकवळा [21],।
कां, स्माशानी अमंगळा । आघवयांची [22] ,।।650।।
तयापरी, जो अशेषा [23] । विश्वाचिया अभिलाषा ।
पायपाखाळणिया [24], दोषा । घरटा [25] जाला ।।651।।

20 घाण 21 एकत्रित होते
22 सर्वांची
23 संपूर्ण
24 आदरपूर्वक स्वीकार करण्यास 25 आश्रय

म्हणौनि, फळाचा लागु । देखे जिये असलगु [1], ।
तिये कर्मी चांगु । रोहो मांडी [2] ।।652।।
आणि आपण ,जालिये जोडी [3], । उपखो [4] नेदी कवडी, ।
क्षणक्षणा कुरोंडी [5]। जीवाची करी ।।653।।
कृपणु चित्ती ठेवा आपुला। तैसा दक्षु पराविया माला[6] ,।
बकु जैसा खुतला [7] । मासेयासी ।।654।।
आणि गोवी[8] ,गेलिया जवळी ,।झगटलिया अंग फाळी ,[9]।
फळे तरी आंतु पोळी [10]। बोरांटी जैसी ।।655।।
तैसे, मने, वाचा, काये,। भलतया दुःख देतु जाये ।
स्वार्थु साधितां, न पाहे । पराचे हित ।।656।।
तेवीचि, आंगे ,कर्मी । आचरणे , नोहे क्षमी [11], ।
न निघे मनोधर्मी । अरोचकु [12]।।657।।
कनकाचिया फळा [13] ,। आंतु माज [14] बाहेरी मौळा [15] ,।
तैसा सबाह्य दुबळा । शुचित्वे जो ।।658।।
आणि कर्मजात केलिया, । फळ लाहे जरी धनंजया ! ।
तरी हरिखे [16] ,जगा यया ।वांकुलिया वाये [17] ।।659।।
अथवा , जे आदरिले [19] । हीनफळ होय, केले, ।
तरी, शोके तेणें जिंतिले [20] , । धिक्कारो लागे ।।660।।
कर्मी राहाटी ऐसी । जयाते होती ,देखसी, ।
तोचि जाण त्रिशुद्धीसी[21] । राजस कर्ता ।।661।।
आतां यया पाठी ,येरु । जो कुकर्माचा आगरु, ।
तोही करूं गोचरु ।तामस कर्ता ।।662।।

1 सुलभ
2 आरंभ करितो
3 मिळवलेले साठवतो 4 खर्च करीत नाहीं 5 ओवाळून टाकतो
6 दुसऱ्याचे धनावर नजर ठेऊन असतो 7 तटस्थ असतो
8 गुंतवते 9 आंग ओरबाडते
10 आंबटपणामुळे जीभेला चटका देते
11 सामर्थ्य
12 शिसारी
13 धोत्र्याचे फळ 14 मादकता
15 काटे
17 हर्ष होतो 18 वेडावून दाखवितो 19 आरंभ केला
20 त्याने शोकग्रस्त होऊन
21 निश्चितपणे

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।
विषादी दीर्घसूत्रीच कर्ता तामस उच्यते ।।28।।

अयुक्त म्हणजे चंचल बुद्धीचा, अडाणी, ताठलेला,ठक,नैष्कृतिक म्हणजे बुडव्या, आळशी, सदा खट्टु व दीर्घसूत्री म्हणजे चेंगट अशा कर्त्यास तामस म्हटले आहे .

तरी मियां लागलिया कैसे । पुढील जळत असे, ।
हे नेणिजे हुताशे । जियापरी ।।663।।
पै, शस्त्रे मियां तिखटे[22] । नेणिजे कैसेनि निवटे [23] ।
कां, नेणिजे काळकूटे । आपुले केले ।।664।।
तैसा पुढीलया , आपुलया । घातु करीत धनंजया! ।
आदरी वोखटिया [24] । क्रिया जो का, ।।665।।

22 धारदार असल्यामुळे
23 मारतो
24 वाईट

तिया करितांही वेळी, ।काय जाले हे न सांभाळी, ।
चळला वायु वाहटुळी । चेष्टे तैसा ।।666।।
पै, करणिया आणि जया । मेळु नाहीं धनंजया ! ।
तो पाहुनी पिसेया । कैची त्राय? ।।+667।।
आणि इंद्रियांचे वोगरिले [1] । चरोनि, राखे जो जियाले [2],।
बैलातळी लागले । गोचिड जैसे ।।668।।
हांसया, रुदना, वेळु । नेणतां ,आदरी ,बाळु ,।
राहाटे उच्छृंखळु । तयापरी ।।669।।
जो प्रकृती आंतलेपणे [3] । कृत्याकृत्यस्वादु नेणे, ।
फुगे, केरे धालेपणे [4] । उकरडा जैसा ।।670।।
म्हणौनि, मान्याचेनि नांवे, । ईश्वराही परी न खालवे [5],।
स्तब्धपणे न मनवे । डोंगरासी ।।671।।
आणि,मन जयाचे विषकल्लोळी।राहाटी, फुडी [6] चोरिली ।
दिठी कीर, ते वोली [7] । पण्यांगनेची[8] ।।672।।
किंबहुना, कपटाचे । देहचि वळिले [9], तयाचें ।
ते जिणे, कीं जुंवाराचे । टिटेघर ?[10] ।।673।।
नोहे! ,तयाचा प्रादुर्भावो [11] ,।तो साभिलाष[12] भिल्लांचा गांवो !।
म्हणौनि ,नये येवो जावो । तया वाटा ।।674।।
आणि,आणिकाचे निके [13] केले,। विरु [14] होय जया आलें,।
जैसे अपेय , पया मिनले ,। लवण करी ।।675।।
कां, हींव ऐसा पदार्थु [15]। घातलिया आगीआंतु, ।
तेचि क्षणी धडाडितु । अग्नि होय ।।676।।
नाना, सुद्रव्ये गोमटी, । जालिया शरीरी पैठी [16] ,।
होऊनि ठाती किरीटी ! । मळुचि जेवी ।।677।।
तैसे पुढिलाचे बरवे, । जयाच्या भीतरी पावे, ।
आणि विरुद्धचि आघवे । होऊनि निगे ।।678।।
जो गुण घे, दे दोख [17], । अमृताचे करी विख ।
दूध पाजलिया , देख । व्याळु [18] जैसा ।।679।।
आणि ऐहिकीं जियावे । जेणे परत्रा साच यावे, ।
ते उचित कृत्य पावे । अवसरी जिये, ।।680।।
तेव्हां, जया आपैसी । निद्रा ये ठेविली ऐसी।
दुर्व्यवहारी जैसी । विटाळे लोटे ।।+681।।
पै, द्राक्षरसा, अम्ररसा । वेळे, तोंड सडे वायसा [19] ।
कां, डोळे फुटती दिवसा । डुडुळाचे [20] ।।682।।

1 समोर ठेविले 2 जीवीत
3 प्रकृतीच्या आधीन असल्यामुळे
4 कचरा मिळाला म्हणुन
5 नतमस्तक होत नाहीं
6 विषयविचारात पूर्णपणे गुंतले असते 7 प्रेमयुक्त
8 वैश्येची 9 घडले
10 चोरी,चहाडी व शिंदळकीं याचे चोहाट्यावरचे घर
11दर्शन 12 आशाखोर
13 सत्कृत्य 14 शल्यासारखे रुतते
15 बर्फाप्रमाणे थंड
16 साचून राहील्याने
17 दोष
18 साप
19 कावळ्याचे
20 घुबडाचे

तैसा कल्याणकाळु पाहे ,। तै, तयाते आळसु खाये ।
ना प्रमादी तरी होये । तो म्हणे तैसे ।।683।।
जेवीचि सागराच्या पोटी। जळे अखंड आगिठी, ।
तैसा विषादु वाहे गांठी । जिवाचिये जो ।।684।।
लेंडोराआगी [1] धूमावधि , । कां, अपाना आंगी दुर्गंधि ,। — 1 लेंड्याच्या विस्तवात
तैसा जो जीविताावधि । विषादे केला ।।685।।
आणि कल्पांताचिया पारा [2] , । वेगळेही जो वीरा! । — 2 कल्पांताच्याही पलीकडे न संपणाऱ्या
सूत्र धरी [3]व्यापारा । साभिलाषा ।।686।। — 3 आयोजन करितो
अगा! जगाही परौती [4] । शुचा [5] वाहे, पै, चित्ती । — 4 जगाच्या पलीकडची 5 चिंता
करितां, विषी [5] हाती । तृणही न लगे ।।687।। — 5 विषयी
ऐसा जो लोकाआंतु । पापपुंजु मूर्तु ।
देखसी, तो अव्याहतु [6] । तामसु कर्ता ।।688।। — 6 निर्विवाद
एवं, कर्म ,कर्ता , ज्ञान । या तिहीचे त्रिधा चिन्ह ।
दाविले तुज सुजन-। चक्रवर्ती ।।689।।

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ।
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ।।29।।
हे धनंजया! बुद्धि आणि धृति यांचेहि गुणांमुळे होणारे तीन भेद वेगवेगळे निःशेष तुला सांगतो ऐक.

आतां, अविद्येचिया गांवी, । मोहाची वेढूनि मदवी [7] । — 7 कोरे वस्त्र
संदेहाची आघवी । लेऊनि लेणी, ।।690।।
आत्मनिश्चयाची बरव [8] । जया आरिसां पाहे सावयव ,। — 8 शोभा
तिये बुद्धीचीही धांव, । त्रिधा असे ।।691।।
अगा! सत्त्वादि गुणी इही । कायी एक तिही ठायी ।
न कींजेचि ? येथ पाही । जगामाजी ।।692।।
आगी न वसतां पोटी, । कवण काष्ट असे सृष्टी ?।
तैसे, ते कैचे दृश्यकोटी [9] । त्रिविध जे नोहे ? ।।693।। — 9 दृश्यविश्वात
म्हणौनि, तिही गुणी । बुद्धी केली त्रिगुणी ।
धृतीसिही वांटणी । तैसीचि असे ।।694।।
तेचि येक वेगळाले । यथा चिन्ही अळंकारले, ।
सांगिजैल , उपाइले [10] । भेदलेपणे ।।695।। — 10 विस्तारपूर्वक
परी बुद्धि, धृति इयां । दोही भागांमाजी धनंजया ! ।
आधी रूप बुद्धीचिया । भेदासि करूं ।।696।।
तरी, उत्तमा,मध्यमा,निकृष्टा ,। संसारासि गा सुभटा ! ।
प्राणियां येतिया वाटा । तिनी आथी ।।697।।

जे अकरणीय (करणीय),काम्य निषिद्ध, । ते हे मार्ग तिन्ही प्रसिद्ध ।
संसारभये सबाध [1] ।जिवां ययां ।।698।। 1 कष्टप्रद

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकीं ।।30।।

प्रवृत्ति म्हणजे एखादी गोष्ट करूं लागणे , आणि निवृत्ति म्हणजे एखादी गोष्ट करूं न लागणे; कार्य म्हणजे कोणते कृत्य करण्यास योग्य, आणि कोणते अयोग्य , भ्यावे कशास ,आणि कशास भिऊं नये, बंध व मोक्ष कशांत आहे , हे जे बुद्धि जाणते ती बुद्धि हे पार्था! सात्त्विक होय .

म्हणौनि अधिकारे मानिले, । जे विधीचेनि वोघे आलें ।
ते येकचि येथ भले । नित्य कर्म ।।699।।
तेचि आत्मप्राप्ति फळ । दिठी सूनि [2] केवळ । 2 नजरेसमोर ठेऊन
कींजे, जैसे कां जळ । सेविजे ताहने ।।700।।
येतुलेनि ते कर्म । सांडी जन्मभय विषम [3] ,। 3 कठीण
करूनि दे सुगम । मोक्षसिद्धि ।।701।।
ऐसे करी ,तो भला । संसारभये सांडिला, ।
करणीयत्वे [4] आला । मुमुक्षुभागा ।।702।। 4 कर्मकरून
तेथ जे , बुद्धि ,ऐसा । बळिया बांधे भरंवसा।
मोक्षु ,ठेविला ऐसा । जोडेल येथ, ।।703।। 5 निवृत्तिचा पाया
म्हणौनि, निवृत्तीचि मांडिली[5] । सूनि [6] प्रवृत्तितळी [7] । 6 घातला 7 कर्मवृत्तिच्या
इये कर्मी बुडकुळी [8] । द्यावी कीं ना !।।704।। खाली 8 झोकून देणे
तृषार्ता उदके जिणे, । कां, पुरी पडलिया पोहणे, ।
अंधकुपी, गति , किरणे । सूर्याचेनि । ।705।।
नाना, पथ्येसी औषध लाहे । तरी रोगे दाटलाही [9], जिये । 9 बळावला असला तरी
कां, मीना जिव्हाळा होये । जळाचा जरी ,।।706।।
तरी, तयाच्या जीविता । नाहीं जेवी अन्यथा, ।
तैसे ,कर्मी इये वर्तता ,। जोडेचि मोक्षु ।।707।।
हे करणीयाचिया कडे [10] । जे ज्ञान आथी [11] चोखडे [12] । 10 प्रवृत्ति 11 आहे 12 शुद्ध
आणि अकरणीय हें फुडे [13] । ऐसे जाण ।।708।। 13 योग्य प्रकारे
जी तिये काम्यदिके । संसारभयदायके ।
अकृत्यपणाचे आंबुखे [14] । पडिले जया ।।709।। 14 शिंतोडा
तिये कर्मी अकार्यी [15] । जन्ममरणसमयी । 15 अकरणीय
प्रवृत्ति पळवी पायी । मागिलीचि ।।710।।
पै, आगीमाजी न रिघवे, । अथावी [16] न घलवे, । 16 खोल समुद्रात
धगधगीत [17] नागवे [18] । शूळ जेवी ।।711।। 17 तप्त 18 धरवत नाहीं

कां, काळियानाग धुंधुवातु [1] । देखोनि, न घालवे हातु ,।
न वचवे [2] खोपेआंतु । वाघाचिये ।।712।।
तैसे, कर्म अकरणीय । देखोनि, महाभय ।
उपजे निःसंदेह [3] ।बुद्धी जिये ,।।713।।
वाढिले रांधूनि विखे, । तेथे जाणिजे ,मृत्यु न चुके ,।
तेवी, निषेधी कां देखे । बंधाते जे ।।714।।
मग ,बंधभयभरितीं । तिये निषिद्धी प्राप्ती, ।
विनियोगु जाणे , निवृत्ती । कर्माचिये ।।715।।
ऐसेनि कार्याकार्यविवेकीं । जे प्रवृत्ति निवृत्ति मापकीं [4] ।
खरा,कुडा [5] ,पारखी । जियापरी ।।716।।
तैसी, कृत्याकृत्यशुद्धी । बुझे [6] जे निरवधी [7] ।
सात्त्विक म्हणिपे बुद्धी । तेचि तूं जाण ।।717।।

1 फुत्कारे सोडणारा
2 जाववत नाहीं
3 निर्विवाद
4 तुलना करणारी
5 वाईट
6 समजते 7 अमर्याद

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ।।31।।

ज्या बुद्धीने धर्म व अधर्म, किंवा कार्य आणि अकार्य यांचा यथार्थ निर्णय होत नाहीं, ती बुद्धि हे पार्था! राजस होय.

आणि बकाच्या गांवी, । घेपे क्षीरनीर सकलवी [8] ,।
कां, अहोरात्रीची गोवी [9] । आंधळे नेणे ।।718।।
जया ,फुलाचा मकरंदु फावे, । तो काष्ठे कोरूं धावे ,।
परी भ्रमरपणा नव्हे । अव्हाटा [10] जेवी ।।719।।
तैसी, इये कार्याकार्ये , । धर्माधर्मरूपे जिये ,।
तिये न चोजवितां [11] ,जाये । जाणती[12] जे कां, ।।720 ।।
अगा! डोळांवीण मोतिये । घेतां, पाडु मिळे विपाये [13] ,।
न मिळणे ते आहे । ठेविले तेथे ।।721।।
तेसे, अकरणीय अवचटे [14] ।नोडवे [15] ,तरीच लोटे, ।
एऱ्हवी जाणे , एकवटे । दोन्ही जे कां ।।722।।
ते गा ! बुद्धि चोखविषी [16] । जाण येथ राजसी ।
अक्षत टाकिली जैसी । मांदियेवरी [17]।।723।।

8 एकत्र
9 गुंता
10 विसंबत
11समजून न घेता 12 बुद्धी
13 चांगले मोती चुकुनच मिळतील
14 चुकुन 15 समोर आलें नाहीं तरच
16 चांगल्या प्रकारे
17 घोळक्यावर

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसाऽऽवृता ।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ।।32।।

जी शुद्ध तमाने व्याप्त होऊन अधर्माला धर्म मानिते, आणि सर्व गोष्टीत विपरीत म्हणजे उलटा समज करून देते, ती बुद्धि ,हे पार्था ! तामस होय.

आणि राजा जिया वाटा जाये, । ते चोरांसि आडव[1] होये ।
कां, राक्षसां दिवो ,पाहे । राति होऊनि !।।724।।
नाना, निधानचि निदैवा [2] । होये ,कोळसयाचा उंडवा [3] ।
पै, असते आपणपे [4] जीवा, । नाहीं जाले [5]।।725।।
तैसे, धर्मजात तितुके । जिये, बुद्धीसी पातके ,।
साच, ते [6] लटिके । ऐसेचि बुझे [7] ।।726।।
ते आघवेचि अर्थ ,। करूनि घाली अनर्थ, ।
गुण ,ते ते ,व्यवस्थित ,। दोषचि मानी ।।727।।
किंबहुना, श्रुतिजाते । अधिष्ठूनि केले सरते [8] ,।
तेतुलेही ,उपरते [9] । जाणे जे बुद्धी ।।728।।
ते ,कोणातेही न पुसतां, । तामसी जाणावी ,पंडसुता ! ।
रात्री काय धर्मार्था [10]। साच करावी[11] ? ।।729।।
एवं, बुद्धीचे भेद । तिन्ही, तुज विशद ।
सांगितले, स्वबोध-।कुमुदचंद्रा ।।730।।
आतां, ययाची बुद्धीवृत्ती । निष्टंकिला [12] कर्मजाती ।
खांदु मांडिजे [13] धृती । त्रिविधा तया ।।731।।
तिये धृतीचेही विभाग । तिन्ही यथालिंग[14]।
सांगिजती चांग ,। अवधान देई ।।732।।

1 अडचणीचे
2 दुर्दैवी 3 ढीग
4 आत्मस्वरूप 5 नाहीं असे भासते
6 धर्मजात 7खरे ते खोटे समजतो
8 मान्य
9 विपरीत
10 चांगल्या कामाकरिता
11 योग्य मानावी
12 निश्चित केलेले
13 आधार देते
14 ज्या लक्षणाचे आहे ते त्या क्रमाने

धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रिया ः।
योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकीं ।।33।।

ज्या अव्यभिचारी म्हणजे इकडेतिकडे न ढळणाऱ्या धृतीने मन, प्राण व इंद्रिये यांचे व्यापार कर्मफल-त्याग रुप योगाने चालविले जातात , ती धृति हे पार्था! सात्त्विक होय .

तरी उदेलिया दिनकरु, । चोरीसि[15] थोके [16] अंधारु, ।
कां, राजाज्ञा , अव्यवहारु । कुंठवी [17] जेवी ।।733।।
नाना, पवनाचा साटु [18] । वाजीनलिया [19] नीटु, ।
आंगेसी ,बोभाटु [20], । सांडिती मेघ ।।734।।
कां, अगस्तीचेनि दर्शने, । सिंधु घेऊनि ठाती मौने ।
चंद्रोदयी कमळवने । मिठी [21] देती ।।735।।
हे असो; पावो [22] उचलिला । मदमुख [23], न ठेविती खालां [24] ।
गर्जोनि पुढा जाला ,। सिंहु जरी ।।736।।
तैसा जो धीरु । उठलिया अंतरु, ।
मनादिके व्यापारु । सांडिती उभीं [25] ।।737।।

15 चोरासह 16 नाहींसा होतो
17 थांबवते
18 वेग 19 वाढला म्हणजे
20 गर्जना करून
21 मिटतात
22 पाय 23मदोन्मत्त हत्ती
24 खाली
25 उभ्या उभ्या

इंद्रियां विषयांचिया गांठी । अपैसया सुटती किरीटी ! ।
मन मायेच्या पोटी । रिगती दाही ।। 738।।
अधोर्ध्व गूढे [1] काढी । प्राण नवांची पैडी [2]। — 1 प्राणाचा उर्ध्व व अपानाचा खालचा
बांधोनि, घाली उडी । मध्यमेमाजी ।।739।। — अवरोध करून 2प्राण नऊ वायुंचे गाठोडे
संकल्पविकल्पांचे लुगडे [3] । सांडुनि, मन उघडे । — बांधून 3 वस्त्र
बुद्धि मागिलेकडे । उगीचि बैसे ।।740।।
ऐसी, धैर्यराजे जेणे । मन, प्राण ,करणे[4] ,। — 4 इंद्रिय
स्वचेष्टांची संभाषणे [5]। सांडविजती ।।741।। — 5 स्वतःचे व्यापार
मग आघवीचि सडी [6] । ध्यानाच्या आंतुल्या मढी [7] । — 6 मोकळी झालेली
कोंडिजती निरवडी [8] । योगाचिये ।।742।। — 7 हृदयकमळात 8 कोठडीत
परी परमात्मया चक्रवर्ती । उगाणिती[9] जंव हाती, । — 9 सोपवतात
तंव, लांचु न घेता , धृती । धरिजती जिया।।743।।
ते गा ! धृती येथे । सात्त्विक ,हे निरुते [10] । — 10 निश्चितपणे
आईक, अर्जुनाते । श्रीकांतु म्हणे ।।744।।

यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयतेऽर्जुन ।
प्रसंगेन फलाकाङक्षी धृतिः सा पार्थ राजसी ।।34।।

हे अर्जुना ! ज्या धृतीने धर्म, काम व अर्थ हे पुरुषार्थ चालविले जातात व धर्मार्थ -कामातील प्रसंगानुसार जी फलाची इच्छा ठेविते , ती धृति हे पार्था ! राजस होय.

आणि होऊनियां शरीरी, । स्वर्गसंसाराच्या दोही घरी ।
नांदे जो पोटभरी, । त्रिवर्गोपाये [11] ।।745।। — 11 धर्म,अर्थ व काम या तीन
तो मनोराथांच्या सागरी । धर्मार्थकामांच्या तारुवावरी [12] । — उपायांनी 12 गलबतावर
जेणे धैर्यबळे करी । क्रिया वणिज[13] ।।746।। — 13 कर्माचा व्यापार
जे कर्म भांडवला सुये[14],। तयाची चौगुणी येती [15] पाहे,। — 14 जे कर्म भांडवल म्हणून
येवढे सायास साहे । जया धृती ।।747।। — घातले जाते 15 चौपट मिळेल
ते गा ! धृती राजस । पार्था! येथ परियेस ।
आतां आइक तामस । तिसरी जे कां ।।748।।

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।
न विमुञ्चति दूर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ।।35।।

ज्या धृतीने मनुष्य दुर्बुद्ध होऊन झोप,भय,शोक ,विषाद आणि मद सोडीत नाहीं ती धृति हे पार्था ! तामस होय.

तरी, सर्वाधमे गुणे, । जयाचे का रूपा येणे, ।
कोळसा काळेपणे । घडला जैसा ।।749।।
अहो ! प्राकृत [1] आणि हीनु, । तयाही कीं गुणत्वाचा मानु ! । 1 सामान्य
तरी न म्हणिजे पुण्यजनु [2] । राक्षसु काई ? ।।750।। 2 अमरकोशात राक्षसाला
पै, ग्रहांमाजी इंगळु [3], । तयाते म्हणिजे मंगळु ! । पुण्यजन म्हटले आहे 3 निखारा
तैसा, तमी, धसाळु [4] । गुणशब्दु हा ।।751।। 4 स्थूलदृष्टिचा
जे सर्वदोषांचा वसौटा [5] ,। तमचि ,कामऊनि [6]सुभटा ! । 5 आगर 6 एकत्र करून
उभारिला आंगवठा [7] । जया नराचा ,।।752।। 7 शरीर
तो आळसु सूनि असे कांखे [8],। म्हणौनि निद्रे कही न मुके । 8 खाकोटीस मारलेला असतो
पापे पोषितां, दुःखे । न सांडिजे जेवी ।।753।।
आणि, देहधनाचिया आवडी [9] , । सदा भय तयांते न सांडी । 9 लोभाने
विसंबूं न सके धोंडी ,। काठिण्य जैसे ।।754।।
आणि, पदार्थजाती स्नेहो । बांधे, म्हणौनि तो शोके ठावो [10] । 10 आश्रय स्थान
केला, न शके पाप जावों । कृतघ्नौनि जैसे ।।755।।
आणि, असंतोष जीवेसी । धरूनि ठेला अहर्निशी ।
म्हणौनि ,मैत्री तेणेंसी । विषादे केली ।।756।।
लसणाते न सांडी गंधी [11], । कां अपथ्यशीळाते व्याधी, । 11 वाईट वास
तैसी, केली मरणावधी [12]। विषादे तया ।। 757।। 12 मरेपर्यंत
आणि वयसा [13], वित्तकामु ,। ययांचा वाढवी संभ्रमु [14] । 13 तारुण्य 14 पसारा
म्हणौनि मदे ,आश्रमु । तोचि केला ।।758।।
आगीते न सांडी तापु, । सळाते [15] जातीचा सापु ,। 15 वैर
कां, जगाचा वैरी, वासिपु [16] । अखंडु जैसा ।।759।। 16 भय
नातरी, शरीराते काळु ,। न विसंबे कवणे वेळु , ।
तैसा, आथी [17] अढळु ,। तामसी मदु ।।760।। 17 असतो
एवं, पांचही हे निद्रादिक , । तामसाच्या ठाई दोख,।
जिया धृती देख ,। धरिले आहाती, ।।761।।
तिये गा ! धृती नांवे । तामसी येथ हे जाणावे ।
म्हणितले तेणें देवे । जगाचेनी ।।762।।
एवं, त्रिविध जे बुद्धि । कींजे कर्मनिश्चयो आधि ,।
तो ,धृती या ,सिद्धि । नेईजो येथ ।।763।।
सूर्ये मार्गु गोचरु होये, । आणि तो चालती कीर पाये, ।
परी चालणे ते आहे । धैर्ये जेवी ।।764।।
तैसी, बुद्धि कर्माते दावी, । ते करणसामग्री निफजवी, ।
परी निफजावया होआवी । धीरता जे ।। 765।।

ते हे गा! तुजप्रती । सांगितली , त्रिविध धृती ।
यया कर्मत्रया निष्पत्ती । जालिया मग ,।।766।।
येथ फळ जे एक निफजे, । सुख जयाते म्हणिजे, ।
तेही त्रिविध जाणिजे । कर्मवशे ।।767।।
तरी फळरूप ते सुख । त्रिगुणी भेदले देख ।
विंवचूं आतां चोख [1]। चोखी बोली [2] ।।768।। 1 स्पष्ट 2 निर्विवाद
परी चोखी ते कैसी सांगे ?। पै, घेवो जातां बोलबगे [3] । 3 बोलण्याच्या रुपाने
कानीचियेही लागे । हातीचा मळु ।।+769।।
म्हणौनि,जयाचेनि अव्हेरे [4],।अवधानही होय बाहिरे,। 4 त्याग केला असता
तेणें आइक हो आंतरे [5] । जीवाचेनि जीवे ।।770।। 5 अंतःकरण पूर्वक
ऐसे म्हणौनि देवो । त्रिविधा सुखाचा प्रस्तावो ।
मांडला, तो निर्वाहो [6] । निरुपित असे ।।771।। 6 प्रकार

सुखं त्विदानी त्रिविधं श्रुणु मे भरतर्षभ ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ।।36।।
आतां हे भरतश्रेष्ठा! सुखाचेहि तीन प्रकार मी सांगतो ऐक. अभ्यासाने म्हणजे सतत परिचयाने ज्यांत रमतो व जेथे दुःखाचा अंत प्राप्त होतो ,

म्हणे सुखत्रयसंज्ञा । सांगो म्हणौनि प्रतिज्ञा ।
बोलिलो, ते प्राज्ञा ! । ऐक आतां ।।772।।
तरी सुख ते गा किरीटी ! । दाविजेल तुज दिठी ।
जे ,आत्मयाचिये भेटी , । जीवासी होय।।773।।
परी, मात्रेचेनि मापे, । दिव्यौषध जैसे घेपे , ।
कां, कथिलाचे कींजे रूपे । रसभावनी [7] ।।774।। 7 रसाची पुटे देऊन
नाना, लवणाचे जळु । होआवया, दोनि चार वेळु।
देऊनि , सांडिजती [8],ढाळु [9] । तोयाचे जेवी ।।775।। 8 द्रावण करण्याकरिता 9 हापके
तेवी,जालेनि सुखलेशे [10],।जीवु भाविलिया[11],अभ्यासे,। 10 सुखाची चव
जीवपणाचे नासे । दुःख जेथे ।।776।। 11 आत्मानुभूती झाल्यावर
ते येथ आत्मसुख ,। जाले असे त्रिगुणात्मक ।
तेही सांगो एकैक । रूप आतां ।।777।।

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ।।37।।
जे आरंभी विषासारखे, पण परिणामी अमृततुल्य ते आत्मनिष्ठ बुद्धीच्या प्रसन्नतेपासून होणारे म्हणजे अध्यात्मिक सुख सात्विक म्हटले आहे

आतां, चंदनाचे बुड । सर्पी जैसे दुवाड [1] ,।
कां, निधानाचे तोंड । विवसिया[2] जेवीं ।।778।।
अगा ! स्वर्गीचे गोमटे ,। आडव[3] , यागसंकटें ,।
कां, बाळपण दासटे [4] । त्रासकाळें ।।779।।
हे असो; दीपाचिये सिद्धी । अवघड धू आधीं, ।
नातरी, तो औषधी । जीभेचा ठावो [5] ।।780।।
तयापरी पांडवा !। जया सुखाचा रिगावा [6] ।
विषम [7], तेथ ,मेळावा । यमदमांचा ।।781।।
देत सर्वस्नेहा मिठी [8], । आगी ऐसे वैराग्य उठी, ।
स्वर्ग, संसारा कांटी [9] । काढीतचि ।।782।।
विवेकश्रवणे खरपुसे [10],। जेथ व्रताचरणे कर्कशे[11] ।
करितां, जाती भोकसे [12]। बुद्ध्यादिकांचे ।।783।।
सुषुम्नेचेनि तोंडें । गिळिजे प्राणापानाचे लोंढे, ।
बोहणियेसिचि [13] येवढें।भारी जेथ , ।।784।।
जे सारसांही[14] विघडतां[15] ।होय,वोहाहूनि वत्स काढितां,।
ना, भणंगु[16] दवडितां । भाणयावरूनी [17]।।785।।
पै, मायेपुढौनि बाळक । काळे नेतां एकुलते एक ।
होय, कां, उदक । तुटतां मीना , ।।786।।
तैसे, विषयांचे घर । इंद्रिया सांडितां, थोर ।
युगांतु होय, ते वीर । विराग साहाती [18] ।।787।।
ऐसा जया सुखाचा आरंभु,।दावी काठिण्याचा क्षोभु[19]।
मग क्षीराब्धी लाभु । अमृताचा जैसा ।।788।।
पहिलया वैराग्यगरळा [20],। धैर्यशंभु वोडवी [21] गळा ।
तरी ज्ञानामृते सोहळा [22] । पाहे जेथे ।।789।।
पै, कोलिताही कोपे [23], ऐसे । द्राक्षांचें हिरवेपण असे ।
ते परिपाकीं [24] कां जैसे । माधुर्य आते [25] ,।।790।।
ते वैराग्यादिक तैसें ,। पिकलिया आत्मप्रकाशें , ।
मग वैराग्येसीही नाशे । अविद्याजात ।।791।।
तेव्हां सागरी गंगा जैसी । आत्मी ,मीनल्या बुद्धि तैसी ।
अद्वयानंदाची आपैसी । खाणी उघडे ।।792।।
ऐसे स्वानुभवविश्रामे । वैराग्यमूळ जे परिणमे, ।
ते सात्त्विक येणे नामे । बोलिजे सुख ।।+793।।

1 साप असल्यामुळे धोकादायक 2 हडळ
3 त्रासदायक
4 क्लेशकारक
5 जीभेला चटका बसतो
6 प्रवेश
7 कठीण
8 सर्व मोह गीळून टाकून
9 कुंपण दूर करणे
10 कठोर विवेकाच्या उपदेशाने
11 त्रासदायक 12 निष्प्राण होतात
13 सुरवातीलाच
14 चक्रवाकपक्षांच्या जोडप्याला
15 दूर होताना 15 भिकारी
17 ताटावरून
18 वैराग्य धारण करितात
19 दाहकता
20 विषाचा घोट 21 पुढे करितो
22 समारंभ
23 जळक्या लाकडाच्या चटक्यासारखे 24 पिकल्यावर
25 गोड होते

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम ।।38।।

इंद्रिये व त्यांचे विषय यांच्या संयोगापासून होणारे म्हणजे अधिभौतिक, जे प्रथम अमृतासारखे व परिणामी विषासारखे असते ,ते सुख राजस म्हटले आहे

आणि विषयेंद्रियां । मेळु होतां, धनंजया ! ।
जे सुख जाय थडिया [1] । सांडूनि दोन्ही ,।।794।। 1 काठ
अधिकारिया रिगता गांवो, । होय जैसा उत्साहो ,।
कां, रिणावरी [2] विवाहो । विस्तारिला ।।795।। 2 कर्ज
नाना रोगिया ,जिभेपासी । केळे गोड साखरेसीं ,।
कां, बचनागाची जैसी । मधुरता पहिली, ।।796।।
पहिले , संवचोराचे मैत्र [3] ,। हाटभेटीचे कलत्र [4], । 3 सोबतीच्या चोराची मैत्री
कां, लाघवियाचे [5] विचित्र । विनोद ते, ।।797।। 4 वैश्या 4 बहुरुपी
तैसे , विषयेंद्रियदोखी । जे सुख जीवाते पोखी [5] ,। 5 पोसते
मग, उपडिला [6] खडकीं । हंसु जैसा ।।798।। 6 आपटून मारला असता
तैसी जोडी[7] आघवी आटे, । जीविताचा ठाय फिटे, । 7 संपादिलेले
सुकृताचियाही सुटे । धनाची गांठी [8] ।।799।। 8 पुण्यरुप धनाचाही नाश होतो
आणिक भोगिले जे कांही,। ते,स्वप्न तैसें,होय,नाहीं [9],। 9 होते कीं नव्हते असे होते
मग हानीच्याचि घाई [10] । लोळावे उरे ।।800।। 10 घाव
ऐसे आपत्ती[11], जे सुख । ऐहिकीं परिणमे देख ,। 11 क्लेशकारक
परत्री कीर विख । होऊनि परते ,।।801।।
जे इंद्रियजाता लळा । दिधलिया, धर्माचा मळा ।
जाळूनि, भोगिजे सोहळा । विषयांचा जेथ ।।802।।
तेथ पातके बांधिती थावो [12] । तिये नरकी देती ठावो । 12 बळावतात
जेणे सुखे , हा अपावो । परत्रीं ऐसा ।।803।।
पै, नामे विष महुरें [13] ,। परी मारूनि अंती खरे ,। 13 गोड
तैसे आदि जे गोडिरे [14], । अंती कडु , ।।804।। 14 गोड
पार्था ! ते सुख साचें [15] । वळिले आहे रजाचे । 15 खरोखर
म्हणौनि न शिवे तयाचे । आंग कहीं ।।805।।

यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ।।39।।

आणि जे प्रारंभी व अनुबंधांत म्हणजे परिणामीहि आपल्याला मोह पाडते, व जे निद्रा, आळस व प्रमाद म्हणजे कर्तव्याचा विसर यांपासून होते ते सुख तामस म्हटले आहे .

आणि अपेयाचेनि पानें, । अखाद्याचेनि भोजने ।
स्वैरस्त्रीसंनिधाने [16] । होय जे सुख ,।।806।। 16 दुराचारी स्त्रीच्या सानिध्यात

कां, पुढीलांचेनि मारे, । नातरी, परस्वापहारे ,।
जे सुख अवतरे । भाटाच्या बोली, ।।807।।
जे आलस्यावरी पोखिजे [1], । निद्रेमाजी जे देखिजे ,। 1 पोसते
जयाच्या आद्यंती भुलिजे । आपुली वाट [2], ।।808।। 2 कल्याणाचा मार्ग चुकतो
ते गा सुख , पार्था ! । तामस जाण सर्वथा ।
हे बहु न सागोंचि, जे कथा । असंभाव्य[3] हे ।।809।। 3 निंद्य
ऐसे कर्मभेदे मुदले [4] , । फळसुखही त्रिधा जाले । 4 कर्मभेदाचे मुळापासून
ते हे यथागमे केले । गोचर तुज ।।810।।
ते कर्ता,कर्म,कर्मफळ । ये त्रिपुटी येकीं केवळ ।
वांचूनि, कांहीचि नसे स्थूल-।सूक्ष्मी इये ।।811।।
आणि हे तंव त्रिपुटी , । तिही गुणीं इही किरीटी ! ।
गुंफिली असे पटी । तांतुवीं [5] जैसी ।।812।। 5 तंतुनी

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ।।40।।
या पृथ्वीवर, आकाशांत किंवा देवां म्हणजे देवलोकीहि असें कांही नाहीं की जे प्रकृतीच्या या तीन गुणांपासून मुक्त म्हणजे सुटलेले आहे .

म्हणौनि, प्रकृतीच्या [6],अवलोकीं,। न बंधिजे ,इही सत्त्वादिकी । 6 मायेच्या
तैसी स्वर्गी ना मृत्युलोकी ,। आथी वस्तु ।।813।।
कैंचा लोंवेवीण [7] कांबळा ?। मातियेवीण मोदळा [8] ? । 7 लोकरीशिवाय 8चीखलाचा गोळा
कां, जळेवीण कल्लोळा । होणे आहे ? ।।814।।
तैसे न होनि गुणाचे । सृष्टीची रचना रचे ,।
ऐसे नाहीचि गा ! साचें । प्राणिजात ।।815।।
यालागी हें सकळ ,। तिहां गुणांचेंचि केवळ ।
घडले आहे निखिळ ,। ऐसे जाण ।।816।।
गुणी, देवां त्रयी लाविली, । गुणी, लोकी त्रिपुटी पाडिली, ।
चतुर्वर्णा घातली । सिनानी उळिगे [9] ।।817।। 9 निरनिराळी कर्मे

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ।।41।।
हे परंतपा ! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांची कर्में , त्यांच्या स्वभावजन्य म्हणून प्रकृतिसिद्ध गुणाप्रमाणें पृथक् विभागलेली आहेत.

तेचि चारी वर्ण । पुससी जरी कोण कोण, ।
तरी जयां मुख्य ब्राह्मण । धुरेचे[1] कां ।।818।। 1 अग्रगण्य
येर,क्षत्रिय,वैश्य दोन्ही । तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानी,।
जे ,ते वैदिकविधानी [2] । योग्य म्हणौनि ।।819।। 2 वैदिक कर्माच्या
चौथा शूद्रु जो धनंजया ! । वेदी लागु नाही तया ।
तऱ्ही, वृत्ति वर्णत्रया-। आधीन तयाची ।।820।।
तिये वृत्तीचिया जवळिका [3] ,। वर्णा ब्राह्मणादिकां ,। 3 सेवावृत्तिच्या जवळकींने
शूद्रही की देखा !। चौथा जाला ।।821।।
जैसा , फुलाचेनि सांगाते ,। तांतु तुरंबिजे [4] श्रीमंते ,। 4 सुताचा पण वास घेतला
तैसें , द्विजसंगें शुद्राते । स्वीकारी श्रुती ।।822।। जातो
ऐसैसी गा पार्था ! । हे चातुर्वर्ण्यव्यस्था ।
करूं आतां कर्मपथा । यांचिया रूपा ।।823।।
जिही गुणी ते वर्ण चारी । जन्ममृत्यूंचिये कातरी [5] । 5 संकटाला
चुकोनियां, ईश्वरीं । पैठे होती ।।824।।
जिये आत्मप्रकृतीचे, इही ,। गुणी सत्त्वादिकीं तिही ,।
कर्मे चौघां चहूं ठाई । वांटिली ,वर्णा ।।825।।
जैसे, बापें जोडिले, लेंका । वांटिलें , सूर्ये , मार्ग पांथिका ,।
नाना, व्यापार सेवकां ,। स्वामी जैसे ।।826।।
तैसी प्रकृतीच्या गुणी,। जया कर्माची वेल्हावणी [6] । 6 विस्तार
केली आहे , वर्णी । चहूं इही ।।827।।
तेथ सत्त्वें आपल्या आंगी । समीननिमीन [7] भागीं । 7 समविषम
दोघे केले नियोगी [8] । ब्राह्मण, क्षत्रिय ।।828।। 8 अधिकारी
आणि, रज परी सात्त्विक, । तेथ ठेविलें वैश्य लोक ।
रजचि तमभेसक [9] । तेथ शूद्र ते गा! ।।829।। 9 तममिश्रित
ऐसा येकाचि प्राणिवृंदा । भेदु चतुर्वर्णधा ।
गुणीचि प्रबुद्धा । केला जाण ।।830।।
मग , आपुले ठेविले जैसे । आइतेचि दीपें दिसे, ।
गुणभिन्न कर्म तैसें । शास्त्र दावी ।।831।।
तेचि आतां , कोण कोण । वर्णविहिताचें लक्षण ,।
हे सांगों ऐक श्रवण-। सौभाग्यनिधी ।।832।।

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।।42।।

शम,दम,तप,शुचिर्भूतपणा,शान्ति,सरळपणा(आर्जव),ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान,विज्ञान म्हणजे विविधज्ञान, व आस्तिक्य-बुद्धी, हे ब्राह्मणाचे स्वभावजन्य कर्म होय .

तरी सर्वेंद्रियाचिया वृत्ती [1]। घेऊनि आपुल्या हातीं,।   1 व्यापार
बुद्धि आत्मया मिळे येकांती । प्रिया जैसी ,।।833।।
ऐसा बुद्धीचा उपरमु [2] ,। तया नाम म्हणिपे शमु [3] ।   2 अंतर्मुखता 3 मनोनिग्रह
तो गुण गा ! उपक्रमु [4] । जया कर्माचा ।।834।।   4 आरंभ
आणि बाह्येंद्रियांचे धेंडें, । पिटूनि विधीचेनि दडें, ।
नेदिजे अधर्माकडे । कहींचि जावों ।।835।।
तो पै, गा ! शमा विरजा [5] । दमु गुण जेथ दुजा ।   5 साह्यक
आणि स्वधर्माचिया वोजा [6] । जिणे जे कां, ।।836।।   6 रीतीने
सटवीचिये रातीं, । न विसंबिजे जेवीं वातीं [7] , ।   7 दिवा
तैसा ईश्वरनिर्णयो चित्तीं । वाहणे सदा ।।837।।
तया नाम 'तप '। ते तिजया गुणाचे रूप ।
आणि शौचही निष्पाप । द्विविध जेथ ,।।838।।
मन भावशुद्धी भरले । आंग, क्रिया अळंकारिलें ,।
ऐसें सबाह्य जियालें । साजिरे जे कां ,।।839।।
तया नाम 'शौच 'पार्था !, तो कर्मी गुण जये चौथा।
आणि पृथ्वीचिया परी सर्वथा । सर्व जे साहाणे, ।।840।।
ते गा ! क्षमा , पांडवा ! । गुण जेथ पांचवा ।
स्वरांमाजी सुहावा [8] । पंचमु जैसा ।।841।।   8 मधूर
आणि वांकडेनी वोघेंसीं [9] , । गंगा वाहे उजूचि जैसी ,।   9 वोघ वाकडा असला तरी
कां, पुटी वळला[10] , उंसी । गोडी जैसी ।।842।।   10 पेरापेरात वाकडा असला
तैसा, विषमांही जीवां-। लागी ,उजुकारु [11] बरवा, ।   11 सरळपणा
ते ,आर्जव ,गा ! साहावा । जेथींच गुण ।।843।।
आणि पाणिये[12], प्रयत्नें[13],माळी,।अखंड जचे[14] झाडामुळीं,।   12 पाणी देऊन13 मशागत
परी ते आघवेंचि फळी ,। जाणे जेवीं ।।+844।।   करून 14 श्रमतो
तैसे शास्त्राचारे , तेणें । ईश्वरुचि येकु पावणे ।
हे फुडे [15] जे कां जाणणे ,। ते येथ 'ज्ञान ' ।।845।।   15 निश्चित
ते गा ! कर्मी जिये । सातवा गुण होये ।
आणि विज्ञान हे पाहें ।एवंरूप ।।846।।
तरी सत्त्वशुद्धीचिये वेळे ,। शास्त्रे कां ध्यानबळें , ।
ईश्वरतत्त्वींचि मिळे । निष्टंकबुद्धी [16] ।।847।।   16 निश्चयात्मक बुद्धीने
हे ' विज्ञान ' बरवें । गुणरत्न जेथ आठवें ।
आणि आस्तिक्य जाणावे । नववा गुण ।।848।।
पै, राजमुद्रा आथिलिया [17] ,। प्रजा भजे भलतया, ।   17 राजमान्यता असलेल्याला
तेवीं, शास्त्रे स्वीकारिलिया । मार्गमात्राते ।।849।।

आदरे जे कां मानणे[1] , । ते 'आस्तिक्य' मी म्हणें ।   1 आदराने स्विकारणे
तो नववा गुण , जेणे । कर्म ते साच ।।850।।
एवं, नवही शमादिक । गुण जेथ निर्दोख ।
ते कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचे ।।851।।
तो नवगुणरत्नाकरु । यया नवरत्नांचा हारु ।
न फेडित,ले [2] दिनकरु । प्रकाशु जैसा ।।852।।   2 न सोडता धारण करितो
नाना, चांपा [3] चांपौळी [4] पूजिला, । चंद्र चंद्रिका धवळला,।   3 चांफा 4 चाफ्याच्या कळ्यांनी
कां, चंदनु निजे चर्चिला । सौरभ्यें जेवीं ,।।853।।
तेवीं नवगुणटिकलग[5] । लेणे [6] ब्राह्मणाचे अव्यंग ।   5 नवगुणरत्नांनी शोभिवंत
कहींचि न संडी आंग । ब्राह्मणाचे ।।854।।   6 अलंकार
आतां उचित जे क्षत्रिया, । तेहीं कर्म धनंजया ! ।
सांगो ऐक , प्रज्ञेचिया । भरोवरी [7] ।।855।।   7 सामग्रीने

शौर्य तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।।43।।
शौर्य,दक्षता,तेजस्विता,धैर्य, युद्धांतून पलायन न करणे, दातृत्व आणि प्रजेवर सत्ता चालविणें हे क्षत्रियाचें स्वभावजन्य कर्म होय.

तरी भानु हा ,तेजे ।नापेक्षी जेवीं विरजे [8] ,।   8 मदत
कां, सिंहे न पाहिजे । जावळिया [9] ,।।856।।   9 साहायक
ऐसा स्वयंभ जो जीवें लाठु [10] । सावायेंवीण उद्भटु ,[11]।   10 बलवान 11 शूर
ते ,'शौर्य ' गा ! जेथ श्रेष्ठु । पहिला गुण ।।857।।
आणि ,सूर्याचेनि प्रतापे, । कोडिही[12] नक्षत्र हारपे ,।   12 कोट्यावधी
ना, तो तरी न लोपे ,। सचंद्री तिहीं ।।858।।
तैसेनि, आपुले प्रौढिगुणे [13], । जगा या विस्मयो देणे, ।   13 श्रेष्ठ गुणांनि
आपण तरी न क्षोभणे । कायसेनही ।।859।।
ते प्रागल्भ्यरूप [14] तेजा । जिये कर्मी गुण दुजा ।   14 पाणीदारपणा
आणि धीरु तो तिजा । जेथीचा गुण ।।860।।
वरिपडलिया [15] आकाश, । बुद्धीचे डोळे मानस [16]।   15 कोसळले तरी 16 बुद्धीभ्रष्ट
झांकीं ना, ते परियेस । धैर्य जेथे ।।861।।   व हिरमुसला होत नाही
आणि,पाणी हो कां भलतेतुके[17],। परी,ते जिणौनि पद्म फांके,।   17 वाटेल तेवढे
कां, आकाश उंचिया जिंके । आवडे तयाते ।।862।।
तेवीं विविध अवस्था । पातलिया, जिणौनि पार्था ! ।

प्रज्ञाफळ [18]तया अर्था । वेझ देणे [19] ,जे ,।।863।। 18 चाणाक्षपणे19 मार्ग काढणे
तें , 'दक्षत्व 'गा ! चोख । जेंथ चौथा गुण देख ।
आणि झुंज अलौकिक । तो पांचवा गुण ।।864।।
आदित्याचीं झाडें [1], । सदा सन्मुख सूर्याकडे, । 1 सूर्यफुल
तेवीं समोर शत्रुपुढे । होणें जें कां ,।।865।।
माहेवणी [2] , प्रयत्नेंसी । चुकविजें सेजें जैसी, । 2 गरोदर स्त्री
रिपू पाठी नेदिजें तैसी ,। समरांगणीं ।।866।।
हा क्षत्रियाचेया आचारी । पांचवा गुणेंद्रु अवधारी ।
चहूं पुरुषार्था शिरी[3] ,। भक्ति जैसी ।।867।। 3 श्रेष्ठ
आणि, जालेनि फुलें, फळें, । शाखिया जैसी मोकळे, ।
कां, उदार परिमळे , । पद्माकरु ।।868।।
नाना, आवडीचेनि मापे, । चांदिणें भलतेंणें घेपे [4] । 4 कींतीही घ्यावे
पुढिलांचेनि संकल्पे [5] । तैसे जें देणे, ।।869।। 5 मनोरथासारिखे
तें उमप गा ! 'दान '। जेंथ सहावें गुणरत्न ।
आणि आज्ञे एकायतन । होणे [6] जें कां, ।।870।। 6 आपली आज्ञा पालन करावयास लावणे
पोषूनि अवयव आपुले, । करविजती मानविले, ।
तेवीं पाळणे लोभविले [7] । जग जें भोगणें, ।।871।। 7 पालनपोषण करून प्रेम संपादन करून
तया नाम 'ईश्वरभावो '। जो सर्वसामर्थ्याचा ठावो ।
तो गुणांमाजी रावो । सातवा जेंथ ।।872।।
ऐसें जें शौर्यादिकीं । इही सात गुणविशेखीं ।
अळंकृत, सप्तऋखीं । आकाश जैसे, ।।873।।
तैसे, सप्तगुणी विचित्र । कर्म जें जगीं पवित्र, ।
तें सहज जाण क्षात्र । क्षत्रियाचें ।।874।।
नाना, क्षत्रिय नव्हे नरु, । तो सत्त्वसोनयाचा मेरु ।
म्हणौनि, गुणस्वार्गा आधारु । सातां इयां ।।875।।
नातरी, सप्तगुणार्णवीं । परिवारली [8] बरवी । 8 अलंकृत केलेली
हें क्रिया नव्हे ! पृथ्वी । भोगीतसे तो ।।876।।
कां, गुणांचे सातांही ओघीं, । हें क्रिया ,तें गंगा जगी ।
तया महोदधीचिया आंगी । विलसे जैसी ।।877।।
परी हें बहु असो, देख । शौर्यादि गुणात्मक ।
कर्म गा! नैसर्गिक ।क्षत्रजातीसी ।।878।।
आतां वैश्याचिये जाती । उचित जें, महामती ! ।
तें ऐक गा निरुती [9] । क्रिया सांगों ।।879।। 9 निश्चित

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।।44।।

कृषि म्हणजे शेती ,गौरक्ष्य म्हणजे गुरेंढोरें पाळण्याचा धंदा, आणि वाणिज्य म्हणजे व्यापार, हे वैश्याचें स्वभावजन्य कर्म होय; आणि तसेच सेवा करणे हे शूद्राचे स्वभावजन्य कर्म होय.

तरी भूमि,बीज,नांगरु । यया भांडवलाचा आधारु ।
घेऊनि, लाभु अपारु । मेळवणे जे, ।।880।।
किंबहुना, कृषी जिणे, । गोधनें राखोनि वर्तणें, ।
कां, समर्घीची[1] विकणे । महर्घीवस्तु [2] ।।881।। 1 स्वस्त वस्तु 2 महाग विकणे
येतुलाचि पांडवा ! । वैश्याते कर्माचा मेळावा ।
हा वैश्यजातीस्वभावा-। आंतुला जाण ।।882।।
आणि, वैश्य,क्षत्रिय, ब्राह्मण । हे द्विजन्मे तिन्ही वर्ण, ।
ययांचे जे शुश्रुषण, । ते शूद्रकर्म ।।883।।
पै, द्विजसेवेपरौते ,। धांवणे नाहीं शूद्राते ।
एवं, चतुर्वर्णोचिते । दाविलीं कर्में ।।884।।

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ।।45।।

आपआपल्या स्वभावजन्य गुणांप्रमाणे प्राप्त झालेल्या कर्मात जो पुरुष नित्य रत त्याला त्यानेच परम सिद्धि प्राप्त होते. आपल्या कर्मात तत्पर राहिल्याने सिद्धि कशी मिळते ते ऐक.

आतां, इयेचि विचक्षणा ! । वेगळालिया वर्णा ।
उचित जैसे करणां[3] । शब्दादिक ।।885।। 3 इंद्रियांना
नातरी, जळदच्युता [4] । पाणिया, उचित सरिता । 4 ढगातून पडणाऱ्या
सरितेसी पंडुसुता । सिंधु उचितु ।।886।।
तैसे, वर्णाश्रमवशे । जे करणीय आलें असे, ।
गोरेया आंगा जैसे । गोरेपण [5]।।887।। 5 गोऱ्या व्यक्तीला गोरेपण शोभते तसे
तया स्वभावविहिता कर्मा । शास्त्राचेनि मुखे वीरोत्तमा ! ।
प्रवर्तावयालागी प्रमा [6] । अढळ कीजे ।।888।। 6 बुद्धी
पै, आपुलेंचि रत्न थिते [7], । घेपे पारखियाचेनि हाते, । 7 जवळचे
तैसें स्वकर्म आपैते [8] । शास्त्रे करावीं ।।889।। 8 स्वीकारावी
जैसी दिठी असे आपुलिया ठायी । परी दीपेवीण भोग नाहीं, ।
मार्गु न लाहतां [9] , काई । पाय असतां होय ? ।।890।। 9 सापडला नाहीं तर
म्हणौनि ज्ञातिवशे साचारु । सहज असे जो अधिकारु ।
तो आपुलिया शास्त्रे गोचरु । आपण कींजे ।।891।।
मग घरीचाचि ठेवा, । जेवीं डोळ्या दावी दिवा ।
तरी घेतां, काय पांडवा ! । आडळु [10] असे ? ।।892।। 10 अडचण

तैसे स्वभावे भागा आलें, । वरी शास्त्रे खरे केलें, ।
ते विहित जो आपुलें । आचरे गा ! ।।893।।
परी आळसु सांडुनी ,। फळकाम दवडुनी, ।
आंगे जीवें मांडुनी [1] । तेथेंचि भरु [2], ।।894।। 1 मनःपूर्वक 2 आदरपूर्वक
वोघी पडिलें पाणी, । नेणें आनानी वाहणी, ।
तैसा जाय आचरणी । व्यवस्थौनि ।।895।।
अर्जुना ! जो यापरी । ते विहित कर्म स्वयें करी ,।
तो मोक्षाच्या ऐलद्वारी । पैठा [3] होय ।।896।। 3 स्थीर होतो
जे अकरणा आणि निषिद्धा,। न वचेचि [4] कांही संबंधा,। 4 वाटेला जात नाहीं
म्हणौनि भवा विरुद्धा [5] । मुकला तो ।।897।। 5 संसारभया पासून
आणि काम्यकर्माकडे । न परतेचि जेथ कोडे [6], । 6 कौतुकाने 7 चंदनाचा खोडा
तेथ चंदनाचेही खोडे । न लेचि[7] तो ।।898।। सुवासिक म्हणून त्यात कोणी पाय
येर नित्य कर्म तंव । फळत्यागे वेंचिलें सर्व, । अडकवून घेत नाहीं त्याप्रमाणे
म्हणौनि मोक्षाची शींव । ठाकूं लाहे [8] ।।899।। 8 मोक्षाच्या वेशीपर्यंत पोहचतो
ऐसेंनि , शुभाशुभी संसारी । सांडिला, तो अवधारी ।
वैराग्यमोक्षद्वारी । उभा ठाके ।।900।।
जे सकळ भाग्याची सीमा, । मोक्षलाभाची जे प्रमा [9],। 9 निश्चितज्ञान
नाना, कर्ममार्गश्रमा । शेवटु जेथ ।।901।।
मोक्षफळे दिधली वोल [10], । जे सुकृततरूचें फूल । 10 इसारा
तयें वैराग्यीं ठेवी पाऊल ,। भंवरु [11] जैसा ।।902।। 11 भ्रमर
पाही,आत्मज्ञानसुदिनाचा ।वाधावा[12],सांगतया,अरुणाचा । 12 नांदी
उदयो ,त्या वैराग्याचा । ठावो पावे ।।903।।
किंबहुना, आत्मज्ञान । जेणें हाता ये निधान, ।
ते वैराग्य दिव्यांजन । जीवे ले [13] तो ।।904।। 13 मनापासून घालतो
ऐसी मोक्षाची योग्यता । सिद्धी जाय तया, पंडुसुता !।
अनुसरोनि विहिता । कर्मा यया ।।905।।
हे विहित कर्म पांडवा ! । आपुला अनन्य वोलावा [14] । 14 जीव्हाळा
आणि हेचि परम सेवा । मज सर्वात्मकाची ।।906।।
पै, आघवाचि भोगेंसीं , । पतिव्रता क्रीडे प्रियेसीं, ।
की, तयाचीं नामे ,जैसी । तपें तियां केलीं ।।907।।
कां, बाळका एकीं माये-। वांचोनि ,जिणे काय आहे ?।
म्हणौनि सेविजे , की तो होये । पाटाचा [15] धर्मु ।।908।। 15 श्रेष्ठ
नाना, पाणी म्हणौनि ,मासा, । गंगा न सांडितां, जैसा । 16 सर्व तीर्थाच्या
सर्व तीर्थ [16] सहवासा । वरपडा [17] जाला ।।909।। योग्यतेच्या सागराला 17 पोचतो

तैसे आपुलिया विहिता । उपावो असे[1] ?, न विसंबितां ।
ऐसा कींजे की, जगन्नाथा । आभारु पडे [2] ।।910।।
अगा! जया जे विहित, । ते ईश्वराचे मनोगत ।
म्हणौनि केलिया , निभ्रांत [3]। सांपडेचि तो ।।911।।
पै,जीवाचे कसीं उतरली,। ते दासी कीं गोसांवीण [4] जाली ।
सिसे वेंचि [5], तया मविली [6] । वही [7] जेवीं ।।912।।
तैसे,स्वामीचिया मनोभावा । न चुकिजे, हेचि परमसेवा।
येर ते गा पांडवा ! । वाणिज्य करणें ।।913।।

1 धर्माप्रमाणे प्रयत्न करणे
2 आभारी होईल
3 चिंताविरहीत
4 मालकींण
5 मस्तक अर्पण करण्यास तयार होतो 6 पात्र होतो
7 मानसन्मानास

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।।46।।

ज्याच्यापासून सर्व भूतांची प्रवृत्ती झाली व ज्याने हे सर्व जग विस्तारले किंवा व्यापले आहे , त्याची पूजा आपल्यास प्राप्त झालेल्या कर्मांनी केली म्हणजे मनुष्याला सिद्धि प्राप्त होत असते

म्हणौनि विहित क्रिया केली,। नव्हे तयाची खूण [8]पाळिली,।
जयापासूनि कां आली । आकारा भूते ।।914।।
जो अविद्येचिया चिंधिया । गुंडूनि जीव बाहुलिया ।
खेळवीतसे , तिगुणिया[9] । अहंकाररज्जू ।।915।।
जेणे जग हें समस्त । आंत बाहेरी पूर्ण भरित ।
जाले आहे , दीपजात । तेजे जैसे, ।।916।।
तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची, वीरा ! ।
पूजा केली, होय अपारा । तोषालागी ।।917।।
म्हणौनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजे, ।
वैराग्यसिद्धि देईजे । पसाय [10] तया ।।918।।
जिये वैराग्यदशे । ईश्वराचेनि वेधवशें [11],।
हे सर्वही नावडे, जैसे । वांत [12] होय ।।919।।
प्राणनाथाचिया आधी [13], । विरहणीते जिणेंही बाधी [14] ।
तैसे ,सुखजात ,त्रिशुद्धी ,। दुःखचि लागे ।।920।।
सम्यक्ज्ञान नुदैजतां [15], । वेधेंचि [16]तन्मयता ।
उपजे , ऐसी योग्यता । बोधाची [17] लाहे ।।921।।
म्हणौनि, मोक्षलाभालागी, । जो व्रते वाहातसें आंगीं, ।
तेणें, स्वधर्मु ,आस्था चांगी ,। अनुष्ठावा ।।922।।

8 आज्ञेप्रमाणे
9 त्रिगुणात्मक दोराने
10 प्रसाद
11 ध्यास लागून
12 उलटी
13 विरहाने 14 दुःखदायक होते
15 ईश्वराचे पूर्ण ज्ञान होण्याचे आधी16 ध्यासाने 17 बुद्धिची

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।।47।।

परक्याचा धर्म सुखानें आचरितां आला तरी त्यापेक्षा आपला धर्म म्हणजे चातुर्वण्यविहित कर्म विगुण म्हणजे सदोष असले , तरी तेच अधिक श्रेयस्कर आहे; आपले स्वभावसिद्ध म्हणजे गुणस्वभावनुरुप निर्मिलेल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेने नियमित झालेले कर्म करित असतां त्यानें कोणतेही पाप लागत नाहीं.

अगा! आपुला हा स्वर्धमु । आचरणी जरी विषमु, ।
तरी पाहावा तो ,परिणामु । फळेल जेणें ।।923।।
जै ,सुखालागी आपणपयां,। निंबचि आथी ,धनंजया ! ।
तै, कडुवटपणा तयाचिया । उबगिजेना ।।924।।
फळणया ऐलीकडे, । केळीते पाहातां आस मोडे [1], । — 1 आशा रहात नाहीं
ऐसी त्यजिली, तरी जोडे । तैसे कें गोमटें ? ।।925।।
तेवीं स्वधर्मु सांकडु [2] ,। देखोनि ,केला जरी कडु [3], । — 2 कठीण 3 नावडता
तरी मोक्षसुरवाडु [4] । अंतरला की !।।926।। — 4 मोक्षसुखाला
आणि, आपुली माये । कुब्ज जरी आहे , ।
तरी जीये ,ते नोहे । स्नेह ,कुऱ्हे [5] की ? ।।927।। — 5 वाईट
येरी[6] जिया पराविया [7] ,। रंभेहूनि बरविया , । — 6 इतर 7 परक्या
तिया काय कराविया । बाळकें तेणें ? ।।928।।
अगा! पाणियाहूनि बहुवे ,। तुपी गुण कीर आहे ,।
परी मीना काय होये । असणे तेथ ? ।।929।।
पै, आघविया जगा जे विख,। ते विख कीडियाचे पीयूख [8],। — 8 अमृत
आणि जगा गुळ, ते देख । मरण तया ।।930।।
म्हणौनि, जे विहित जया, जेणे । फिटे संसाराचें धरणें, ।
क्रिया कठोर, तऱ्ही तेणें । तेचि करावी ।।931।।
येरा पराचारा बरविया, । ऐसें होईल, टेंकलेया ।
पायांचे चालणे डोइया । केलें जैसे ।।932।।
यालागी, कर्म आपुले, । जे जातिस्वभावे असे आलें, ।
ते करी , तेणें जिंतले । कर्मबंधाते ।।933।।
आणि स्वधर्मुचि पाळावा, । परधर्मु तो गाळावा।
हा नेमुही पांडवा ! । न कींजेचि पै गा ? ।।934।।
तरी आत्मा दृष्ट नोहे, । तंव कर्म करणे कां ठाये [9]? । — 9 थांबणार आहे का
आणि करणे, तेथ आहे । आयासु [10]आधीं ।।935।। — 10 श्रम

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ।।48।।

जे कर्म सहज म्हणजे जन्मतःच गुणकर्मविभागामुळे नियत आहे ,ते सदोष असले तरी हे कोंन्तेया ! कधीहि सोडूं नये. कारण धुराने ज्याप्रमाणे विस्तव त्याप्रमाणे सर्व आरंभ म्हणजे उद्योग कोणत्या ना कोणत्या तरी दोषाने व्यापिलेले असतात.

म्हणौनि, भलतिये [1] कर्मी, । आयासु [2] जऱ्ही उपक्रमी [3], ।
तरी, काय स्वधर्मी । दोषु सांगे ? ।।936।।
आगा! उजू वाटा चालावे । तरी, पायचि शिणवावे ।
ना , आडरानें धांवावे , । तऱ्ही तेंचि ।।937।।
पै, शिळा कां सिदोरिया, । दाटणे [4] एक धनंजया !
परी जे वाहतां विसांवया । मिळिजे, ते घेपे ।।938।।
एऱ्हवीं, कणा आणि भूसा । कांडितांही, सोसु [5] सरिसा, ।
जेचि रंधन [6] श्वान मांसा, । तेचि हवि ।।939।।
दधी, जळाचिया घुसळणा, । व्यापार सारिखेचि विचक्षणा !।
वाळूवे , तिळा ,घाणा । गाळणे ,एक ।।940।।
पै, नित्य होम देयावया, । कां सैरा [7] आगी सुवावया [8] ,।
फुंकितां ,धू ,धनंजया ! । साहणें तेचि ।।941।।
परी, धर्मपत्नी, धांगडी [9], । पोसितां ,जरी एकीं वोढी [10], ।
तरी कां अपरवडी [11] । आणावी आंगा ? ।।942।।
हां गा ! पाठीं लागला , घाई [12] । मरण न चुकेचि पाहीं, ?
तरी समोरला [13] काई । आगळें [14] न कीजे ? ।।943।।
कुलस्त्री दांड्याचे घाये [15] । परघर रिगालीही जरी साहे, ।
तरी स्वपतीते वायें [16] । सांडिले की ? ।।+944।।
तैसे, आवडतेही करणे । न निपजे शिणल्याविणे, ।
तरी विहित बा रे ! कोणें । बोले भारी[17] ! ।।945।।
वरी, थोडेंचि अमृत घेतां, । सर्वस्व वेंचो कां, पंडुसुता ! ।
जेणे जोडे जीविता । अक्षयत्व ।।946।।
येर, काह्यां मोलें वेचूनि [18] । विष पियावे घेऊनि, ।
आत्महत्येसि निमोनि[19] । जायिजे जेणें ।।947।।
तैसे, जाचूनियां इंद्रियें, । वेचूनि आयुष्याचेनि दिये [20], ।
सांचले पापी[21] ,आन आहे । दुःखावांचूनि ?।।948।।
म्हणौनि करावा स्वधर्मु । जो करितां, हिरोनि घे श्रमु ।
उचित देईल परमु । पुरुषार्थराजु ।।949।।
याकारणे किरीटी ! । स्वधर्माचिये राहाटी, ।
न विसंबिजे, संकटी । सिद्धमंत्र जैसा ।।950।।

1 कोणत्याहि 2 कष्ट
3 सुरवातीला
4 ओझे
5 श्रम
6 शिजवण्याचे श्रम
7 स्वैर 8 पेटवावयाला
9 स्वैराचारी 10 ओढताण होते
11 स्वैरस्त्री ठेऊन
होणारा दुर्लौकिक
12 पाठ दाखवून वार खावा लागतो
13 समोरसमोर 14 दोन हात
करणे 15 काठीचा मार
16 उगीचच
17 त्रासदायक कोण म्हणार
18 विकत घेऊन
19 आत्महत्या करून मरुन जावे
20 दिवस
21 पाप साठवून

कां, नाव जैसी उदधीं [1], । महारोगी दिव्यौषधी ।
न विसंबिजे, तया बुद्धी । स्वकर्म येथ ।।951।।
मग, ययाचि गा कपिध्वजा ! । स्वकर्माचिया महापूजा, ।
तोषला ईशु, तमरजा ।झाडा करुनी, ।।952।।
शुद्धसत्त्वाचिया वाटा । आणी , आपुली उत्कंठा [2] ।
भव,स्वर्ग काळकूटा [3]। ऐसें दावी ।।953।।
जियें ''वैराग्ये ''येणें बोलें, । मागां संसिद्धी [4] रूप केले, ।
किंबहूना, ते आपुलें । मेळवी खागे [5] ।।954।।
मग जिंतलिया हे भोये [6] ,। पुरूष सर्वत्र जैसा होये, ।
कां, जालाही जे लाहे ,। ते आतां सांगों ।।955।।

1 सागरात
2 आत्मप्राप्तीची तीव्र इच्छा
3 कालकूट विषाप्रामाणे
4 45 व्या श्लोकात संसिद्धी असे म्हटले 5 ते ठीकाण
6 भूमीका

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ।।49।।

म्हणून कोठेहि आसक्ति न ठेवितां मन ताब्यात आणून निष्काम-बुद्धीने वागले म्हणजे कर्मफलाच्या संन्यासाने परम नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त होते

तरी देहादिक हे संसारे । सर्वही मांडलेंसे जे गुफिरे [7], ।
तेथ नातुडे [8] तो, वागुरे [9] । वारा जैसा ।।956।।
पै, परिपाकाचिये वेळे [10] ,। फळ देठें , ना, देठु फळें ।
न धरे, तैसे स्नेह खुळे [11] । सर्वत्र होय ।।957।।
पुत्र,वित्त,कलत्र । हे जालियाही स्वतंत्र [12], ।
माझे न म्हणे, पात्र । विषाचे जैसे ।।958।।
हे असो; विषयजाती । बुद्धी पोळली ऐसी, माघौती ।
पाउले घेऊनि , एकांती । हृदयाच्या रिगे ।।959।।
ऐसया, अंतःकरण । बाह्य येतां[13], तयाची आण ।
न मोडी, समर्था भेण [14] । दासी जैसी ।।960।।
तैसे ऐक्याचिये मुठी-।माजिवडे [15] चित्त , किरीटी! ।
करूनि, वेधी नेहटी [16] । आत्मयाच्या ।।961।।
तेव्हां, दृष्टादृष्ट स्पृहे [17] । निमणे [18] जालेंचि आहे , ।
आगी दडपलिया[19], धुये[20] । राहिजे ? जैसे ।।962।।
म्हणौनि,नियमिलिया [21] मानसीं,।स्पृहा [22] नासौनि जाय आपैसी ।
किंबहूना, तो ऐसी । भूमिका पावे ।।963।।
पै, अन्यथा बोधु [23] आघवा । मावळोनि, तया पांडवा ! ।
बोधमात्रींचि जीवा । ठावो होय ।।964।।

7 जाळे
8 गुंतत नाहीं 9 जाळ्यात
10 पिकल्यानंतर
11 लोभ खोटा वाटतो
12 स्वाधीन
13 मन बाहेर गेले
14 मालकाच्या भीतीने
15 मुठीमध्ये
16 दीशेने रेटतो
17 इहलोकीची अभिलाषा
18 मेली19 आग विझवल्यानंतर
20 धूर 21 निग्रह 22 अभिलाषा
23 विपरीत ज्ञान

धरवणी वेचे सरे [1], । तैसे भोगें ,प्राचीन पुरे ।
नवें तंव नुपकरे [2] । कांहींचि करूं ।।965।।
ऐसी कर्मे साम्यदशा । होय, तेथ वीरेशा ! ।
मग श्रीगुरु आपैसा । भेटेचि गा ! ।।966।।
रात्रीची चौपाहरी । वेंचलिया, अवधारी ।
डोळ्या तमारी [3] । मिळे जैसा ।।967।।
कां, येऊनि फळाचा घडु, । पारुषवी [4] केळीची वाढु ।
श्रीगुरु भेटोनि करी पाडु [5] । बुभुत्सु[6] तैसा ।।968।।
मग आलिंगिला पूर्णिमा, । जैसा उणीव सांडी चंद्रमा, ।
तैसे होय वीरोत्तमा ! । गुरुकृपा तया ।।969।।
तेव्हां अबोधुमात्र [7] असे, । तो, तंव तया कृपा नासे ।
तेथ, निशीसवें जैसे । आंधारे जाय ।।970।।
तैसी, अबोधाचिये कुशी [8], । कर्म,कर्ता,कार्य ऐशी ।
त्रिपुटी असे, ते , जैसी । गाभिणी[9] मारिली ।971।।
तैसेचि अबोधनाशासवें ,। नाशे क्रियाजात आघवें ।
ऐसा समूळ संभवे । संन्यासु हा ।।972।।
येणे मूळाज्ञानसंन्यासें । दृश्याचा जेथ ठावो पुसे [10] ,।
तेथ बुझावे [11] ते आपैसें । तोचि आहे ।।973।।
चेइलियावरी पाही । स्वप्नींचिया तिये डोहीं , ।
आपणयाते काई । काढूं जाईजे ?।।974।।
तै, ''मी नेणें '', आतां जाणेन ,। हे सरले तया दुःस्वप्न ।
जाला ज्ञातृज्ञेयाविहीन । चिदाकाश ।।975।।
मुखाभासेंसीं[12] ,आरिसा । परौता नेलिया, वीरेशा! ।
पाहातेंपणेवीण जैसा । पाहाता ठाके [13] ।।976।।
तैसे, नेणणे जे गेलें । तेणें जाणणेंही नेलें ,।
मग निष्क्रिय उरले । चिन्मात्रचि [14] ।।977।।
तेथ स्वभावे , धनंजया ! । नाही कोणीचि क्रिया, ।
म्हणौनि प्रवादु [15] तया ।' नैष्कर्म्यु ' ऐसा ।।978।।
ते आपुले आपणपें । असे , तेचि होऊनि हारपे , ।
तरंगु कां , वायुलोपे । समुद्रु ,जैसा ।। 979।।
तैसे न होणे निफजे । ते नैष्कर्म्यसिद्धि जाणिजे ।
सर्वसिद्धींत सहजे । परम [16]हेचि ।।980।।
देउळाचिया कामा,कळसु ।परम [17],गंगेसी सिंधु प्रवेशु,।
कां, सुवर्णशुद्धी कसु । सोळावा जैसा ।।981।।

1 सांठवलेले भोगून खर्च करून
2 साह्य होत नाहीं
3 सूर्य
4 खुंटते
5 योग्यता 6 जिज्ञासु
7 विपरितज्ञानलेश
8 पोटात
9 गरोदर
10 नाहींसे होते
11 प्राप्त करून घ्यावे
12 प्रतिबिंबासकट
13 उरतो
14 चैतन्य
15 नांव
16 श्रेष्ठ
17 अखेर

तैसे, आपुले नेणणे । फेडिजे [1], का जाणणे ।
तेंही गिळूनि असणे ,। ऐसी जे दशा ,।।982।।
तियेपरते कांही । निपजणे आन नाहीं, ।
म्हणौनि ,म्हणिपे पाही ।' परमसिद्धि ' ते ।।983।।

1 नाहींसे करणे

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ।।50।।

याप्रमाणे सिद्धि प्राप्त झाल्यावर त्या पुरुषाला ज्ञानाची परमावधीची निष्ठा जे ब्रह्म ते हे कौंतेया ! ज्या प्रकारे प्राप्त होते ते मी थोडक्यात सांगतो ऐक.

परी हेचि आत्मसिद्धि ,। जो कोणी भाग्यनिधि ,।
श्रीगुरुकृपालब्धि-। काळीं ,पावे ।।984।।
उदयतांचि दिनकरु, । प्रकाशुचि आते [2] आंधारु, ।
कां, दीपसंगे कापुरु । दीपुचि होय ।।985।।
तया लवणाची कणिका । मिळतखेंवो उदका, ।
उदकचि होऊनि , देखा । ठाके जेवी ।।986।।
कां, निद्रितु चेवविलिया, । स्वप्नेसि नीद वायां ।
जाऊनि, आपणपयां । मिळे जैसा , ।।987।।
तैसे जया कोण्हासि दैवे ,। गुरुवाक्यश्रवणाचि सवें , ।
द्वैत गिळोनि ,विसवें । आपणया वृत्ती ।।988।।
तयासि मग कर्म करणें । हे बोलिजैलचि कवणे ? ।
आकाशा येणें जाणें । आहे काई ? ।।989।।
म्हणौनि तयासी कांही । त्रिशुद्धि करणें नाहीं।
परी, ऐसें जरी हे कांही ,। नव्हे जया ।।990।।
कानावचनाचिये भेटी-। सरिसाचि [3], पै, किरीटी ! ।
वस्तु [4] होऊनि उठी । कवणि एकु जो ,।।991।।
एऱ्हवी, स्वकर्माचेनि वन्ही । काम्यनिषिद्धा चिया इंधनी ,।
रजतमे कीर दोन्ही । जाळिलीं आधी ।।992।।
पुत्र,वित्त, परलोकु । यया तिहींचा अभिलाखु ।
घरी होय पाइकु [5] , । हेही जाले ।।993।।
इंद्रिये सैरा पदार्थी । रिगतां, विटाळली होतीं ।
तियें प्रत्याहार तीर्थी [6] । न्हाणिलीं कीर ।।994।।
आणि स्वधर्माचे फळ । ईश्वरीं अर्पूनि सकळ ।
घेऊनि केले अढळ । वैराग्यपद ।।995।।

2 व्यापतो
3 ऐकल्याबरोबर
4 ब्रह्म
5 सेवक
6 इंद्रियांच्या अंर्तमुखतेने

ऐसी , आत्मसाक्षात्कारी । लाभे ज्ञानाची उजरी [1] ,। 1 उत्कर्षदशा
ते सामुग्री ,कीर ,पुरी । मेळविली ।।996।।
आणि ,तेचि समयीं । सद्‌गुरु भेटले पाहीं ,।
तेवींचि[2] , तिही कांही । वंचिजेना [3]।।997।। 2 त्याचप्रमाणे 3 संकोच केला
परी वोखद [4] घेतखेंवो , । काय लाभे आपुला ठावो [5]? । नाही 4 औषध 5 स्वास्थ्य
कां उदयजतांचि , दिवो । मध्यान्ह होय ? ।।998।।
सुक्षेत्रीं आणि वोलटे [6] । बीजही पेरिले गोमटे, । 6 पाणी दीले
तरी अलोट फळ भेटे ,। परी , वेळे की गा ! ।।999।।
जोडला मार्गु प्रांजळु [7], । मिनला सुसंगाचाही मेळु ,। 7 सोपा
तरी पाविजे, वांचूनि वेळु । लागेचि कीं ! ।।1000।।
तैसा, वैराग्यलाभु जाला ,। वरी सद्‌गुरुही भेटला, ।
जीवी अंकरु फुटला । विवेकाचा ,।।1001।।
तेणें, ब्रह्म एक आथी [8] । येर, आघवीचि भ्रांती ,। 8 सत्य
हेही कीर प्रतीती । गाढ केली [9] ।।1002।। 9 अनुभव पक्का केला
परी तेचि जे परब्रह्म । सर्वात्मक सर्वोत्तम ,।
मोक्षाचेही काम । सरे जेथ ,।।1003।।
यया तिन्ही अवस्था पोटीं । जिरवी, जे गा किरीटी ! ।
तया ज्ञानासिही मिठी । दे जे वस्तु ,।।+1004।।
ऐक्याचे एकपण सरे, । जेथ आनंदकणुही विरे ।
कांहींचि नुरोनि उरे । जे काही गा ! ।।1005।।
तिये ब्रह्मी ऐक्यपणें । ब्रह्मचि होऊनि असणें, ।
ते ,क्रमेचि [10] करूनि ,तेणें । पाविजे पै ।।1006।। 10 क्रमाक्रमाने
भुकेलियापासी । वोगरिले षड्रसीं [11], । 11 षडरसयुक्त अन्न वाढले
तो तृप्ति प्रतिग्रासीं । लाहे जेवीं, ।।1007।।
तैसा वैराग्याचा वोलावा ,। विवेकाचा तो दिवा , ।
आंबुथितां[12] , आत्मठेवा । काढीचि तो ।।1008।। 12 उजळल्यावर
तरी भोगिजे आत्मऋद्धी । येवढी योग्यतेची सिद्धी ,।
जयाच्या आंगी निरवधी [13] । लेणे जाली ,।।1009।। 13 अमर्याद
तो जेणे क्रमे ब्रह्म । होणे करी ,गा ! सुगम ।
तया क्रमाचे आतां वर्म । आईक सांगो ।।1010।।

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ।।51।।

शुद्ध बुद्धीने युक्त होत्साता धैर्याने आपले संयमन करून , श्ब्दादि इंद्रियांचे विषय सोडून, आणि प्रीति व द्वेष दूर करून

तरी गुरु दाविलिया वाटा । येऊनि विवेकतीर्थतटा,।
धुऊनियां मळकटा । बुद्धीचा ,तेणें ।1011।।
मग राहूनें उगळिली [1] । प्रभा, चंद्रें आलिंगिली । 1 मुक्त झालेली
तैसी शुद्धत्वे जडली । आपणयां बुद्धि ।।1012।।
सांडुनि कुळें दोन्ही, । प्रियासी अनुसरे कामिनी ।
द्वंद्वत्यागें स्वचिंतनी । पडली तैसी ।।+1013।।
आणि ज्ञाना ऐसें जिव्हार [2] । नेवों नेवों [3] निरंतर । 2 जीवन 3 वारंवार उपभोगून
इंद्रियी केले थोर, । शब्दादिक जे ।।1014।।
ते ,रश्मिजाळ काढलेया [4]। मृगजळ जाय लया, । 4 सूर्यकीरण नाहींसे होताच
तैसे धृतिरोधें तयां । पांचांही [5] केले ।।1015।। 5 शब्दादि पांच विषय
नेणतां अधमाचिया अन्ना । खादिलिया, कींजे वमना ,। 6 वासनेसकट विषय
तैसी वोकविली सवासना [6]। इंद्रिये विषयीं ।।1016।। इंद्रियाकडून वोकविले
मग प्रत्यगावृत्ती [7] ,चोखटे । लाविलीं गंगेचेनि तटें । 7 इंद्रिये अंर्तमुख करून
ऐसी, प्रायश्चित्ते धुवटे । केली येणे ।।+1017।।
पाठी सात्त्विकें धीरे ,तेणें । शोधारली [8] तिये करणें [9] । 8 शुद्ध केली 9 इंद्रिये
मग ,मनेंसीं , योगधारणें । मेळविलीं ।।1018।।
तेवींचि प्राचीनें [10] इष्टानिष्टे । भोगेंसी येउनी भेटे , । 10 प्रारब्धात असलेली
तेथ देखलियाही वोखटे [11] ,। द्वेषु न करी ।।1019।। 11 वाईट
ना, गोमटेचि विपायें । ते आणूनि पुढां सूये [12], । 12 समोर ठेवली
तयालागी न होये । साभिलाषु ।।1020।।
यापरी ,इष्टानिष्टी । रागद्वेष, किरीटी ! ।
त्यजूनि, गिरीकपाटी,।निकुंजी [13] वसे ।।1021।। 13, डोंगर,गुहा,दाट अरण्य

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानस ः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रित ः ।।52।।

‘विवक्त’ म्हणजे निवडक किंवा एकान्त स्थळी रहाणारा, मिताहारी, काया ,वाचा व मन ज्याच्या ताब्यांत, आणि नित्य ध्यानयुक्त व विरक्त

गजबजा सांडिलिया । वसवी वनस्थळिया ।
अंगाचियाचि मांदिया [14] । एकलेया ।।1022।। 14 अवयवांचा मेळावा
शमदमादिकीं खेळे, । न बोलणेंचि ,चावळे [15] ,। 15 बडबडतो
गुरुवाक्याचेनि मेळे [16] । नेणे वेळु [17]।।1023।। 16 गुरोपदेशाचे चिंतनात
आणि आंगा बळ यावें, । नातरी क्षुधा जावें ,। 17 इतर गोष्टीकरता वेळ नसतो
कां, जिभेचे पुरवावे । मनोरथ ।।1024।।

भोजन करितांविखी । यया तिहींते न लेखी [1] ।
आहारी मिती, संतोषी । माप न सूये [2]।।1025।।
अशनाचेनि पावके [3] ,। हारपतां प्राणु पोखे [4] ,।
इतुकियाचि भागु मोटके [5] । अशन करी [6] ।।1026 ।।
आणि परपुरुषे कामिली, । कुळवधू आंग न घाली ,।
निद्रालस्या न मोकली [7] । आसन तैसे ।।1027।।
दंडवताचेनि प्रसंगे । भुयीं हन अंग लागे ,।
वांचूनि येर नेघे । राभस्य [8] तेथ ।।1028।।
देहनिर्वाहापुरते । राहाटवी हातांपायांते ।
किंबहुना आपैते [9] । सबाह्य केले ।।1029।।
आणि मनाचा उंबरा । वृत्तीसी [10] देखों नेदी, वीरा ! ।
तेथ कें वाग्व्यापारा । अवकाशु असे ? ।।1030।।
ऐसेनि देह,वाचा,मानस । हे जिणौनि बाह्यप्रदेश, ।
आकळिले आकाश । ध्यानाचें तेणें ।।1031।।
गुरुवाक्ये उठविला । बोधी [11], निश्चयो आपुला ।
न्याहाळी, हाती घेतला । आरिसा जैसा ।।1032।।
पै, ध्याता आपणचि ,परी । ध्यानरूप वृत्तिमाझारी ।
ध्येयत्वे घे, हे अवधारी । ध्यानरूढी [12] गा ! ।।1033।।
तेथ ध्येय, ध्यान, ध्याता । ययां तिहीं एकरूपता ।
होय, तंव पंडुसता ! । कीजे ते गा ! ।।1034।।
म्हणौनि, तो मुमुक्षु । आत्मज्ञानी जाला दक्षु ।
परी पुढां सूनि पक्षु [13]। योगाभ्यासाचा ।।1035।।
अपानरंध्रद्वयां-।माझारी धनंजया !
पार्ष्णी पिडूनियां [14]। कांवरमूळ ,।।+1036।।
आकुंचूनि अध । देऊनि तिन्ही बंध ।
करूनि एकवद । वायुभेदी ।।+1037।।
कुंडलिनी जागवूनि । मध्यमा विकाशूनि ।
आधारादि भेदूनि । आज्ञावरी ।।+1038।।
सहस्त्रदळाचा मेघु । पीयूषे वर्षोनि चांगु ।
तो मूळवरी वोघु । आणूनिया ।।+1039।।
नाचतया , पुण्यगिरी ,। चिद्‌भैरवाच्या खापरी [15] ।
मनपवनाची खीच ,पुरी । वाढूनियां ।।+1040।।
जालिया योगाचा गाढा । मेळावा ,सूनि हा पुढां ।
ध्यान मागिलीकडां । स्वयंभ केलें ।।+1041।।
आणि ध्यान योग दोन्ही । इये आत्मतत्त्वज्ञानी ।
पैठी होआवया निर्विघ्नी । आधींचि तेणें ।।+1042।।

1 विचारात घेत नाही
2 संतोषाला सीमा नसते
3 जठराग्नी 4 प्राण जाणार नाहीं
इतकेच 5 नेमके 6 भोजन करितो
7 मोकळे सोडत नाहीं
8 अविचार
9 स्वाधीन
10 अंतःकरणातील वासनेला
11 गुरोपदेशाने झालेल्या ज्ञानास
12 ध्यान करण्याची रीत
13 समोर मार्ग ठेवतो
14 संकुचित करून
15 भिक्षापात्र

वीतरागतेसारिखा [1] । जोडूनि ठेविला सखा ।   1 वैराग्यासारिखा
तो आघवियाचि भूमिका-।सवें चाले [2] ।।1043।।   2 सर्व मार्गात साथ करितो
पहावे दिसें , तंववरी, । दिठीते [3], न संडी दीप जरी ,।   3 डोळ्याने
तरी कें आहे अवसरी [4] । देखावया ? ।।1044 ।।   4 विलंब
तैसे मोक्षीं प्रवर्तलया । वृत्ती, ब्रह्मी जाय लया ।
तंव वैराग्य आथी, तया । भंगु कैचा ? ।।1045।।
म्हणौनि सवैराग्यु ,। ज्ञानाभ्यासु , तो सभाग्यु ,।
करूनि जाला योग्यु । आत्मलाभा ।।1046।।
ऐसी वैराग्याची आंगी । बाणूनियां वज्रांगी, ।
राजयोगतुरंगी [5] । आरूढला ।।1047।।   5 राजयोगरूपी घोडयावर
वरी आड पडिले दिठी । साने, थोरे, निवटी ।
ते , बळीं विवेकमुष्टी,। ध्यानाचें खांडे [6] ।।1048।।   6 तलवारीने
ऐसेनि संसाररणाआंतु । आंधारी सूर्य , तैसा ,असें जातु ,।
मोक्षविजयश्रीये वरैतु [7] । होआवायालागी ।।1049।।   7 वर म्हणून योग्य होण्यास

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ।।53।।

तसेच अहंकार,बल,दर्प,काम,क्रोध व परिग्रह म्हणजे पाश सोडून शांत व ममत्वरहित झालेला ब्रह्मभूत होण्यास समर्थ होतो .

तेथ आडवावया आले। दोषवैरी ,जे धोपटिले ,।
तयांमाजी पहिले ,।देहाहंकारु ।।1050।।
जो, न मोकली मारूनी [8] । जीवों नेदी ,उपजवोनि [9] ।।   8 मारून सोडीत नाहीं 9 जन्मून जगु
विचंबवी [10], खोडां घालुनी । हाडांचिया ।।1051।।   देत नाही 10 कुजवतो
तयाचा,देहदुर्ग हा थारा [11]। मोडूनि घेतला,तो,वीरा ! ।   11 आश्रय
आणि बळ हा दुसरा । मारिला वैरी ।।1052।।
जो विषयाचेनि नांवे [12]। चौगुणेंही वरी थांवे [13] ।   12 विषयांचे नांव एकताच 13 चौपट
जेणे मृतावस्था धांवे [14]। सर्वत्र जगा ।।1053।।   वाढतो 14 मरण धांवून येते
तो विषय विषाचा अथावो[15],।आघविया दोषांचा रावो,।   15 सागर
परी ध्यानखड्गाचा घावो । साहेल कैचा ?।।1054।।
आणि प्रिय विषयप्राप्ती । करी जया सुखाची व्यक्ती[16], ।   16 दाखवते
तेचि घालूनि बुंथी [17] ,। आंगी जो वाजे [18], ।।1055।।   17 खोळ 18 आदळतो
जो सन्मार्गा भुलवी, । मग अधर्माच्या आडवी [19] ।   19 रानात
सूनि, वाघा सांपडवी, । नरकादिकां ,।।1056।।

तो विश्वासे मारितां[1] ,रिपु ,। निवटूनि [2] घातला दर्पु ।
आणि जयाचा अहा कंपु ! । तापसांसी ।।1057।।
क्रोधा ऐसा महादोखु, ।जयाचा देखा परिपाकु [3], ।
भरिजे, तंव अधिकु । रिता होय जो ,।।1058।।
तो कामु, कोणेच ठायी । नसे, ऐसें केलें पाही ! ।
की तेचि ,क्रोधाही । सहजे आलें ।।1059।।
मुळाचे तोडणें जैसे । होय कां शाखोद्देशें, ।
कामु नाशलेनि ,नाशे । तैसा क्रोधु ।।1060।।
म्हणौनि, काम वैरी । जाला जेथ ठाणोरी [4] ।
तेथ सरली वारी । क्रोधाचीही ।।1061।।
आणि समर्थु आपुला खोडा ।शिसे वाहवी [5]जैसा, होडा [6] ।
तैसा भुंजौनि [7] जो गाढा [8] । परिग्रहो [9] ,।।1062।।
जो माथांचि पालाणवी [10], । अंगा अवगुण घालवी [11],।
जीवे दांडी [12] घेववी । ममत्वाची ।।1063।।
शिष्यशास्त्रादिविलासे । मठदिमुद्रेचेनि मिसे [13] ,।
घातले आहाती फांसे । निसंगा जेणें, ।।1064।।
घरी कुटुंबपणे सरे [14], । तरी ,वनीं वन्य होऊनि अवतरे ।
नागवीयाही शरीरे । लागला आहे ।।1065।।
ऐसा दुर्जयो जो परिग्रहो [15], । तयाचा फेडूनि ठावो [16] ।
भवविजयाचा उत्साहो [17]। भोगीतसे जो ।।1066।।
तेथ अमानित्वादि आघवे । ज्ञानगुणाचे जे मेळावे, ।
ते कैवल्यदेशीचे आघवे । रावो, जैसे आलें ।।1067।।
तेव्हां सम्यक्ज्ञानाचिया । राणिवा [18] उगाणूनि [19] ,तया ।
परिवारु होऊनियां । राहत आंगे ।।+1068।।
प्रवृत्तीचिये राजबिंदीं [20]। अवस्थाभेदप्रमर्दी [21] ।
कींजत आहे प्रतिपदी । सुखाचे लोण [22] ।।+1069।।
पुढां बोधाचिये कांबीवरी [23]। विवेकु दृश्याची मांदी [24] सारी ।
योगभूमिका ,आरती करी । येती, जैसिया ।।+1070।।
तेथ ऋद्धिसिद्धीची अनेगें [25] । वृंदे मिळती प्रसंगे ।
तिये पुष्पवर्षी आंगे । नाहातसे तो ।।+1071।।
ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें । स्वराज्य [26] येतां जवळिके, ।
झळंबित [27] आहे हरिखे [28] । तिन्ही लोक ।।1072।।
तेव्हां वैरिया कां मैत्रियां ,। तयासि माझे म्हणावया ,।
समानता ,धनंजया !। उरेचिही ना ।।1073।।

1 विश्वास दाखवून मारणारा 2 नष्ट केला
3 परिणाम
4 युद्धात मेला
5 डोक्यात अडकवितो 6 पैजेने
7 भोग देऊन 8 बलवान 9 संसारात
10 बुद्धि भ्रष्ट करितो 11 जडवतो
12 आधार
13 निमित्ताने
14 व्यापतो
15 संसार 16 समूळ नष्ट करून
17 संसारावर विजय मिळविल्याचा आनंद
18 राज्याला 19 मान देऊन
20 राजरस्त्यावर 21 तीन अवस्थारुपी स्त्रीयांकडून 22 ओवाळतात
23 धनुष्यदंडाने 24 समुदाय
25 अनेक
26 ब्रह्मैक्यता
27 ओसंडून वाहत आहे
28 आनंदाने

हे ना ,भलतेणें व्याजे [1] । तो जयाते म्हणे माझे, ।
ते नोडवेचि [2] कां दुजे ,। अद्वितीय जाला ।।1074।।
पै, आपुलिया एकी सत्ता [3] ,। सर्वही कवळूनिया पंडुसुता ! ।
कहीं , न लगती ममता । धाडिली [4] तेणें ।।1075।।
ऐसा जिंतिलिया रिपुवर्गु । अपमानिलिया [5] हे जगु ।
अपैसा योगतुरंगु । स्थिर जाला ।।1076।।
वैराग्याचे गाढले [6] । अंगी त्राण [7] होते भले, ।
तेही नावेक [8] ढिलें । तेव्हां करी ।।1077।।
आणि निवटी [9] ध्यानाचें खांडे [10] । ते दुजे नाहींचि पुढें ।
म्हणौनि ,हातु आसुडे [11] । वृत्तीचाही ।।1078।।
जैसे रसौषध खरें, । आपुले काज करोनि पुरें ,।
आपणही नुरे ,। तैसे होतसे ।।1079।।
देखोनि ठाकिता ठावो [12] , । धांवता थिरावे पावो ।
तैसा ब्रह्मसामीप्यें थावो ,। अभ्यासु सांडी ।।1080।।
घडतां महोदधीसी, । गंगा वेगु सांडी जैसी, ।
कां, कामिनी कांतापासी । स्थिर होय ।।1081।।
नाना, फळतिये वेळे, । केळीची वाढी मांटुळे [13] ।
कां, गांवापुढे वळे । मार्गु जैसा ।।1082।।
तैसा , आत्मसाक्षात्कारु । होईल देखोनि गोचरु ,।
ऐसा साधनहतियेरु । हळुचि ठेवी ।।1083।।
म्हणौनि ब्रह्मेसीं तया । ऐक्याचा समो [14] धनंजया ! ।
होतसे, तै उपाया । वोहटु पडे ।।1084।।
मग वैराग्याची गोंधळुक, । जे ज्ञानाभ्यासाचे वार्धक्य ,।
योगफळाचाही परिपाक [15] । दशा जे कां ,।।1085।।
ते शांति पै गा सुभगा ! । संपूर्ण ये तयाचिया आंगा ।
तै, ब्रह्म होआवयाजोगा । होय तो पुरुषु ।।1086।।
पुनवेहुनी चतुर्दशी । जेतुले उणेपण शशी, ।
कां, सोळे पाऊनि जैसी । पंधरावी वानी ।।1087।।
सागरीही पाणी वेगें । संचरे ,ते रूप गंगे, ।
येर ,निश्चळ जे उगे ,। ते समुद्र जैसा ।।1088।।
ब्रह्मा आणि ब्रह्महोतिये । योग्यते, तैसा पाडु [16] आहे ।
तेचि शांतीचेनि लवलाहे [17] । होय तो गा ! ।।1089।।
पै, तेचि होणेंनवीण [18] । प्रतीती [19] आलें जे ब्रह्मपण ,।
ते ब्रह्म होती[20] , जाण ,। योग्यता येथ ।।1090।।

1 प्रकारे
2 होत नाहीं
3 एकात्मभावनेमुळे
4 ममत्व निर्माण होणार नाही अशी दूर केली 5 संसाराच लोभ सोडल्यावर
6 बळकट 7 कवच
8 क्षणभर 9 ठार मारु शकाणारा
10 ध्यानरूप तलवार
11 हिसका बसतो
12 मुक्कामाचे ठिकाण आल्यावर
13 खुंटते
14 समय
15 पक्वता
16 फरक
17 लवकर
18 न होता 19 अनुभवास येते
20 ब्रह्मत्व प्राप्त करण्यास

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ।।54।।

ब्रह्मभूत झाला म्हणजे प्रसन्नचित्त होऊन तो कशाची आकांक्षा धरीत नाहीं, व कशाचा द्वेषहि करत नाहीं; आणि सर्वांभूतीं सम होऊन माझी परम भक्ति प्राप्त करून घेतो.

ब्रह्मभावयोग्यता । पुरुषु, तो मग पंडुसुता ! ।
आत्मबोधप्रसन्नता-। पदी बैसे ।।1091।।
जेणें निपजे रससोय [1] , । तो तापुही जै जाय, । — 1 स्वयंपाक
तै, ते का होय । प्रसन्न जैसी ।।1092।।
नाना, भरतिया लगबगा [2] ,। शरत्काळी सांडिजे गंगा, । — 2 खळखळाट
कां, गीत रहातां, उपांगा [3] । वोहटु पडे ।।1093।। — 3 वाद्य शांत होतात
तैसा, आत्मबोधी उद्यमु । करितां, होय जो श्रमु, ।
तोही जेथे समु [4] । होऊनि जाय ।।1094।। — 4 शांत
आत्मबोधप्रशस्ती [5] । हे तिये दशेची ख्याती । — 5 प्रसन्नता
ते भोगीतसे महामती ! । योग्यु तो गा ! ।।1095।।
तेव्हां आत्मत्वें (अप्राप्ते)शोचावे [6] ,। कांही पावावया कामावें,। — 6 आत्मानुभवाची चिंता करावा
हे सरले , समभावे । भरिते तया ।।1096।।
उदया येतां गभस्ती, । नाना नक्षत्रव्यक्ती ।
हारवीजती , दीप्ती । आंगिका [7] जेवी ,।।1097।। — 7 स्वतेजाने
तेवीं, उठतिया आत्मप्रथा [8] , । हे भूतभेदव्यवस्था । — 8 आत्मानुभव
मोडीत मोडीत , पार्था ! ।वास पाहे [9] तो ।। 1098।। — 9 अनुभवतो
पाटियेवरील अक्षरे, । जैसी पुसतां येती करें, ।
तैसी, हारपती भेदांतरे । तयाचिये दृष्टी ।।1099।।
तैसेनि अन्यथा ज्ञाने, । जिये घेपती [10] जागरस्वप्ने [11] । — 10 ग्रस्त होतो 11 जागृती आणि स्वपनातील
तिये दोन्ही केली लीने । अव्यक्तामाजी ।।1100।।
मग तेही अव्यक्त ,। बोध वाढतां झिजत ,।
पुरला बोधी, समस्त ।बुडोनि जाय ।।1101 ।।
जैसी, भोजनाच्या व्यापारी, । क्षुधा जिरत जाय, अवधारी ।
मग तृप्तीच्या अवसरी । नाहींच होय ।।1102।।
नाना चालीचिया वाढी, । वाट होत जाय थोडी, ।
मग पातला ठायी, बुडी । देऊनि निमे ।।1103।।
कां, जागृति जंव जंव उद्दीपे, । तंव तंव निद्रा हारपे ,।
मग जागीनलिया , स्वरुपे । नाहींच होय ।।1104।।
हे ना, आपुलें पूर्णत्व भेटे, । जेथ चंद्रासी वाढी खुंटे, ।
तेथ शुक्लपक्षु आटे । निःशेषु जैसा ,।।1105।।

तैसा, बोध्यजात गिळितु । बोधु ,बोधे ये मज आंतु, ।
मिसळला , तेथ साद्यंतु । अबोधु गेला ।।1106।।
तेव्हां, कल्पांताचिये वेळे, । नदी सिंधूचें पैडवळें [1] । 1 मर्यादा
मोडूनि, भरले जळे । आब्रह्म जैसें ।।1107।।
नाना, गेलिया घट,मठ । आकाश ठाके एकवट ।
कां, जळोनि , काष्ठे काष्ठ । वन्हीचि होय ।।1108।।
नातरी, लेणियांचे ठसे[2], । आटोनि गेलिया मुसे[3], । 2 नाना अलंकार 3 मुशीत
नामरूपभेदें जैसें । सांडिजे सोने ।।1109।।
हेही असो, चेइलया [4], । ते स्वप्न ,नाहीं जालिया, । 4 जागे झाल्यावर
मग आपणचि आपणयां । उरिजे जैसें ।।1110।।
तैसा, मी एकवांचूनि काही । तया ,तयाहीसकट नाही ।
हे चौथी भक्ति ,पाहीं ,। माझी , तो लाहे ।। 1111।।
येर, आर्तु, जिज्ञासु, अर्थार्थी ।हे भजती जियें पंथी ,।
ते तिन्ही पावोनि चौथी । म्हणिपत आहे ।।1112।।
एऱ्हवी, तिजी ना चौथी, । हे पहिली ना सरती, ।
पै, माझिये सहजस्थिती ।'' भक्ति ''नाम ।।1113।।
जे नेणणे [5],माझें ,प्रकाशूनि, । अन्यथात्वें [6]माते दाऊनि, । 5 जाणत नाहींत 6 विपरीत
सर्वही सर्वी भजौनि । बुझावीतसे [7]जे ।।1114।। भाव 7 समजुत घालते
जो जेथ जैसे पाहो बैसे, । तया तेथ तैसेंचि असे ।
हे उजियेडें [8] कां दिसे । अखंडे जेणे ।।1115।। 8 प्रकाश
स्वप्नाचे दिसणे, न दिसणे, । जैसे आपलेनि असलेपणें ।
विश्वाचें आहे नाही ,जेणें । प्रकाशें तैसें ।।1116।।
ऐसा हा सहज माझा । प्रकाशु जो, कपिध्वजा ! ।
तो भक्ति या वोजा [9] । बोलिजे गा ! ।।1117।। 9 योग्यतेला
म्हणौनि आर्ताच्या ठायीं, । हे आर्ति होऊनि ,पाहीं, ।
अपेक्षणीय ,जे कांही, । ते मीचि केला ।।1118।।
जिज्ञासुपुढां वीरेशा! । हेचि होऊनि जिज्ञासा, ।
मी, कां, जिज्ञास्यु ऐसा । दाखविला ।।1119।।
हेचि होऊनि अर्थना[10], । मीचि माझ्या अर्थी , अर्जुना ! । 10 उद्देष्य
करूनि, अर्थाभिधाना [11] । आणी माते ।।1120।। 11 अर्थसंज्ञेला
एवं, घेऊनि अज्ञानाते ,। माझी भक्ति ,जे हे वर्ते, ।
ते दावी मज द्रष्टयाते । दृश्य करुनि ।।1121।।
येथें मुखचि दिसे मुखें, । या बोला, कांही न चुके ।
तरी दुजेपण, हे लटिके, । आरिसा करी ।।1122।।

दिठी चंद्रचि घे साचें, । परी येतुलें हे तिमिराचे[1] , ।
जे एकचि असे, तयाचें । दोनी दावी[2] ।।1123।।
तैसा, सर्वत्र मीचि मियां । घेपतसे भक्ति इया, ।
परी दृश्यत्व हे वायां, । अज्ञानवशें ।।1124।।
ते अज्ञान आतां फिटलें, ।माझे द्रष्टृत्व मज भेटले, ।
निजबिंबीं एकवटले । प्रतिबिंब जैसे ।।1125।।
पै, जेव्हांही असे किडाळ[3], । तेव्हांही सोनेंचि अढळ[4] , ।
परी, ते कीड गेलिया केवळ । उरे जैसे ।।1126।।
हां गा ! पूर्णिमे आधीं, कायी । चंद्रु सावयवु नाही ? ।
परी तिये दिवशीं भेटे ,पाही ,। पूर्णता तया ।।1127।।
तैसा, मीचि ज्ञानद्वारें । दिसे, परी हस्तांतरे[5] ।
मग 'द्रष्टृत्व' ते सरे[6] ,। मियांचि मी लाभे ।।1128।।
म्हणौनि, दृश्यपथा-। अतीतु[7] माझा , पार्था ! ।
भक्तियोगु चवथा । म्हणितला गा ! ।।1129।।

1 तीमीर रोगाचे लक्षण
2 एकाचे जागी दोन दिसणे
3 हिणकस 4 निश्चितपणे
5 इतर मदतीने
6 संपते
7 पलीकडचा

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम् ।।55।।

भक्तीने मी केवढा व कोण आहे याचे त्याला तात्त्विक ज्ञान होते, आणि याप्रमाणे माझी तात्त्विक ओळख झाल्यावर तो माझे ठायीच प्रवेश करितो

या ज्ञान भक्ति सहज । भक्तु एकवटला मज ।
मीचि केवळ हे तुज । श्रुतही आहे ।।1130।।
जे, उभउनियां भुजा, ।'' ज्ञानिया आत्मा माझा ''।
हे बोलिलो कपिध्वजा ! । सप्तमाध्यायीं ।।1131।।
ते हे कल्पादीं[8] , भक्ति, मियां ।भागवतमिषे ब्रह्मया ।
उत्तम ,म्हणौनि धनंजया ! । उपदेशिली ।।1132।।
ज्ञानी इयेते स्वसंवित्ती[9] , । शैव म्हणती शक्ती ,।
आम्ही , परमभक्ती । आपुली म्हणो ।।1133।।
हे मज मिळतिये वेळे । तयां क्रमयोगियां फळे ।
मग , समस्तही निखिळे[10] । मियांचि भरे ।।1134।।
तेथ वैराग्यविवेकेंसी । आटे ,बंध मोक्षेंसीं ।
वृत्ती तिये आवृत्तीसी[11] । बुडोनि जाय ।।1135।।
घेऊनि ऐलपणाते[12] । परत्व[13] हारपे जेथे, ।
गिळूनि चाऱ्ही भूते । आकाश जैसे ।।1136।।

8 कल्पाच्या आरंभी
9 आत्मज्ञान
10 शुद्ध
11 वारंवार चिंतन करुन
12 ऐहीक 13 पारत्रिक

तया परी थडथाद [1] । साध्यसाधनातीत शुद्ध ।   1 अलिप्तपणे
ते ,मी होऊनि एकवद [2] । भोगितो माते ।।1137।।   2 एकजीव
घडोनि सिंधूचिया आंगा, । सिंधूवरी तळपे गंगा ।
तैसा पाडु तया भोगा । अवधारी जो ।।1138।।
का,आरिसयासि आरिसा । उटूनि [3] दाविलिया,जैसा ।   3 स्वच्छ करून
देखणा अतिशयो [4], तैसा । भोगणा तिये ।।1139।।   4 खूप शुद्ध
हे असो; दर्पणु नेलिया, । तो मुख बोधुही गेलिया ,।
देखलेंपण एकलेया [5] । आस्वादिजे जेवीं ।।1140।।   5 एकट्यानेच
चेइलिया स्वप्न नाशे । आपले ऐक्यचि दिसे ।
ते दुजेनवीण जैसे । भोगिजे का ।।1141।।
तोचि जालिया ,भोगु तयाचा । न घडे ,हा भांवो जयांचा ,।
तिही ,बोले केवीं बोलाचा [6]। उच्चारु कीजे ? ।।1142।।   6 शब्दाने शब्दाचा
तयांच्या , नेणो, गांवी । रवी प्रकाशी हन दिवी ?।
कीं व्योमालागी मांडवी[7] । उभिली तिही ? ।।1143।।   7 मांडव
हां गा ! राजन्यत्व नव्हतां आंगी । रावो रायपण काय भोगी ? ।
का, आंधारु ,हन ,आलिंगी । दिनकराते ? ।।1144।।
आणि आकाश जे नव्हे , । तया आकाश काय जाणवे ? ।
रत्नाच्या रूपीं मिरवे । गुंजांचे लेणे ? ।।1145।।
म्हणौनि, मी होणे नाहीं, । तया मीचि आहे केही ? ।
मग , भजेल हे कायी । बोलो कीर ? ।।1146।।
यालागी तो क्रमयोगी । मी जालाचि माते भोगी ।
तारुण्य कां तरुणांगी । जियापरी ।।1147।।
तरंग सर्वांगी तोय चुंबी ,। प्रभा सर्वत्र विलसे बिंबी, ।
नाना, अवकाश नभीं । लुंठतु [8] जैसा ।।1148।।   8 लोळते
तैसा रूप होऊनि माझें, ।माते क्रियावीण तो भजे ।
अलंकारु का सहजे । सोनयाते जेवीं ।।1149।।
का, चंदनाची द्रुती जैसी । चंदनी भजे अपैसी, ।
का अकृत्रिम [9] शशीं । चंद्रिका ते ।।1150।।   9 कोणीही तयार न केलेली
तैसी क्रिया कीर न साहे [10], । तऱ्ही, अद्वैतीं भक्ति आहे ।   10 क्रियाकर्माला वाव नाहीं
हे अनुभवाचिजोगे, नव्हे । बोलाऐसें ।।1151।।
तेव्हां पूर्वसंस्कार छंदे। जे कांही तो अनुवादे [11], ।   11 बोलतो
तेणें आळविलेनि ,वो दे ;। बोलता मीचि ।।1152।।
बोलतया बोलताचि भेटे, । तेथें बोलिले हे न घटे[12], ।   12 बोलणे घडत नाहीं
ते मौन तंव गोमटे । स्तवन माझे ।।1153।।

म्हणौनि तया बोलतां । बोली, बोलतां मी भेटतां, ।
मौन होय, तेणें तत्त्वतां । स्तवितो माते ।।1154।।
तैसेचि ,बुद्धी का दिठी ,। जे तो देखों जाय किरीटी ! ।
ते देखणे दृश्य लोटी [1], । देखतेचि दावी ।।1155।। 1 पहावयाची दृश्य दूर सारिते
आरिसया आधी जैसे । देखतेचि मुख दिसे ,।
तयाचें देखणे तैसे । मेळवी द्रष्टे ।।1156।।
दृश्य जाउनियां ,द्रष्टे । द्रष्टयासीचि जै भेटे, ।
तै, एकलेपणे न घटे । द्रष्टेपणही ।।1157।।
तेथ स्वप्नींचिया ,प्रिया ,। चेवोनि ,झोंबो गेलिया, ।
ठायिजे [2],दोन्ही न होनियां ।आपणचि [3]जैसे ।।1158।। 2 थांबते 3 स्वतःच
का, दोही काष्ठांचिये घृष्टी-। माजीं , वन्हि एक उठी, ।
तो ,दोन्ही हे भाष आटी ,।आपणचि होय ।।1159।।
नाना, प्रतिबिंब हातीं । घेऊं ,गेलिया गभस्ती, ।
बिंबताही असती, । जाय जैसी ।।1160।।
तैसा, मी होऊनि देखते । तो घेऊं जाय दृश्याते ।
तेथ दृश्य ने ,थिते [4]। द्रष्टृत्वेंसी ।।1161।। 4 असलेले
रवि आंधारु प्रकाशिता, । नुरेचि जेवी प्रकाश्यता ।
तेवी दृश्यी नाहीं द्रष्टुता । मी जालिया ।।1162।।
मग देखिजे , ना न देखिजे, । ऐसी जे दशा निपजे ।
ते, ते दर्शन माझे । साचोकारें ।।1163।।
ते भलतयाही , किरीटी ! । पदार्थाचिया भेटी ।
द्रष्टुदृश्यातीता दृष्टी [5] । भोगितो सदा ।।1164।। 5 पाहणारा, पाहावयाचे
आणि, आकाश हे आकाशें । दाटले [6], न ढळे जैसे ,। याच्या पलिकडच्या
मियां आत्मेन आपणपे तैसे । जालें तया ।।1165।। दृष्टीने 6 दबले
कल्पांतीं उदक उदकें । रुंधिलिया [7], वाहो ठाके । 7 अडवल्यावर
तैसा आत्मेनि मिया येके । कोंदला तो ।।1166।।
पावो आपणपयां वोळघे [8] ?। केवीं वन्ही आपणपयां लागे ? । 8 चालतील
आपणपां पाणी रिघे । स्नाना कैसे ? ।।1167।।
म्हणौनि सर्व मी जालेपणे ,। ठेले तया येणें जाणे ।
तेचि गा ! यात्रा करणें । अद्वया मज ।।1168।।
पै, जळावरील तरंगु । तरी धांविन्नला सवेगु, ।
तरी नाहीं भूमिभागु । क्रमिला तेणें ।।1169।।
जे सांडावे कां मांडावे । जे चालणे जेणे चालावे ।
ते तोयचि एक आघवे । म्हणौनिया ।।1170।।

गेलियाही भलतेउता, । उदकपणें, पंडुसुता ।
तरंगाची एकात्मता । न मोडेचि, जेवी ।।1171।।
तैसा,'मीपणें ' हा लोटला(हालो ठेला),।तो आघवेंयाचि मजआंतु आला,।
या यात्रा होय भला । कापडी [1] माझा ।।1172।। 1 यात्रेकरु
आणि शरीर स्वभाववशे, । कांही येक करुं जरी बैसे, ।
तरी , मीचि तो , तेणें मिषे । भेटे तया ।।1173।।
तेथ कर्म आणि कर्ता । हे जाऊनि पंडुसुता ! ।
मिया आत्मेनि मज पाहतां । मीचि होय ।।1174।।
पै, दर्पणाते दर्पणे । पाहिलिया, होय न पहाणे, ।
सोने झांकिलिया सुवर्णे, । न झांकें जेवीं ।।1175।।
दीपाते दीपे प्रकाशिजे, । ते न प्रकाशणेचि निपजे ।
तैसे , कर्म मियां कींजे, । ते करणे कैंचें ? ।।1176।।
कर्मही करितचि आहे । जै करावें हे भाष जाये ।
तैं न करणेंचि होये । तयाचें केलें ।।1177।।
क्रियाजात मी जालेपणें ,।घडे कांहींचि न करणें ।
तयाचि नांव पूजणें । खुणेचें [2] माझें ।।1178।। 2 लक्षण
म्हणौनि करीतयाही वोजा [3],। ते न करणें हेंचि कपिध्वजा! । 3 योग्यतेला
निफजे, तिया महापूजा । पूजी तो माते ।।1179।।
एवं, तो बोले ते स्तवन, । तो देखे ते दर्शन, ।
अद्वया मज गमन, । तो चाले तेचि ।।1180।।
तो करी तेतुली पुजा, । तो कल्पी तो जपु माझा ,।
तो असे तेचि कपिध्वजा , । समाधी माझी ।।1181।।
जैसें कनकेंसीं कांकणें । असिजे अनन्यपणें, ।
तो भक्तियोगें येणें ।मजसी तैसा ।।1182।।
उदकीं कल्लोळु, । कापुरी परिमळु, ।
रत्नी उजाळु, । अनन्यु जैसा ।।1183।।
किंबहुना, तंतूंसी पटु, । का मृत्तीकेसीं घटु , ।
तैसा तो एकवटु । मजसीं माझा ।।1184।।
इया अनन्यसिद्धा भक्ती, । या आघवाचि दृश्यजातीं [4]। 4 दृश्यमात्र पदार्थात
मज ,आपणपेंया ,सुमती !। द्रष्टयाते जाण ।।1185।।
तिन्ही अवस्थांचेनि द्वारें, । उपाध्युपहिताकारें [5],। 5 इंद्रियादि प्रपंच
भावाभावरूप स्फुरें । द्रश्य जे हे ,।।1186।।
ते हे आघवेंचि, मी द्रष्टा । ऐसिया बोधाचा माजिवटा [6],। 6 आवेशपूर्ण
अनुभवाचा, सुभटा! ।धेंडा [7] तो नाचे ।।1187।। 7 वधूवराला घेऊन नाचणारा

रज्जु जालिया गोचरु, । आभासतां तो व्याळाकारु [1],। — 1 सर्पाचा आकार
रज्जुचि ऐसा निर्धारु । होय जेवी ।।1188।।
भांगारापरते कांही । लेणें गुंजहीभरी नाहीं, ।
हे आटुनियां ठायी [2] । कीजे जैसे ।।1189।। — 2 नक्की
उदका येकापरते । तरंग नाहींचि, हे निरुते [3] । — 3 खरोखर
जाणोनि, तया आकाराते । न घेपे जेवीं ।।1190।।
नातरी, स्वप्नविकारां समस्तां । चेऊनियां उमाणे घेतां [4],। — 4 निर्णय होतो
तो आपणयापरौता [5] । न दिसे जैसा ।।1191।। — 5 आपल्याशिवाय दुसरें
तैसे, जे कांही आथी,नाथी, । येणें होय ज्ञेयस्फूर्ती [6],। — 6 ज्ञेय असे भासते
ते 'ज्ञाताचि मी' हे प्रतीती [7] । होऊनि, भोगी ।।1192।। — 7 अनुभवास येऊन
जाणें अजु [8] मी अजरु [9],। अक्षयो मी अक्षरु,। — 8 जन्मातीत 9 वयातीत
अपूर्व मी ,अपारु,। आनंदु मी ।।1193।।
अचळु मी, अच्युतु । अनंतु मी अद्वैतु ।
आद्यु मी, अव्यक्तु । व्यक्तुही मी ।।1194।।
ईश्य [10] मी ,ईश्वरु ।अनादि मी ,अमरु । — 10 नियम्य
अभय मी ,आधारु । आधेय [11] मी ।।1195।। — 11 आश्रित
स्वामी मी ,सदोदितु । सहजु मी ,सततु ।
सर्व मी ,सर्वगतु । सर्वातीतु मी ।।1196।।
नवा मी ,पुराणु । शून्यु मी संपूर्णु ।
स्थुलु मी ,अणु । जे कांहीं, ते मी ।।1197।।
अक्रियु मी ,येकु । असंगु मी ,अशोकु ।
व्यापु मी ,व्यापकु ।पुरुषोत्तमु मी ।।1198।।
अशब्दु मी ,अश्रोत्रु । अरूपु मी , अगोत्रु ।
समु मी ,स्वतंत्रु । ब्रह्म मी ,परु ।।1199।।
ऐसें आत्मत्वे मज एकाते । इया अद्वयभक्ती जाणोनि निरुते, ।
आणि याही बोधा जाणते [12],।तेही मीचि जाणे।।1200।। — 12 ज्ञान
पै, चेईलेयानंतरें, । आपुले एकपण उरे ।
तेही तोंवरी स्फुरे । तयाशींचि जैसे[13] ।।1201।। — 13 त्याचे त्यालाच कळते
कां, प्रकाशतां अर्कु, । तोचि होय प्रकाशकु ।
तयाही अभेदा द्योतकु [14] । तोचि जैसा ।।1202।। — 14 दर्शवणारा
तैसा, वेद्यांच्या विलयी [15], । केवळ वेदकु [16] उरे पाहीं ! । — 15 जाणावयाच्या वस्तुच्या
तेणें जाणवे तया ,तेही । हेंही जो जाणें ।।1203।। — ज्ञानाने 16 जाणणारा
तया अद्वयपणा आपुलिया, । जाणती ज्ञप्ती [17] जे धनंजया ! । — 17 ज्ञान
ते ईश्वरचि मी, हे तया । बोधासि ये ।।1204।।

मग ,द्वैताद्वैतातीत ,।'' मीचि आत्मा एकु '' निभ्रांत ।
हे जाणोनि , जाणणे जेथ । अनुभवी रिघे ,।1205।।
तेथ, चेइलियां येकपण । दिसे ,जे आपुलया आपण, ।
ते ही जातां, नेणों , कोण । होइजे जेवीं ! ।।1206।।
कां, डोळां देखतिये क्षणीं, । सुवर्णपण सुवर्णी ,।
नाटितां ,होय,आटणी । अळंकाराचीही ।।1207।।
नाना, लवण तोय होये, । मग क्षारता तोयत्वे राहे ।
तेही जिरतां ,जेवीं जाये । जालेपण ते ।।1208।।
तैसा 'मी,तो,' हे जे असे । ते स्वानंदानुभवसमरसें ।
कालवूनियां , प्रवेशे । मजचिमाजीं ।।1209।।
आणि ''तो'' हे भाष जेथ जाये, । तेथें मी हे कोण्हासी आहे !।
ऐसा 'मी' ना ,तो तिये सामाये । माझ्याचि रूपीं ।।1210।।
जेव्हां कापुर जळों सरे, ।तयाचि नाम अग्नि पुरे ।
मग उभयतातीत उरे । आकाश जेवी ।।1211।।
कां, धाडलिया [1] एका एकु, । वाढे [2] तो शून्यु विशेखु [3],।
तैसा,' आहे नाहीचा ' शेखु [4] । मीचि मग आथी ।।1212।।
तेथ ब्रह्म, आत्मा, ईशु । या बोला [5],मोडे सौरसु [6] ।
न बोलणे , याही पैसु [7] । नाहीं तेथ ।।1213।।
'न बोलणेंही न बोलोनी ' । ते, बोलिजे तोंड भरुनी ।
जाणिव, नेणिव , नेणोनि । जाणिजे ते ।।1214।।
तेथ बुझिजे बोधु, बोधे । आनंदु घेपे ,आनंदे ।
सुखावरी नुसधें । सुखचि भोगिजे ।।1215।।
तेथ लाभु जोडला लाभा ,। प्रभा आलिंगिली प्रभा , ।
विस्मयो बुडाला उभा ,। विस्मयामाजीं ।।1216।।
शमु तेथ सामावला [8] । विश्रामु विश्रांति आला ,।
अनुभवु वेडावला । अनुभूतिपणें ।।1217।।
किंबहुना, ऐसें निखळ । मीपण जोडे, तया ,फळ ।
सेवूनि ,वेली वेल्हाळ [9], । क्रमयोगाची ते ।।1218।।
पै, क्रमयोगिया ,किरीटी !। चक्रवर्तीच्या मुकुटी ,।
मी चिद्रत्न ते ,साटोवाटी [10] ,। होय, तो माझा ।।1219।।
की, क्रमयोगप्रासादाचा । कळसु जो हा मोक्षाचा, ।
तयावरील अवकाशाचा । उवावो [11] जाला तो ।।1220।।
नाना, संसार आडवी [12],। क्रमयोग वाट बरवी[13] ।
जोडिली, ते मदैक्यगांवीं । पैठी [14] जालीसे ।।1221।।

1 वजा केल्यावर 2 उरते
3 बाकीं 4 शेवट
5 बोलण्याने 6 स्वानंदाचा
ऱ्हास होतो 7 वाव
8 शांत झाला
9 विस्तृत होते
10 मोबदला
11 विस्तार
12 रानात 13 चांगली
14 स्थिर

हे असो; क्रमयोगबोधे । तेणें भक्तिचिद्‌गंगे 1।
मी स्वानंदोदधी [2]वेगे । ठाकिला की गा !।।1222।।
हा ठायवरी [3] सुवर्मा ! । क्रमयोगी आहे महिमा ।
म्हणौनि वेळोवेळां तुम्हां । सांगतो आम्ही ।।1223।।
पै, देशे,काळें, पदार्थे । साधूनि घेइजे माते ।
तैसा नव्हे, मी आयते । सर्वांचे सर्वही ।।1224।।
म्हणौनि माझ्या ठायी । जाचावे न लगे [4] कांही ।
मी लाभे ,इयें उपायीं ,। साचचि गा ! ।।1225।।
एक शिष्य, एक गुरु ,। हा रूढला साच व्यहारु ,।
तो ,मत्प्राप्तिप्रकारु । जाणावया ।।1226।।
अगा ! वसुधेच्या पोटी । निधान सिद्ध , किरीटी! ।
वन्हि सिद्ध काष्टी ,। वोहा[5] दूध ।।1227।।
परी लाभे, ते असते ,। तया , कींजे उपायाते ,।
येर सिद्धचि, तैसा तेथे । उपायीं मी ।।1228।।
''हा फळहीवरी [6] ,उपावो । कां पां प्रस्तावीतसे देवो !'' ।
हे पुसतां , परी अभिप्रावो । येथिंचा ऐसा ।।1229।।
जे गीतार्थाचे , चांगावें, । मोक्षोपायपर आघवें ,।
आन शास्त्रोपाय की नव्हे ,। प्रमाणसिद्ध ।।1230।।
वारा आभाळचि फेडी, । वांचूनि, सूर्याते न घडी ।
कां, हातु बाबुळी धाडी [7] , । तोय न करी ।।1231।।
तैसा, आत्मदर्शनी आडळु [8] । असे अविद्येचा जो मळु , ।
तो शास्त्र नाशी, येरु निर्मळु । मी प्रकाशे स्वयें ।।1232।।
म्हणौनि ,आघवींचि शास्त्रे । अविद्याविनाशाचीं पात्रें ।
वांचोनि [9] ,न होतीं ,स्वतंत्रे ,। आत्मबोधीं [10] ।।1233।।
तया अध्याात्मशास्त्रांसीं । जै साचपणाची ये ,पुसी [11] , ।
तै, येईजे जया ठायासी[12] । ते हे गीता ।।1234।।
भानुभूषिता प्राचिया[13] , । सतेजा दिशा आघविया ।।
तैसी शास्त्रेश्वरा ,गीता , या ,। सनाथे शास्त्रें ।।1235।।
हे असो; येणें शास्त्रेश्वरें । मागां उपाय बहुवे विस्तारे ।
सांगितला, जैसा करें । घेवो ये आत्मा ।।1236।।
परी, प्रथमश्रवणासवें । अर्जुना विपाये [14] हे फावे [15], ।
हा भावो सकणवे । धरूनि, श्रीहरी ।।1237।।
तेचि प्रमेय ,एक वेळ ,। शिष्यी होआवया अढळ [16] , ।
सांगतसे मुकुल[17] । मुद्रा [18] आतां ।।1238।।

1 भक्तिरूपी ज्ञान गंगेमार्गे
2 आत्मानंदरूपी समुद्राला
3 या योग्यतेचा
4 श्रम करावे लागत नाहींत
5 कासेला
6 आतापर्यंत फळप्राप्तिचा
7 शेवाळ बाजुला सारते
8 अडथळा
9 या व्यतिरिक्त
10 आत्मबोध घडविणारे
11 खरेपणाबद्धल प्रश्न केला तर
12 ज्या निर्णयाला येतो
13 पूर्वेला सूर्योदय झाला कीं
14 कदाचित 15 अनुभवास येईल
16 दृढ
17 थोडक्यात 18 मर्म

आणि प्रसंगे , गीता । ठावोही हा संपता ,।
म्हणौनि ,दावी आद्यंता । एकार्थत्व [1] ।।1239।।
जे ग्रंथाच्या मध्यभागी, । नाना ,अधिकारप्रसंगी ,।
निरुपण अनेगीं । सिद्धांती केलें ,।।1240।।
तरी ,तेतुलेही सिद्धांत । इये शास्त्री प्रस्तुत ।
हे पूर्वापर नेणत [2] ,। कोण्ही जै मानी ,।।1241।।
तै, महासिद्धांताचा आवांका । सिद्धांतकक्षा [3] अनेका ,।
भिडऊनि आरंभु , देखा । संपवितु असे ।।1242।।
एथ अविद्यानाशु ,हे स्थळ [4] , । तेणें मोक्षोपादान [5] फळ ।
या दोही केवळ । साधन, ज्ञान ।।1243।।
हे इतुलेंचि, नानापरी । निरूपिलें ग्रंथविस्तारी ।
ते आतां दोहीं अक्षरी [6] । अनुवादावें ।।1244।।
म्हणौनि ,उपेयही हातीं । जालया [7] , उपायस्थिती [8] ।
देव प्रवर्तले ,ते, पुढती । येणेंचि भावें ।।1245।।

1 आरंभी व शेवटी एकसुत्रीपणा आहे हे
2 मागचा व पुढचा संदर्भ लक्षात न घेता
3 सिद्धांताच्या मर्यादा
4 प्रस्तुत विषय 5 मोक्षप्राप्ती
6 थोडक्यात
7 साध्य 8 साधनस्वरूप

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ।।56।।

आणि माझाच आश्रय करून सर्व कर्मे नेहमी करीत असतांही माझ्या अनुग्रहाने शाश्वत व अव्यय स्थान त्याला प्राप्त होते .

मग म्हणे,'' गा सुभटा! । तो क्रमयोगिया , निष्ठा [9] ।
मी होउनि, होय पैठा [10] । माझ्या रूपी ।।1246।।
स्वकर्माच्या चोखौळी [11] ,। मज पूजा करूनि भली, ।
तेणें प्रसादे , आकळी [12] । ज्ञाननिष्ठेते [13] ।।1247।।
ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे [14] ,। तेथ भक्ति माझी उल्लासे [15] ।
तिया भजन समरसें, । सुखिया होय ।।1248।।
आणि विश्वप्रकाशितया । आत्मया, मज आपुलिया , ।
अनुसरे, जो करुनियां, । सर्वत्रता हे ।।1249।।
सांडूनि आपुला आडळ [16] , । लवण आश्रयी जळ ।
कां, हिंडोनि राहे निश्चळ । वायु ,व्योमी ।।1250।।
तैसा, बुद्धी,वाचा,कायें ।जो माते आश्रऊनि ठाये, ।
तो निषिद्धेही विपाये । कर्मे करुं ,।।1251।।
परी गंगेच्या संबंधी । बिदी [17] आणि महानदी ।
एक, तेवीं माझ्या बोधीं [18] । शुभाशुभांसी ।।1252।।

9 अंतःकरणपूर्वक
10 स्थीर
11 शुद्ध फुलांनी
12 प्राप्त होते 13 जाणण्याची इच्छा
14 प्राप्त होते 15 भरास येते
16 संशय
17 गटार
18 माझे ज्ञान झाल्यावर

का, बावने [1] आणि धुरे [2] । हा निवाडु तंवचि सरे [3], ।
जंव ,न घेपती वैश्वानरे । कवळूनि दोन्ही ।।1253।।
ना, पांचिके [4] आणि सोळे [5] , । हे सोनया तंवचि आलें ।
जंव परिसु आंगमेळे [6] । एकवटीना ।। 1254।।
तैसे ,शुभाशुभ ऐसें ,। हे तंवचिवरी आभासे ,।
जंव ,ऐकु न प्रकाशे । सर्वत्र मी ।।1255।।
अगा! रात्री आणि दिवो ,। हा तंवचि द्वैतभावो, ।
जंव न रिगिजे[7] गांवो । गभस्तीचा ।।1256।।
म्हणौनि ,माझिया भेटी, । तयाची सर्व कर्मे किरीटी ! ।
जाऊनि ,बैसे तो पाटीं । सायुज्याच्या [8]।।1257।।
देशे,काळे, स्वभावे । वेंचु [9] जया न संभवे ,।
ते पद माझे पावे । अविनाश तो ।।1258।।
किंबहुना, पंडुसुता! । मज आत्मयाची प्रसन्नता ।
लाहे, तेणें न पविजतां । लाभु कवणु असे ? ।।1259।।

1 चंदन 2 साधे लाकुड 3 संपतो
4 हिणकस 5 शुद्ध
6 स्पर्श करून
7 प्रवेश केला नाही तोवर
8 मोक्ष
9 क्षय

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ।।57।।

मनाने सर्व कर्मे मला संन्यस्य म्हणजे अर्पण करून मत्परायण होत्साता साम्य बुद्धियोगाच्या आश्रयाने माझ्या ठायी नेहमी चित्त ठेव .

याकारणे गा ! तुवां , इया । सर्व कर्मा आपुलिया, ।
माझ्या स्वरूपीं, धनंजया । संन्यासु कींजे ।।1260।।
परी तोचि संन्यासु वीरा ! । करणीयेचा [10],झणे करा [11]।
आत्मविवेकीं धरा । चित्तवृत्ति हे ।।1261।।
मग तेणें विवेकबळे, । आपणपें कर्माविगळे ।
माझ्या स्वरूपी ,निर्मळे । देखिजेल ।।1262।।
आणि कर्माची जन्मभोये [12] ,। प्रकृति जे का आहे , ।
ते , आपणयाहूनि बहुवे [13] । देखसी दूरी ।।1263।।
तेथ प्रकृति आपणयां-।वेगळी नुरे, धनंजया !।
रूपेवीण का छाया । जयापरी ।।1264।।
ऐसेनि प्रकृतिनाशु । जालया ,कर्मसंन्यासु ।
निफजेल अनायासु ,। सकारणु ।।1265।।
मग कर्मजात गेलया, । मी आत्मा उरें आपणपयां ।
तेथ बुद्धि घापे करूनियां । पतिव्रता ।।1266।।

10 स्वधर्मनियत कर्माचा
11 नका करु
12 जन्मभूमी
13 फार

बुद्धि अनन्य येणें योगें । मजमाजी जै रिगे, ।
तै, चित्त चैत्यत्यागें [1] । मातेंचि भजे ।।1267।। 1 चिंतन करण्याचा विषय सोडून
ऐसें चैत्यजाते सांडिले । चित्त ,माझ्या ठायी जडले।
ठाके, तैसे वहिले [2] । सर्वदा करी ।।1268।। 2 लवकर

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्त्वमहंकाराान्न श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ।।58।।
माझ्या ठायी चित्त ठेविलेस म्हणजे तूं माझ्या अनुग्रहाने सर्व संकटे म्हणजे कर्माची शुभाशुभ फले तरून जाशील . पण अहंकाराने माझे न ऐकशील तर मात्र नाश पावशील.

मग अभिन्ना इया सेवा , । चित्त मियांचि भरेल जेधवां, ।
माझा प्रसादु जाण तेधवां । संपूर्ण जाहला ।।1269।।
तेथ सकळ दुःखधामे । भुंजीजती [3] जिये मृत्युजन्मे, । 3 भोगतात
तिये दुर्गमेचि, सुगमे । होती तुज ।।1270।।
सूर्याचेनि सावायें [4], । डोळा सावाइला होये [5], । 4 साह्याने 5 कार्यक्षम झाला
तै अंधाराचा आहे । पाडु [6] तया ? ।।1271।। 6 किंमत
तैसा माझेनि प्रसादें । जीवकणु[7] जयाचा उपमर्दे [8] ,। 7 अल्पसा जीव 8 नाश पावतो
तो संसाराचेनि बाधे । बागुले [9] केवीं ? ।।1272।। 9 घाबरेल
म्हणौनि , धनंजया ! । तूं संसारदुर्गती यया ।
तरसील , माझिया । प्रसादास्तव ।।1273।।
अथवा ,हन , अहंभावे, । माझे बोलणे हें आघवें, ।
कानामनाचिये शिवें । नेदिसी टेकों, ।।1274।।
तरी नित्य मुक्त अव्ययो । तूं आहासि,ते होऊनि वावो[10],। 10 व्यर्थ
देहसंबंधाचा घावो । वाजेल आंगी ।।1275।।
जया देहसंबंधा आंतु । प्रतिपदीं आत्मघातु ।
भुंजतां [11], उसंतु । कहींचि नाही ।।1276।। 11 भोगिता
येवढेनि दारुणे । निमणेनवीण निमणे[12] । 12 जीवंतपणी मरणयातना
पडेल, जरी बोलणे । नेघसी माझें ।।1277।।

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।।59।।
मी लढणार नाहीं असे जे तू अहंकाराने मानीत आहेस, तो तुझा निश्चय फुकट आहे . प्रकृति म्हणजे स्वभाव तुला ते करावयास लावील.

पथ्यद्वेषिया पोषी ज्वरु, । कां दीपद्वेषिया अंधकारु ,।
विवेकद्वेषें अहंकारु । पोषूनि तैसा ।।1278।।
स्वदेहा नाम अर्जुनु ,। परदेहा नाम स्वजनु ,।
संग्रामा नाम मलिनु , । पापाचारु ।।1279।।
इया मती आपुलिया, । तिघां तीन नामें ययां ।
ठेऊनिया, धनंजया ! । न झुंजे ऐसा ,।।1280।।
जीवमाजीं निष्टंकु [1] ।करिसी जो आत्यंतिकु, । 1 सर्वांसमोर निश्चय
तो वायां धाडील , नैसर्गिकु । स्वभावोचि तुझा ।।1281।।
आणि मी अर्जुन,हे आत्मिक [2],। ययां वधु करणे हे पातक, । 2 माझे आप्त
हे ,मायावांचूनि तात्त्विक [3]। कांही आहे ? ।।1282।। 3 मायेशिवाय सत्य कांही आहे
आधीं जुंझार तुवां होआवें, । मग जुंझावया शस्त्र घेयावे ।
कां ,न जुंझावया करावें । देवांगण [4] ?।।1283।। 4 प्रतिज्ञा
म्हणौनि , न झुंजणें । म्हणसी , ते वायाणे [5] , । 5 खोटे
ना मानूं, लोकपणे [6] , । लोकदृष्टीही ।।1284।। 6 लोकव्यवहारातही
तऱ्ही न झुंजे , ऐसें । निष्टंकिसी जे मानसें, ।
ते प्रकृति अनारिसें [7] । करवीलचि ।।1285।। 7 वेगळेच

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ।।60।।

हे कौंतेया ! आपल्या स्वभावजन्य कर्माने बद्ध झाल्यामुळे मोहाने जे तूं करूं इच्छित नाहीस तेच परतंत्र म्हणजे प्रकृतीच्या स्वाधीन होऊन तुला करावें लागेल

पै, पूर्वे वाहतां पाणी, । पव्हिजे पश्चिमेचे वाहणीं ।
तरी आग्रहोचि उरे, ते आणी । आपुलिया लेखा [8] ।।1286।। 8 वळणानेच
कां, साळीचा कणु म्हणे, । 'मी नुगवें साळीपणे '।
तरी आहे आन करणें । स्वभावासी ?।।1287।।
तैसा, क्षात्रसंस्कारसिद्धा , । प्रकृती, घडिलासी प्रबुद्धा[9] ! । 9 सूज्ञा
आतां नुठी म्हणसी, हा धांदा[10],। परी उठविजसीचि तूं ।।1288।। 10 निष्फळ बोलणे
पै, शौर्य,तेज, दक्षता । एवमादिक , पंडुसुता ! ।
गुण दिधले जन्मतां ,। प्रकृती तुज ।।1289।।
तरी, तयाचिया समवाया-। अनुरूप [11] ,धनंजया ! । 11 गुणांच्या एकवट धर्माप्रमाणे
न करितां, उगलिया [12] । नयेल असों ।।1290।। 12स्वस्थ बसणे
म्हणौनियां , तिहीं गुणीं । बांधिलासि तूं कोदंडपाणी,।
त्रिशुद्धी,[12] निघसी वाहणी [13] । क्षात्राचिया ।।1291 ।। 12 खात्रिने13 वागण्याची रीत

ना, हे आपुले जन्ममूळ [1] । न विचारीतचि केवळ, । 1 जन्मजात स्वभाव
न झुंजे ऐसें अढळ । व्रत जरी घेसी ।।1292।।
तरी, बांधोनि हात पाये, । जो रथीं घातला होये, ।
तो न चले, तरी जाये । दिगंता जेवीं ।।1293।।
तैसा , तूं आपुलियाकडुनी । मी कांहींच न करीं म्हणौनि ।
ठासी [2], परी भरंवसेनि । तूंचि करिसी ।।1294।। 2 ठरविलेस
उत्तरु वैराटींचा राजा । पळता, तूं कां निघालासी झुंजा ?।
हा क्षात्रस्वभावो तुझा । झुंजवील तुज ।।1295।।
महावीर अकरा अक्षौहिणी । तुवां येके नागविले रणांगणीं, ।
तो स्वभावो, कोदंडपाणी ! । झुंजवील तूंते ।।1296।।
हां गा ! रोगु कायी रोगिया । आवडे ? दरिद्र दरिद्रिया ? ।
परी भोगविजे बळिया [3] । अदृष्टें जेणें ।।1297।। 3 बळजबरीने
ते अदृष्ट अनारिसें । न करील ईश्वरवशे, ।
तो इश्वरुही असे । हृदयीं तुझ्या ।।1298।।

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ।।61।।
हे अर्जुना! ईश्वर सर्व भूतांच्या हृदयात राहून यंत्रावर चढविल्याप्रमाणे सर्व भूतांना आपल्या मायेने चाळवीत असतो .

सर्व भूतांच्या अंतरी, । हृदय महाअंबरी [4], । 4 महाकाशात
चिद्वृत्तीच्या सहस्त्रकरी [5] । उदयला असे जो, ।।1299।। 5 ज्ञानवृत्तिरूप हजारो किरणांसह
अवस्थात्रय तिन्ही लोक । प्रकाशूनि अशेख, ।
अन्यथादृष्टि [6] पांथिक [7] । चेवविले ।।1300।। 6 विपरित ज्ञानदृष्टिने
वेद्योदकाच्या सरोवरीं , । फांकतां विषयकल्हारीं, । 7 यात्री,जीव
इंद्रियषट्पदा चारी । जीवभ्रमरातें ।।+1301।।
असो रूपक हे ,तो ईश्वरु । सकल भूतांचा अहंकारु ।
पांघरोनि ,निरंतरु ।उल्हासत असे ।।1302 ।।
स्वमायेचे आडवस्त्र । लावूनि, एकला खेळवी सूत्र ।
बाहेरी नटी छायाचित्र ।चौऱ्याशी लक्ष ।।1303।।
तया ब्रह्मादिकीटांता । अशेषांही भूतजाता ,।
देहाकार योग्यता । पाहोनि , दावी ।।1304।।
तेथ , जे देह जयापुढे । अनुरुपपणें मांडे, ।
ते भूत तया आरूढे ।' हें ' मी म्हणौनि ।।1305।।

सूत सूते गुंतले । तृण तृणचि बांधले ।
का, आत्मबिंबा घेतलें ।बाळके जळीं।।1306।।
तयापरी देहाकारें । आपणपेंचि दुसरे ।
देखोनि, जीव आविष्करे । आत्मबुद्धि ।।1307।।
ऐसेनि शरीराकारीं । यंत्रे भूते, अवधारी, ।
वाहूनि, हालवी दोरी । प्राचीनाची ।।1308।।
तेथ , जया जे कर्मसूत्र । मांडूनि ठेविलें स्वतंत्र, ।
ते तिये गती पात्र । होचि लागे ।।1309।।
किंबहुना, धनुर्धरा! भूतांते स्वर्गसंसारा-।
माजी भोवंडी, तृणे वारा । आकाशीं जैसा ।।1310।।
भ्रामकाचेनि [1] संगे । जैसे लोहो वेढा रिगे [2] ,।
तैसी ईश्वरसत्तायोगें । चेष्टती भूते ।।3111।।
जैसे ,चेष्टा आपुलिया । समुद्रादिक, धनंजया ! ।
चेष्टती ,चंद्राचिया । सन्निधी येकीं ।।1312।।
तया सिंधू , भरिते दाटें, । सोमकांता पाझरु फुटें ,।
कुमुदाचकोरांचा[3] फिटे । संकोचु तो ।।1313।।
तैसी, बीजप्रकृतिवशे, । अनेकें भूते , येकें ईशें ।
चेष्टवीजती, तो असे । तुझ्या हृदयी ।।1314।।
अर्जुनपण न घेतां, । 'मी' ऐसें जे पंडुसुता ! ।
उठतसे ,ते तत्त्वता । तयाचें रूप ।।1315।।
यालागी तो प्रकृतीते । प्रवर्तवील, हे निरुते [4] ।
आणि ते झुंजवील तूंते ,। न झुंजशी जऱ्ही ।।1316।।
म्हणौनि, ईश्वरु गोसावी ,। तेणें प्रकृती हे नेमावी ,।
तिया ,सुखें राबवावीं । इंद्रिये आपुलीं ।।1317।।
तूं , करणे न करणे दोन्ही, । लाऊनि प्रकृतीच्या मानीं ।
प्रकृतीही कां अधीनी [5] । हृदयस्था जया ।।1318।।

1 लोहचुंबक 2 फिरु लागते
3 चंद्रविकसीनी कमळ आणि चकोर पक्षी
4 नक्कीच
5 स्वाधीन

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्ति स्थानं प्राप्यसि शाश्वतम् ।।62।।
म्हणून हे भारता ! सर्व भावाने त्यालाच शरण जा. त्याच्या अनुग्रहाने परम शांति व नित्यस्थान तुला प्राप्त होईल.

तया , अहं, वाचा, चित्त आंग । देऊनियां, शरण रिग ।
महोदधी का गांग । रिगाले , जैसे ।।1319।।

मग तयाचेनि प्रसादे, । सर्वोपशांतिप्रमदे ।
कांतु होऊनियां ,स्वानंदे । स्वरूपींचि रमसी ।।1320।।
संभूति [1] जेणें संभवे, । विश्रांति जेथें विसंवे , । 1 विश्वाची उत्पत्ती जेथून
अनुभूतिही अनुभवे । अनुभवा जया ।।1321।। होते ते
तिये निजात्मपदींचा रावो । होऊनि ठाकसी अव्ययो, ।
म्हणे लक्ष्मीनाहो । पार्था तूं गा ! ।।1322।।

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद् गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ।।63।।

याप्रमाणे गुह्यातले गुह्य असे हे ज्ञान तुला मी सांगितले. याचा पूर्ण विचार करून तुझ्या इच्छेला येईल ते कर .

हे गीतानाम विख्यात । सर्ववाङ्मयाचे मथित [2] । 2 सार
आत्मा ,जेणे हस्तगत ,। रत्न होय ।।1323।।
"ज्ञान" ऐसिया रूढी । वेदांती जयाची प्रौढी [3], । 3 प्रसिद्धी
वानितां ,कीर्ति चोखडी । पातली जगी ।।1324।।
बुद्ध्यादिकें[4] डोळसे [5] । हे जयाचें का कडवसें [6] । 4 बुद्धी वगैरे इंद्रियांना 5 शक्ती
मी सर्वद्रष्टाही दिसें । पाहला जया ,।।1325।। येते 6 कीरण
ते हे गा ! आत्मज्ञान । मज गौप्याचेंही गुप्त धन ।
परी तूं म्हणौनि , आन । केवीं करूं ? ।।1326।।
याकारणे गा पांडवा ! । आम्ही आपुला हा गुह्य ठेवा ।
तुज दिधला , कणवा । जाकळिलेपणें [7] ।।1327।। 7 करुणेने भारवल्यामुळे
जैसी, भुलली वोरसें [8], । माय बोले बाळा दोषे, । 8 प्रेमाने
प्रीति ही परी तैसे । न करूंचि हो ? ।।1328।।
येथ आकाश आणि गाळिजे, । अमृताही साली फेडिजे, ।
का, दिव्याकरवी करविजे । दिव्य जैसे ।।1329।।
जयाचेनि अंगप्रकाशें, । पाताळींचा परमाणु दिसें ।
तया सूर्याही का जैसे । अंजन सूदले [9] ।।1330।। 9 घातले
तैसे, सर्वज्ञेंही मियां । सर्वही निर्धारूनियां, ।
निके होय, ते धनंजया !। सांगितले तुज ।।1331।।
आतां, तूं ययावरी । निके हें निर्धारी[10], । 10 चंगले काय ते ठरव
निर्धारूनि करीं । आवडे तैसें ।।1332।।
यया देवाचिया बोला । अर्जुनु उगाचि ठेला ।
तेथ देवो म्हणती," भला ।अवंचकु [11] होसी ! " ।।1333।। 11 न फसवीणारा

वाढतया पुढे ,भुकेला । उपरोधे [1] म्हणे, '' मी धाला [2] '' । 1 लाजून 2 तृप्त झालो
तै, तोचि पीडे आपुला ,। आणि दोषूही तया ।।1334।।
तैसा, सर्वज्ञु श्रीगुरु । भेटलिया, आत्मनिर्धारु [3] । 3 आत्मनिर्णयाचा
न पुसिजे, जै आभारु [4] । धरूनिया , ।।1335।। 4 संकोच
तै, आपणपेचि वंचे । आणि पापही वंचनाचें ।
आपणयाचि साचें । चुकविले [5] तेणें ।।1336।। भोगले
पै, उगेपणा तुझिया । हा अभिप्रावो [6] की, धनंजया ? । प्रस्ताव
जे एकवेळ आवांकुनियां [7], । सांगावे ज्ञान ।।1337।। सार काढून
तेथ पार्थु म्हणे,'' दातारा! । भले जाणसी माझिया अंतरा ।
हे म्हणो, तरी दुसरा । जाणता असे काई ? ।।1338।।
येर ,ज्ञेय हे जी आघवें । तूं , ज्ञाता एकचि स्वभावें ,।
मा, सूर्यु म्हणौनि वानावे । सूर्याते काई ?'' ।।1339।।
या बोला श्रीकृष्णे । म्हणितले,'' काय येणे ! ।
हेंचि थोडे गा वानणे । जे बुझतासि [8] तूं '' ।।1340।। समजून घेतोस

सर्वगुह्यतमं भूयः श्रुणु मे परमं वचः ।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ।।64।।

सर्व गुह्यातले गुह्य अशी अखेरची एक गोष्ट पुनः सांगतो ती ऐक. तूं माझा अत्यंत आवडता आहेस म्हणून तुझ्या हिताची गोष्ट तुला सांगणार आहे .

तरी अवधान पघळ [9] । करुनियां, आणिक येक वेळ । 9 मोठे
वाक्य माझें निर्मळ । अवधारी पां ।।1341।।
हे वाच्य म्हणौनि बोलिजे । का श्राव्य मग आयिकिजे, ।
तैसे नव्हे, परी तुझें । भाग्य बरवें ।।1342।।
कूर्मीचिया पिलियां । दिठी पान्हा ये, धनंजया ! ।
का आकाश वाहे , बापिया [10], । घरीचे पाणी ।।1343।। 10 चातकाला
जो व्यवहारु जेथ न घडे, । तयाचें फळचि तेथ जोडे ।
काय दैवे ,न सांपडे ,। सानुकुळे [11]? ।।1344।। 11 अनुकुल असले जी
एऱ्हवी, द्वैताची वारी । सारुनि, ऐक्याच्या परिवरी ।
भोगिजे,ते अवधारी ।रहस्य हे ।।1345।।
आणि निरुपचारा [12] प्रेमा, । विषय होय जे प्रियोत्तमा ! । 12 निष्काम
ते दुजे नव्हे ,की आत्मा । ऐसेंचि जाणावें ! ।। 1346।।
आरिसाचिया ,देखिलया, [13] । गोमटे कीजे[14], धनंजया ! । 13 पहाण्याकरिता 14 स्वच्छ
ते तया नोहे, आपणयां-। लागी जैसे ।।1347।। करतो

तैसे, पार्था ! तुझेनि मिषे । मी बोले, आपणयाचि उद्देशें ।
माझ्या तुझ्या ठाई असे । मी तूंपण गा ? ।।1348।।
म्हणौनि, जिव्हारींचें गुज । सांगतसे , जीवासी तुज ।
हे अनन्यगतीचे मज । आथी , व्यसन ।।1349।।
पै, जळा आपणपें देतां, । लवण भुललें ,पंडुसता !।
की, आघवें तयाचें होतां, । न लजेचि ते ।।1350।।
तैसा, तूं माझ्या ठाई । राखो , नेणसीचि कांही ।
तरी , आतां तुज काई । गोप्य मी करूं ? ।।1351।।
म्हणौनि आघवींचि गूढे, । जे पाऊनि, अति उघडे ।
ते गोप्य ,माझें चोखडे । वाक्य आइक ।।1352।।

मन्मना भव मद्‌भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।।65।।

माझ्या ठायी मन ठेव, माझा भक्त हो, माझें यजन कर, आणि मला वंदन कर, म्हणजे तूं मला येऊन मिळशील, हे सत्य प्रतिज्ञेने मी तुला सांगतो ,कारण तूं माझा आवडता भक्त आहेस.

तरी बाह्य आणि अंतरा । आपुलिया सर्व व्यापारा, ।
मज व्यापकाते वीरा ! । विषयो करीं ।।1353।।
आघवां आंगीं जैसा । वायु मिळोनि आहे आकाशा,।
तूं सर्व कर्मी तैसा । मजसींचि आस ।।1354।।
किंबहुना, आपुले मन ,। करी माझें एकायतन [1] ,।
माझेनि श्रवणें, कान । भरूनि घालीं ।।1355।।
आत्मज्ञाने चोखडी, । संत जे माझीं रूपडीं, ।
ते दृष्टि पडो, आवडी, । कामिनी जैसी ।।1356।.
मी सर्व वस्तीचें वसौटे [2], । माझी नामें जियें चोखटें [3] , ।
तिये जियावया वाटे , । वाचेचिये लावीं ।।1357।।
हातांचे करणें ,। का, पायांचें चालणें, ।
ते , होय मजकारणें । तैसे करी ।।1358।।
आपुला अथवा परावा । ठायी, उपकरसी[4], पांडवा ! ।
तेणें यज्ञें , होई बरवा । याज्ञिकु माझा ।।1359।।
हे एकैक शिकऊ काई ! । पै, सेवकें [5] आपुल्या ठाईं ।
उरुनि[6] ,येर सर्वही ,। मी सेव्यचि करी ।।1360।।
तेथ जाऊनिया भूतद्वेषु । सर्वत्र नमवैन [7] मीचि एकु ।
ऐसेनि , आश्रयो , आत्यंतिकु, । लाहसी तूं माझा ।।1361।।

1 एकच स्थान
2 आश्रय स्थान 3 शुद्ध
4 उपकार करशील
5 सेवकपणा
6 राखून
7 नमस्कारास योग्य

मग भरलेया जगाआंतु । जाऊनि तिजयाची मातु, ।
होऊनि ठायील [1] एकांतु । आम्हां तुम्हां ।।1362।। 1 स्थीर होईल
तेव्हां, भलतिये आवस्थे, । मी तूंते, तूं माते ।
भोगिसी ,ऐसें आइते । वाढेल सुख ।।1363।।
आणि तिजे आडळ [2] करिते । निमाले, अर्जुना ! । 2 तिसरे अडथळा करणारे
जेथे ते मीचि, म्हणौनि तूं माते । पावसी शेखीं [3] ।।1364।। 3 शेवटी
जैसी, जळींची प्रतिभा ,। जळनाशी बिंबा ।
येतां, गाभागोभा [4] । कांहीं आहे ? ।।1365।। 4 अडथळा
पै, पवनु अंबरा, । कां कल्लोळु सागरा , ।
मिळतां, आडवार । कोणाचा गा ? ।।1366।।
म्हणौनि, तूं आणि आम्हीं, । हे दिसताहे देहधर्मी ।
मग ययाच्या विरामी । मीचि होसी ।।1367।।
यया बोलामाझारी । होय,नव्हे ,झणे करीं [5] । 5 नको करु
येथ आन आथी [6], तरी । तुझीचि आण ।।1368।। 6 हें खोटे असेल तर
पै, तुझी आण वाहणे, । हे आत्मलिंगाते [7] शिवणे । 7 आत्मस्वरुपाला
प्रीतीची जाति ,लाजणे । आठवों नेदी ।।1369।। 8 ज्ञानाचा विषय
एऱ्हवी वेद्यु [8] निष्प्रपंचु [9] ,। जेणें विश्वाभासु हा साचु [10]। 9 प्रपंचाचा मोह 10 नसलेला
आज्ञेचा नटनाचु [11] । काळाते जिणें [12]।।1370।। खरा भासतो11 उत्कर्ष
तो देवो मी सत्यसंकल्पु ,। आणि जगाच्या हिती बापु [13],। 12 काळाला जिंकतो
मा, आणेचा आक्षेपु [14] । कां करावा ? ।।1371।। 13 वडीलांसारखा 14 खटाटोप
परी अर्जुना ! तुझेनि वेधें[15] । मिया देवपणाचीं बिरुदें । 15 तुझ्या करिता
सांडिली गा !, मी हे आधें [16], । सगळेनि तुवां [17] ।।1372।। 16 मी अर्धा 17पण तुझ्यासकट
पै, काजा आपुलिया , । रावो आपुली आपणया । पूर्ण होतो
आण वाहे, धनंजया ! । तैसे हे की !।।1373।।
तेथ अर्जुनु म्हणे देवें ,। ''अचाट हे न बोलावें ।
जे आमचे काज[18] नांवे । तुझेनि एके ।।1374।। 18 आमचे कार्य
यावरी सांगों बैससी, । कां सांगतां भाषही देसी ,।
या तुझिया विनोदासी । पारु [19]आहे जी ? ।।1375।। 19 तोड
कमळवना विकाशु । करी, रवीचा एक अंशु ।
तेथ आघवाचि प्रकाशु । नित्य दे तो ।।1376।।
पृथ्वी निवऊनि सागर । भरीजती, येवढे थोर ।
वर्षे, तेथ मिषांतर [20] । चातकु की ।।1377।। 20 निमित्त
म्हणौनि, औदार्या तुझेंया । मज निमित्त ना म्हणावया, ।
प्राप्ति असे, दानीराया । कृपानिधी ''।।+1378।।

तंव देवो म्हणती,'' राहे ,। या बोलाचा प्रस्तावो नोहे [1], । 1 प्रसंग नाहीं
पै, माते पावसी उपायें । साचचि येणें ।।1379।।
सैंधव सिंधू पडलिया । जो क्षणु , धनंजया ! ।
तेणें विरेचि ,कीं उरावया । कारण कायी ? ।।1380।।
तैसे सर्वत्र माते भजतां ,। सर्व मी होतां ,अहंता [2] । 2 अहंपणा
निःशेष जाऊनि ,तत्त्वता । मीचि होसी ।।1381।।
एवं, माझिये प्राप्तीवरी [3] । कर्मालागोनि [4] ,अवधारी, । 3 प्राप्तीपर्यंत 4 कर्मापासून
दाविली तुज उजरी [5] । उपायांची ।।1382।। 5 स्पष्ट
जे आधीं तंव पंडुसुता ! । सर्व कर्मे मज अर्पितां, ।
सर्वत्र प्रसन्नता । लाहिजे माझी ।।1383।।
पाठी, माझ्या इये प्रसादी, । माझें ज्ञान जाय सिद्धी ।
तेणें मिसळिजे, त्रिशुद्धी , । स्वरुपीं माझ्या ।।1384।।
मग पार्था ! तिये ठायी । साध्य, साधन ,होय नाहीं ।
किंबहुना ,तुज कांही । उरेचि ना ।।1385।।
तरी सर्व कर्मे आपुलीं ,। तुवां सर्वदा मज अर्पिली, ।
तेणें प्रसन्नता लाधली । आजि हे माझी ।।1386।।
म्हणौनि , येणे प्रसादबळें, । नव्हे झुंजाचेनि आडळे [6] ,। 6 अडथळा
न ठाकेचि,[7] येकवेळे । भाळलो तुज ।।1387।। 7 विसंबणार नाही
जेणें सप्रपंच अज्ञान जाये, । एकु मी गोचरु होये ।
ते उपपत्तीचेनि उपाये [8] । गीतारुप हे ।।1388।। 8 युक्तीचा उपाय
मियां, ज्ञान तुज आपुलें । नानापरी उपदेशिले, ।
येणे अज्ञानजात, सांडीं, वियाले [9] । धर्माधर्म जे ।।1389।। 9 उत्पन्न झाले

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।66।।
सर्व धर्म सोडून तूं मला एकट्यालाच शरण ये . मी तुला सर्व पापापासून मुक्त करीन, भिऊ नको.

आशा जैशी दुःखाते । व्याली, निंदा दुरिते [10] ,। 10 पातकाला
हे असो; जैसे दैन्याते । दुर्भगत्व [11] ।।1390।। 11 दुर्भाग्य
तैसे, स्वर्गनरकसूचक । अज्ञान , व्यालें धर्मादिक ।
ते सांडूनि घाली अशेख ,। ज्ञाने येणें ।।1391।।
हाती घेऊनि तो दोरु, । सांडिजे जैसा सर्पाकारु ,।
कां, निद्रात्यागे घराचारु [12] ,। स्वप्नीचा जैसा ।।1392।। 12 प्रपंच
नाना, सांडिलेनि कवळें [13] । चंद्रीचें धुये [14] पिवळे, । 13 कावीळ 14 नाहींसे होते
व्याधित्यागें कडुवाळे-। पण मुखाचे ।।1393।।

अगा! दिवसा पाठीं देउनि [1] ,। मृगजळ घापे त्यजुनी ।
कां, काष्टत्यागे वन्ही । त्यजिजे जैसा ।।1394।।
तैसे, धर्माधर्माचें टवाळ [2] । दावी अज्ञान, जे कां मूळ, ।
ते त्यजूनि ,त्यजी सकळ । धर्मजात ।।1395।।
मग अज्ञान निमालिया, । मीचि येकु असे अपैसया ,।
सनिद्र स्वप्न गेलया ,। आपणपें जैसे ।।1396।।
तैसा, मी एकवांचूनि कांही । मग, भिन्नाभिन्न आन नाहीं ।
सोऽहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्यु होय ।।1397।।
पै, आपुलेनि भेदेंविण । माझें जाणिजे जे एकपण, ।
तयाचि नांव 'शरण ' ,। मज येणें गा ! ।।1398।।
जैसे घटाचेनि नाशें, । गगनी गगन प्रवेशे ,।
मज शरण येणें ,तैसे । ऐक्य करी ।।1399।।
सुवर्णमणि सोनया । ये, कल्लोळु जैसा पाणिया, ।
तैसा , मज धनंजया ! । शरण ये तूं ।।1400।।
वांचूनि,[3] सागराच्या पोटीं।वडवानळु शरण आला,किरीटी! ।
जाळूनि ठाके [4], तया गोठी । वाळूनि [5] दे पां ।।1401।।
मजहि शरण रिघिजे, । आणि जीवत्वेंचि असिजे ?।
धिग् बोली यिया [6], न लजे । प्रज्ञा केवीं ? ।।1402।।
अगा! प्राकृताही [7], राया-। आंगी पडे[8] जे ,धनंजया ! ।
ते दासिरुंहि [9] की ,तया-। समान होय ।।1403।।
मा, मी विश्वेश्वरु भेटे , । आणि जीवग्रंथी न सुटे , ।
हे बोल, नको ,वोखटे [10] । कानी लाऊं ।।1404।।
म्हणौनि, मी होऊनि माते । सेवणें आहे आयिते ।
ते करीं, हातां येते । ज्ञाने येणें ।।1405।।
मग ,ताकौनियां काढिलें ।लोणी, मागौते ताकी घातलें,।
परी न घेपेचि , कांही केलें । तेणें जेवीं ।।1406।।
तैसें अद्वयत्वें मज । शरण रिघालिया, तुज ।
धर्माधर्म हे सहज । लागतील ना ।।1407।।
लोह उभे खाय माती ;। ते, परिसाचिये संगती ।
सोने जालया, पुढती । न शिविजे मळें ।।1408।।
हे असो; काष्ठापासोनि । मथूनि घेतलिया वन्ही, ।
मग काष्ठेंही कोंडोनी । न ठके जैसा ।।1409।।
अर्जुना ! काय दिनकरु । देखत आहे अंधारु ?।
की प्रबोधी [11], होय गोचरु । स्वप्नभ्रमु ? ।।1410।।

1 दिवस मावळला की
2 बंड
3 शिवाय
4 जळून जाऊन 5 सोडून दे
6 धिक्कार असो अशा बोलण्याचा 7 सामान्यपणे
8 स्विकारणे 9 दासी
10 खोटे
11 जागे झाल्यावर

तैसें, मजसी एकवटलेया । मी सर्वरूप वांचूनियां ,।
आन कांही उरावया ,। कारण असे ? ।।1411।।
म्हणौनि, तयाचें कांही । चिंती ना आपुल्या ठायीं ,।
तुझें पाप,पुण्य ,पाही । मीचि होईन ।।1412।।
तेथ, सर्वबंधलक्षणे । पापें उरावें दुजेपणें, ।
ते माझ्या बोधीं [1] , वायाणे [2] । होऊनि जाईल ।।1413।।
जळी पडिलिया लवणा, । सर्वही जळ होईल, विचक्षणा ! ।
तुज, मी, अनन्यशरणा । होईन तैसा ।।1414।।
येंतुलेनि, अपैसया । सुटलाचि आहासी, धनंजया! ।
घेईं मज प्रकाशोनियां ,। सोडवीन तूंते ।।1415।।
याकारणे पुढती, । हे आधी [3] न वाहे चित्तीं ।
मज एकासि ये, सुमती !, । जाणोनि शरण ।।1416।।
ऐसें ,सर्वरूपरूपसें । सर्वदृष्टिडोळसें ,।
सर्वदेशनिवासें । बोलिले श्रीकृष्णे ।।1417।।
मग, सांवळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु ,।
आलिंगिला , स्वशरणु । भक्तराजु तो ।।1418।।
न पवतां जयाते [4] ,। काखे सूनि बुद्धीते [5] ,।
बोलणे मागौते । वोसरले [6] ,।।1419।।
ऐसें जे कांही येक , । बोला ,बुद्धीसिही अटक [7] ।
ते द्यावया, मिष [8] । खेवाचें केलें ।।1420।।
हृदया हृदय येक जाले, । ये हृदयींचे ते हृदयीं घातलें ।
द्वैत न मोडितां केले । आपणाऐसें अर्जुना ।।1421।।
दीपें दीप लाविला, । तैसा परिष्वंगु [10] तो जाला ।
द्वैत न मोडितां , केला । आपणपे पार्थु ।।1422।।
तेव्हां सुखाचा मग तया । पूर आला, जो धनंजया ।
तेथ, वाडु [11] , तऱ्ही बुडोनियां । ठेला , देवो ।।1423।।
सिंधू सिंधूते पावों जाये , । ते पावणें ठाके, दुणा होये ।
वरी रिगे[12] , पुरवणिये [13]। आकाशही ।।1424।।
तैसें तयां दोघांचे मिळणे । दोघां नावरे, जाणावे कवणें?।
किंबहुना, श्रीनारायणें । विश्व कोंदले ।।1425।।
एवं, वेदाचें मूळसुत्र । सर्वाधिकारैकपवित्र ।
श्रीकृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ।।1426।।
येथ, गीता मूळ वेदां, । ऐसें केवीं पां आलें बोधा ?।
हे म्हणाल, तरी प्रसिद्धा । उपपत्ति सांगों ।।1427।।

1 माझें ज्ञान झाल्यावर 2 खोटे
3 अगोदरच
4 एथपर्यंत न पोचता
5 बुद्धीला बगल देऊन जाते
6 शब्दबद्ध न करता येण्यासारिखे
7 अगम्य 8 निमित्त 9 आलिंगनाचे
10 आलिंगन झाले
11 मोठी व्यक्ती
12 ओसंडते 13 पुरेशा जागे अभावी

तरी जयाच्या निःश्वासी । जन्म झाले वेदराशी ,।
तो सत्यप्रतिज्ञ , पैजेसी । बोलला स्वमुखे ।।1428।।
म्हणौनि, वेदां मूळभूत । गीता म्हणों, हे होय उचित ।
आणिकही येकी येथ । उपपत्ति असे ।।1429।।
जे न नशतु , स्वरुपें [1],। जयाचा विस्तारु जेथ लपे, ।
ते, तयांचे म्हणिपे । बीज, जगी ।।1430।।
तरी, कांडत्रयात्मकु । शब्दराशी अशेखु [2] , ।
गीतेमाजी असे, रुखु । बीजीं जैसा ।।1431।।
म्हणौनि, वेदांचे बीज । श्रीगीता होय, हे मज ।
गमे, आणि सहज । दिसतही आहे ।।1432।।
जे, वेदांचे तिन्ही भाग ।गीते उमटले असती चांग ।
भूषणरत्नीं सर्वांग । शोभले जैसे ।।1433।।
तियेचि कर्मादिकें तिन्ही । कांडे, कोणकोणे स्थानीं ।
गीते आहाति, ते नयनीं । दाखऊं, आईक !।।1434।।
तरि पहिला जो अध्यावो, । तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्तावो [3]।
द्वितीयीं, सांख्यसद्भावो [4]। प्रकाशिला ।।1435।।
मोक्षदानी, स्वतंत्र ,। ज्ञानप्रधान हे शास्त्र ।
येतुलालें [5] ,दुजी सूत्र । उभारिले [6]।।1436।।
मग, अज्ञाने बांधलेयां, । मोक्षपदी बैसावया ।
साधनारंभु, तो तृतीया-। ध्यायीं बोलिला ।।1437।।
जे देहाभिमानबंधें । सांडूनि, काम्यनिषिद्धें ।
विहित, परी अप्रमादे । अनुष्ठावे ।।1438।।
ऐसेनि सद्भावें कर्म करावें । हा तिजा अध्यावो जो देवें ।
निर्णय केला, ते जाणावे । कर्मकांड येथ ।।1439।।
आणि, तेचि नित्यादिक ,। अज्ञानाचे ,आवश्यक ।
आचरतां ,मोचक [7], । केवीं होय पां ! ।।1440।।
ऐसी अपेक्षा जालियां, । बद्ध मुमुक्षुते आलिया, ।
देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया । सांगितली ।।1441।।
जे देहवाचामानसें । विहित निपजे, जे जैसे ,।
ते एक ईश्वरोद्देशे । कीजे, म्हणितले ।।1442।।
हेंचि ईश्वरीं कर्मयोगें । भजनकथनाचें खागें [8], ।
आदरिले [9], शेषभागें । चतुर्थाचेनी ।।1443।।
ते , विश्वरूप अकरावा । अध्यावो संपे जंव आघवा, ।
तंव कर्मे ईशु भजावा । हे जे बोलिले, । ।1444।।

1 स्वरूपाचा नाश न होता
2 संपूर्ण
3 शास्त्रविचाराची प्रस्तावना
4 ज्ञानविचार
5 एकमेव 6 सुतोवाच केला
7 सुटका करणारे
8 प्रकारे
9 आरंभ केला

ते अष्टाध्यायीं उघड । जाण, येथें देवताकांड ।
शास्त्र सांगतसे । आड । मोडूनि[1], बोले ।।1445।। — 1 अडथळे पार करून
आणि, तेणेंचि ईशप्रसादे, । श्रीगुरुसंप्रदायलब्धें ।
साच ज्ञान, उद्बोधे [2], । कोंवळे जे ।।1446।। — 2 लाभते
ते अद्वेष्टादिप्रभृतिकी । अथवा अमानित्वादिकी ।
वाढविजे ,म्हणौनि लेखीं, । बारावा गणूं [3]।।1447।। — 3 समजतो
तो बारावा अध्याय आदी ,। आणि पंधरावा अवधी [4] ,। — 4 शेवट
ज्ञानफळपाकसिद्धी । निरुपणासीं ।। 1448।।
म्हणौनि चहूंही इही । उर्ध्वमूळांतीं अध्यायीं ।
ज्ञानकांड ये ठायी । निरुपिजे ।।1449।।
एवं, कांडत्रयनिरूपणी । श्रुतीचि हे कोडसवाणी 5। — 5 गोजीरवाणी
गीतापद्मरत्नांची लेणी । लेयिली आहे ।।1450।।
हे असो; कांडत्रयात्मक । श्रुति, मोक्षरूप फळ येक ।
बोभावे [6], जे आवश्यक । ठाकावे म्हणौनि ।।1451।। — 6 गर्जुन सांगते
तयाचेनि साधन [7],ज्ञानेसीं । वैर करी जो प्रतिदिवशी,। — 7 त्या प्राप्तकरण्याच्या साधनाशी
तो अज्ञानवर्ग, षोडशीं । प्रतिपादिजे ।।1452 ।।
तोचि शास्त्राचा बोळावा [8] । घेवोनि, वैरी जिणावा, । — 8 मुक्कामापर्यंतचा सोबती
हा निरोपु, तो सतरावा । अध्याय येथ ।।1453।।
ऐसा, प्रथमालागोनि । सतरावा लाणी [9] करूनी ,। — 9 शेवट
आत्मनिश्वास विवरूनी । दाविला देवें ।।1454।।
तया अर्थजातां अशेषां,। केला,तात्पर्याचा आवांका [10] । — 10 सारांश
तो हा अठरावा , देखा । कलशाध्यायो ।।1455।।
एवं, सकळसंख्यासिद्धु [11],। श्रीभगवद्गीता प्रबंधु ,। — 11सर्व अध्यांयाची संख्या पाहता
हा औदार्ये आगळा , वेदु । मुर्तु जाण ।।1456।।
वेदु संपन्नु होय ठाई । पर, कृपणु ऐसा आनु नाही !।
जे कानीं लागला तिही । वर्णाच्याचि ।।1457।।
येरां भवव्यथा [12] ठेलियां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां, । — 12 संसारदुःखे
अनवसरू [13] मांडुनियां । राहिला आहे ।।1458।। — 13 अनाधिकारत्व
तरी मज पाहतां, ते मागील उणें । फेडावया, गीतापणे ।
वेदु वेठला [14], भलतेणें । सेव्य होआवया ।।1459।। — 14 अवतार घेतला
ना, हे अर्थु रिगोनि मनी, । श्रवणे लागोनि कानीं,।
जपमिषे वदनीं । वसोनिया, ।।1460।।
ये गीतेचा पाठु जो जाणे, । तयाचेनि सांगातीपणे [15] । — 15 सोबतीने
गीता लिहोनि वाहाणे [16] । पुस्तकमिषे [17] ।।1461।। — 16 बाळगतो 17 पुस्तकरूपाने

ऐसैसा मिसकटा[1] ,। संसाराचा चोहटा [2]।
गवादी घालीत [3]चोखटा । मोक्षसुखाची ।।1462।।
परी आकाशी वसावया, ।पृथ्वीवरी बैसावया ।
रविदीप्ती राहाटावया । आवारु [4] ,नभ ।।1463।।
तेवीं, उत्तम, अधम ऐसें । सेवितां, कवणातेही न पुसे ,।
कैवल्यदानें [5] सरिसे [6] । निववीत जगा ।।1464।।
यालागी, मागिली कुटी [7] । भ्याला,वेदु गीतेच्या पोटी ।
रिगाला ,आतां गोमटी [8]। कीर्ति पातला ।।1465।।
म्हणौनि ,वेदाची सुसेव्यता,। ते हे मूर्त जाण,श्रीगीता ।
श्रीकृष्णे पंडुसुता । उपदेशिली ।।1466।।
परी वत्साचेनि वोरसें [9] ,। दुभते होय घरोद्देशें ,।
जाले पांडवाचेनि मिषे । जगदुद्धरण ।।1467।।
चातकाचिये कणवें, । मेघु पाणियेसिं धांवें, ।
तेथ चराचर आघवें । निवाले जेवीं ।।1468।।
कां, अनन्यगतीकमळा-। लागी, सूर्य ये वेळोवेळा ,।
की सुखिया होईजे डोळा । त्रिभुवनींचा ।।1469।।
तैसें, अर्जुनाचेनि व्याजे [10] ,। गीता प्रकाशूनि श्रीराजे ।
संसारायेवढें थोर ओझे । फेडिले जगाचे ।।1470।।
सर्वशास्त्ररत्नदीप्ती । उजळिता, हा त्रिजगतीं ।
सूर्यु नव्हे लक्ष्मीपती । वक्त्राकाशींचा [11]?।।
बाप! कुळ ते पवित्र, । जेथिंचा पार्थु , या ज्ञाना पात्र ।
जेणे गीता केले शास्त्र । आवारु जगा ।।1472।।
हे असो; मग तेणें । सद्गुरु श्रीकृष्णे ,।
पार्थाचे मिसळणे । आणिलें द्वैता ।।1473।।
पाठी म्हणतसे,''पांडवा! । शास्त्र हे मानले कीं जीवा ?''।
तेथ येरु म्हणे,''देवा ! । अपुलिया कृपा ''।।1474।।
तरी,निधान[12] जोडावया,। भाग्य घडे गा धनंजया ! ।
परी जोडिले भोगावया,। विपाये [13] होय ।।1476।।
पै, क्षीरसागरायेवढे । अविरजी दुधाचे [14] भांडे , ।
सुरां, असुरां ,केवढे ।मथितां जालें ?।।1476।।
ते सायासही फळा आलें,। जे अमृतही डोळां देखिलें ।
परी वरिचिली [15] चुकले । जतनेते [16]।।
तेथ अमरत्वा वोगरिले [17] ,।ते मरणाचिलागी जालें ।
भोगों नेणता, जोडले । ऐसें आहे ।।1478।।

1 अशा प्रकारांनी 2 चव्हाट्यावर
3 अन्नछत्र उघडले आहे
4 सीमा
5 मोक्षदानाने 6 सारखेच
7 दूषणांनी
8 चांगली
9 प्रेमाने
10 प्रेमाने
11 वाग्भुवनाचा
12 संपत्ती
13 क्वचितच
14 विरजण न लावलेले दुधाचे
15 वर सांगितल्याप्रमाणे
16 संभाळण्यास 17 अमर व्हावे
म्हणून प्राप्त करावयाला गेले

नहुषु स्वर्गाधिपति जाहला,। परी राहाटी भांबावला [1],। 1 वागण्यात चुकला
तो भुजंगत्व पावला । नेणसी कायी ? ।।1479।।
म्हणौनि, बहुत पुण्य तुवां । केले, तेणें धनंजया ! ।
आजि शास्त्रराजा इया । जालासि विषयो [2] ।।1480।। 2 निमित्त
तरी ययाचि शास्त्राचेनि ,। संप्रदायें पांघुरौनि [3], । 3 विधीवत धारण करून
शास्त्रार्थु हा निकेनि [4] । अनुष्ठीं [5] हो ।।1481।। 4 उत्तम प्रकारे 5 आचरणारा
एऱ्हवी, अमृतमंथना-। सारिखे होईल, अर्जुना ! ।
जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेवीण ।।1482।।
गाय धड जोडे गोमटी, । ते तैचि पिवो ये किरीटी !।
जै जाणिजे हातवटी [6] । सांजवणीची [7] ।।1483।। 6 रीत 7 दोहण्याची
तैसा, श्रीगुरु प्रसन्न होये,। शिष्य विद्याही कीर लाहे ,।
परी ते फळे , संप्रदाये । उपासिलिया ।।1484।।
म्हणौनि, शास्त्री जो इये । उचितु संप्रदायो आहे , ।
तो ऐक आतां , बहुवे । आदरेसी [8] ।।1485।। 8 अत्यंत आदरपूर्वक

इदं नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
न चाशुश्रुषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ।।67।।

हे गुह्य ज्याला तप नाहीं, भक्ती नाहीं व ऐकण्याची इच्छा नाहीं , तसेच जो माझी निंदा करितो त्याला तूं कधींहि सांगूं नको

तरी तुवां हें जे पार्था ! । गीताशास्त्र लाधले आस्था [9],। 9 मोठया भक्तीने मिळवलेस
ते , तपोहीना सर्वथा । सांगावे ना हो ।।1486।।
अथवा, तापसुही जाला, । परी गुरुभक्ती जो ढिला, ।
तो,वेदीं अंत्यजु [10] वाळिला [11],। तैसा वाळीं ।।1487।। 10 चांडाळ 11 अपात्र ठरवीला
नातरी,पुरोडाशु [12] जैसा,। न घापे, वृद्ध तरी वायसा [13] । 12 हवन द्रव्याचा शेष
गीता नेदी तैसी, तापसा । गुरुभक्तिहीना ।।1488।। 13 कावळ्याला
कां, तपही जोडे, देही । भजे गुरुदेवांच्या ठायी, ।
परी आकर्णनी[14] नाहीं । चाड [15]जरी ,।।1489।। 14 ऐकण्याची 15 इच्छा
तरी मागील दोन्ही आंगी । उत्तम होय कीर जगीं, ।
परी या श्रवणालागी । योग्यु नोहे ।।1490।।
मुक्ताफळ भलतैसें । हो, परी मुख [16] नसे । 16 भोक
तंव गुण[17] प्रवेशे । तेथ कायी ? ।।1491।। 17 दोरा
सागरु गंभीरु होये । हें, कोण ना म्हणत आहे ? ।
परी वृष्टि वायां जाये । जाली तेथ ।।1492।।

धालिया [1] दिव्यान्न सुवावे [2], ।मग जे वायां धाडावे, ।
ते, आर्ती [3] कां न करावे । उदारपण ? ।।1493।।
म्हणौनि, योग्य भलतैसें [4] । होतु, परी चाड नसे ।
तरी झणे वानिवसें [5] । देसी ,हे तयां ।।1494।।
रुपाचा सुजाणु [6] डोळा,। वोडवूं [7] ये कायि परिमळा ?।
जेथ जे माने [8], ते फळा । तेथचि ये गा ! ।।1495।।
म्हणौनि, तपी,भक्ति । पाहावे, ते सुभद्रापती ।
परी शास्त्रश्रवणीं अनासक्ती, । वाळावेचि ते ।।1496।।
नातरी, तपभक्ति । होऊनि, श्रवणी आर्ति ।
आथी , ऐसीही आयती [9] । देखसी जरी ,।।1497।।
तरी गीताशास्त्रनिर्मिता । जो मी सकळलोकशास्ता ,।
तया माते सामान्यता [10] । बोलेल जो ,।।1498।।
माझ्या सज्जनेंसिं ,माते । पैशून्याचेनि हाते [11] ,।
येक [12] आहाती, तयांते । योग्य न म्हण ।।1499।।
तयांची येर आघवी । सामग्री ऐसें जाणावी , ।
दीपेवीण ठाणदिवी [13]। रात्रीची जैसी ।।1500।।
अंग गोरे आणि तरुणे, । वरी लेईले आहे लेणें ।
परी , येकलेनि प्राणें । सांडिले जेवीं ।।1501।।
सोनयाचें सुंदर । निर्वाळिले [14] होय घर, ।
परी, सर्पांगना द्वार । रुंधले [15] आहे ।।1502।।
निपजे दिव्यान्न चोखट, । परी माजीं काळकूट ।
असो; मैत्री कपट-।गर्भिणी [16] जैसी ।।1503।।
तैसी, तपभक्तिमेधा । तयाची जाण प्रबुद्धा ! ।
जो माझयांची ,कां निंदा । माझीचि करी ।।1504।।
याकारणे धनंजया! । तो भक्तु ,मेधावीं,तपिया ,।
तरी नको बापा! इया । शास्त्रा आतळो [17] देवों ।।1505।।
काय बहु बोलो! निंदका ,। योग्य स्त्रष्टयाहीसारिखा, ।
गीता हे कवतिका [18] । लागीही नेदी ।।1506।।
म्हणौनि,तपाचा,धनुर्धरा ! । तळी दाटोनि गाडोरा [19],।
वरी गुरुभक्तीचा पुरा । प्रासादु जो जाला, ।।1507।।
आणि,श्रवणेच्छेचा पुढां । दारवंटा[20] सदा उघडा ।
वरी कलशु चोखडा । अनिंदारत्नांचा ।।1508।।

1 तृप्त माणसाला 2 वाढावे
3 भुकेलेल्या
4 कींतीही
5 चुकुनसुद्धा
6 रुपाचा जाणकार
7 योग्यता ठरविता येईल
8 योग्य
9 योग्यता
10 हलकेपणाने
11 दोषदृष्टिने बोलणारे
12 कांहीं
13 दिव्याची बैठक
14 स्वच्छ
15 अडवले आहे
16 कपटी
17 नको स्पर्श करु दे
18 सहज म्हणून देखील
19 भक्कम पाया
20 उंबरा

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ।।68।।

जो हे परम गुह्य माझ्या भक्तांना कळवील, त्याची माझ्या ठायी परम भक्ती होऊन तो मलाच येऊन पोचेल यात संशय नाहीं

ऐशा भक्तालयीं [1] चोखटी ,। गीतारत्नेश्वरु हा प्रतिष्ठीं ।	1 भक्तीरूपी मंदीरात
मग माझिया संवसाटी । तुकसी [2] जगी ।।1509।।	2 माझ्या बरोबरीने येशील
कां, जे एकाक्षरपणेसी [3]।त्रिमात्रकेचिये [4] कुशी ,।	3 ॐकार 4 अ,उ, या तीन
प्रणवु होतां गर्भवासी ।सांकडला [5], ।।1510।।	मात्रांमध्ये 5 अडकला
तो गीतेचिया बाहाळीं [6], । वेदबीज गेलें पाहाळी [7], ।	6 विस्ताराने 7 मोहरले
की, गायत्री फुलीफळीं । श्लोकांच्या आली ।।1511।।	
ते, हे मंत्ररहस्य गीता ,। मेळवी जो माझिया भक्ता , ।	
अनन्यजीवना ,माता । बाळका जैसी ।।1512।।	
तैसी भक्तां , गीतेसीं । भेटी करी जो आदरेंसीं, ।	
तो देहापाठी मजसीं । येकचि होय ।।1513।।	

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ।।69।।

आणि त्याच्यापेक्षा माझें जास्त प्रिय करणारा सर्व मनुष्यात दुसरा कोणीहि मिळणार नाहीं; आणि या भूमीत त्याच्यापेक्षा मला जास्त आवडता कोणी होणार नाही.

आणि देहाचेही लेणे । घेऊनि, वेगळेपणे ।	
असें , तंव जीवेप्राणें । तोचि पढिये [8] ।।1514।।	8 आवडतो
ज्ञानियां,कर्मठा, तापसां । ययां खुणेचिया [9] माणुसां-।	9 वृत्तीच्या
माजीं, तो येकु गा ! जैसा । पढिये[10] मज ,।।1515।।	10 आवडतो
तैसा, भूतळी आघवा । आन न देखे , पांडवा ! ।	
जो गीता सांगें, मेळावा । भक्तजनांचा ।।1516।।	
मज ईश्वराचेनि लोभें, । हे गीता पढतां अक्षोभे [11], ।	11 निरलसपणे
जो मंडन होय सभे । संतांचिये ।।1517।।	
नवपल्लवीं रोमांचितु , । मंदानिळें कांपवितु , ।	
आमोदजळें वोलावितु , । फुलांचे डोळे ।।1518।।	
कोकिळा कलरवाचेनि [12] मिषे,। सद्गद बोलवीत जैसे ,।	12 टाहो फोडून
वसंत का प्रवेशे । मद्भक्त आरामी [13]।।1519।।	13 उद्यानात
का, जन्माचें फळ चकोरां । होत, जै चंद्र ये अंबरा , ।	
नाना, नवघन मयूरां । वो देत पावे ।।1520।।	
तैसा, सज्जनांच्या मेळापीं, । गीतापद्यरत्नी उमपीं [14]।	14 अमर्याद
वर्षे, जो माझ्या रुपी । हेतु ठेऊनि ।।1521।।	

मग तयाचेनि पाडे [1], । पढियंते मज फुडे [2] । 1 योग्यतेचे 2 खरोखर
नाहीचि गा ! मागेपुढें । न्याहाळितां ।।1522।।
अर्जुना ! हा ठायवरी [3],। मी तयाते सूये जिव्हारीं [4] ,। 3 इतका 4 हृदयस्थ करितो
जो गीतार्थाचे करी । परगुणे [5] संतां ।।1523।। 5 मेजवानी

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ।।70।।
आमच्या दोघांच्या या धर्मसंवादाचे जो कोणी अध्ययन करील त्याने ज्ञानयज्ञाने माझी पूजा केल्या सारखे होईल, असे मी समजीन .

पै, माझिया तुझिया मिळणी, । वाढीनली जे हे कहाणी, ।
मोक्षधर्म का जिणी [6] । आलासे जेथें ,।।1524।। 6 जन्मला
तो, हा सकळार्थप्रबोधु, । आम्हां दोघांचा संवादु , ।
न करितां पदभेदु । पाठेचि, जो पढे, ।।1525।।
तेणें,ज्ञानानळी प्रदीप्तीं [7] ,।मूळ अविद्येचिया आहुती,। 7 ज्ञानयज्ञ करून
तोषविला होय सुमती । परमात्मा मी ।।1526।।
घेऊनि गीतार्थ उगाणा [8] । ज्ञानिये जे, विचक्षणा ! । 8 बोध
ठाकती[9] ते गाणावाणा [10] ।गीतेचा,तो लाहे [11] ।।1527।। 9 आचरतात 10 गाऊन व वर्णन करून 11 प्राप्त होते
गीता पाठकासि असें , । फळ अर्थज्ञाचि [12] सरिसे ।
गीता माउलियेसि नसे, । जाणे, तान्हे ।।1528।। 12 अर्थ समजणाऱ्या

श्रद्धावाननसुयश्च श्रृणुयादपि यो नरः ।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम ।।71।।
तसेच दोष न काढिता जो जो कोणी हे ऐकेल तोहि पापांपासून मुक्त होऊन पुण्यवान लोक प्राप्त होणाऱ्या शुभ लोकाप्रत जाऊन पोंचेल.

आणि, सर्वमार्गी निंदा । सांडूनि, आस्था, पै शुद्धा ।
गीताश्रवणीं श्रद्धा । उभारी जो , ।।1529।।
तयाच्या श्रवणपुटी । गीतेचीं अक्षरें जंव पैठीं [13] । 13 शिरतात
होतीना, तंव उठाउठी [14] । पळेचि पाप ।।1530।। 14 लागलीच
अटवियेमाजीं [15] जैसा । वन्हि रिघतां सहसा, । 15 रानात
लंघिती [16] का दिशा । वनौकें [17] तिये ,।।1531।। 16 सोडतात 17 वनचर
कां, उदयाचळकुळीं । झळकतां अंशुमाळी, ।
तिमिरें अंतराळी । हारपती ।।1532।।

तैसा, कानाच्या महाद्वारी । गीता गजर जेथ करी, ।
तेथ सृष्टीचिया आदीवरी [1] । जायचि पाप ।।1533।। 1 आरंभापासूनचे
ऐसी जन्मवेली धुवट [2]। होय, पुण्यरूप चोखट । 2 जन्मापासूनची पापे
याहीवरी अचाट । लाहे फळ ।।1534।। नाहींशी होऊन
जे ,इये गीतेची अक्षरे । जेतुली का कर्णद्वारे ।
रिघती, तेतुले होती पुरे । अश्वमेध कीं ! ।।1535।।
म्हणौनि, श्रवणे पापें जाती । आणि धर्म धरी उन्नती ।
तेणें स्वर्गराज, संपत्ती । लाहेचि शेखीं [3] ।।1536।। 3 शेवटी
तो, पै, मज यावयालागी । पहिले पेणे [4] करी स्वर्गी, । 4 मुक्काम करितो
मग, आवडे तंव भोगी , । पाठीं मजचि मिळे ।।1537।।
ऐसी गीता धनंजया ! । ऐकतया आणि पढतया , ।
फळे महानंदे [5], मियां । बहु काय बोलों ? ।।1538।। 5 अमर्याद सुख मिळते
याकारणे हे असो; । परी जयालागी शास्त्रातिसो [6] । 6 शास्त्रविस्तार
केला, ते ,तंव तुज पुसों । काज तुझें ।।1539।।

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।
कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ।।72।।

हे पार्था! तूं हे एकाग्र चित्ताने ऐकलेस ना ? आणि तुझा अज्ञानरुपी मोह हे धनंजया । आतां अगदी नष्ट झाला ना ?

तरी सांग पां पांडवा ! । हा शास्त्रसिद्धांतु आघवा ।
तुज एकचित्ते फावा [7] । गेला आहे ? ।।1540।। 7 ठसला आहे
आम्ही जैसे, जया रीतीं । उगाणिले [8], कानांच्या हाती , । 8 विवरण केले
येरीं [9], तैसेचि तुझ्या चित्ती । पेठें[9] केले की ?।।1541।। 9 या कानांनी 10 स्थिरावले
अथवा, माझारी[11] । गेलें सांडिविखुरी [12] ? । 11 मध्येच 12 इकडेतिकडे
किंवा, उपेक्षेवरी [13]। वाळूनि सांडिले ? ।।1542।। गेलें 13 लक्ष न दिल्यामुळे
जैसे आम्हीं सांगितले, । तैसेचि हृदयीं फावलें ।
तरी सांग पां वहिले [14] । पुसेन ते मी ।।1543।। 14 चटकन
''तरी स्वाज्ञानजनिते ,। मागिले ,मोहें तूते ।
भुलविलें, तो येथे । असें की नाहीं ?।।1544।।
हे बहु पुसों , काई ? । सांगे, तूं आपल्या ठाई ।
कर्माकर्म कांही । देखतासी ? ''।।1545।।
पार्थु स्वानंदेकरसें । विरेल[15], ऐसा भेददशे । 15 आत्मानंदात बुडेल
आणिला , येणे मिषे । प्रश्नाचेनि ।।1546।।

पूर्णब्रह्म जाला पार्थु । तरी पुढील साधावया कार्यार्थु ,।
मर्यादा, श्रीकृष्णनाथु । उल्लंघो नेदी ।।1547।।
एऱ्हवी, आपुले करणें । सर्वज्ञ काय तो नेणें ?।
परी केलें पुसणे ,। याचि लागी ।।1548।।
एवं, करोनिया प्रश्न ,। नसतेंचि अर्जुनपण ।
आणूनिया, जालें पूर्णपण । ते बोलवी स्वयें ।।1549।।
मग क्षीराब्धीते सांडितु ,। गगनीं पुंजु मंडितु [1], ।
निवडे [2] जैसा, न निवडितु [3] । पूर्णचंद्रु ।।1550।
तैसा, ब्रह्म मी, हे विसरे। तेथ जगचि ब्रह्मत्वें भरे ।
हेंही सांडी, तरी विरे । ब्रह्मपणही ।।1551।।
ऐसा, मोडतु ,मांडतु ब्रह्मे [4], । तो दुःखे, देहाचिये सीमे ।
'मी अर्जुन' येणे नामें । उभा ठेला ।।1552।।
मग कांपतां , करतळी । दडपूनि रोमावळी, ।
पुलिका स्वेदजळी[5] । जिरऊनिया, ।।1553।।
प्राणक्षोभे डोलतया । आंगा, आंगचि टेंकया ।
सूनि[6], स्तंभु चाळया [7], । भुलौनिया ।।1554।।
नेंत्रयुगळाचेनि वोते [8] । आनंदामृताचे भरिते [9] ।
वोसंडत [9] ते मागुते । काढूनिया ,।।1555।।
विविधा औत्सुक्यांची दाटी ।चीप [11] दाटत होती कंठी, ।
ते करुनिया पैठी । हृदयामाजी ,।।1556।।
वाचेचे वितुळणे [12]। सांवरूनि, प्राणे ।
अक्रमाचे [13] श्वसणे । ठेऊनि ठायीं ,।।1557।।

1 तेजोमय
2 ठळक दिसतो 3 न शोधता
4 ब्रह्ममय अवस्थेचा स्विकार,त्याग करीत
5 घामाचे बिंदु
6 आंगाला आंगाचा आधार घेऊन
7 कंप थांबवण्याकरित 8 कडा
9 भरती 10 ओसंडत होते
11 आवंढा
12 विस्कळीतपणा
13 अनियमीतपणा

अर्जुन उवाच

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ।।73।।

अर्जुन म्हणालाः हे अच्युता ! तुमच्या प्रसादाने मोह नष्ट झाला; आणि मला कर्तव्य धर्माची स्मृति झाली. मी आतां निःसंदेह होऊन राहिलो आहे . तुमच्या म्हणण्याप्रमाणे युद्ध करितो.

मग अर्जुन म्हणे, '' काय देवो । पुसताति, आवडे ' मोहो ? ' ।
तरी तो सकुटंब गेला जी ठावो । घेऊनि आपुला ।।1558।।
पासी येऊनि, दिनकरे । डोळ्यांते अंधारे ।
पुसिजे , हे कायि सरे[14] । कोणे गांवी ? ।।1559।।
तैसा, तूं श्रीकृष्णराया । आमुचिया डोळ्यां ।
गोचर, हेचि कयिसया । न पुरे, तंव ?।।1560।।

14 संभवनीय आहे?

वरी लोभे मायेपासूनी । ते सांगसी तोंड भरूनी ।
जे कयिसेनिही करुनी । जाणूं नये ?।।1561।।
आतां, मोह असें कीं नाहीं । हे ऐसें जी पुससी काई ।
कृतकृत्य जाहलो पाहीं । तुझेंपणें ।।1562।।
गुंतलो होतों अर्जुनगुणे, । तो मुक्त जालों तुझेंपणें ।
आतां पुसणे, सांगणे । दोन्ही नाही ।।1563।।
मी तुझेनि प्रसादे । लाधलेनि आत्मबोधे, ।
मोहाचे तया कांदे । नेदीच उरों ।।1564।।
आतां, करणे का ं न करणें , । हें जेणे उठी ,दुजेपणें ,।
ते ,तूं वांचूनि नेणे । सर्वत्र गा ।।1565।।
येविषयी माझ्या ठायीं । संदेहाचे नुरेचि कांही ,।
त्रिशुद्धी कर्म जेथ नाही । ते मी जालों ।।1566।।
तुझेनि, मज मी पावोनी । कर्तव्य गेलें निपटूनी ।
परी, आज्ञा तुझी वांचोनी । आन नाहीं प्रभो ।।1567।।
कां, जे दृश्य दृश्याते नाशीं, । जे, दुजे द्वैताते ग्रासी, ।
जे एक, परी सर्वदेशी । वसवी सदा ।।1568।।
जयाचेनि संबंधे बंधु फिटे, । जयाचिया आशा, आस तुटे, ।
जे भेटलेया सर्व भेटे, । आपणपांचि ।।1569।।
ते तूं गुरुलिंग जी माझें । जे येकलेपणीचें विरजे [1],। 1 ऐक्यपणाला मदत करते
जयालागी वोलांडिजे [2]। अद्वैतबोधु ।।1570।। 2 दूर करतो
आपणचि होऊनि ब्रह्म, । सारिजे कृत्याकृत्यांचे काम, ।
मग कीजे का निःसीम । सेवा जयाची ।।1571।।
गंगा सिंधू सेवूं गेली । पावतांचि समुद्र जाली ।
तेवी, भक्ता सेल [3] दिधली । निजपदाची ।।1572।। 3 योग्यता
तो तूं माझा जी निरुपचारु [4]। श्रीकृष्णा ! सेव्य,सद्गुरु। 4 अकृत्रिम
मा, ब्रह्मतेचा उपकारु । हाचि मानी ।।1573।।
जे मज,तुम्हां आड, । होते भेदाचें कवाड, ।
ते फेडोनि केलें गोड । सेवासुख ।।1574।।
तरी, आतां तुझी आज्ञा । सकळ, देवाधिदेवराज्ञा ! ।
करीन, देई अनुज्ञा । भलतियेविषयीं ''।।1575।।
यया अर्जुनाचिया बोला, । देवो नाचे, सुखे भुलला, ।
म्हणे ,'विश्वफळा जाला । फळ हा मज '।।1576।।
उणेनि उमचला [5] सुधाकरु , । देखुनी आपला कुमरु [6], । 5 पोर्णीमेचा चंद्र 6 पुत्र
मर्यादा , क्षीरसागरु । विसरेचिना ?।।1577।।

ऐसें संवादाचिया बहुलां [1] । लग्न दोघांचियां आंतुला [2] ,। 1 बोहल्यावार 2 मनोमिलन
लागले देखोनि, जाला । निर्भरु [3] संजयो ।।1578।। 3 तन्मय
तेणें, म्हणतसे संजयो ,।'' बाप! कृपानिधी रावो ।
तो आपुला मनोभावो । अर्जुनेसी केला'' ।।1579।।
तेणें उचंबळलेपणें, । संजय धृतराष्ट्राते म्हणे, ।
'' जी! कैसें बादरायणें [4] । रक्षिलो दोघे ? ।।1580।। 4 व्यासामुळे
आजि तुमते अवधारा, । नाहीं चर्मचक्षूही संसारा [5] ,। 5 व्यवहारापुरते
की, ज्ञानदृष्टिव्यवहारा[6] । आणिलेती ।।1581।। 6 ज्ञानद्रष्टीने व्यवहार करण्यास
आणि रथींचिये राहाटी [7]। घेई जो घोडेयासाठी [8], । 7 मोठ्या वीरांच्या बरोबरीने
तया आम्हां [9],या गोष्टी । गोचरा होती ? ।।+1582।। वावरण्यास 8 केवळ अश्वपरिक्षक
वरी जुंझाचे निर्वाण [10] । मांडले असें दारुण ,। 9 त्या मला 10 अनर्थ
दोहीं हारी[11], आपण । हारपिजे [12]जैसे ।।1583।। 11 कुणीही हरले तरी 12 नाश
येवढा जिये सांकडां [13] । कैसा अनुग्रहो ! पै, गाढा । 13 संकट
जे ब्रह्मानंदु उघडा [14]। भोगवीतसे ''।। 1584।। 14 स्पष्टपणे
ऐसें संजय बोलिला । परी न द्रवे येरु , उगला [15],। 15 निर्विकार
चंद्रकिरणी शिवतला । पाषाणु जैसा ।।1585।।
हे देखोनि तयाची दशा, । मग करीचिना सरिसा [16] । 16 पुढे बोलवेना
परी सुखे जाला पिसा [17] ,। बोलतसे ।।1586।। 17 वेडा
भुलविला हर्षवेगें । म्हणौनि, धृतराष्ट्रा सांगे ।
एऱ्हवी नव्हे तयाजोगें । हे, कीर जाणें ।।1587।।

संजय उवाच

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ।।74।।

याप्रमाणे अंगावार रोमांच उभे करणारा वासुदेव व माहात्मा अर्जुन यांचा हा अद्भूत संवाद मी ऐकिला

मग म्हणे, ''पै, कुरुराजा! । ऐसा बंधुपुत्र तो तुझा।
बोलिला, ते अधोक्षजा [18] । गोड जाले ।।1588।। 18 कृष्णाला
अगा! पूर्वापर सागर । यया, नामसीचि सिनार [19], । 19 वेगळेपणा
येर, आघवें ते नीर । एक जैसें ।।1589।।
तैसा, श्रीकृष्ण ,पार्थ , ऐसें । हें , आंगाचिपासीं दिसें , ।
मग, संवादी जी नसे । कांहीचि भेदु ।।1590।।
पै, दर्पणाहूनि चोखे । दोन्ही होती सन्मुखे, ।
तेथ, येरी, येर देखे । आपणपें जैसे ।।1591।।

तैसा देवेसी पंडुसुतु, । आपणपें देवीं देखतु ।
पांडवेंसीं देखे अनंतु । आपणपें पार्थी ।।1592।।
देव देवो भक्तालागी । जियें विवरूनि [1] देखे आंगी, । 1 वेगवेगळ्या जागी
येरु तियेचेही भागी । दोन्ही देखे ।।1593।।
आणि कांहीच नाहीं । म्हणौनि करिती काई ?।
दोघे येकपणे पाही । नांदताती ।।1594।।
आतां भेदु जरी मोडे, । तरी प्रश्नोत्तर कां घडे ?।
ना भेदुचि[2] , तरी जोडे । संवादसुख कां ? ।।1595।। 2 भेद गेल्यावर
ऐसे बोलता दुजेपणे । संवादी, द्वैत गिळणे ।
ते ऐकिले बोलणे । दोघांचें मियां ।।1596।।
उटूनि दोन्ही आरसे । वोडविलीया सरिसे [3], । 3 समोरासमोर ठेवले
कोण कोणा पाहातसे । कल्पावें पां ? ।।1597।।
कां, दीपासन्मुखु । ठेविलया दीपकु, ।
कोण कोणा अर्थिकु [4] । कोण जाणे ? ।।1598।। 4 प्रकाशक
नाना, अर्कापुढे अर्कु । उदयलिया आणिकु ,।
कोण म्हणे प्रकाशकु ?। प्रकाश्य कवण ? ।।1599।।
हे निर्धारु जातां फुडे [5] ,। निर्धारासि ठक पडे [6] । 5 खरोखर 6 स्तब्धता येते
ते दोघे जाले एवढे । संवादे , सरिसे ।।1600।।
जी मिळतां दोन्ही उदके-।माजी, लवण वारुं ठाके [7] ?। 7 रोखता येईल
की तयासींही निमिखे [8] । तेचि होय ।। 1601।। 8 विरघळून
तैसें, श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही । संवादले, ते मनी ।
धरितां, मजही वानी [9]। तेचि होतसे ।। 1602।। 9 प्रकार
एसे म्हणे ना मोटके [10], । तंव हिरोनि सात्त्विकें ,। 10 जेमतेम
आठव नेला[11] ,नेणो कें । संजयपणाचा ।।1603।। 11 स्मृती गेली
रोमांच जंव फरके [12], । तंव तंव आंग सुरके [13] । 12 उठले 13 संकोचते
स्तंभ ,स्वेदांते जिंके । एकला कंपु ।।1604।।
अद्वयानंदस्पर्शे, । दिठी रसमय [14]जाली असें । 14 अश्रुपूर्ण
ते अश्रु नव्हती, जैसे । द्रवत्वचि [15]।।1605।। 15 पाझर
नेणों, काय न माय [16]पोटी ,। नेणों काय गुंफे [17]कंठी ,। 16 सामावले 17 अडकले
वागर्था पडत मिठी । उससांचिया[18] ।।1606।। 17 धाप लागली
किंबहुना, सात्त्विका आठां ,। चाचरु मांडतां [18]उमेठा[19], । 18 बोबडी वळली असता
संजयो जालासे चोहटां । संवादसुखाचा ।।1607।। 19 अतीशय
तया सुखाची ऐसी जाती, । जे , आपणचि धरी शांती।
मग पुढती देहस्मृती । लाधली तेणें ।।1608।।

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ।
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ।।75।।
व्यासांच्या अनुग्रहामुळे हे परमगुह्य म्हणजे योग अर्थात कर्मयोग साक्षात् योगेश्वर श्रीकृष्ण स्वतः सांगत असतां मला ऐकावयास मिळाला.

तेव्हां बैसतेनि आनंदे [1]। म्हणें जी !,''जे उपनिषदे । — 1 आनंदाचा आवेग ओसरल्यावर
नेणती, ते व्यासप्रसादें । ऐकिले मियां ।।1609।।
ऐकतांचि ते गोठी, । ब्रह्मत्वाची पडिली मिठी ।
मीतूंपणेंसी सृष्टी । विरोनि गेली ।।1610।।
हे आघवेचि का योग, । जया ठाया येती ,मार्ग ।
तयाचें वाक्य [2] सवंग [3] । केले मज व्यासे ।।1611।। — 2 भाषा 3 सोपी
अहो! अर्जुनाचेनि मिषे, । आपणपेचि दुजे ऐसें ।
नटोनि, आपणया उद्देशे । बोलिले जे देव, ।।1612।।
तेथ की माझें श्रोत्र । पाटाचे [4] जालें जी पात्र । — 4 थोर
काय वानू स्वतंत्र । सामर्थ्य श्रीगुरुचें ? ।।1613।।

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहु ः।।76।।
हे राजा, धृतराष्ट्रा ! केशव व अर्जुन या दोघांच्या या अद्भुत व पुण्याकारक संवादाची आठवण होऊन मला पुनः पुनः हर्ष होत आहे .

राया हे बोलतां,विस्मित होये[5] । तेणेंचि,मोडावला ठाये [6] । — 5 चमकला 6 देहभान हारपले
रत्नी की रत्नकिळा [7]ये । झाकोळित [8]जैसी ।।1614।। — 7 रत्नाची प्रभा 8 पसरते
हिमवंतीचीं सरोवरें , । चंद्रोदयीं होती काश्मीरें [9] ,। — 9 स्फटिकासारखी
मग, सूर्यागमीं माघारे । द्रवत्व ये ।।1615।।
तैसा, शरीराचिया स्मृती, । तो संवादु संजय चित्ती ।
धरी, आणि पुढती । तेचि होय [10]।।1616।। — 10 तल्लिन होतो

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।
विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ।।77।।
आणि श्रीहरीचे ते अत्यद्भुत विश्वरूप मनांत येऊन हे राजा! मला मोठा विस्मय वाटतो व पुनः हर्ष होतो !

मग उठोनि म्हणे .''नृपा! । श्रीहरीचिया विश्वरूपा ।
देखिलया, उगा कां पां । असों लाहसी ? ।।1617।।

न देखणेनि जें दिसें , । नाहींपणेंचि जे असें ,।
विसरें, आठवे [1] ,तै कैसे । चुकऊं आतां ? ।।1618।। — 1 विसरु म्हटले तरी आठवते
देखोनि चमत्कारु । कीजे ,तो नाहीं पैसारु[2], । — 2 विस्तार
मजहीसकट महापूरु । नेत आहे ।।+1619।।
ऐसा श्रीकृष्णार्जुन-।संवादसंगमी स्नान ।
करूनि, देतसे तिळदान । अहंतेचे ।।1620।।
तेथ असंवरे आनंदे [3] । अलौकिकही ,कांही स्फुंदे, । — 3 आवरता न येणाऱ्या आनंदाने
''श्रीकृष्ण ''म्हणे सद्‌गदें। वेळोवेळां ।1621।।
या अवस्थांची कांही । कौरवांते परी[4] नाहीं । — 4 महत्व
म्हणौनि, रायें ते कांहीं । कल्पावें जंव ,।।1622।।
तंव, जाला सुखलाभु, । आपणपां करूनि स्वयंभु, ।
बुझाविला अवष्टंभु [5] । संजयें तेणें ।।1623।। — 5 अष्टांग भावांना आलेला आनंद आवरला
तेथ कोणी येकीं अवसरी । होआवी, ते करूनि दुरी, ।
रावो म्हणे, '' संजया! परी [6]। कैशी तुझी गा ? ।।1624।। — 6 रीत
तेणें तूंते येथें व्यासें । बैसविलें कासया उद्देशें ? ।
अप्रसंगामाजी ऐसें । बोलसी काई ?'' ।।1625।।
रानींचे राउळा नेलिया, । दाही दिशा मानी सुनिया [7]। — 7 दाही दिशा चुकल्यासारखे वाटते
कां, रात्री होय पाहलया [8] । निशाचरां ।।1626।। — 8 पाहाटे
जो जेथिंचे गौरव नेणें, । तयासि ते भिंगुळवाणें [9] । — 9 विपरीत
म्हणौनि अप्रसंगु तेणें । म्हणावा की तो ! ।।1627।।
मग म्हणे, '' सांगे प्रस्तुत । उदयलेसें जे उत्कळित [10], । — 10 युद्ध
ते कोणासि बा रे ! जैत । देईल शेखीं [11] ? ।।1628।। — 11 शेवटी
एऱ्हवी, विशेषें बहुतेक । आमुचे ऐसें मानसिक, ।
जे दुर्योधनाचे अधिक ।प्रताप सदा ।।1629।।
आणि, येरांचेनि पाडें [12], । दळही याचें देव्हडे [13] । — 12 तुलनेने 13 दीडपट
म्हणौनि, जैत फुडें [14] । आणील ना ते ? ।।1630।। — 14 खरेच
आम्हां तंव गमे ऐसें । मा, तुझें ज्योतीष कैसें ?।
ते नेणों, संजया ! असें । तैसें सांग पां ''! ।।1631।।

यत्र योगेशवरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।78।।

जिकडे योगेश्वर श्रीकृष्ण व जिकडे धनुर्धर अर्जुन तिकडेच श्री,विजय,शाश्वत ऐश्वर्य व नीति , असें माझें मत आहे .

यया बोला संजयो म्हणे । '' जी! येरयेरांचें मी नेणें ,।
परी आयुष्य ,तेथे जिणे । हे फुडे [1] की गा ! ।। 1632।। 1 सत्य
चंद्रु तेथें चंद्रिका, । शंभु तेथें अंबिका ,।
संत तेथें विवेका । असणें कीं जी ! ।।1633।।
रावो तेथें कटक [2], । सौजन्य तेथें सोयरीक, । 2 सेना
वन्हि तेथे दाहक । सामर्थ्य की ।।1634।।
दया तेथें धर्मु, । धर्मु तेथे सुखागमु ,।
सुखीं पुरुषोत्तमु । असें जैसा ।।1635।।
वसंतु तेथे वनें । वन तेथें सुमनें [3],। 3 फुले
सुमनीं पालिंगनें [4] । सारंगांची [5] ।।1636।। 4 समुदाय 5 भ्रमरांचे
गुरु तेथ ज्ञान, । ज्ञानी आत्मदर्शन ।
दर्शनी समाधान । आथी जैसे ।।1637।।
भाग्य तेथ विलासु, । सुख तेथ उल्लासु [6] । 6 प्रसन्नता
हे असो; तेथ प्रकाशु । सूर्य जेथें ।।1638।।
तैसें, सकल पुरुषार्थ । जेणें स्वामी का सनाथ, ।
तो श्रीकृष्णरावो जेथ, । तेथ लक्ष्मी ।।1639।।
आणि, आपुलेनि कांतेसीं । ते जगदंबा जयापासीं, ।
अणिमादिकीं[7] काय दासी । नव्हती तयाते ? ।।1640।। 7 अष्ट महासिद्धी
कृष्ण विजयस्वरूप निजांगे [8],। तो राहिला असें जेणे भागे,। 8 मूर्तीमंत
तै, जयो लागवेगे[9] । तेथेंचि आहे ।।1641।। 9 लागलीच
विजयो नामें अर्जुन विख्यातु,। विजयस्वरूप श्रीकृष्णनाथु,।
श्रियेसीं [10] ,विजय निश्चितु । तेथेंचि असें ।।1642।। 10 लक्ष्मीसह
तयाचिये देशींच्या झाडी ,। कल्पतरूते होडी [11]। 11 पैज लावता
न जिणावे कां [12] ? येवढीं । मायबापें असतां ? ।।1643।। 12 न जिंकणार तर काय
ते पाषाणही आघवें । चिंतारत्नें [13] कां नोहावें ?। 13 चिंतामणी
तिये भूमिके कां न यावें । सुर्वणत्व ? ।।1644।।
तयाचिया गांवींचिया । नदी, अमृते वाहाविया ।
नवल कायि राया ! । विचारी पां ? ।।1645।।
तयाचें बिसाट शब्द [14] । सुखे म्हणो येती वेद । 14 स्वैर बोलणे
सदेह [15] सच्चिदानंद । कां न व्हावे ते ? ।।1646।। 15 मूर्तीमंत
पै, स्वर्गापवर्ग दोन्ही, । इये पदें जया अधीनीं [16], । 16 स्वाधीन
तो श्रीकृष्ण बाप ! जननी । कमळा जया ,।।1647।।
म्हणौनि, जिया बाही उभा । तो लक्ष्मीयेचा वल्लभा, ।
तेथे सर्वसिद्धी स्वयंभा [17] ,। येर मी नेणें ।।1648।। 17 आपोआप असतात

आणि समुद्राचा मेघु । उपयोगे[1] ,तयाहूनि चांगु ।
तैसा पार्थी आजि लागु । आहे ,तये ।।1649।।
कनकत्वदीक्षागुरु [2]।लोहा ,परिसु होय ,कीरु [3]! ।
परी, जगा पोसिता व्यवहारु [4], ।तेचि जाणे [5]।।1650।।
येथ गुरुत्वा येतसे उणे, । ऐसें झणे [6]कोण्ही म्हणे ,।
वन्हि , प्रकाश ,दीपपणे । प्रकाशी आपुला ।।1651।।
तैसा, देवाचिया शक्ती, । पार्थु देवासीचि बहुती ।
परी माने [7] , इये स्तुती । गौरव असें ।।1652।।
आणि, पुत्रें मी सर्व गुणी । जिणावा, हे बापा शिराणी [8]।
तरी ते शाङ्गर्पाणी [9]। फळा आली ।। 1653।।
किंबहुना, ऐसा , नृपा! । पार्थु जालासे कृष्णकृपा ।
तो जयाकडे साक्षेपा । रीति[10] आहे ,।।1654।।
तोचि गा विजयासि ठावो । येथ तुज कोण संदेहो ? ।
तेथ न ये, तरी वावो [11] । विजयोचि होय ।। 1655।।
म्हणौनि, जेथ श्री, तेथे श्रीमंतु , । तेथ तो पंडूचा सुतु , ।
तेथ विजय, समस्तु । अभ्युदयो [12] तेथ ।।1656।।
जरी व्यासाचेनि ,साचें [13],। धिरे (मानी) मन तुमचे [14], ।
तरी या बोलाचे । ध्रुवचि माना[15] ।। 1657।।
''जेथ तो श्रीवल्लभु, । जेथ भक्तकदंबु [16], ।
तेथ सुख आणि लाभु । मंगळाचा ''।।1658।।
या बोला आन होये, । तरी व्यासाचा अंकु न वाहे [17] ।
ऐसें गाजोनि बाहे । उभिली तेणें ।।1659।।
एवं, भारताचा आवांका [18] । आणूनि श्लोका येका, ।
संजये कुरुनायका । दीधला हाती ।।1660।।
जैसा, नेणो केवढा वन्ही, । परी गुणाग्री [19] ठेऊनी ,।
आणिजे, सूर्याची हानी । निस्तरावया ।।1661।।
तैसें ,शब्दब्रह्म अनंत । जाले सवालक्ष भारत ।
भारताचे शते सात । सर्वस्व , गीता ।।1662।।
तयाही सातां शतांचा । इत्यर्थु, हा श्लोक शेषीचा ।
व्यासशिष्य संजयाचा । पूर्णोद् गारु जो ।।1663।।
येणें येकेंचि श्लोकें । राहे [20],तेणें असकें [21] ।
अविद्याजाताचे निके [22] । जिंतले होय ।।1664।।
ऐसे, श्लोक शते सात । गीतेचीं पदे[23] आंगे वाहत[24] ।
पदे म्हणो, की परमामृत । गीताकाशीचें ।।1665।।

1 मदत करितो
2 लोखंडाला सोने करणारा 3 आहे
पण 4 जगाच्या व्यवहारात
5 सोन्यालाकिंमत आहे 6 कदाचित
7 तुलनेने मोठा वाटतो
8 इच्छा
9 श्रीकृष्णाची
10 मनोभावे
11 व्यर्थ
12 उत्कर्ष
13 सत्य बोलण्यावर
14 विश्वास असेल 15 वज्रलेप
समजा 16 भक्तसमुदाय
17 शिष्य म्हणवणार नाहीं
18 अभिप्राय
19 वातीच्या टोकावर
20 हृदयी धरिला 21 संपूर्ण
22 खरोखर
23 पाउले 24 चालतात

की, आत्मराजाचिये सभे, । गीते वोडवले हे खांबे ।
मज श्लोक प्रतिभे । ऐसें येत ।।1666।।
की, गीता हे सप्तशती । मंत्रप्रतिपाद्य भगवती [1], ।
मोहमहिषा मुक्ति । आनंदली असें ।।1667।।
म्हणौनि, मनें,कायें,वाचा । जो सेवकु होईल इयेचा , ।
तो स्वानंदसाम्राज्याचा । चक्रवर्ती करी ।।1668।।
की, अविद्यातिमिररोखें [2]। श्लोक सूर्याते पैजा जिंके ।
ऐसें प्रकाशिले गीतामिषे, । राये, श्रीकृष्णे ।।1669।।
कीं, श्लोकाक्षरद्राक्षलता ,। मांडव जाली आहे गीता ।
संसारपथश्रांता [3]। विसंवावया ।।1670।।
की, सभाग्यसंती भ्रमरी । केले , ते श्लोककल्हारी [4] ।
श्रीकृष्णाख्यसरोवरीं । सासिन्नली [5] हे ।।1671।।
की, श्लोक नव्हती ,आन । गमे गीतेचे महिमान [6] ,।
वाखाणितें बंदिजन [7] । उदंड जैसे ।।1672।।
की, श्लोकांचिया आवारा [8], । सात शते करुनि सुंदरा, ।
सर्वागम [9] गीतापुरा । वसो आलें [10] ।।1673।।
की, निजकांता आत्मया । आवडी[11], गीता, मिळावया ।
श्लोक नव्हती, बाह्या-। पसरु का जो ।।1674।।
की, गीताकमळीचे भृंग। की हे गीतासागरतरंग।
की हरीचे हे तुरंग [12] । गीतारथींचे ।।1675।।
की श्लोक सर्वतीर्थ संघातु । आला, श्रीगीतेगंगे आंतु ।
जे अर्जुन नर सिहंस्थु । जाला म्हणौनि ।।1676।।
की नोहे हे श्लोकश्रेणी, । अचिंत्यचित्तचिंतामणी ।
की निर्विकल्पां लावणी । कल्पतरुंची ।।1677।।
ऐसिया शते सात श्लोकां । परी आगळा [13] येकयेका ।
आतां, कोण वेगळिका [14]। वानावा [15] पां ? ।।1678।।
तान्ही आणि पारठी [16], । इया कामधेनूते दिठी ।
सूनि [17] , जैसिया गोठी । कींजती ना ! ।।1679।।
दीपा, आगिलु, मागिलु [18], । सूर्यु धाकुटा, वडीलु ।
अमृतसिंधु खोलु । उथळु, कायसा ? ।।1680।।
तैसें पहिले सरते । श्लोक न म्हणावे गीते ।
जुनी,नवी पारिजाते । आहाती काई? ।।1681।।
आणि श्लोका पाडु [19] नाहीं, । हे, कीर समर्थु काई ।
येथ वाच्यवाचकही ,। भागु न धरी [20] ।।1682।।

1 देवी
2 अज्ञानरुप अंधाराच्या दृष्टिने
3 संसार मार्गातील थकलेल्या वाटसरुला
4 श्लोकरूपी कमळानी युक्त
5 भराला आली
6 मोठेपणा
7 भाट
8 तट
9 वेदज्ञ 10 वस्तीला आले
11 प्रेमाने
12 घोडे
13 श्रेष्ठ
14 वेगळा करून 15 तारीफ करावी 16 वयस्कर
17 अशी दृष्टि ठेवून
18 मागचा पुढचा
19 तुलना
20 वेगळे भाग करिता येत नाहीत

जे इये शास्त्री येकु । श्रीकृष्णचि वाच्य, वाचकु ।
हे प्रसिद्ध जाणे लोकु । भलताही ।।1683।।
येथें अर्थे ,तेचि पाठे । जोडे, येवढेनि घटे [1]। 1 घडते
वाच्यवाचक येकवटे ,। साधिते शास्त्र ।। 1684।।
म्हणौनि, मज कांही । समर्थनी आतां विषय नाही ।
गीता जाणा हें वाङमयी । श्रीमूर्ती प्रभूची ।।1685।।
शास्त्र ,वाच्यें, अर्थे फळे, । मग आपण मावळे ।
तैसें नव्हे, हे सगळें । परब्रह्मचि ।।1686।।
कैसा विश्वाचिया कृपा, । करूनि महानंद सोपा, ।
अर्जुनव्याजी रूपा । आणिला देवें ।।1687।।
चकोराचेनि निमित्तें ,। तिन्ही भुवनें संतप्ते, ।
निवविलीं , कळावंते [2]। चंद्रे जेवीं ।।1688।। 2 नाना कळा असलेल्या
कां, गौतमाचेनि मिषे, । कळिकाळज्वरितोद्देशें [2]। 3 कळीकाळाच्या तापाने
पाणिढाळु[3] गिरीशें । गंगेचा केला ।।1689।। पीडलेल्यांच्या उद्धारासाठा
तैसें, गीतेचें हे दुभते । वत्स करूनि पार्थाते, । 4 खाली आणले
दुभीनली [5] जगापुरते । श्रीकृष्ण , गाय ।।1690।। 5 दोहन केले
येथे जीवें जरी नाहाल । तरी हेंचि कीर होआल ।
नातरी, पाठमिषे तिंबाल [6] । जीभचि जरी ,।।1691।। 6 उच्चाराल
तरी, लोह, एके अंशे । झगटलिया परिसें, ।
येरीकडे अपैसें । सुवर्ण होय ।।1692।।
तेसी, पाठाची ते वाटी, ।श्लोकपाद लावा ना जंव वोठी, ।
तंव ब्रह्मतेची पुष्टी । येईल आंगा ।।1693।।
ना, येणेसी मुख वांकडे । करूनि, ठाकाल कानवडे, ।
तरी कानींहि घेतां पडे । तेचि लेख [7] ।।1694।। 7 प्राप्ती
जे हे श्रवणें,पाठें,अर्थें । गीता , नेदी मोक्षाआरौते [8]। 8 मोक्षापेक्षा कमी
जैसा, समर्थु दाता कोण्हाते । नास्ति [9] न म्हणे ।।1695।। 9 नाहीं आहे
म्हणौनि, जाणतया सवा[10], । गीताचि येकीं सेवा । 10 सोबतीने
काय कराल आघवां । शास्त्री येरी ? ।।1696।।
आणि कृष्णार्जुनी मोकळी । गोठी चावळिली[11] जे निराळी । 11 बोलले
ते श्रीव्यासे केली करतळी । घेवो ये ऐसी ।।1697।।
बाळकाते वोरसें[12], । माय जै जेवऊं बैसे, । 12 प्रेमाने
तै, तया ठाकती[13] तैसें । घांस करी ।।1698।। 13 योग्य होईल असें
कां, अफाटा समीरणा [14] । आपैतेपण [14] ,शाहणा ,। 14 अफाट वाऱ्याला 15 स्वाधीन
केले, जैसे विंजणा [16] । निर्मूनियां ।।1699।। 16 पंखा

तैसें, शब्दे जे न लभें, । ते घडूनियां अनुष्टुभें ,।
स्त्रीशूद्रादि ,प्रतिभे । सामाविलें ।।1700।।
स्वातीचेनि पाणिये, । न होती जरी मोतियें, ।
तरी, अंगी सुंदारांचिये । कां शोभिती तिये ?।।1701।।
नादु वाद्या न येतां, । तरी कां गोचरु होता ?।
फुलें न होतां, घेपता । आमोदु केवी ?।।1702।।
गोडीं न होती पक्वान्ने, । तरी कां फावती रसनें?।
दर्पणावीण नयनें । नयनु कां दिसें ?।।1703।।
द्रष्टा श्रीगुरुमूर्ती । न रिगता दृश्यपंथी[1] ,। — 1 प्रत्यक्ष दिसला नसता तर
तरी कां ह्या उपास्ती [2]। आकळता[2] तो ? ।।1704।। — 2 सेवा 3 करणें जाणणे
तैसें, वस्तु जे असंख्यात ,। तया संख्या शते सात ।
न होती, तरी कोणा येथ । फावों शकते [4]?।।1705।। — 4 प्राप्ती झाली असती
मेघ सिंधूचे पाणी वाहे, । तरी जग तयातेचि पाहे ।
कां, जे उमप [5], ते नोहें । ठाकते कोण्हा ।।1706।। — 5 अमर्याद
आणि वाचा जे न पवे, । ते हे श्लोक न होते बरवे, ।
तरी कानें मुखे फावे, । ऐसें कां होते ?।।1707।।
म्हणौनि, श्रीव्यासाचा हो थोरु । विश्वा जाला उपकारु ,।
जे श्रीकृष्ण उक्ती ,आकारु । ग्रंथाचा केला ।।1708।।
आणि तोचि हा मी आतां । श्रीव्यासाचीं पदें पाहतां पाहतां, ।
आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया ।।1709।।
व्यासादिकांचे उन्मेख [56] ।राहाटती जेथ साशंक [7], । — 6 ज्ञान 7 चाचपडत वावरते
तेथ मीही रंक एक । चावळी करी [8]।।1710।। — 8 बडबड करतो
परी, गीता ईश्वरु भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा ।
तरी, माझिया दूर्वादळा । ना , न म्हणे की ! ।।1711।।
आणि,क्षीरसिंधूचिया तटा [9]। पाणिया येती गजघटा[10],। — 9 काठी 10 हत्तीचे कळप
तेथ काय मुरकुटा [11] । वारिजत[12] असे ?।।1712।. — 11 चिलट 12 नाकारत असें
पांख फुटे पांखिरुं [13] । नुडे[14] , तरी नभींच स्थिरु [15],। — 13 नुकतेच पंख फुटलेले पाखरु
गगन आक्रमी सत्वरु, । तो गरुडही तेथ ।।1713।। — 14 नीट उडता न येणारे
राजहंसाचें चालणे । भूतळीं जालिया शाहाणे [16],। — 15 तरंगते 16 प्रसिद्ध
आणिके काय कोणें । चालावेचिना ? ।।1714।।
जी! आपुलेनि अवकाशे [17], । अगाध जळ घेपे कलशे, । — 17 व्याप्तीमुळे
चुळीं, चूळपणा ऐसें । भरूनि न निघे ? ।।1715।।
दिवटीच्या आंगी थोरी [18]। तरी ते बहु तेज धरी । — 18 आकाराने मोठी
वाती आपुलिया परी । आणीच की ना ? ।।1716।।

जी ! समुद्राचेनि पैसे [1],। समुद्री आकाशा आभासे ।
थिल्लरीं, थिल्लाराऐसें । बिंबेचि पै ! ।।1717।
तेवीं, व्यासादिक महामती । वावरो येती इये ग्रंथीं ,।
मा, आम्ही ठाको[2] , हे युक्ती । न मिळे [3]कीर ।। 1718।।
जिये सागरीं जळचरें । संचरती मंदराकारे , ।
तेथ देखोनि , शफरे [4] येरे । पोहो न लाहती ? ।।1719।।
अरुण आंगाजवळिके, । म्हणौनि सूर्याते देखे , ।
मा, भूतळींची न देखे । मुंगी काई ? ।।1720।।
यालागी, आम्हां प्राकृतां,[5] । देशिकारे बंधे गीता,[6] ।
म्हणणे 'हें अनुचिता '। कारण नोहे ।।1721।।
आणि बापु पुढां जाये, । ते घेत पाउलाची सोये [7],।
बाळ ये, तरी न लाहे । पावों कायी[8] ? ।।1722।।
तैसा, व्यासाचा मागोवा घेतु , । भाष्यकाराते वाट पुसतु , ।
अयोग्यही मी, न पवतु [9], । कें जाईन ? ।।1723।।
आणि पृथ्वी ,जयाचिया क्षमा ,। नुबगे स्थावर ,जंगमा ,।
जयाचेनि अमृते, चंद्रमा । निववी जग ।।1724।।
जयाचे आंगिक असिके । तेज, लाहोनि अर्के [10] ।
आंधाराचे सावाईकें [11] । लोटिजत आहे [12] ।।1725।।
समुद्रा जयाचें तोय ,। तोया जयाचें माधुर्य, ।
माधुर्या सौंदर्य । जयाचेनि, ।।1726।।
पवना जयाचें बळ , । आकाश जेणे पघळ [13] ।
ज्ञान जेणे उज्ज्वळ [14]। चक्रवर्ती ,।।1727।।
वेद जेणें सुभाष , । सुख जेणे सोल्लास [15] ।
हे असो; रुपस [16] । विश्व जेणें ,।।1728।।
तो सर्वोपकारी समर्थु । सद्‌गुरु श्रीनिवृत्तिनाथु ।
राहाटत असें मजही आंतु । रिघोनिया ।।1729।।
आतां , आयती गीता , जगी। मी सांगे मऱ्हाठिया भंगी [17] ,।
येथ कें विस्मयालागी । ठावो आहे ?।।1730।।
श्रीगुरुचेनि नांवे , माती ,। डोंगरी , जयापासी होती, ।
तेणें कोळिये, त्रिजगतीं । येकवद [18] केली ।।+1731।।
चंदने वेधली[19] झाडे,। जाली चंदनाचेनि पाडे [20]।
वसिष्ठे मानिली, की भांडे [21]। भानूसी, शाटी[22]।।1732।।
मा, मी तव चित्ताथिला [23] , । आणि श्रीगुरु ऐसा दादुला , ।
जो दिठीवेनि आपुला । बैसवी पदीं ।।1733।।

1 विस्ताराने
2 थांबावे 3 संयुक्तिक वाटत नाही
4 लहान मासे
5 सामान्य 6 मराठीत
7 पाउलांचा मागोवा घेत
8पोचणार नाही का?
9 न पोचता
10 सूर्य
11 अंधाराचे सर्व व्यवहार 12 दूर करितो
13 व्यापक
14 लखलखीत
15 आनंदमय
16 सुंदर
17 रीतीने
18 एकत्र केले
19 सुगंधीत केली 20 योग्यतेची
21 भांडते 22 छाटी
23 चित्तसंपन्न

आधींचि देखणे दिठी, । वरी सूर्य पुरवी पाठी, ।
तै, न दिसें ऐसी गोठी । केंही आहे ? ।।1734।।
म्हणौनि, माझे नित्य नवे । श्वासोच्छ्वासही, प्रबंध होआवे ,।
श्रीगुरुकृपा काय नोहे ?। ज्ञानदेवो म्हणे ।।1735।।
याकारणे, मियां । श्रीगीतार्थु मऱ्हाठिया ।
केला, लोकां यया । दिठीचा विषो ।।1736।।
परी मऱ्हाठे बोलरंगें । कवळितां [1],पै, गीतांगे [2] ,। — 1 स्वाद घेता 2 गीतेतील पदें
तै, गातयाचेनि पांगे [3] । येकाढतां नोहे [4] ।।1737।। — 3 उणीव 4 अपूर्णता नाहीं
म्हणौनि गीता गावों म्हणे[5], । तै, गाणिवें होती लेणे [6]। — 5 गाऊन म्हटली 6 गाण्याला भूषण होते
ना, मोकळे तरी [7],उणे । गीताही आणित ।।1738।। — 7 न गाता वाचली
सुंदर आंगी लेणें न सूये, । तै, तो मोकळा शृंगारु होये ।
ना लेइलें , तरी आहे । तैसें कें उचित ! ।।1739।।
कां, मोतियांची जैसी जाती । सोनयाही मान देती ।
नातरी मानविती [8] । अंगेचि सडीं ।।1740।। — 8 शोभतात
नाना, गुंफिली कां मोकळी, । उणी न होती परिमळी ।
वसंतागमींची वाटोळी । मोगरीं जैसीं ।।1741।।
तैसा, गाणिवेते मिरवी । गीतेवीणही [9] रंगु दावीं । — 9 न गाताहि
तो लाभाचा प्रबंधु , ओवी । केला मियां ।।1742।।
तेणें आबालसुबोधें ,। ओवीयेचेनि प्रबंधे ,।
ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें गुंथिलीं [10]।।1743।। — 10 गुंफली
आतां, चंदनाच्या तरुवरी, । परिमळालागी, फुलवरी ।
पारुखणें [11], जियापरी । लागेना कीं ! ।।1744।। — 11 थांबावे लागत नाहीं
तैसा, प्रबंधु हा श्रवणी । लागखेंवो, समाधि आणी ।
ऐकिलियाही वाखाणी,। काय व्यसन न लवी ? ।।1745।।
पाठ करितां व्याजे[12],। पांडित्यें येती वेषजे[13] । — 12 हौसेने 13 अलंकृत करते
तै, अमृताते नेणिजे । फावलिया [14] ।।1746।। — 14 प्राप्त झाले तरी
तैसेनि आइतेपणें । कवित्व जाले हे उपेणें [15] । — 15 विश्रांतिस्थान
मनन, निदिध्यास ,श्रवणे । जिंतले आतां ।।1747।।
हे स्वानंदभोगाची सेल [16], । भलतयासीचि देईल । — 16 शेलका भाग
सर्वेंद्रिया पोषवील । श्रवणाकरवीं ।।1748।।
चंद्राते आंगवणे [17] । भोगूनि, चकोर शाहाणे । — 17 स्वशक्तीने
परी , फावे जैसे चांदिणे । भलतयाही ।।1749।।
तैसें,अध्यात्मशास्त्रीं यिये । अंतरंगचि[18] अधिकारिये[19]। — 18 मर्मज्ञान
परी लोकु वाक्चातुर्ये । होईल सुखिया ।।1750।। — 19 अध्यात्मशास्त्रप्रवीणांना

ऐसे श्रीनिवृत्तिनाथाचें । गौरव आहे जी ! साचें ।
ग्रंथु नोहे , हे कृपेचे । वैभव तिये ! ।।1751।।
क्षीरसिंधु परिसरी । शक्तीच्या कर्णकुहरी [1], ।
नेणो कै , श्रीत्रिपुरारी । सांगितले जे ,।।1752।।
ते, क्षीरकल्लोळाआंतु । मकरोदरी गुप्तु ।
होता, तयाचा हातु । पैठे जाले [2]।।1753।।
तो मत्स्येंद्र , सप्तशृंगी । भग्नावयवा चौरंगी ।
भेटला, की तो सर्वांगी । संपूर्ण जाला ।।1754।।
मग समाधि अव्युत्थया [3]। भोगावी, वासना यया ।
ते मुद्रा [4] , श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ।।1758।।
तेणें, योगाब्जिनीसरोवरु [5]। विषयविध्वंसैकवीरु [6] ।
तिये पदी कां सर्वेश्वरु । अभिषेकिला ।।1756।।
मग तिहीं, ते, शांभव [7]। अद्वयानंदवैभव [8]।
संपादिले सप्रभव [9]। श्रीगहिनीनाथा ।।1757।।
तेणें, कळिकळितु भूतां [10] । आला, देखोनि, निरुता [11] ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ।।1758।।
'' ना, आदिगुरु शंकरा-।लागोनि , शिष्यपरंपरा ।
बोधाचा, हा संसरा [12] । जाला जो आमुते, ।।1759।।
''तो हा '' तूं घेऊनि आघवा ,। कळीं गिळितयां जीवां ,।
सर्व प्रकारी धांवा । करी [13], पां वेगी ''।।1760।।
आधींच तंव तो कृपाळु , । वरी गुरुआज्ञेचा बोलु ।
जाला , जैसा वर्षाकाळू । खवळणे मेघां ।।1761।।
मग आर्ताचेनि वोरसे [14] । गीतार्थग्रंथनमिसे [15] ।
वर्षला शांतरसे , । तो हा ग्रंथु ।।1762।।
तेथ ,पुढां, मी बापिया [16] ,। मांडला आर्ती आपुलिया ,।
की यासाठी येवढिया । आणिलो यशा ।।1763।।
एवं, गुरुक्रमे लाधले । समाधिधन जे आपुले, ।
ते ग्रंथे बोधौनि दिधले । गोसावी मज ।।1764।।
वाचूनि, पढे ना वाची । ना सेवाही जाणे स्वामीची ।
ऐशिया मज , ग्रंथाची । योग्यता कें असे ?।।1765।।
परी साचचि , गुरुनाथे । निमित्त करूनि माते ।
प्रबंधव्याजे ,जगाते । रक्षिले, जाणा ।।1766।।
तऱ्ही, पुरोहितगुणे । मी बोललो पुरें , उणें, ।
ते, तुम्हीं माउलीपणें । उपसाहिजो जी ! ।।1767।।

1 पार्वतीच्या कानात
2 मिळाले
3 निरुपाधिक
4 दीक्षा
5 योगरुपी कमलाचे सागर
6 विषयाचे कर्दनकाळ 7 शंकरापासून
मिळविलेले 8 अद्वयानंदसुख
9 प्रभावासहित दिले 10 कली
सर्व भूतांना ग्रासत
आहे हे पाहुन 11 स्पष्ट
12 लाभ
13 मदतीला जा
14 प्रेमाने 15 निमित्ताने
16 चातक

शब्द कैसा घडिजे, । प्रमेयीं कैसे पां चढिजे [1],।
अळंकारु म्हणिजे । काय, ते नेणें ।।1768।।
सायिखडेयाचे बाहुले [2],। चालविल्या सूत्राचेनि चाले ।
तैसा, माते दावीत, बोले । स्वामी तो माझा ।।1769।।
यालागी मी गुणदोष-।विषी क्षमाविना [3] विशेष ।
जे मी संजात [4] ग्रंथलो, देख । आचार्ये की ।।+1770।।
आणि तुम्हां संतांचिये सभे, । जे उणिवेंसी[5] ठाके उभे [6], ।
ते पूर्ण नोहे तै [7], लोभे । तुम्हांसीचि [8] कोपे ।।1771।।
सिवतलियाही परिसें, । लोहत्वाचिये अवदसे [9] ।
न मुकिजे आयसें, । तै, कवणा बोलु [10] ?।।+1772।।
वोहळें हेचि करावे । जे गंगेचे आंग ठाकावे , ।
मगही गंगा जरी नोहावे । तै, तो काय करी ? ।।1773।।
म्हणौनि भाग्ययोगे बहुवे, । तुम्हां संतांचे मी पाये ।
पातलो, आतां के लाहे । उणें जगी ? ।।1774।।
अहो जी! माझेनि स्वामी ! । मज संत जोडुनि तुम्ही ।
दिधलेति, तेणें सर्वकामी । परिपूर्ण जालों ।।1775।।
पाहा पां, माते तुम्हां सांगडे [11]। माहेर, तेणें सुरवाडे [12]।
ग्रंथाचे आळियाडे [13] । सिद्धी गेलें ।।1776।।
जी कनकाचे निखळ [14]। वोतूं येईल भूमंडळ ।
चिंतारत्नी कुळाचळ [15]। निर्मु येती ।।1777।।
सातांही हो सागराते । सोपे, भरितां अमृते ।
दुवाड नोहे [16] तारांते । चंद्र करितां ।।1778।।
कल्पतरुचे आराम [17] । लावितां, नाहीं विषम [18],।
परी गीतार्थाचे वर्म । निवडूं न ये ।।1779।।
तो मी येकु सर्व मुका ,। बोलोनि मऱ्हाठिया भाखा [19] ।
करी, डोळेवरी [20] लोकां। घेवों ये, ऐसें जे ।।1780।।
हा ग्रंथसागरु येव्हढा। उतरोनि पैलीकडा ,।
कीर्तिविजयाचा धेंडा । नाचे जो कां !।।1781।।
गीतार्थाचा आवारु । कलशेंसी महामेरु ।
रचूनि, माजी श्रीगुरु-।लिंग जे पूजीं ।।1782।।
गीता निष्कपट माय । चुकोनि तान्हे हिंडे जे वाय [21],।
ते मायपूता भेटी होय ,। हा धर्म तुमचा ।।1783।।
तुम्हां सज्जनांचें केलें । आकळूनी [22] जी! मी बोलें ।
ज्ञानदेव म्हणे थेकुले [23] । तैसें नोहें ।।1784।।

1 तत्त्वार्थ कसा काढावा
2 कठपुली
3 क्षमा मागत नाहीं
4 केलेला ग्रंथ
5 कमीपणासकट 6 उभा राहतो
7 परिपूर्ण झाला नाहीं तर
8 तुमच्यावरच 9 हलक्या स्थितीला 10 दोष कुणाचा
11 सारखे 12 सुखाने
13 हट्ट
14 शुद्ध
15 चिंतामण्याचे डोंगर
16 कठीण नाहीं
17 बगीचा 18 त्रास
19 भाषेत
20 प्रत्यक्ष डोळ्यांनी
21 इकडेतिकडे
22 जाणतो
23 हलकीसलकी गोष्ट नाहीं

काय बहु बोलो ! सकळां । मेळविलो जन्मफळा ।
ग्रंथसिद्धीचा सोहळा । दाविला जो हा ।।1785।।
मियां जैसजैसिया आशा ,। केला तुमचा भरंवसा, ।
ते पुरवूनि जी ! बहुवसा[1] । आणिलो सुखा ।।1786।।
मजलागी ग्रंथाची स्वामी ! । दुजीं सृष्टी जे हें केली तुम्ही,।
ते पाहोनि, हांसो आम्ही । विश्वामित्रातेही ।।1787।।
जे असोनि त्रिशंकुदोषें । धातयाही आणावें वोसें [2],।
ते नासते कींजे [3] , की[3] ऐसें । निर्मावि नाहीं ?।।1788।।
शंभु उपमन्युचेनि मोहे, । क्षीरसागरुही केला आहे ,।
येथ तोही उपमे सरी नोहे [4],। जे विषगर्भ कीं ! ।।1789।।
अंधकारु निशाचरां । गिळितां ,सूर्ये , चराचरां ,।
धांवा केला [5] , तरी खरा । ताउनी [6] जी तो ! ।।1790।।
तातलियाही जगाकारणे, । चंद्रे वेंचिलें चांदणें ,।
तया सदोषा [7], केवी म्हणे । सारिखे हें ?।।1791।।
म्हणौनि, तुम्ही मज संती । ग्रंथरुप ,जो हा त्रिजगती ।
उपयोग ,केला, तो पुढती । निरुपम जी ! ।।1792।।
किंबहुना, तुमचे केले । धर्मकीर्तन, हे सिद्धी नेले ।
येथ , माझें जी उरले ,। पाईकपण ।।1793।।
आतां, विश्वात्मकें देवें ! । येणे वाग्यज्ञे तोषावे, ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।।1794।।
जे खळांची व्यंकटी [8] सांडो । तयां, सत्कर्मी रती वाढो, ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ।।1795।।
दुरिताचें तिमिर [9] जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो,जे वांछील, तो ते लाहो । प्राणिजात ।।1796।।
वर्षत सकळमंगळीं [10] । ईश्वर निष्ठांची मांदियाळी 11।
अनवरत[12], भूतळी ,। भेटतु या भूतां ।।1797।।
चला कल्पतरूंचे आरव [13], ।चेतना [134]चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव [14] । पीयूषाचे [15] ।।1798।।
चंद्रमे जे अलांछन [16] । मार्तंड [17] जे तापहीन ,।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।।1799।।
किंबहुना, सर्वसुखी । पूर्ण होऊनि ,तिही लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।1800।।
आणि ग्रंथोपजीविये [18] । विशेषी लोकीं इये, ।
दृष्टादृष्टविजयें [19]। होआवे जी ! ।।1801।।

1 मोठया
2 उणेपणा आणण्याकरिता
3 कशाकरिता 4 नाशवंत निर्माण करावे
4 योग्य नाहीं
5 साह्यास धावला 6 ताप देऊन
7 कलांचा दोष असलेल्या
8 दुष्टांचा कुटीलपणा
9 पापांचा अंधःकार
10 सगळ्या शुभ गोष्टींचा वर्षाव करणारे 11संतजनांचे समुदाय 12 सतत 13 चालतेबोलते कल्पवक्षाचे अंकुर 13 सचेतन
14 सागर 15 अमृताचे
16 कलंकरहित 17 सूर्य
18 याच ग्रथांवर उपजीवीका करणाऱ्यांना
19 इहलोक व परलोक सौख्य

तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो, ।''हा होईल दानपसावो[1] '' ।   1 दानाचा प्रसाद
येणे वरे, ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।1802।।
ऐं से युगी परी कळी[2] । आणि महाराष्ट्रमंडळी ।   2 कलीयुगात
श्रीगोदावरीच्या कूली[3], । दक्षिणलिंगी ,।।1803।।   3 काठावर
त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र[4] ,।   4 पुरातन अशा पंचकोशीत
जेथ जगाचे जीवनसूत्र ।श्रीमहालया (श्री महाळसा) असें ।।1804।।
तेथ, यदुवंशविलासु । जो सकळकळानिवासु ,।
न्यायाते पोषी क्षितीशु[5] । श्रीरामचंद्रु ।।1805।।   5 राजा
तेथ, महेशान्वयसंभूते[6], । श्रीनिवृत्तीनाथसुते, ।   6 महेशाच्या शिष्य परंपरेत तयार झालेल्या
केले, ज्ञानदेवें, गीते । देशीकार लेणे ।।1806।।
एवं, भारताच्या गांवी, । भीष्मनाम प्रसिद्ध पर्वी , ।
श्रीकृष्णार्जुनीं , बरवी । गोठी जे केली , ।।1807।।
जे उपनिषदांचे सार, । सर्व शास्त्रांचे माहेर , ।
परमहंसी सरोवर । सेविजे जे ,।।1808।।
तिये गीतेचा कलशु । संपूर्ण हा अष्टादशु ।
म्हणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ।।1809।।
पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती ।
सर्वसुखीं सर्वभूती । संपूर्ण होईजे ।।1810।।
शके बाराशते बारोत्तरे । तै टीका केली ज्ञानेश्वरे ।
सच्चिदानंदबाबा आदरे । लेखकु जाहला ।।1811।।

एकनाथ महाराजांच्या ओव्या

श्रीशाके पंधराशें साहोत्तरी । तारणनामसंवत्सरी।
एकाजनार्दने अत्यादरीं ।गीता-ज्ञानेश्वरी प्रतिशुद्ध केली ।।1।।
ग्रंथ पूर्वीच अतिशुद्ध । परी पाठांतरी शुद्ध अबद्ध ।
तो शोधूनियां, एवंविध । प्रतिशुद्ध सिद्धज्ञानेश्वरी ।।2।।
नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका !। जयाची गीतेची वाचितां टीका ,।
ज्ञान होय लोकां । अतिभाविकां , ग्रंथार्थियां ।।3।।
बहुकाळपर्वणी गोमटी , । भाद्रपदमास कपिलाषष्ठी , ।
प्रतिष्ठानी गोदातटी ,। लेखनकामाठी[7] संपूर्ण जाहली ।।4।।   7 लेखन कार्य
ज्ञानेश्वरीपाठीं । जो ओंवी करील मऱ्हाठी , ।
तेणें अमृताचे ताटीं । जाण, नरोटी[8] ठेविली ।।5।।   8 करवंटी

।।श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगो नाम अष्टादशोऽ ध्याय ः ।।18।।

कठीण ओव्यांचे अर्थ

1. हे श्रीगुरो ! आपण स्वयंप्रकाश व अविद्यादिमलरहित आहात. आपल्या भक्तांना सर्वतोपरी मंगलकारक आहात. जन्म व वार्धक्यरुपी मेघ समुदायाचा विनाश करण्याचे बाबतीत आपण प्रबल आहात,त्या आपला जयजयकार असो.
2. देव! आपण बलवान कुळातील आहात. अज्ञान व तत्कार्य अहंकार , त्रिविध दुःख इत्यादि अमंगळ कुळांचा समूळ नाश करण्यात प्रबल आहात. वेद व शास्त्ररुपी वृक्षांचे आपण फल आहात व प्राणीकर्माचे फलदातेही आपणच आहात अशा आपला जयजयकार असो
3. देवा! आपण स्वरूपतः संपूर्ण वा स्वस्वरूप आहात. ज्यांची विषयवासना निवृत्त झाली आहे अशा वैराग्यसंपन्नावर प्रेमाने कृपा करणारे आहात. सर्वनाशक कालाच्या क्रीडेस आपण आपल्या आज्ञेने अंकित ठेवले आहे . परमार्थतः अंशरहित परिपूर्ण आहात. हे श्रीगुरुदेवा! आपला जयजयकार असो.
4. हे श्रीगुरुदेवा! आपण चिरस्थिीर आहात. शिष्याच्या चंचल चित्ताचे प्राशन करून दोंद पुष्ट झालेले आहात. वरचेवर जगदोत्पत्तिरुपी अखंड क्रीडा करणें हीच ज्यांना सदा प्रिय आहे अशा तुमचा जयजयकार असो.
5. देवा! आपले स्वरूप परमार्थतः अंश व अवयवरहित आहे . नित्य निरतिशय व स्वयंप्रकाशरूपाने स्फुरित होणारा तुमचे ठिकाणी विपुल आहे . त्या स्वरूपाचे ठिकाणी पंचक्लेश,त्रिविधदुःख,कामकर्म व अविद्या हे सर्व मल मुळिच नाहींत. संसार वृक्षास मूलभूत आधार व अधिष्ठान असणाऱ्या श्रीगुरुदेवा आपला जयजयकार असो.
6. हे देवा! तू स्वतः स्वयंप्रकाश आहेस. जगतरुपी मेघाचा गर्भ राहण्याचे आकाश, जगदोत्पत्तीच्या आरंभाचा आधारस्तंभ व संसाराचा बाध करणारा आहेस अशा देवा! तुझा जयजयकार असो.
7. हे देवा! तू अत्यंत शुद्ध आहेस . अविद्यारुपी वनाचा नाश करणारा हत्ती आहेस आणि शमदमादि साधनाद्वारा मदनाच्या गर्वाचा भेद करणारा आहेस अशा दयासागरा देवा ! तुझा जयजयकार असो
8. देवा! तू स्वगतादी सर्व भेदरहित एकरूप आहेस. मदनरुपी सर्पाचा गर्व हरण करणारा आहेस. भक्तांच्या भावनापूर्ण ह्रदयरूपी घरांतील तू दीप आहेस. आणि त्रिविध तापाचा विनाश करणारा आहेस. देवा! तुझा जयजयकार असो.
9. देवा! तुझ्यासारखा पारमार्थिक सत्तावान पदार्थ नाहीं. अशा अद्वितीय शुद्ध विवेक वैराग्यवान अधिकारी पुरुषांना आवडणारा व त्यांचेवर प्रेम करणारा आहेस. देवा! आपल्या भक्तांच्या अधीन आहेस.भजन भक्तीस योग्य आहेस. मायेस आच्छादन करण्यास अशक्य असणाऱ्या मायेच्या अतीव आहेस. तुझा जयजयकार असो.
10. हे श्रीगुरुदेवा! निर्विकल्प ब्रह्मवस्तुची प्राप्ती करून देणारा तू कल्पतरुच आहेस. तसेच आत्मज्ञानी वृक्षाच्या बीजाचे उत्पत्तिस्थान आहेस. ज्ञानाच्या वाढीस आश्रयभूत भूमी तू आहेस. श्रीगुरुदेवा! तुझा जयजयकार असो.
18. तसे, हे श्रीगुरुराया! तशीच माझी स्थिती तुम्ही केली. याशिवाय आपण माझा मीपणा नाहींसा करून स्तुतीच्या निमित्ताने माझ्या वाचेला वेड लावल
35. श्रीव्यास हे स्वभावतःच श्रेष्ठ कारागीर, सूत्रकार विशाल बुद्धीचे होते. त्यांनी मोठ्या कुशलतेने ब्रह्मसूत्रे रचिली आणि वेदरूप रत्नांच्या पर्वतावर उपनिषदार्थ पठारावर खणावयास सुरवात केली.
36. त्यावेळी त्या माळ जमीनीत धर्म,अर्थ व काम हा त्रिविध पुरुषार्थरुपी भिन्न भिन्न आकाराचे पुष्कळ गडळ,गोटे,बारीक चुरा निघाला. त्या धोंड्यांचा महाभारतरुपी तट गीतारुपी देवालयाचे भोवती बांधला.

38. मग निवृत्तीरुप ओळंबा लाऊन आखणी करून व सर्व शास्त्रांची पुरणी घालून मोक्ष मर्यादेच्या मांडणीचा आकार साधला.

63. पण तो कर्मठ दीन बिचारा अज्ञानामुळे अंध झालेला असल्यामुळे सर्व जगतात ओतप्रोत भरलेल्या एवढ्या ईश्वरासच जाणत नाहीं; असा ईश्वर प्रत्यक्ष त्याच्यापुढे असूनही जर त्यास दिसत नाहीं तर मग त्यास ब्रह्मनाम व त्या नामावरील श्रद्धेचे वर्म इत्यादि गोष्टी तरी कशा कळणार?

81. आणि आरशांत जसे स्वतःचे रूप पहावे, तसा अर्जुन संभाषणाच्या निमित्ताने जी वस्तु व्यवहारात लाभत नाहीं , तिचे दर्शन अनुभवीत होता.

134. त्याग करण्याचे युक्तीपूर्ण वर्म चुकले असता जो कर्मत्याग केला जातो त्या त्यागाचेही मनुष्यास ओझे होते. कर्मबंधात सापडतो. मात्र सर्वत्र वैराग्यसंपन्न जे आहेत ते केव्हाही त्याज्य गोष्टींचे म्हणजे निषिद्ध कर्माचे आचरण करण्याकडे वळतही नाहींत.

181. भूक लागलेल्या मनुष्यापुढे ठेवलेले कढत अन्न, मग ते वाटेल तितके उन असले तरी बुद्धीनेविचार न करता, अविचाराने ते लाथेने झुगारून दिले तर त्याला लंघनच करावे लागणार.

203 म्हणून या दोन्ही गोष्टी वर्जाव्या अणि मग आईची मनोभावे सेवा करावी; का आपले गाईचे तोंड अपवित्र असते, म्हणून तेवढ्याच कारणाकरिता सबंध गायच त्याज्य मानावी?

211. एवढे मोठे आकाश सर्वत्र असूनही जसे ते कोणीकडे दिसत नाहीं तसा बुद्ध्यादिकांपुढा जगाचा एवढा मोठा मिथ्याभास आहे , पण त्यास तो कोणीकडेही दिसत नाहीं.

246. बाहेर सोडण्याचा प्राणवायुच योगाभ्यासाने दाबून धरला असता तोच त्याहून उलट लक्षणाच्या कुंभकास कारणीभूत होतो. त्याप्रमाणे सत्य व असत्य यांचे मिश्रण झाले म्हणजे ते त्या दोहीनाहीं जिंकण्यास कारणीभूत असणारे तिसरेच निर्माण होते.

539. ज्या ज्ञानाने भूतमात्राच्या औपाधिक अनेकत्वामुळे आपण आपल्या वेगळ्या ठिकऱ्या करून घेतल्या आहेत व ज्याने ज्ञात्याला चुकवून फारच भ्रमिष्टपणा आणला आहे.

541. त्याप्रमाणे जे ज्ञान आत्मज्ञानाच्या मंदिराच्या आवाराच्या बाहेर भोवतालून मिथ्यां मायेच्या माळरानावर पसारा घालून जागृती ,स्वप्न व सुषुप्ती या तीन अवस्थांचे खेळ दाखवून जीवांस फसवते.

641. आणि अशा स्थितीतही , जसे हीणकस जळल्यामुळे सोने वजनाला कमी भरते पण कसाला चढते तसा त्याच्यात कर्माविषयी अधिक उत्साह दिसून येतो.

667. आणि अर्जुना , त्याची करणी व हेतु यांत मेळ नसल्यामुळे वेडा मनुष्यही ज्याच्या पासंगासही उतरत नाहीं

681. झोप ज्याच्याजवळ अगदी ठेवलीच असते पण दुष्ट व्यवहार करतांना मात्र जी जणू काय विटाळ होईल म्हणून दूर पळते

769. पण शब्दाचा चोखटपणा तरी कसला वानावा? कारण जर शब्दाद्वारे हे समजू जावे तर शब्दाला कानाच्या हातचा मळ लागतोच.

793 असें ज्याचे मूळ वैराग्यात आहे पण ज्याची अखेर आत्मनुभवाच्या आनंदात होते ते सुख 'सात्त्विक' म्हणतात

844 आणि माळी मेहनतीने पाणी घालून झाडाच्या मुळाशी खपत असतो पण या सर्व श्रमाचे सार्थक फळलाभाने व्हावयाचे आहे हे तो जसे जाणत असतो.

944. कुलस्त्रीयेने दुसऱ्याच्या घराचा आश्रय केला व तीथेही जर तिला दंडुक्याचे घाव सोसावे लागतात तर घरी नवरा मारतो म्हणून नवऱ्याला सोडून बाहेर पडण्यात तिने काय मिळवले?

1004 अर्जुना! जे ज्ञान आपल्या पोटात साध्य,साधक व साधन ही त्रिपुटी किंवा जागृती आदी तीन अवस्था नाहींशी करते अशा ह्या ज्ञानालाही नाहींसे करणारी जी परब्रम्ह वस्तु ,

1013 कुळस्त्री जशी सासर व माहेर या दोन्ही कुळांचा अभिमान टाकून केवळ आपल्या प्रिय पतीलाच अनुसरते तशी बुद्धी ही द्वैतभावना सोडून केवळ आत्मचिंतनातच रत होते

1017. मग विषयपासून परावृत्त झालेली इंद्रिये प्रत्यगात्म्याकडे लावून आत्माकार वृत्तिरूप गंगेच्या तीरावर आणिली व त्यांच्याकडून उत्तमचित्त शोधक प्रायश्चित्तेही करवीली.

1036. अर्जुना! गुद व शिश्न या दोन द्वारांच्या मध्यभागी जी शिवण आहे तिचा मध्य पायाच्या टाचेने दाबून प्रथम मूळबंध करतो.

1037. अधोभाग अकुंचन करून मूळ, ओढियाण व जालंधर असें तीन बंध देऊन आणि प्राणापानादी वायूचे भेद मोडून त्यांना एकत्रित करून,

1038 अर्थात अशा प्रकारे प्राणनिरोधपूर्वक कुंडलिनी जागे करून सुषुम्ना नाडीचा मार्ग विकसित करून आणि आधारचक्रपासून तो आज्ञाचक्रापर्यंत सर्व चक्राचे भेद करून उर्ध्व जातो

1039. मग ब्रह्मरंध्रातील सहस्त्रदल कमलरूपी मेघापासून चांगलिच अमृतवृष्टी होऊन त्याचा तो ओघ सुषुम्ना नाडीने मुलाधारचक्रापर्यंत खाली आणून,